म. ग्रं. सं. ठाणें.
विषय ...इतिहास...
क्र. क. २६१

विद्यमाने प्रसिद्ध करण्यात आलेली

बखर

ऊर्फ

वसईचा दुर्धर धर्मसंग्राम

ई.सन १७३९ ते १७६१

ई.सन १७३९

REFBK-0005334

लेखक:
गजानन गोविंद नाईक

ठाणे

मराठी ग्रंथसंग्रहालय संघ

नजर

वरील ग्रंथसंग्रहालयास खालील

ग्रंथाची

एक प्रत त्यांच्या इच्छेनुरूप

ग्रंथकर्ती

प्रमाणे सोसायटीकडे

अगोदर

ता १ महिन्याच्या आत पाठविली



वरळी गोपचार व भोयें संस्थानच्या विद्यमानें प्रसिद्ध होणारी

साष्टीची बखर

ऊर्फ

वसईचा दुर्धर धर्मसंग्राम



लेखक:

गजानन गोविंद नाईक

अणजूर–भिंवडी



REFBK-0005334

१२ मे १९३५

किंमत दोन रुपये

प्रकाशक:
श्री. वसंतराव दामोदर म्हात्रे,
चिटणीस,
वरळी गोपचार व भोगें संस्थान,
वरळी, मुंबई

[ह्या पुस्तकासंबंधाचे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.]

मुद्रक:
श्री. मंगेश रामचंद्र टाकी,
सद्भक्ति-प्रकाश प्रिन्टिंग प्रेस,
नानाभाई लेन, कोट, मुंबई.

प्रकाशकांचे दोन शब्द

पाठारे क्षत्रिय ज्ञातींतील एक प्रसिद्ध लेखक व गेलीं वीस पंचवीस वर्षें ऐतिहासिक साहित्याचे संशोधन करणारे आमचे मित्र श्री. गजानन गोविंद नाईक यांनीं तयार केलेला प्रस्तुतचा ग्रंथ वाचकांच्या हातीं देतांना संस्थानला फार आनंद होत आहे. संकल्प पुरा झाल्याचा हा आनंद आहे. ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वीच महाराष्ट्रांतील कांहीं थोर माणसांच्या दृष्टीखालून तो गेलेला असून त्यापैकीं कांहींनीं आपले अनुकूल अभिप्रायही व्यक्त केलेले आहेत. पैकीं डॉ. नारायणराव सावरकर यांनीं तर ह्या पुस्तकाचें 'थोडें प्राथमिक निवेदन' लिहिलें असून कर्नाटक कॉलेजचे प्रोफेसर आंग्लभाषा–वाचस्पति श्री. नीलकंठराव सदाशिव ताकखाव, M. A., I. E. S., यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक ग्रंथांतील मजकुराची छाननी करून व अनेक उपयुक्त सूचना करून आपला जो उत्कृष्ट अभिप्राय दिला आहे तो ह्या पुस्तकासच जोडला आहे.

श्री. गजाननराव नाईक यांच्या कार्य करण्याच्या पद्धतींत जें एक वैशिष्ट्य आहे तें येथें नमूद करावेसें वाटतें. कोणतेंही काम हातीं घेतल्यानंतर तें पुरें होईपर्यंत कोणत्याही इतर गोष्टींची पर्वा न करतां त्या कार्याशीं ते समरस होत असतात. परिस्थितीला न जुमानतां नियतकर्म निष्कामबुद्धीनें एकसारखें करीत राहणें, हें त्यांनीं आपलें ब्रीदच ठरविलेलें आहे. ज्या अत्यंत प्रतिकूल व निराशामय वैयक्तिक परिस्थितींत त्यांनीं प्रस्तुतचा ग्रंथ ठरलेल्या मुदतींत तयार केला त्या परिस्थितींत इतरांना तो पुरा करणें शक्यच झालें नसतें. श्री. गजाननरावांचें ह्या त्यांच्या यशाबद्दल मीं संस्थानतर्फे साभिमान अभिनंदन करतों. श्री. गजाननराव आपलें नियतकर्म निष्कामबुद्धीनें केवळ कर्तव्य म्हणून करीत असतात. मोलापुरतीच मजुरी करणें किंवा आर्थिक लाभाकरितांच एखादें कार्य हातीं घेणें, ही कल्पनाच त्यांस रुचत नाहीं. ही गोष्ट त्यांनीं प्रस्तुतचा ग्रंथ कोणत्याही प्रकारचा करार न करतां किंवा त्याचें मूल्यही न मागतां प्रकाशनाकरितां संस्थानच्या हवालीं केला ह्यावरून सिद्ध होण्यासारखी आहे. त्यांना आपला ग्रंथ कोणाही प्रकाशकाच्या हवालीं करून त्याचा मोबदलाही मिळवितां आला असता. पण तसें न करतां त्यांनीं तो संस्थानच्या हवालीं केला, ह्यावरून त्यांचा ज्ञातिहितबुद्धि व्यक्त होत आहे. त्यांच्या ह्या औदार्याबद्दल संस्थान तर त्यांचें ऋणी राहीलच पण त्यांनीं आपल्या ह्या बहुमोल कृतीनें अखिल पाठारे क्षत्रिय ज्ञातीला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. ज्ञातीनें हें ऋण अंशतः तरी फेडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ग्रथप्रकाशनाच्या व त्याकरितां लागणाऱ्या साहित्याच्या बाबतींत ज्या ज्या बांधवांचें सहाय्य झालें त्यांचे श्री. गजाननरावांनी आपल्या प्रस्तावनेंतून व्यक्तिशः आभार मानले आहेतच. मीही ह्या सर्व बांधवांचे संस्थानतर्फे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

श्री. गजाननरावांचे अशा प्रकारचे पुढील ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत संस्थानला आनंदच वाटेल, नव्हे संस्थानचें तें कर्तव्यच आहे असें म्हटलें तरी चालेल. परमेश्वर त्यांचें सदैव कल्याण करून त्यांच्या हातून अशा प्रकारचे अनेक उपयुक्त ग्रंथ निर्माण करो अशी शुभेच्छा व्यक्त करून हे 'दोन शब्द' पुरे करतों.

वरळी, मुंबई नं. १८
ता. १२ मे १९३५

वसंतराव दामोदर म्हात्रे
चिटणीस, वरळी गोपचार व भोयें संस्थान

दुरुस्ती पा. २८ ओळ १३ मध्यें accession च्या ऐवजीं occasion असें पाहिजे व ओळ ३० मध्यें be च्या ऐवजीं the असें पाहिजे.

समर्पण



वसईच्या पवित्र पावनतीर्थीं

आपल्या

सर्वस्वाचें

—अमोल प्राणांचेंही—

मोल देऊन

महाराष्ट्रधर्म व महाराष्ट्रदेश

ह्यांची ज्या धर्मवीर रणबहाद्दरांनीं सेवा केली

त्या सर्व हुतात्म्यांच्या व महात्म्यांच्या

तेजस्वी आत्म्यांच्या पदार्णवीं

अत्यंत कृतज्ञताबुद्धीनें, विनम्रभावानें

व

मोठ्या आदरानें

ही

अल्प सेवा अर्पण करीत आहे.

—ग्रंथकर्ता

गंगाजी नाईकांना श्रीचिंतामणि देवांनीं प्रसाद म्हणून दिलेली

व

अणजूर येथील नाईकांच्या माडींत असलेली

श्री सिद्धिविनायकाची मूर्ति

अस्तिभातिस्वरूपस्थं सूक्ष्मात्सूक्ष्मतरस्तथा ॥
आनंददायकः सिद्धिविनायक नमोस्तुते ॥

—साष्टीची बखर

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल क्रम
सं.....नं.
ता.....
॥ ॐ ॥

थोडें प्राथमिक निवेदन

वसईच्या घनघोर संग्रामाची आठवण नाहीं, असा महाराष्ट्रीय विरळा. यूरोपखंडांतील देशांचें आशिया खंडांतील देशांवर आक्रमण सुरू झाल्यापासून प्रथम जर कुणी पाश्चात्य राष्ट्रांचा निःपात करणारा पराभव केला असेल तर तो महाराष्ट्रांतलि मराठ्यांनीं होय. जपाननें रशियाचा पराभव इ. स. १९०५ सालीं केला. परंतु पाश्चात्यांचा पराभव करण्याचा पहिला मान मराठ्यांनीं इ. स. १७३९ मध्यें मिळविला आहे. पोर्च्युगीज लोकांनीं सबंद कोकणप्रान्तांत–विशेषतः गोमांतक प्रांत व साष्टीप्रांत यामध्यें–धार्मिक अत्याचाराचा जो कळस केला, त्याला तोड केवळ मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारांवांचून अन्यत्र सांपडणें कठीण. पोर्च्युगीज लोक त्यांतहि नवीन शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेले व पाश्चात्य पद्धतीचे कवाइतीचें सैन्य बाळगणारे. म्हणून मराठ्यांनीं इ. स. १७३९ मध्यें वसईवर जो प्रचंड विजय मिळविला त्याचें महत्व युगपरिवर्तनाइतकें आहे. त्यावेळीं मराठ्यांनीं पोर्च्युगीजांचा जो घोर पराभव केला, त्यायोगें पोर्च्युगीजांच्या हिंदुस्थानमधील सत्तेचें कंबरडेंच मोडलें व पोर्च्युगीजांचें सत्तायुग अस्तंगत झालें. अशा ह्या विजयासंबंधीं कुणा महाराष्ट्रीयास सार्थ अभिमान वाटणार नाहीं !

या वसईच्या रणसंग्रामांत महाराष्ट्रांतील सर्व देशवीर व धर्मवीर झगडले. अत्यंत अभिमानाची गोष्ट कीं या धर्मयुद्धांत सर्व जातींनीं, देशकर्तव्याची, धर्मकर्तव्याची आपापली वर्गणी अनेक कार्यकर्ते पुरवून पुरी पाडली परंतु, त्यांतहि पाठारे क्षत्रिय ज्ञातीनें तर या युद्धांत अग्रभाग घेतला हें त्यांच्या हिंदुसंस्कृतीच्या अभिमानाचें केवढें प्रत्यंतर आहे ! पोर्च्युगीजांनीं ज्यावेळीं साष्टीप्रान्त हस्तगत करून तेथें धर्मच्छलास आरंभ केला त्यावेळीं हिंदूंमध्यें अग्रगण्य असलेल्या जातींवरच त्यांच्या अत्याचारांचा पहिला मारा झाला. यामध्यें पाठारे क्षत्रिय ज्ञाति तर फारच रगडली गेली. परंतु या अत्याचारांनीं हतबल न होतां किंवा भीरुपणानें ह्या धर्मच्छलानें स्वकर्तव्य न सोडतां या जातींतील अनेक कार्यकर्ते धर्मरक्षणाकरितां व 'महाराष्ट्रधर्मा'ची ध्वजा पुन्हां विजयी करण्याकरितां पुढें आले. त्यामध्यें अत्यंत प्रमुख असे ठाणें जिल्ह्यांतील अणजूरकर **गंगाजी नाईक** हे होत. यांनीं सतत २० वर्षें म्हणजे इ. स. १७२० पासून तों इ. स. १७३९ पर्यंत सर्व साष्टीप्रांतांत अखंड राजकारण करून फिरंग्यांच्या उच्छेदाकरतां व हिंदूंवर केलेल्या अत्याचारांचा सूड उगवण्याकरतां जागरूकपणें नित्य खटपटी केल्या. पेशव्यांच्या दरबारीं वारंवार हिंदूंवरील धर्मच्छलांच्या

करुण कहाण्या पोंचवून त्यांना उन्मत्त झालेल्या फिरंग्यांचें पारिपत्य करण्यास उद्युक्त केले. त्यावेळीं प्रतापनिधि पहिले बाजीराव व त्यांचे समरशार्दूल बंधु चिमणाजी आप्पा हे मराठ्यांच्या 'हिंदवी साम्राज्या'चा विस्तार सर्व हिंदुस्थानभर करण्याच्या भगीरथ प्रयत्नांत गर्क झाले होते. त्यामुळें वसई प्रांतांतील फिरंग्यांचें प्रकरण वेळोवेळीं अपरिहार्यपणें मागें पडत होतें. परंतु गंगाजी नाईकांच्या जाज्वल्य स्वराज्य व स्वधर्मभक्तीनें या प्रकरणाचें सूत्र खंडित होऊं दिलें नाहीं हे त्यांचें हिंदुधर्मावर केवढे उपकार! या नाईकांचें सर्वच घराणें व त्या घराण्याचे सर्वच नातलग या धर्मयुद्धांत प्रतिज्ञाबद्ध होऊन संबद्ध झाले होते. नाईकांचे पांचहि बंधु या धर्मयुद्धांत महत्वाच्या कामगिऱ्या करीत होते. त्यांचेंपैकीं एक बंधु मुरारजी नाईक हे तर वसईच्या घोर युद्धांत किल्यावर जी शेवटची भीषण चढाई मराठ्यांनीं केली, तिच्यामध्यें फिरंग्यांना मारतां मारतां कामीं आले आणि हुतात्म्यांच्या दिव्य पदवीला पोंचले! गंगाजी नाईक स्वतः जितके मुत्सद्दी तितकेच समरपंडितहि होते! त्यांच्या वीस वर्षांच्या तपश्चर्येनंतर वसईच्या प्रत्यक्ष मोहिमेंत जेव्हां त्यांना सैन्यासह हिंदुधर्माचे हाडवैरी जे फिरंगी त्यांच्याशीं युद्धांत गांठ घालतां आली, तेव्हां त्यांना किती आनंद झाला असेल! किती सार्थकता वाटली असेल! ज्या शत्रूंची रग जिरविण्यास, व ज्यांच्या अत्याचारांचा सूड घेण्यास सतत वीस वर्षें गंगाजी नाईक तळमळत होते, तो प्रसंग येऊन टेपल्यावर गंगाजी नाईकांच्या अंगांत अपूर्व वीरत्वाचा संचार झाला व ते नवतरुणाप्रमाणें लढाईच्या अग्रभागीं राहून अनेक बिकटप्रसंगीं विजय प्राप्त करते झाले. आपल्या देशाधर्माच्या शत्रूंचें शासन 'याच देहीं याच डोळां' करीत असतांना गंगाजी नाईकांना किती धन्यता वाटली असेल! असें भाग्य फार थोड्यांना लाभतें! या भाग्याचा कुणाला हेवा करावासा वाटणार नाहीं?

गंगाजी नाईकांसारखे अनेक वीर आणि मुत्सद्दी त्यावेळच्या महाराष्ट्रानें जागोजागीं निर्माण केले म्हणून तर मराठ्यांचा अद्भूत इतिहास घडला! असें कितितरी मराठ्यांचे कर्तृत्ववान् वीर व मुत्सद्दी आज विस्मृतिपथांत गेले असतील. परंतु त्यांतल्यात्यांत भाग्य आपलें कीं, या धर्मवीर नाईक घराण्याची ही बखर आपणांस उपलब्ध झाली आहे.

त्याच नाईक घराण्यांतील माझे मित्र श्री. गजानन गोविंद नाईक यांनीं ही बखर संशोधित करून प्रसिद्धविली आहे. त्यामुळें त्यांत एक प्रकारचा जिवंतपणा भासत आहे. श्री. गजाननराव नाईक यांनींहि पूर्वी बंगभंगाच्या चळवळीच्या काळांत आपल्या वंशाचें वैशिष्ट्य राखून देशाकरितां कारावासाची तपश्चर्या केली आहे. त्यामुळें तर ही बखर संशोधिण्याला त्यांना अधिक अधिकार प्राप्त झाला आहे! कारण 'शूरमर्दांचे पोवाडे। शूरमर्दांनीं ऐकावे!'

वर्तमानकाळच्या पिढींतली पराक्रम करण्याची धमक नष्ट झाली म्हणजे कांहीं काळ तरी त्या पिढीला पूर्वजांच्या पराक्रमांवर जीव धरून जगावें लागते. त्यांच्या चरित्रांपासून आपल्या अंतःकरणांत स्फूर्ति उत्पन्न करावी लागते. एवढ्याकरतां या बखरीचें यावेळीं होत असलेलें प्रसिद्धीकरण अत्यंत उचित असेंच आहे. त्यांतही यंदा 'वसई विजयदिन महोत्सव' च्या दिवशीं साजरा होणार त्याच दिवशीं या बखरीलाहि प्रसिद्धीकरण मिळणार हें एक अपूर्व औचित्यच साधलें असें म्हटलें पाहिजे.

अशा रीतीनें अणजूरकर नाईक घराण्यानें स्वराज्याच्या आणि हिंदवी साम्राज्याच्या सेवेंत बजावलेल्या कामगिरीचें व्यवस्थित वर्णन करून प्रसिद्ध होणाऱ्या या बखरीनें मराठ्यांच्या दिव्य इतिहासाच्या भव्य प्रासादांतील एक तेजस्वी दालन उघडलें गेलें असेंच म्हटलें पाहिजे. या महत्वाच्या कामगिरीसंबंधीं माझे मित्र श्री. गजानन गोविंद नाईक यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. त्याचप्रमाणें या ग्रंथाच्या प्रसिद्धीची शक्यता ज्या पाठारे ज्ञातीच्या 'गोपचार' संस्थाननें द्रव्यसाह्य देऊन आणून दिली त्या संस्थेचेंहि आभार मानणें अवश्य आहे. निरनिराळ्या सार्वजनिक निधींचा असाच देशकाल परिस्थितीप्रमाणें योग्य उपयोग झाला म्हणजे केवढें कार्य होतें याचें हें अनुकरणीय उदाहरण आहे. एवढी ओळख करून देऊन मी हें प्राथमिक निवेदन पुरें करतों.

गिरगांव, मुंबई
४-५-१९३५

ना. दा. सावरकर.

प्रस्तावना

'This remarkable siege, the most vigorous ever prosecuted by Maharattas' —*Grant Duff.*

"The seige was carried on with such extra-ordinary vigour, skill and perseverence, as perhaps, Maharattas have in no other instance displayed." —*Mr. Anderson.*

"मराठीशाहीच्या एकंदर राज्यप्रकरणांत शौर्य, स्वराज्यप्रेम, संघशक्ति इत्यादि उदात्त गुणांचें निदर्शन करणारे जे अनेक प्रसंग घडलेले आहेत, त्यांत वसईच्या युद्धाची प्रामुख्यानें गणना असून, त्याचीं वर्णनें पुष्कळांस अवगत असल्यामुळें येथें सर्व वृत्तान्त साद्यन्त देण्याची जरूर नाहीं." —गो. स. सरदेसाई.

"मराठ्यांच्या इतिहासामध्यें अतुल पराक्रम, अचाट साहस, अलौकिक तेज, अद्वितीय रणोत्साह, आणि अपार स्वाभिमान हे गुण व्यक्त करणारे जे कांहीं युद्धप्रसंग प्रसिद्ध आहेत, त्यामध्यें 'वसईचा रणसंग्राम' हा अग्रस्थानीं गणण्यासारखा आहे यांत शंका नाहीं." —दत्तात्रय बळवंत पारसनीस.

"यामुळें हें युद्ध उघडउघड मराठ्यांत व फिरंग्यांत असले, तरी त्याला हिंदु-ख्रिस्ति लढाईचें स्वरूप लवकरच प्राप्त झालें." —प्रो. ना. के. बेहरे.

"ह्या महत्वाच्या राजकारणांत स्वधर्मरक्षणाचा पवित्र हेतु किती अंतर्भूत होता, ह्याची खरी कल्पना वाचकांस करितां येईल." —द. व. पारसनीस.

धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचें अवतार । झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ १ ॥ उत्तम गुणांचा ग्राहक । तर्क तीक्ष्ण विवेक । धर्मस्थापना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ॥ २ ॥ —(श्रीसमर्थ).

यदायदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ —श्रीमत् भगवद्गीता.

अवतार तुम्हां धराया कारण । उद्धराया जन जडजीवा ॥ —श्रीतुकाराम.

काव्येतिहास–संग्रहकर्त्यांनीं स. १८८२ सालीं छापलेली 'साष्टीची बखर' मूळ बखरीची बालबोध लिपींत लिहिलेली प्रत होती असें त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. कै. रामचंद्र सखाराम नाईक ह्यांनीं अणजूराहून पुष्कळ वर्षांपूर्वीं एक बखर नेली होती. पुढें ती गहाळ झाल्याचें समजलें. ती त्यांनीं श्री. मंत्री यांना दिली होती. त्या बखरीसमवेत बरेच महत्वाचे कागदपत्र व गंगाजी नाईकांची रोजनिशीही त्यांनीं त्यांना दिलेली होती. कै. रा. सा. माधवराव गोविंद रानडे ह्यांनीं काव्येतिहास–संग्रहांत छापलेली बखर ही कदाचित् त्या हरवलेल्या बखरीचीच प्रत असावी. मूळ प्रत कोणत्या लिपींत लिहिलेली होती हें समजण्याचें प्रत्यक्ष साधन नाहीं. तरीसुद्धां प्रस्तुतच्या प्रतीचें संशोधन केलें असतांना असें आढळून येतें कीं मूळ बखर मोडी लिपींत लिहिलेली असावी. नंतर तिच्या निरनिराळ्यावेळीं निरनिराळ्या व्यक्तींनीं नकला केलेल्या दिसतात. ह्या बखरीचा पूर्वार्ध मजजवळ आहे. तोही बाळबोध लिपींतच लिहिलेला आहे. ह्या दोन्ही प्रती मला एकदम व एकत्र मिळाल्या त्या पूर्वार्धाची मजजवळ दुसरी एक प्रत होती; ती प्रत माझे आतेबंधूंनीं अणजूरांतील एका प्रतीवरून लिहीलेली होती. अर्थात् एवढें निर्विवाद ठरते कीं, प्रस्तुतच्या प्रतीच्या लेखकानें साष्टीची बखर व तिचा पूर्वार्ध ह्या दोनही भागांची नकल स्वतः एकदमच केलेली आहे. पूर्वार्धाचें प्रतीचें अक्षर व ह्या बखरीच्या प्रतीचें अक्षर एकच आहे. कांहीं ठिकाणीं अक्षरें बदलल्यासारखीं वाटतात, परंतु त्या ठिकाणीं ते निराळ्या लेखकांचें अक्षर असावें असें म्हणतां येत नाहीं. मनुष्याला लिहितांना कंटाळा आला म्हणजे पुढें तो हलगर्जीपणानें अक्षरें काढीत असतो, त्यावेळीं त्याच्या स्वतःच्या दोन्ही लिखाणांत फरक पडतो; तसाच व तितकाच फरक ह्या बखरींतल्या लिखाणांत वारंवार दिसून येतो. अर्थात् ह्या दोनही भागाच्या प्रती एकाच लेखकानें उतरलेल्या आहेत. ह्या प्रति मूळच्या 'मोडी' बखरीवरून बाळबोध लिपींत उतरलेल्या आहेत असें समजावयास जो सबळ आधार आहे तो हा कीं ह्या प्रतींतल्या अनेक चुका मोडी शब्दांचें वळण न समजल्यामुळें व कांहीं मोडी अक्षरांचें सादृश्य असल्यामुळें झालेल्या आहेत असें स्पष्ट दिसते. अनेक शब्द मी दुरुस्त करूनच छापलेले आहेत. तसचें शुद्धलेखनाच्या चुका दोन्ही भागांत सारख्याच स्वरूपाच्या आहेत. दोन्ही भागांचा कागद एकच आकाराचा व एकच नमुन्याचा आहे. कागदाचे चारही बाजूचे सामे दोन्ही भागांत सारखेच सोडलेले आहेत. प्रथम भागापासून ते दुसऱ्या भागाच्या शेवटापर्यंत एकच शाई वापरलेली आहे ह्या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे असें दिसून येतें कीं, दोन्ही भागांचा प्रति–लेखक एकच होता.

ह्या ठिकाणीं नकलकारानें केलेल्या कांहीं चुकांचें दिग्दर्शन करणें जरूर आहे. मोडी अक्षरांचा बोध न झाल्यामुळें कांहीं ढोबळ चुका झालेल्या आहेत; हें ही मूळ बखर वरवर पहाणाऱ्यांच्याही ध्यानांत येईल. मोडी वळणाच्या एकाच अक्षराचे दोन निराळ्या अर्थाचे

निराळे शब्द बनतात ; व वाक्यांच्या अर्थास जुळणारे वळण न समजल्यास वाचक तो शब्द भलत्याच स्वरूपांत वाचतो. त्यामुळें कांहीं वेळां अर्थाचा बोध होत नाहीं व कांहीं वेळां तर अर्थाचा विपर्यास होतो. उ.–षैद (ब. पा. ४) चिकट (तिकट ब. पा. १७) दोन्हि मुडे (दोही दुहीमुळें ब. पा. १७), बडकी (बटकी ब. पा. २१), तहस (तहास ब. पा. २४), वळित (? ब. पा. २५), कवळें (कावळे ब. पा. २६–२७) वसता (वसता ब. पा. २८), माहाड (पाहाड ब. पा. ३१), बोलीत (वोळींत–ओळींत ब. पा. ३१), म्हउन (म्हणून ब. पा. ३८), असे (नसे ब. पा. ३८), वसरवर (वसइवर ब. पा. ३८), राउत (रोउन ब. पा. ४१), धाडा (?. ब. पा. ४१), बळोख (?. ब. पा. ४१), बाळज्यास (बोळंज्यास ब. पा. ४२), वर्णाजि (कर्णाजि ब. पा. ४५), सिधाचा (सिंद्याचा ब. पा. ४५) शिवबंदीचा (शिबंदीचा ब. पा. ४७), डाकु (डाणु ब. पा. ४८), लेस (?. ब. पा ४९) शृंग (सुरुंग ब. पा. ४९), मुरदा (मुडदा ब. पा. ५०), बायाचा (रायाचा ब. पा. ५३) ह्या सर्व चुका मोडी अक्षरें वाचतां न आल्यामुळें झाल्या आहेत हे सहज वाचणाऱ्याच्याही ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाहीं. आणखी अशा बऱ्याच चुका बखरींत होत्या. पण त्या मी दुरुस्त करून छापल्या आहेत. नमुन्याकरितां वर निर्दिष्ट केलेल्या कांहीं चुका तशाच मूळ स्वरूपांत दाखविल्या आहेत. अक्षरांच्या कानामात्राच्या चुका तर प्रत्येक पानांत ४।८ तरी होत्या. वेलांट्यांच्या व उकाराच्या कांहीं चुका होत्या. अनुस्वाराचा तर बहुतेक बेपत्ता झालेला आहे. कानामात्रा वेलांट्या इत्यादि चुका मी दुरुस्त केल्या आहेत. अगदींच अर्थ बोध होण्यासारखा नव्हता त्या ठिकाणीं अनुस्वार देऊन शब्द छापले आहेत. इतरत्र शुद्धलेखनाच्या दृष्टीनें अनुस्वारासंबंधीं शब्दांत फरक मुळींच न करितां बखरींतले शब्द तसेंच अननुस्वारींतच छापले आहेत. नक्कल करितांना अनेक ठिकाणीं मध्यंतरीचीं अक्षरें किंवा शब्दच गाळलेले आहेत. त्या ठिकाणीं मी कंसांत ते शब्द किंवा तीं अक्षरें पुरविलीं आहेत. कांहीं ठिकाणीं तेच शब्द किंवा तेच शब्दसमूह दोनदां उतरलेले आहेत. अशा स्थलीं चौकोनी कंस करून त्यांचें द्विरुक्तीपण दाखविले आहे. 'वतनास वस' (ब. पा. ५२) मध्यें हा 'वस' कां व कोठून आला व ह्याचें येथें प्रयोजन काय तें कळत नाहीं. ह्या 'वस' मुळें अर्थाची वाढ होत नाहीं किंवा नसल्यास अर्थास उणीव येत नाहीं. ज्या शब्दांच्या अर्थाची मला खात्री वाटत नाहीं, अशा शब्दाच्यापुढें नुसते प्रश्नचिन्ह कंसांत दिलें आहे किंवा समानार्थक शब्द देऊन संशयप्रदर्शनार्थ कंसांत प्रश्नचिन्ह घातलें आहे. 'वसदा होउन (?)' (ब. पा. २६) ह्या ठिकाणीं अर्थबोध होत नव्हता म्हणून प्रश्नचिन्ह घातलें होतें. वसत किंवा वसदा गांव असावा असें निश्चित वाटत होतें कारण गंगाजी नाईक लोनाडहून आले व बाबाजी अडठराव वसदा होऊन आले असा अर्थ होत होता. पण त्या गांवाचा शोध लागेना म्हणून प्रश्नचिन्ह घातलें. तो मजकूर मुद्रित झाल्यानंतर वसत गांवचा शोध लागला. आतां अर्थ

जुळत असल्यामुळें प्रश्नचिन्हांची जरूरी येथें राहिली नाहीं. तद्वतच 'अकलेशयास' हा शब्द बखरींत पान २३ वर आहे. ह्या शब्दाचा उलगडा मला ही बखर समग्र छापली गेली तरी झाला नव्हता. अनेक अर्थ त्यावर बसविले पण मनाचें समाधान होईना म्हणून अर्थ न समजलेल्या शब्दांच्या सदरेंत त्याला घालून त्यापुढें प्रश्नचिन्ह छापलें. परंतु आतां त्याचा उलगडा झाला असल्यामुळें प्रश्नचिन्हांची जरूरी नाहीं 'आपले रायास' हा तो शब्दप्रयोग होय. आपले रायास म्हणजे आपले बाजीरावाना असा सुसंगत अर्थ जुळतो. 'आपले रायास' ह्या मोडी वळणाचा व अकलेशयास ह्या मोडी वळणाचा आकार जवळजवळ सारखाच दिसत असल्यामुळें नकलकाराची ती चूक झालेली दिसते. मूळ प्रतींत पुष्कळ ठिकाणीं वाक्यांचीं वाक्यें व शब्दांचे शब्द पुनः उतरलेले आहेत. पुढें लेखकाला आपली चुकी आढळून येतांच त्यानें त्या वाक्यावर किंवा शब्दावर, डोक्यावर लहानलहान रेघा ओढून तीं वाक्यें किंवा ते शब्द रद्द केले आहेत. तरीपण कांहीं वाक्यें व शब्द ह्या प्रतींत तसेंच द्विरुक्त राहिलेले आहेतच. वर सांगितल्याप्रमाणें ते मी चौकोनी कंसांत घातले आहेत. नकलकारानें नकल करितांना बऱ्याच जागीं शब्द व वाक्यें गाळलेलीं होतीं व नंतर त्या चुका आढळल्यामुळें कांहीं ठिकाणीं काकपद करून तर कांहीं कांहीं खुणा करून तर कांहीं ठिकाणीं तसेंच तीं वाक्यें वाक्यांच्यावर, बाजूस, किंवा साऱ्यांतून लिहिलेलीं आहेत. व त्यामुळें बखर वाचतांना योग्य ठिकाणीं तीं वाक्यें जर वाचलीं गेलीं नाहींत तर अर्थाचा विपर्यास होतो; व अशा विपर्यास प्रारंभीं ह्या प्रतीची प्रत करणाऱ्याच्या हातून झालेला होता. पण शोधाअंतीं मी ते सर्व अर्थविपर्यासाचे दोष नाहींसे करून त्या त्या ठिकाणीं जुळणारीं वाक्यें व शब्द घालून अर्थ जुळेलसा केला आहे. मागें सांगितल्याप्रमाणें विसरलेल्या अक्षरांची व शब्दांची तर गणतीच नाहीं. 'पु करणें देवास' (ब. पा. २९) ह्या वाक्याची संगति मला कित्येक दिवस मुळींच लागली नाहीं. फार विचार केला परंतु हें पु करणें देवास काय ते कळेना. एक दिवस सारखें तेंच वाक्य नुसतें वाचत बसलों होतो, तोंच मागील पुढील संदर्भ चटकन् ध्यानांत आला व अर्थबोध असा झाला कीं मनुष्यकृतीच्यानंतर जें काय करावयाचें तें देवानें करावें. त्याला करावयाचें असल्यास मनुष्याच्या कर्तृत्वाची जरूरी नाहीं हा अर्थ ध्यानांत येतांच 'पु'च्या पुढें 'ढें' शब्द नकलकार विसरला आहे हें चटकन ध्यानांत आलें व फार आनंद झाला. हा 'पुढें करणें देवास' म्हणजे देवाच्या कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् शक्तीवरील बखरकाराचा विश्वास, मलाही ह्या ग्रंथनिर्मितीच्या वेळीं अनेकवार उपयोगी पडला आहे. अशा रीतीनें अनेक ठिकाणीं हे विसरलेले शब्द व अक्षरें मी दुरुस्त केलीं आहेत. नमुन्याकरितां त्यांतले कांहीं शब्द पुढें देतों:—देवाशि (सं) शय ब. पान १३, साधून (घे) ब. पान १२, ते (व्हां) ब. पान १४, उर्जित (करील) ब. पा. १८, मज (ज) वळ, ब. पा. १९, आमि (म) चि, ब. पान २०, घा (त) ले, ब. पान २२, सोडु (न) ब. पान २६, फि (र) गाणाचे, ब. पान २६, राजावळी (चा), वोळी (त)

ब. पान ३१, हकि (क) त, ब. पान ३३, (ह) कीगत, ब. पान ४४, फो (ज) सुद्धां ब. पान ३७, मुन्हा (र) जि. ब. पान ४१, किल्ल्याव (र), ब पान ४८, हे शब्द पाहिले असतांना वाचकांना त्या चुकांची योग्य ती कल्पना येईल. पुढील उदाहरणें द्विरुक्तीचीं आहेत. [तेथील मी जमीनदार सांप्रत माझा मुलुख] ब. पान ११, [मग] ब. पान ३१, [या] ब. पान, ४५, [सब] ब. पान ४७, [बाजि] ब. पान ५२, हीं उदाहरणें चौकोनी कंसांत दिलीं आहेत. पुढचा शब्द मागें व मागचा शब्द पुढें घातल्याचें जें एकच उदाहरण ब. पान ३१ वर आहे तें असें:—

'गंगाजि यास विचारे' हें 'गंगाजी विचारे यास' असें असान्वयास पाहिजे. विसरलेला नव्हे पण अर्थबोध चटकन व्हावा म्हणून 'मातुश्रीचे नांव देकाळे ठेविले' ह्या वाक्यांत 'मातुश्रीचे' ह्या शब्दाचें पुढें 'स्मरणार्थ' हा शब्द मी कंसांत घालून 'मातुश्रीचें (स्मरणार्थ) नांव' असें वाक्य तयार केले आहे (ब. पा. ५३). बखरींत दोन ठिकाणीं बखरकारांनीं शक दिले आहेत. पहिला शक १६५९ हा आहे. त्यानंतर वसईच्या किल्ल्यावर झालेल्या शेवटच्या हल्ल्याचा शक दिला आहे. हा हल्ला ठाण्यावरील हल्ल्याच्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे शके १६६१ त झाला आहे. शके १६६१ हा शक इ. स. १७३९ त येतो. पण नकलकारानें तो शक १६६२ असा चुकीनें उतरलेला आहे. हा नकलकाराचा हस्तदोष असावा किंवा मोडी (१) ह्या अंकास कोठें लहानशी रेघ खालीं फुटलेली असावी व म्हणून हा अंक एक आहे किंवा दोन आहे हे उमगतां न येऊन त्यानें तो अंक दोन म्हणून उतरलेला दिसतो. ही बखर मोडींतून बालबोध लिपींत उतरलेली आहे. ह्या माझ्या विधानास ह्या अंकानें पाठिंबा मिळतो. तसेंच प्रस्तुतची प्रत बऱ्याच नंतरच्या काळीं मूळबखरीवरून उतरलेली आहे ह्याची माझ्या म्हणण्याला वरील अंकाच्या चुकीनें आधार मिळतो. कारण ही बखर युद्धप्रसंगानंतर लगेच लिहिलेली असल्यामुळें जशी अक्षरान् अक्षर खरी ठरली आहे तशीच तिचीही प्रत बऱ्याच पुढच्या काळीं तयार केलेली आहे. त्यावेळीं नकलकाराला युद्धप्रसंगांचें साल ठाऊक नसावें म्हणून अंकाच्या भ्रमामुळें झालेली चुकी त्यांच्या लक्ष्यांत न येऊन ती तशीच राहिली. नकलकाराला संवत्सराची माहिती असती किंवा इतिहासाची माहिती असती तर ही चुकी बखरीच्या प्रस्तुत प्रतींत राहिली नसती. इतिहासज्ञानाला पारखा असणाऱ्या ह्या नकलकाराप्रमाणें काव्येतिहास-संग्रहकर्त्यांच्या प्रतीच्या नकलकारानें ही शकाची चूक केलेली नाहीं. त्या प्रतींत शके १६६१ च आहे. (ब पा. ५१) तसेंच त्यावेळच्या ज्ञातिसमूहाच्या बरोबर त्याची पूर्ण ओळख असती तर त्यानें 'चातेना' असा चुकीचा शब्द 'पातेना' ह्या शब्दाबद्दल घातला नसता. (ब. पा. ३३) कर्णाजीचा वर्णाजी (ब. पा. ४५), सिद्याच्याबद्दल सिधाचा (ब. पा. ४५), तुंबाजीचा तुकाजी (ब. पा. ४८) सतकराचा सतक (ब. पा. ४९) सिंदेचा सिंदकर किंवा बनकर (ब. पा. ३७) इत्यादि

अनेक चुका नक्कलकारानें केलेल्या आहेत. ह्याचें कारण एकच कीं नक्कलकाराची इतिहासाबरोबर अनोळख हें होय. त्यावेळच्या इतिहासाची माहिती जर त्याला असती तर मूळ मोडी लिपी हे.ती तरी ह्या चुका राहूं दिल्या नसत्या. ह्यावरून असें अनुमान काढावें लागतें कीं, संग्रामाची धामधूम आटोपल्यानंतर बऱ्याच पुढच्या कालीं ही नकल 'एक पवित्र ग्रंथ' ह्या भावनेनें करण्यांत आली असावी. बखरीच्या कालींच ही नकल केली असती तर ह्या चुका नकलेंत उतरल्या नसत्या. नकलेचा एकंदर झोंक पाहतां व ती ज्यांच्याकडे मिळाली त्याच्याबद्दलचा विचार करितां कारण राणे हे ठाण्याचे ज्ञाती–अधिकारी आहेत ही नकल करणारा इसम पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा असावा. ज्या शब्दाचा मला उलगडा झाला नाहीं असें कांहीं शब्द मी खालीं देत आहे. बैद (ब. पा. ४), धाडा (ब पा. ४१), इत्यादी शब्दाचा अर्थ मला लागलेला नाहीं. गऊळबाविवर (ब पा. ३८) व खेरा (ब. पा. ४६) ह्या शब्दांचे अर्थ प्रथमतः मला लागले नव्हते; बखरीची ती पृष्ठें छापल्यानंतर त्या शब्दांची मला सुसंगति लागली. गऊळबाव म्हणून एक ठिकाण तुंगारचे व कामणचे डोंगरांचे रानांत आहे. खेरा हा शब्द खेरा नसून खेस असा आहे खेस म्हणजे (फौजेच्या) रांगेस असा त्या शब्दाचा अर्थ आहे.

गंगाजी नाईकांनीं कल्याणास अंबरनाथाजवळील कांबे गांवावर तळें खणलें त्या ठिकाणीं बखरीच्या प्रस्तुतच्या प्रतीचा शेवट झालेला आहे. म्हणजे इ. स. १७४१ किंवा इ. स. १७४२ सालापर्यंत ही बखर आलेली आहे. पण काव्येतिहासकर्त्यांनी छापलेल्या बखरीचा शेवट सालप्याचे तहाचेवेळीं म्हणजे इ. स. १७८२ सालीं झालेला आहे हा ह्या दोन प्रतींतला एक फरक आहे. ह्या फरकावरून असें अनुमान काढतां येतें कीं हे दोन्ही नकलकार एकच नसावेत. ज्याअर्थीं इ. स. १७८२ सालापर्यंतची हकिकत त्या प्रतींत आहे, त्याअर्थीं तो नकलकार निराळा व पहिल्या नकलकारानंतरचा असावा. ही जास्त हकिकत मूळच्या मोडी बखरीत नसावी असेंच अनुमान निघतें. कारण, जर ही पुढील हकीकत त्या मूळच्या बखरींत असती तर प्रस्तुतच्या प्रतींच्या नकलकाराला ती तेवढीच हकिकत गाळण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. तसेंच कांहीं कारणही उत्पन्न झालेलें नव्हतें कीं त्यामुळें त्या मजकुरामुळें कांहीं बाध येऊन तो मजकूर गाळावा लागला असावा. तेव्हां त्यावरून असें अनुमान निघते कीं, हा पुढील मजकूर त्या नकलकारानें मूळच्या बखरीस स्वतःच्या माहितीवरून जोडला असावा. प्रस्तुतच्या प्रतींत व काव्येतिहास-संग्रहकर्त्याच्या प्रतींत आणखी एक तसाच फार महत्वाचा फरक आहे. तो हा कीं, गंगाजी नाईकांनीं स्वतः केलेल्या कांहीं गोष्टी, तसेंच त्यांनीं आपल्या बंधूकरवीं व मदतनीसाकरवीं केलेल्या सर्व महत्वाच्या गोष्टीं, काव्येतिहास–संग्रहाच्या प्रतींत गाळलेल्या आहेत. गंगाजींच्या श्रीमोरेश्वराच्या प्रयाणाची, व श्रीसिद्धिविनायकाच्या प्राप्तीची हकिकत, त्यांच्या मदतनीस मंडळाच्या बैठकी, त्यांचे निर्धार, त्यानीं ठिकठिकाणीं व वेळोवेळीं केलेली लागामांगाची, व

हवेलागांची माहिती, इत्यादि प्रसंगांची सविस्तर महत्वाची हकिकत, जी प्रस्तुतच्या प्रतींत आहे ती गाळून त्या गोष्टींपैकीं कांहींचा नुसता ओझरता नामनिर्देश व उल्लेख काव्येतिहास-संग्रहाच्या प्रतींत केलेला आहे. गंगाजी नाईकांच्या कर्जाबद्दल तर तो नकलकार अगदीं मूग गिळून बसला आहे. गंगाजी नाईकांच्या भाग्याबद्दलही तो तसाच मुग्ध राहिला आहे. ह्यावरून असें दिसतें कीं, त्या नकलकारानें मूळच्या बखरींत बरीच छाटाछाटी करून मागील दिलेली स. १७८२ पर्यंतची जास्त हकिकत मात्र जोडलेली दिसते. ह्या कांहीं बाबी सोडून दिल्या तर बाकी सर्व महत्वाच्या बाबती दोन्ही प्रतींत एकच आहेत. कांहीं किरकोळ वाक्यभेदांशिवाय त्या दोन प्रतींत इतर मोठेसे फरक नाहींत. मूळ बखरीस त्या नकलकारानें नवीन जास्त भाग कां जोडला असा प्रश्न मनापुढें आल्यास त्याचें उत्तर त्यास माहीत असलेली पुढील हकीकत त्या मूळ बखरींत भर घालण्याकरितां जोडण्याची इच्छा त्यास झाली हें होय. पण त्यानें मूळ बखरींतला वर दिलेला मजकूर कां गाळला हें समजणें कठीण पडते. ती प्रत कोठें व कोणाकडून रा. सा. रानडे यांना मिळाली हें समजतें तर कदाचित ह्या कोड्याचा उलगडा त्वरीत झाला असता. त्या प्रतींत हा मजकूर गाळलेला आहे, किंवा काव्येतिहास-संग्रहकर्त्यांनीं बखर छापतांना तो गाळण्यांत आला आहे हें समजण्यास प्रत आपल्याजवळ आज नसल्यामुळें साधन नाहीं. एक तर्क असा करितां येतो कीं, पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या गृहस्थाशिवाय दुसऱ्या कोणातरी इतर ज्ञातीच्या गृहस्थानीं ती प्रत मूळ बखरीवरून उतरलेली असावी व म्हणून जे प्रसंग प्रस्तुत बखरींत आहेत त्यांचे महत्व सदर इसमास न वाटून त्यांनीं ते प्रसंग आमुलाग्र गाळले असावेत व कांहीं प्रसंगांतल्या हकिकती गाळून त्यांचा नुसता ओझरता उल्लेख केलेला असावा. दुसरा तर्क असाही संभवतो कीं, काव्येतिहास-संग्रहकर्त्यांनीं ही बखर छापली त्यावेळीं, ह्या प्रसंगांचें महत्व त्यांना न वाटून व न पटून त्यांनीं ह्या प्रसंगांच्या हकिकतींत छाटाछाट करून तिला आटपशीर स्वरूप देण्याचा प्रयत्न केलेला असावा. ह्या हकिकती कोणीही कां होईना पण गाळल्या आहेत हें सत्य आहे. ह्यामुळें स्वधर्म व स्वराज्यासाठीं आत्मसमर्पण करणाऱ्या एका घराण्याच्या बाबतींत आपण न कळत कां होईना फार मोठा अन्याय करितों, व सर्वस्वाची होळी करण्यास सदैव तत्पर असणाऱ्या एका तळमळणाऱ्या आत्म्याचा अपमान व त्या राष्ट्रवीरांचा अपराध करितो हें त्यांचें ध्यानांत आलें नसावें. वरील विवेचनावरून असें दिसतें कीं प्रस्तुत छापलेली बखर ही अस्सल मोडी बखरीची नकल होय. काव्येतिहास-संग्रहकर्त्यांनीं छापलेली बखर ही वर दर्शविलेला भाग गाळलेली व जास्त भाग जोडलेली मूळ अस्सल बखरीचीच नकल होय.

जिला ह्या बखरीचा मी पूर्वार्ध म्हणतो, ती वस्तुतः एक स्वतंत्र बखर आहे. शिवाच्या आगमन कालापासून तिचा आरंभ करण्यांत आला असून पोर्तुगीज लोकांच्या आगमन कालापर्यंत इकडील निरनिराळ्या घडामोडींच्या, व बदललेल्या राज्यकर्त्यांच्या हकि-

कर्ती क्रमशः तींत वर्णिलेल्या आहेत. ह्या दोन्ही बखरी म्हणजे बिंबकालापासून ते सन १७४२ किंवा सन १७८२ पर्यंतच्या काळाचा कोंकणप्रान्ताचा साद्यन्त राजकीय इतिहास होय. ह्या दोन्ही बखरींचें नीट संशोधन केलें तर ह्या कोंकणप्रान्ताचा ८००।९०० वर्षांचा सांगंत व सविस्तर असा विश्वसनीय राजकीय इतिहास आपणास तयार करितां येणार आहे. प्रस्तुतच्या बखरीच्या संशोधनानें व प्रकाशनानें साधारणतः स. १६८० ते स. १७४० पर्यंतच्या काळाचा इतिहास आज उजेडांत येत आहे. कोंकणांतील ह्या काळांतला हा इतिहास अद्यापि जरि पूर्ण झालेला नाहीं, तरीपण ह्या बखरीच्या प्रकाशनानें त्या इतिहासाहाची साधारणतः कल्पना येणार आहे. पूर्व बखरीचे जर संशोधन केलें तर ह्याच्या मागील इतिहासाची रूपरेखा आपणास सहज तयार करितां येईल. शक्य झाल्यास व माझ्या सहकारी मित्रांनीं मला अशीच मदत केल्यास मी तें कार्य हातीं घ्यावें असा माझा मनोदय आहे. ह्या पूर्व बखरींत त्या वेळच्या ह्या प्रान्तांतल्या सर्व राजकीय स्थित्यंतरांचा कांहीं ठिकाणीं स्पष्ट व कांहीं ठिकाणीं अस्पष्ट व ओझरता उल्लेख आला आहे, हें ती बखर वाचली असतांना आपणास दिसून येते. आरंभीं बिंबराजे, नंतर इकडील लहानमोठ्या राजांच्या अदलाबदली, नंतर गुजराथेंतील व दक्षिणेंतील सुलतान बादशहांच्या कारकिर्दी व शेवटीं पोर्तुगीजांची साष्टी प्रान्तावरील मगरमिठी अशा क्रमानें पूर्व बखरींतल्या मजकुराची संगति लागलेली दिसून येत आहे. बखरकारानें फिरंग्यांच्या आश्वासनांची हकिकत ह्या बखरीच्या शेवटीं दिलेली असून शेवटीं प्रखरतर अशा फिरंग्यांच्या धार्मिक जुलुमाची हकिकत दिली आहे. फिरंग्यांनीं प्रथमपासूनच हें धोरण ठेविलें होतें, कीं आरंभीं अवळपवळ मोहक आश्वासनें द्यावयाचीं; त्या काळीं लोक आधींच मुसलमानांच्या अंमलाखालीं हैराण झालेले असत, त्यांना तीं आश्वासनें भुरळ पाडीत व नंतर त्यांनीं आपण होऊन फिरंग्यांना वश होऊन मुसलमान राजांच्या विरुद्ध जाऊन फिरंग्यांना आपला प्रान्त व आपला मुलुख व वतनें द्यावयाचीं, असा एक प्रघातच त्या काळीं पडल्यासारखें झालें होतें, असें दिसतें. पण पुढें यथाकालीं फिरंगी आपलें खरें स्वरूप व मतलब उघडपणें प्रकट करीत व प्रजेवर जुलुम करण्यास सुरवात करीत. त्या पूर्व बखरीच्या शेवटचा उतारा खालीं देत आहे त्यावरून वाचकांच्या ध्यानांत येईल कीं, मुलुख घेण्याकरितां कशीं व किती आश्वासनें फिरंग्यांनीं इकडील लोकांना व जमिनदारांना दिलीं व मुलुख प्राप्त होतांच ती आश्वासनें गुंडाळून ठेवून कसा जुलुम सररहा सुरु केला हें ध्यानांत येईल.

"मग विजुरेल त्यांस बोले तुमचा मुलखातयाचा कारभार तुम्हीच करावा आमचि जमीन वाहावि मुलकांत गलिम येईल तो आम्ही मारु तुह्मास फिकिर नाहि तुमचि अमिरि सत्ता साहेबि तुम्हिच करावि तुमचा मुलुख तुम्हीच खाबा (वा) मग जमिदार बोलिले जर आमचा पात-

शहा तुह्मि बुडविला मुलुख तुह्मास देवाने दिधला तर तुह्मि आपला कारभार तुह्मिच करा आह्मि जमिदार आह्मास मुलकाची अमिरी न लगे हे जर्मान आमचि माय भुई इजवर आह्मि अमीरि साहेबि न करु आह्मि जमिदारिची चाकरि करून मुलखाची सुति सचणी करून तुह्मास सिघाव देऊन सवदागर व्यापारि येति त्याचि जकात तुम्हास देउन आमचा जमिदारिचा हक जो येईल तो आह्मि घेउन मुलखात शिळोत्रे वृत्ति ज्या पुर्वापार अहेत त्याच घेउ आपण राजधानि ठाण्यास अथवा माहिमास करावि ॥ मग या बोलास वासकुदेगाव विजुरे खुशि जाला मग दिवान विजुरे जमिदार बहूत नावाजीले माल ऐवज बहुत दिधले मग दिवाण मंडपेश्वरास मेले (गेले?) ॥ मग जमिदारास चवदा माहाले विलायत ठाणे को(क)ण विलायत सुलतान बाहादु(र) ठाणे कोकण बिंबस्थान फिरंगियाखालें आले मग नुन देखुन विजेरे आला मग दांड्याचे बदरिं कोटास काम लाविलें तेच संवत्सरि चेउलचे कोटासि काम लाविले मग चेऊलचा मोगल सुलतान खान त्यास सलुख करुन देव लोप कपतान याणे चेउलचा कोट बांधला मग दो कोस तिसरे बरगास याणे दवणेस जाउन कोटाचे काम लाविले तेथे मीर महमद मोगल आला त्याशि मोटें भांडण जाहले मग मीर महमद पळविला दवणेचा कोट पुरा केला मग फिरंगी याणे मुलकाचे जमिदार बोलावोन त्यास बोले तुह्मि पातशहाचे चाकर व्हावे मग जमिदार बोलिले जर आह्मि जमिनिचि चाकरि करु तुमचि चाकरि न करु मग फिरंगी याणे कुडा भाव धरिला पुरतकालास लीहिलें पुरतकालचे रेणोल १४०० चवदासे आणविले मग कोडो रामजि प्रभु याजपासुन फितवा करविला देशायाशि व देशाशि कथला लाविला अवघि फाटफूट जाली मग वाल(बाल) नाईक देश व पाल ठाकूर देशाई भांडले मग खटला मोटा जाहला ॥ मग पुरतकालचे रनोल आले व आरमार आलें फिरंगि याणे आपला जमाव करून प्रथम वानरे धरिले बारवडेयाचे घर वेढिले सतराशे माणुस लाहान मोटे मिळोन त्यास तिघे भाउ बाल नाईक व भिव नाईक व पोस नाईक (प्रस्तुतच्या बखरींत तान नाईक आहेत अर्थात् पोस नाईक व तान नाईक एकच होत असें दिसतें. हीं एका माणसाचीं दोन नांवें असावींत किंवा नक्कलकाराची त्यांत कांहीं चूक असावी.) आपले हातरे धरून निवालो मग ठाणें आदि ठिकाण धरिलें तेथे च्यार हजार माणसास बाटविले त्यामधोन कोण्हि कोण्हि पळोन पैलाड गेले मग मरोळ धरिलें मग मालाडवर गेले माला(ड)चा देशाई आपले लोक घेउन डोंगरास गेले मग वसई पासुन भाजगाव पावतो तारवांचा वेढा घातला गावोगावि धराधर मांडिली लोक धरुन बहूत बाटविले मग लोक च्यार महिने डोंगरांत राहिले मग कोळि आगरि भंडारि याशि कौल जाले मग मऱ्हाटे लोक होते त्याहि जानवि तोड्(न) कुळबी होऊन घरोघर आले याप्रमाणे फिरंगी याणे वहिवाट केलि ॥"

—हस्तलिखित बखर.

ह्याच राजनीतीचा अवलंब फिरंग्यांनीं गोवें प्रान्तांत—त्या ठिकाणच्या साष्टींत—तिकडील प्रजेचा मुलुख मिळविण्याच्या वेळीं केला होता, असें इ. स. १८९५ सालीं

पोर्तुगालच्या राजाला उद्देशून केलेल्या आपल्या भाषणांत डॉ. आल्मोद ह्यांनीं हेंच दर्शविलें आहे हें त्यांच्या भाषणांतला खालील उतारा वाचला असतांना दिसून येतें. "हिंदूलोक पोर्तुगीज नागरिक आहेत. त्यांच्या मनांत दुसऱ्याबद्दल घातपात किंवा मत्सर नाहीं. 'मुसलमानांच्या जाचांतून सुटावें म्हणून आम्ही पोर्तुगीजांस मदत केली त्याचा मोबदला आम्हांस तुम्ही काय दिला?' असा प्रश्न आम्हांस ते करतील तर दुःखानें डागलेल्या त्यांच्या अंतःकरणांचें समाधान होण्याजोगें उत्तर आम्हांकडून त्यांना मिळेल काय? नाहीं. असें जरी आहे तरी त्या निरपराधी प्रजेच्या डोक्यांत राष्ट्रपरिवर्तनाची क्रांति किंवा बंडाची धामधूम करण्याची खरी कल्पना अजून उत्पन्न झालेली नाहीं; हीच आम्हांवर ईश्वराची खरी कृपा आहे, असें समजलें पाहिजे."

इ. स. १९२९ पालेकरकृत भयंकर धर्मक्रांति पान ७०.

अशा रीतीनें फिरंग्यांनीं ह्या प्रांन्तातील प्रजेला प्रथम मोहक आश्वासनें देऊन नंतर पुढें अजिबात फसविल्याचें वृत्त पूर्व बखरीच्या वरील उताऱ्यावरून सर्वांच्या ध्यानांत येईल. फिरंग्यांचें राज्य कायम झाल्यानंतर फिरंग्यांनीं इकडील प्रजेवर जुलुम करण्यास सुरवात केलेली पाहून धर्म व जात वाचविण्याकरितां बाळ नाईक वांद्रें सोडून गेल्याची हकिकत देऊन बखरकारानें बखरीचा शेवट केला आहे व त्या शेवटच्या मजकुराचा वरील उतारा आहे. फिरंग्यांनीं भयंकर जुलुमास सुरवात केल्यामुळें बाळ नाईकांनीं वांद्रे सोडल्याचें वृत्त छापलेल्या प्रस्तुत बखरीच्या अग्रभागीं देऊन तिची सुरवात केलेली आहे, हें वाचकांच्या ध्यानीं येईलच. ह्यावरून ह्या दोन्ही बखरी एकाच लेखकानें लिहिलेल्या आहेत हा आमचा तर्क खरा ठरतो. ह्या दोन बखरी निरनिराळ्या लेखकांनीं लिहिलेल्या आहेत असें कोणी म्हटल्यास पहिल्या बखरीचा शेवट ज्या ठिकाणीं व ज्या शब्दांत केला आहे त्याच ठिकाणीं व त्याच शब्दांत दुसरीचा आरंभ केला आहे, हें काकतालीय न्यायानें घडलें आहे असें म्हणावयाचें कीं काय? म्हणून ह्या दोन्ही बखरी एकाच लेखकानें रचल्या असून एक दुसरीचा भाग आहे असेंच म्हणणें क्रम प्राप्त आहे. दोन्ही बखरींच्या भाषा-सरणीवरून लेखक एकच असावा हाच तर्क बळावतो, म्हणून मी त्या अप्रकाशित बखरीला प्रस्तुतच्या प्रकाशित बखरीचा पूर्वार्ध म्हटलें आहे.

प्रस्तुतच्या बखरींतल्या अंतरंगाचा विचार केल्यास आपणास काय दिसतें? पोर्तुगीजांनीं कोंकणांतल्या ह्या भागांत धर्मच्छलाचा कहर उडवून दिला होता. हजारों लोक बाटविले जात होते. अशा स्थितींत आपल्या धर्मबांधवांना ह्या धर्मच्छलापासून वांचवावें व महाराष्ट्रधर्म व महाराष्ट्रराज्य स्थापन करावे ह्या हेतूनें मोठ्या चिकाटीनें व धैर्यानें सतत २२ वर्षें परिश्रम करणाऱ्या गंगाजी नाईक व त्यांचे भाऊ व सहकारी मंडळींच्या प्रयत्नांची सांगत हकिकत लिहिण्याची स्फूर्ति सदर लेखकास होऊन त्यानें ही बखर मूळ

लिहिलेली असावी; जशी हकिकत घडली तशीच त्यानें दिलेली दिसते. बखरीचें केलेलें संशोधन आपल्यापुढें आहे. 'ह्याच वर्षीं' व 'त्याच वर्षीं' इत्यादि शब्दप्रयोगांचा सखोल विचार करून बखरींतलि प्रत्येक प्रसंगाचें साल शोधून काढलें आहे. महाराष्ट्राच्या सर्वमान्य व प्रसिद्ध अशा इतिहासाबरोबर ताडून पाहून तीं तीं स्थानें व वर्षें कायम केलीं आहेत. ह्या प्रसंगांचा क्रम व सालांचा क्रम ठरवीत असतांना एकाही सालाबद्दल किंवा प्रसंगाबद्दल विसंगतपणा किंवा अनौचित्य मला दिसून आलें नाहीं. किंबहुना बखरींतली प्रत्येक बाब मी महाराष्ट्राच्या इतिहासाच्या कसोटीस उतरवून दाखविलेली आहे. बखर ही नेहमीं अवास्तव गोष्टींचें अव्यवस्तिपणें व विसंगतवार रीतीनें लिहिलेलें भारुड असतें, अशी एक समजूत आहे. त्यांत प्रसंगांचा व तारखासनांचा मेळ नसतो असाही प्रवाद आहे. पण ह्या बखरीची स्थिति तशी नाहीं, हें ही बखर व तिच्यावरील जागोंजाग दिलेल्या टीपा वाचल्या असतां समजेल. घडलेल्या हकिकती इतक्या सुसंगतवार व सनवार दिलेल्या एखाद्या बखरींत क्वचितच सांपडतात. ह्यावरून असें दिसून येतें कीं प्रस्तुत बखरीचा मूळ लेखक हा तत्कालीन असावा, व महाराष्ट्राच्या त्या वेळच्या घडामोडींबरोबर त्याचा अत्यंत निकटचा परिचय असावा. म्हणून त्याला ह्या सर्व गोष्टी खुलासेवार, तिथीवार व जशा घडल्या तशाच देतां आल्या; तसेंच त्या हकिकतींच्या समवेत योग्य ठिकाणीं दक्षिण कोंकणांतील हालचाली व भानगडी, पेशव्यांचे त्याबद्दलचे हितसंबंध; उत्तर हिंदुस्थानांतील व दक्षिण हिंदुस्थानांतील पेशव्यांच्या स्वाऱ्या, निजाम उल्मुलुखाच्या बरोबरच्या कलागती इत्यादिकांची खुलासेवार माहितीही त्याला देतां आली. ही बखर म्हणजे सुसंगतपणें लिहिलेला त्या वेळचा विश्वसनीय इतिहास आहे हें कोणासही टीपा व परिशिष्टें वाचल्यानंतर दिसून येईल. बखरकारानें निरनिराळ्या ठिकाणीं प्रदर्शित केलेले विचार वाचले म्हणजे तो राजकारणी पुरुष असावा असा तर्क करितां येतो. गंगाजी नाईक व त्यांच्या हालचालींचें सविस्तर असें त्याचें ज्ञान व माहिती पाहिली म्हणजे तो लेखक पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा अथवा राजकारणांत पुढारलेल्या त्या ज्ञातीच्या इतिहासासीं दृढ परिचित असलेला असा असावा असें वाटतें. इतर दुसऱ्या कोणत्या जातीचा किंवा पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासाशीं अपरिचित असलेला तो लेखक असता तर गंगाजी नाईकांच्या हालचालीबद्दल अनभ्यस्त असल्यामुळें अथवा त्यांचें विशेष ज्ञान नसल्यामुळें, त्यांना तो मुळींच महत्त्व देता ना. काव्येतिहास–संग्रहकर्त्यांनीं ह्याच बखरीची जी नकल प्रसिद्ध केली आहे ती प्रसिद्ध करितांना जे प्रकार घडले आहेत त्यावरूनहि माझें उपरोक्त मतच कायम होत आहे. बखरींतल्या प्रसंगाचें निरीक्षण येथें करण्याची जरूरी नाहीं. बखरीच्या खालीं टीपा देऊन तें कार्य तेथेंच केलें आहे. गंगाजी नाईकांच्या कार्याचें परीक्षण करण्याच्या अगोदर एका महत्त्वाच्या प्रश्नाचा आधीं खालीं उल्लेख करीत आहें.

वसईच्या धर्मसंग्रामाच्या कल्पनेचें व योजनेचें श्रेय कोणाला द्यावें हा एक सध्यां फार महत्वाचा प्रश्न होऊन बसला आहे. फिरंगाणाच्या उच्चाटणाचें अखेरचें श्रेय चिमाजी आप्पांना लेखक देतात हें अयोग्य नाहीं. आप्पांनीं नेट धरला नसता तर पुढील पेशव्यांना हें कार्य केव्हांही शक्य झालें नसतें. अनेक प्रकारच्या मनक्षोभकारक गोष्टी रात्रंदिवस आजूबाजूस घडत असतांना ह्या कार्याचा कायमचा विसर चिमाजी आप्पांना व कार्यवैचित्र्याच्या किंवा कार्यबाहुल्याच्या सबबीखालीं बाजीराव पेशव्यांना मुळींच पडला नव्हता हें पाहिलें म्हणजे मनाला समाधान वाटतें व हिंदुपदपादशाहीची ध्वजा अहोरात्र हातांत घेऊन महाराष्ट्राच्या आसमंतांत सर्व हिंदुस्थानभर अष्टदिशांना थैमान करणाऱ्या व श्रीछत्रपतींच्या ध्येयाकरितां रात्रंदिवस तळमळणाऱ्या व किंचितही विश्रांति न घेतां सर्वांबरोबर—शत्रूंबरोबर व अहितमित्रांबरोबर—झगडणाऱ्या रामलक्ष्मणाच्या ह्या महाराष्ट्रीय जोडीकडे पाहून फार कौतुक वाटतें व मुखांतून धन्यवाद बाहेर पडतात. परंतु त्याचवेळीं साष्टी प्रान्तांतल्या धर्मच्छलाचा कहर पाहून तन्मोचनार्थ आमरणान्त जीवाची व स्वकुलाची पर्वा न करितां झटणाऱ्या व तत्सिद्धयर्थ अनेक अविश्रांत खटपटी करणाऱ्या व श्रीमंताकडे किंवा आप्पाकडे पुण्याकुलाच्यास किंवा छत्रपतीकडे साताऱ्यास खेपा घालणाऱ्या, क्वचित् प्रसंगीं प्रेमानें हट्ट धरून तर कधीं वैतागानें त्रागा करून तर कांहीं प्रसंगीं ह्या कार्याचें महत्व व गंभीरता पटविण्याचा प्रयत्न करून हें कार्य पेशव्यांचे हातून शेवटास नेण्याचा जोराचा प्रयत्न करणाऱ्या व त्याकरितां हें आपलें नियतकर्म (mission) ठरवून त्याकरितां स्पृहणीय चिकाटी धरणाऱ्या गंगाजी नाईकांना इतिहासलेखकांनीं विसरून चालावयाचें नाहीं. गंगाजी नाईक म्हणजे वसई व वसई म्हणजे गंगाजी नाईक अशी त्यावेळीं स्थिति होती. गंगाजी नाईकांची चिकाटी चिमाजी आप्पाच्या निग्रहाशिवाय फुकट गेली असती व गंगाजीच्या चिकाटीशिवाय चिमाजी आप्पांचा निग्रह त्यांच्या इतर कार्यांत केव्हांच विलीन होऊन गेला असता हें कोंकणांतील प्रजेला समजलेंही नसतें. अर्थात् वसईचा धर्मसंग्राम म्हणजे गंगाजी नाईकांची चिकाटी व चिमाजी आप्पांचा निग्रह ह्यांच्या सुंदरशा समीकरणाचा परिपाक होय. दोघांत श्रेष्ठ कोण हे ठरविणें चूक व अन्याय होईल. गंगाजी नाईक व चिमाजी आप्पा हे दोघेही आपापल्या परी श्रेष्ठ होत. कांहीं लेखक एका बाजूनें गंगाजींचें महत्व कमी करण्याचे प्रयत्न करितात तर दुसऱ्या बाजूनें चिमाजी आप्पाना गौणत्व आणण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न करितात हें मी इतरत्र दिलेल्या निरनिराळ्या लेखकांच्या मतावरून वाचकांना दिसून येईल. हा श्रेयाचा वाटा ते तिसऱ्याच एका व्यक्तीला देऊं पाहतात तें मला पटत नाहीं.

गंगाजी नाईकांचें जें वैशिष्ट्य आहे ते त्यांच्या स्वधर्म व स्वदेशाकरितां सहकुटुंब अतुल स्वार्थत्यागांत व अनुपम आत्मसमर्पणांत आहे. स्वधर्म, स्वदेश

व स्वराजा ह्या त्रयीचा निदिध्यास गंगाजी नाईकांना अहोरात्र लागलेला होता, स्वकुटुंबावर व त्यांतील सर्व सुखावर कायमची तिलांजली आपले बंधु व आप्तेष्टासह देण्याची तीव्र आतुरता त्यांना उत्पन्न झालेली होती. वडीलांचें कार्य कधीं एकदां हातावेगळें होतें, अशी तळमळ त्यांना इतर गोष्टी सुचू देत नव्हती; ह्याच जन्मीं हें साध्य झालें नाहीं तर पुढल्या जन्मीं तरी मी हें कार्य करीन असा त्यांच्या मनाचा पूर्ण संकल्प झाला होता. अशा ह्या स्वधर्मोद्दीपन व स्वधर्मोत्कर्षार्शा एकनिष्ठपणें तादात्म्य पावलेल्या कार्यक्षम मनोभूमिकेंतच वीरश्रेष्ठ गंगाजी नाईकांचें वैशिष्ट्य दिसून येतें. बखरींत त्यांनीं म्हटलें आहे कीं, '(मोरेश्वरा) ये जन्मीं तूं आपले पाय दाखउन सुखाचा सोहळा दाखविशील तर उत्तम नाहितर जन्मांतरिहि याद असोन तुझी सेवा घडून कार्य सिद्धिस पाववःत्रें हे ऐसें मनि चिंतून...' (ब. पा. ८) हेंच तें गंगाजींचें वैशिष्ट्य होय.

अशा स्थितींत कांहीं लेखकांनीं अंताजी रघुनाथ कावळे हेच वसईच्या धर्मसंग्रामाचें कल्पक, उत्पादक व प्रवर्तक तसेंच पेशव्यांना ह्या बाबतींत प्रथमची सूचना देणारे ठरवून गंगाजी नाईकांना गौणप्रतीचें मदतनीस ठरविलें आहे हें इतिहासास मुळींच धरून नाहीं. वस्तुतः गंगाजीच्यानंतर व गंगाजीच्या मदतीनेंच अंताजी रघुनाथांचा प्रवेश पेशव्यांचे दरबारी झाला होता। असा इतिहासाचा स्पष्ट पुरावा आहे, हें मी बखरींत प्रसिद्ध केलेल्या निरनिराळ्या लेखकांच्या मतांवरून वाचकांच्या ध्यानांत येईल. गंगाजी नाईकांनीं ह्या कार्याचा उपक्रम निंबाजी नाईकांचे मृत्यूनंतर लगेच सुरू केला व इ. स. १७१८ त श्रीसिद्धिविनायकाचा प्रसाद मिळविला. लगेच आंग्रे व दाभाडे यांच्याबरोबर अनुसंधान जोडून प्रयत्न केले व इ. स. १७२० त बाजीराव पेशव्यांचे कल्याणचे सुभेदार रामचंद्रपंत त्यांच्याबरोबर कायमचें बोलणें करून कल्याणास सहकुटुंब राहण्यास गेले. अंताजी रघुनाथांचें इनाम फिरंग्यांनीं जप्त केल्यानंतर ते इ. स. १७२९ त ह्या राजकारणांत सामील झाले होते असें सर्व इतिहासलेखकांनीं म्हटलें आहे. १७२२ मध्यें गंगाजी नाईक साताऱ्यास गेले होते असें नाईकांचे सनदेच्या आधारें पारसनीसांनीं ब्रह्मेंद्र स्वामीच्या चरित्रांत म्हटलें आहे. आपले यजमान म्हणून गंगाजींना अंताजी रघुनाथ ह्यांनी मदत केलेली नसून गंगाजींचें j ते उपाध्याय म्हणून गंगाजीनींच त्यांना मदत केलेली आहे, असें स्पष्ट दिसतें. ह्या बाबतींत योग्य तो निर्णय इतिहासतज्ञ ह्यापुढें तरी देतील अशी आशा आहे.

गंगाजींचें दुसरें वैशिष्ट्य हें कीं, त्यांनीं सतत वीसबावीस वर्षेपर्यंत आपल्या सहकारी व मदतनीस मित्रांना आपल्या कार्यापासून विन्मुख किंवा कार्यांतरित होऊं दिलें नाहीं. भयंकर छल व अमानुष जुलुम नजरेसमोर भेडसावीत असतांना त्यांच्या मदतनीसांपैकीं चुकूनही एखाद्याचेंहि धैर्य विगळीत झाले नाहीं, किंवा कोणीही पळता पाय घेतला

नाहीं. गंगाजींचा उपदेश इतका तीव्र व भेदक होता, त्यांचें तत्त्वज्ञान इतकें पूर्ण होतें, कीं, त्यापासून एकही मनुष्य पराङ्मुख झाला नाहीं. महाराष्ट्रधर्म, महाराष्ट्रदेश, व महाराष्ट्रराजा ह्या त्रयीबद्दलची त्यांची घोषणा आपणास सर्व बखरभर पाहावयास मिळते. ह्या महाराष्ट्रधर्माच्या प्रखर जाज्वलतेच्या विचारांची प्रबल मिठी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनावर इतकी खोल बसली होती कीं, जिवाची पर्वा न करितां त्यांच्या सहकाऱ्यांनीं व बंधूंनीं सतत बावीस वर्षें एकच ध्येय पुढें ठेवून आपलें स्वधर्मकार्य व स्वराज्यकार्य अनेक प्रकारच्या स्वार्थत्यागाच्या दिव्यांतून पार पाडले त्याबद्दलचें त्यांना झालेलें समाधान त्यांनीं बखरीच्या शेवटीं व्यक्त केलें आहे. अशा रीतीनें एकाच ध्येयाची अविचलितपणें, निष्ठेनें, भक्तीनें व अनन्यभावनेनें स्वतः आराधना करणाऱ्या व आपल्या सर्व अनुयायांना तसेंच अखंडितपणें २०।२२ वर्षें करावयास लावणाऱ्या गंगाजी नाईकांच्या मानसिक परिणतीचे व शान्त चित्तानें आपल्या अनुयायांना याच कार्यांत गुंगवून ठेवणाऱ्या त्याच्या समतोल व अविचल प्रेरकतेचे फारच कौतुक वाटते. त्यांचा उपदेशाचा व तत्त्वज्ञानाचा पाया फार भक्कम होता. 'आपण हें कर्म आचरूं जर साधले तर पुण्यपुरुषार्थ अर्थ आणि किर्त न साधे तर येकला मृत सत्यभृत तो सर्वास आहे. परंतु कीर्ति विरळा वाव्यास आलि" (ब. पान ७) ह्या उपदेशांतला हा जाज्वल्यपणा पाहून मनास समाधान वाटतें. श्रीकृष्ण परमात्म्यांनीं नरपुंगव पार्थ वीराला क्लैव्य प्राप्त झाले असतांना जो निष्काम कर्मयोगच।

"हतो वा प्राप्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥"

हा प्रखर व जाज्वल्य उपदेश केला आहे त्याची आठवण होते. असा कर्मयोग आपल्या सहकाऱ्यांना उपदेशून, त्यांच्याकरवीं व त्या कर्मयोगाच्या सिद्धांताबरहुकुम स्वतः सतत २२ वर्षें वर्तन करणाऱ्या ह्या तत्वज्ञानी निष्काम कर्मयोगाच्या आत्म्याला जितके धन्यवाद द्यावे तितके थोडेच वाटतात. अडीचसें वर्षांपूर्वी हाच उपदेश

"धर्मासाठीं मरावें, मरुन अवघ्यास मारावें,
मारता मारता घ्यावे । राज्य आपुलें ॥"

श्रीसमर्थांनी सर्व महाराष्ट्राला केला होता. तोच उपदेश त्याच धर्मकार्याकरितां गंगाजी नाईकांनीं आपल्या प्रान्तीय प्रजेला करून त्यांच्या लाडक्या धर्माची ध्वजा त्यांनीं सतत २२ वर्षें फडकावीत ठेविली होती. हा बहुमोल व जिव्हाळ्याचा संदेश श्रीसमर्थांनीं सर्व महाराष्ट्रास पोहोंचवून श्रीछत्रपतींच्या हस्तें महाराष्ट्रांत महाराष्ट्रधर्म व महाराष्ट्रराज्य स्थापन केलें. गंगाजी नाईकांनीं हाच उपदेश आपल्या अनुयायांना करून महाराष्ट्र-धर्माची परंपरा कायम राखण्याकरितां श्रीमंत आप्पासाहेब पेशव्याचें मदतीनें ह्या प्रान्तांत महाराष्ट्रधर्म व महाराष्ट्रराज्य पुन्हा स्थापित केलें. श्रीकृष्णपरमात्म्यानीं हाच उपदेश

पूर्वी पार्थाला करून त्याच्या हस्तें जुलमाचा प्रतिकार केला व मुराष्ट्र व सद्धर्माची स्थापना केली होती. गंगाजी नाईक हा उपदेश करीत असतांच स्वतः तो अमलांत आणीत होते. उपदेशकाची व कार्यकर्त्याची–तत्त्ववेत्त्याची व कर्मयोगाची–अशा दोन्ही भूमिका त्यानीं स्वतः आचरिल्या; ह्यांतच गंगाजी नाईकांचें वैशिष्ट्य आहे. आपल्या राजकारणास व धर्मकारणास श्रीसमर्थाप्रमाणें त्यांनीं परमेश्वराच्या अधिष्ठानाची व प्रत्यक्ष धर्माचरणाची स्वतःच्या तपश्चर्येनें जोड दिली; कार्याच्या सिद्धीकरितां प्रत्यक्ष श्रीसिद्धि विनायकाची प्रसादमूर्ति प्राप्त करून घेतली; व

"सामर्थ्य आहे चळवळीचें जो जो करील तयाचे ।
परंतु आधीं भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥"

ह्या श्रीसमर्थाच्या उक्तीची सत्यता जनतेला पटवून दिली. त्यांचें कर्म निष्काम कसें होतें ते बखरीतील पान ५३ वरील उद्गार "आपले मुलकास दुष्टराजा फिरंगी आहे, तो खणून काढावा, मराष्ट्र राज्य करावें देवधर्म माराष्ट्र स्थापावे व तिर्थें क्षेत्रें मुक्त व्हावी, हा संकल्प श्रीमोरयाजवळ केला होता त्यास सर्व आलें." वाचलें म्हणजे कळून येतें.

'महाराष्ट्रधर्म' हा मंत्र गंगाजी नाईकांच्या मुखांत सारखा होता असें बखरीवरून दिसतें. अर्थात् हा गंगाजी नाईकांचा महाराष्ट्रधर्म म्हणजे काय होता हें आपण पाहिलें पाहिजे. त्यांना महाराष्ट्रराजा पाहिजे होता व त्यानें महाराष्ट्रधर्म राखला पाहिजे असें त्यांच्या म्हणण्याचें सार आहे. पूर्वापार पद्धतीनें आलेला आपला आर्यधर्म व त्यांच्या आचरणांतील कृत्यें करणें ह्या आपल्या कर्मांच्या आड कोणीही येतां कामा नये असें त्यांना वाटत होतें. आपल्या मायभूमींतच तीर्थें क्षेत्रें व देवदेवालयें सुरक्षित रहावीं, सर्व लोकांना आपल्या धर्माप्रमाणें किंवा धार्मिक समजुतीप्रमाणें धर्माचरण करण्यास व देवपूजनादि विधी आचरण्यास कोणाकडूनही आडकाठी येऊ नये अशी त्यांची इच्छा होती. त्यांत फिरंग्यांनीं अडथळा उत्पन्न केल्याबरोबर त्यांच्या स्वधर्मीय बांधवांना बाटविण्याचा प्रयत्न केल्याबरोबर आपल्या ह्या धर्मावरील हल्ल्यास तोंड देऊन आपला हा महाराष्ट्रीय धर्म वांचविणें व आपल्या लोकांना त्यांच्या त्यांच्या धर्मसजुतीप्रमाणें वागण्यास स्वातंत्र्य मिळवून देणें हें आपलें कर्तव्य होय असें त्यांच्या मनानें ठरविलें. सर्वत्र माझ्या धर्माचा विजय व्हावा, आम्ही सर्व महाराष्ट्रीयांनीं ह्या धर्माच्या कृपाछत्राखालीं एकत्र व्हावें व महाराष्ट्रराज्य स्थापावें ही त्यांची इच्छा होती. त्यांचा महाराष्ट्रधर्म नुसतें 'हरिहरि' म्हणत परमेश्वराचें नांव घेण्यास शिकविणारा असा अक्रिय नव्हता. त्यांच्या प्रत्येक उद्गारांत 'महाराष्ट्र धर्म व महाराष्ट्र राज्य' असा महामंत्र आहे; ते राज्याशिवाय धर्माचें नांव काढीत नाहींत, आधीं धर्म व नंतर त्याचे संरक्षणाकरितां राज्य असावें असा त्यांचा

आग्रह होता. कोणत्याही धर्माला स्वराज्याची जोड नसल्यास तो धर्म मुळींच टिकाव धरणार नाहीं हें महत्त्व त्यांनीं ताडून धर्म व राष्ट्र यांची जोड त्यांनीं ठेविली होती. स्वराष्ट्राशिवाय स्वधर्म टिकणार नाहीं व स्वधर्माशिवाय स्वराष्ट्र उभें राहूं शकणार नाहीं अशी त्याची तत्वविचारणा होती. म्हणून त्यानीं त्यांच्या आधीं ५०।६० वर्षें पूर्वी श्रीसमर्थानीं उपदेशिलेला

'मराठा तितका मिळवावा । महाराष्ट्रधर्म वाढवावा ।' हा उपदेश पुन्हां ह्या प्रान्ताला करून तोच महाराष्ट्रधर्म स्थापन केला. गंगाजीचें एकंदर वर्तन पाहिलें तर त्यांच्या महाराष्ट्र धर्माच्या कल्पनेंत सर्वांचाच समावेश होत होता इतकी व्यापक व्याख्या त्यांच्या धर्माची होती.

ह्या बखरीचें संशोधन मी केलें आहे असें वर सांगितलें आहें. सदरहू बखर कोणत्या फरकानें १८८२ साली काव्येतिहास–संग्रहकर्त्यांनीं छापली त्याचें मी टीप नंबर १ मध्यें व वर विवेचन केलें आहे. त्या बखरींतला फरकही त्या टीपेंत व वरील विवेचनांत मी दिग्दर्शित केला आहे. का. सं. च्या प्रतीचें संशोधन केलेलें नव्हते, त्यामुळें ही बखर खरी आहे किंवा एक भारूड आहे हें समजणें कठीण जात होतें. उत्तर कोंकण प्रान्ताचा इतिहास रा. ब. जोशी ह्यांनीं लिहिलेला आहे त्या पुस्तकांत त्यांनीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं इ. स. १७२९ च्या सुमारास ह्या मोहिमेस आरंभ झाला. व तो आरंभ अंताजि रघुनाथ कावळे व त्यांचे बंधु ह्यांनीं केला त्यांना यजमान ह्या नात्यानें गंगाजी नाईकप्रभृति अणजूरकर भावांनीं मदत केली. वस्तुतः ह्या मोहिमेंचा आरंभकाल आपणांस बीजरूपानें इ. स. १६८०–१६८९ ल्या दशकांत झालेला दिसतो व आरंभकर्ते निंबाजी नाईक हे होते. त्यांचें दुसरे म्हणणें असें कीं गंगाजी नाईकांचा पेशव्यांचें दरबारीं अंताजी रघुनाथांच्यामुळें प्रवेश झाला व गंगाजीचें 'उर्जित' होणें वा न होणें, अंताजी कावळ्यांचें हातीं होतें. हा त्यांचा समज होण्याला कारण असें दिसतें कीं १८८२ सालीं छापलेली ही साष्टीची बखर त्यांना भारुड वाटली असावी. त्यांनीं आपला सगळा भार अंताजि रघुनाथांना आलेल्या कांहीं पत्रावर ठेवलेला आहे. श्री. केशवराव आप्पा पाध्ये ह्यांच्या 'हेमाद्रि पंडीत' ह्या ग्रंथांतही त्यांनीं ह्या मोहिमेचे श्रेय गंगाजी नाईकांन दिलें नाहीं, त्यांच्याही मनाचा कल अंताजी रघुनाथाच्या बाजूकडचाच स्पष्ट दिसतो. रा. ब. पारसनीसानीं साष्टीच्या बखरीचा उपयोग आपल्या ब्रह्मेंद्रस्वामीच्या चरित्रांत 'वसईची मोहीम' हा भाग लिहितांना आधार म्हणून केला आहे व त्यामुळें त्यांच्या लिहिण्यावरून गंगाजी नाईकांची एकमेव कामगिरी त्यांना पटलेली दिसते. त्यांच्या ग्रंथांत अंताजी रघुनाथांचें कामगिरीचा व नांवाचा उल्लेख इन्क्विझिशनच्या वसई प्रान्तांतील जुलमानंतर म्हणजे बराच पुढें–१७३२ च्या नंतर–केलेला आढळतो. श्री. सरदेसाई यांनीं मात्र आपल्या मराठी

रीयासत मध्यविभाग भाग ३ मध्यें वसईच्या रणसंग्रामाचें मूळ उत्पादक म्हणून गंगाजी नाईकांच्या नांवाचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. अंताजी रघुनाथ गंगाजीना नंतर मिळाले असें त्यांच्या लिहिण्यावरून तसेंच अंताजी रघुनाथांच्या कामगिरीचा उल्लेख पुढील काळांत जो रीयासतकारांनीं केला आहे त्यावरून स्पष्ट दिसून येतें. ह्यावरून असें दिसतें कीं सदरहू बखरीचें योग्य तें संशोधन त्यावेळीं झालेलें असतें तर रा. ब. जोशीसारख्यांना असें ऐतिहासिक सत्याला सोडून लिहितां आलें नसतें. म्हणून मी माझेजवळील ह्या बखरीच्या हस्तलिखित प्रतीचें पहिल्यानें संशोधन केल्याचें वर म्हटलें आहे. वाचकांनीं बखरीच्या खालीं दिलेल्या टीपा काळजीपूर्वक वाचल्यानंतर त्यांची खात्री होईल कीं ही बखर अगदीं अक्षरशः खरी आहे. बखरींत आढळलेली प्रत्येक महत्वाची बाब्रत, तसेच घडलेली प्रत्येक हकिकत, महत्वाचे उल्लेख, नावाजलेले रणपुरुष व साधुसंत, वर्णिलेल्या लढाया इत्यादि महत्वाच्या गोष्टी त्यावेळीं खरोखर महाराष्ट्रांत घडल्या किंवा नाहींत व घडल्या असल्यास बखरींत वर्णलेल्या पद्धतीनेंच घडल्या किंवा नाहींत हें मी आधीं इतर ऐतिहासिक ग्रंथाबरोबर ताडून पाहिले आहे. नंतर बखरींत उल्लेखिलेले निरनिराळे प्रसंग कोणत्या सालीं घडले आहेत त्याचा शोध करून महाराष्ट्राच्या व कोंकणच्या इतिहासांत ते केव्हां व कोठें घडले हें निश्चित केलें आहे. अशा रीतीनें हे सर्व प्रसंग विश्वसनीय व पटणाऱ्या पुराव्यानें कायम केल्यानंतर माझी खात्री झाली आहे कीं ही बखर अक्षरशः खरी आहे. बखरीतले अगदी क्षुल्लकसे उल्लेखही खरे ठरल्याचें वाचकांना सर्व टीपा वाचल्या असतांना दिसून येईल. बखरींत उल्लेखिलेलीं सर्व स्थळें व किल्ले यांच्याबद्दलहि मी माहिती मिळविली असता त्या त्या स्थळांचें व किल्ल्यांचें वर्णन अगदीं बरोबर आहे असेंच आढळून आले. स्थळ, काल, पुरुष ह्या त्रयींनीं सिद्ध असलेला हा इतिहास सत्याला धरूनच आहे अशी माझी खात्री झाली. किल्ले, डोंगर, गांव, नद्या, खाड्या, इत्यादि स्थळांचें वर्णन इतकें तंतोतंत क्वचित्च ठिकाणीं जुळलेलें दिसून येतें अशा रीतीनें ही बखर खरी असल्याचें वर सिद्ध केले असतां नंतर ह्यापुढें आपणास कोणत्या गोष्टींची मालिका सिद्ध करतां येतें ते पाहूं.

इ. स. १६०० च्या सुमारास बाळ नाईक व त्यांचे दोन भाऊ फिरंग्यांच्या जुलमामुळें वांदरे सोडून अणजूरास राहाण्यास आले. बाळ नाईकाचे पणतु निंब नाईक यांनीं प्रथमतः इ. स. १६८९ च्या पूर्वी संभाजी महाराजांचेकडे फिरंग्याच्या जुलमाविरुद्ध तक्रार केली परंतु छत्रपतींच्या वधामुळें ती गोष्ट तशीच राहिली. शाहू महाराजांच्या कारकिर्दीत बाळाजी विश्वनाथ पेशवे झाल्यानंतर म्हणजे सन १७१८ च्या वेळीं पुन्हां हें प्रकरण उपस्थित झालें. निंबांजीचें प्रथम स्त्रीचा मुलगा शामजी नाईक हे विभक्त होते. परंतु द्वितीय पत्नीचे मुलगे गंगाजी, बुवाजी, मुऱ्हारजी, शिवजी

व नारायणजी ह्यांनीं ह्या कार्याची अगत्य धरली होती. पण श्रीसमर्थांच्या 'सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परंतु तेथें भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥' ह्या उपदेशाप्रमाणेंच गंगाजी नाईकांनीं 'मनि विचार केला, जे या कामास देवाचा आश्रय असावा, असें ठरवून नंतर ते श्रीमारेश्वरास इ. स. १७१८ त गेले. त्या ठिकाणीं त्यांनीं अनुष्ठान केल्यानंतर श्रीदेवाचा प्रसाद घेऊन गंगाजी नाईक आले. ही हकिकत इ. स. १७१८ त घडलेली आहे. पुढें गंगाजी नाईकांनीं कान्होजी आंगरे सेनाखेल ह्यांच्याकडे अनुसंधान लाविलें पण त्यांनीं ही गोष्ट नाकारल्यामुळें इ. स. १७२० त देहूकर नारोबा गोसावींच्या मार्फत बुगाजी नाईकांनीं सेनापतीकडे अनुसंधान बांधलें. पण त्याच सालीं म्हणजे इ. स. १७२० सालीं पेशव्यांचा अंमल कल्याणास कायम झाल्यामुळें सेनापतीकडे न जातां गंगाजी नाईकांनीं रामचंद्र महादेव मार्फत बाजीराव पेशव्याकडे हे गाऱ्हाणें पोंहोंचविलें. त्यांनीं आश्वासन दिलें. परंतु मध्यंतरी अनेक वर्षे म्हणजे १७२० ते १७२९ पर्यंत पेशव्यांना हा मनसुभा हातीं घेण्यास उरकच झाला नाहीं. वेळोवेळीं पेशव्यांचे लोक इकडे येत व इकडील भागाची माहिती करून घेऊन जात. इ. स. १७२९ च्या सुमारास अंताजी रघुनाथ गंगाजी नाईकाकडे कल्याणास आले व त्यानंतर त्यांनींही पेशव्याकडे त्याबद्दलचा तगादा सुरू केला. इ. स. १७३० त कांव्याची लढाई झाली. इ. स. १७३१ त मनोहर येथें लढाई झाली. अशा रीतीनें ह्या मोहीमेस १७३० सालापासून खरी सुरवात झाली. पुढें पुन्हां सर्वत्र सामसूम झालें. इ. स. १७३२ त गंगाजी नाईक वेतागून देशत्याग करण्यास निघणार होते. त्या वेळीं पेशव्यांनीं हें कार्य करण्याचे नक्की ठरविलें. पेशव्यांचे लोक इकडे खार्ची करून घेण्याकरितां पुन्हां येऊं लागले. परंतु निजामउल्मुलख व सिद्दीसात ह्यांच्यापुढें दरवर्षी हें काम राहतच गेलें. इ. स. १७३७ त मात्र ह्या मोहीमेस पुन्हां खरी सुरवात झाली. ह्या वर्षी साष्टी घेऊन ठाण्याचा किल्ला घेतला. इ. स. १७३८ त पुन्हा फिरंग्यांनीं उचल खाल्ली. परंतु इ. स. १७३८ च्या उत्तरार्धांत माहीम व तारापुर हीं ठिकाणें मराठ्यांनीं घेतलीं व १७३९ च्या मे मध्यें वसई घेऊन फिरंग्याची एकदाची उचलबांगडी केली. ह्या सर्व लढायांत, उलाढालींत व खटपटींत गंगाजी नाईकच मुख्य सूत्रधार होते. बखर वाचून पाहीली असतांना आपणास हें स्पष्ट दिसतें कीं ह्या वीरपुरुषानें जर अत्यंत स्पृहणीय चिकाटी धरली नसती तर फिरंग्याचें उच्चाटन वसई प्रान्तांतून कधींच झालें नसतें. कांहीं वेळां तर त्यांना फार निराश व्हावें लागलें. अग्निकोटें सहकुटुंब भक्षण करण्यापर्यंत त्या वीराच्या मनाची तयारी होती. फारच क्वचित प्रसंगी दिसून येणारा 'एकतर मरु नाहींतर मायभूमी सोडवू' हा निर्धार त्यांनीं स्वतःच्या ठिकाणी केलेला होता. गंगाजी नाईकांनीं सर्व पाठारे क्षत्रिय ज्ञातीला जणूं वीरश्रीची दीक्षा दिली होती असें दिसतें. पुष्कळ काळानंतर आपण हा आपला जुना धर्म (क्षात्रधर्म) अंगिकारला आहे व ह्यांत आतां माघार

घेतां कामा नये, असा त्यानीं सर्वांना उपदेश केला. आपल्या सहकाऱ्यांना व इकडील इतर ज्ञातिसमूहांना त्याचप्रमाणें कोळी, भंडारी, प्रभू वगैरे गृहस्थांसही ह्या कार्यास गंगाजी नाईकांनीं आपल्या व्रतनिष्ठेनें व उदार वर्तनानें उद्दीपीत केलेलें आपल्यास बखरीवरून दिसतें. कांहीं मुसलमान व ख्रिस्ती कपतान यांनाहि आपल्या कार्याचें महत्त्व पटवून आपलेकडे वळवून घेतलेलें आपणास दिसतें. अशा रीतीनें गंगाजी नाईक हे राष्ट्रसंसारी बनले होते म्हणूनच हा अपूर्व विजय मराठ्यांना मिळविता आला हें कोणीही कबूल करील. पाश्चिमात्यांच्या विरुद्ध इतक्या चिकाटीनें लढून मराठ्यांनीं विजय मिळविणें अशक्य आहे असा त्यावेळीं समज होता. पण ह्या अपूर्व अशा धर्मसंग्रामानंतर हा समज खोटा आहे असें सर्वांचें प्रत्ययास आलें. पाश्चिमात्यांच्या विरुद्ध लढून त्यांचा पराजय प्रथमतः एशियांतील जपानने केला असा सर्वत्र समज आहे. पण आपण जर वस्तुस्थिति पाहिली तर ह्या पाश्चिमात्यांच्या प्रथमच्या पराजयाचें श्रेय जपानचे बादशहा किंवा त्याचे सरदार टोगो वगैरे यांचे नसून तें मराठ्यांचें व त्यांच्या धुरंधर अशा सेनापतीचें–आप्पासाहेबांचे–व त्यांच्या इतर सर्व सरदारांचे व गंगाजी नाईकादि सर्व कोकण प्रान्तीय पुढाऱ्याचें आहे. अशा संग्रामास मूहूर्तमेढीपासून आरंभ करून कळसापर्यंत थोरतम अशा चिकाटीनें पोहचवून कार्य पुरें करणाऱ्या एकमेवाद्वितीय अशा व्यक्तीची थोरवी जितकी वर्णावी तितकी थोडीच होणार आहे. अशा व्यक्तीस विसरणें म्हणजे राष्ट्रपुरुष–द्रोहाचें पातक करणें होय. आजपर्यंतच्या प्रसिद्ध झालेल्या इतिहासानें ही चूक केली आहे. परंतु ह्या बखरीच्या प्रकाशनानें आतांतरी ती चूक सांवरण्यांत येतें किंवा नाहीं हें पाहाणें आहे. गंगाजी नाईकांना 'मायभूमी' व 'माराष्ट्रधर्म' ह्या दोन गोष्टीचा कसा निदिध्यास लागला होता, व 'धर्मा करितां मरावें । मरुनी अवघ्यास मारावें । मारता मारतां घ्यावें । राज्य आपलें' ही मागे दिलेली समर्थांची शिकवण त्यांच्या हाडींमासीं कशी खिळली होती हें बखरीच्या वाचनानें आपणास कळून येईल. त्यांनीं आपला धर्म बुडत आहे हें पाहून सर्वां आधीं ह्या धर्मसंग्रामाचा ध्वज प्रथम उभारला व नंतर आपलीं वतनें मिळावीं अशी इच्छा धरली. त्यांचे शेवटचे शब्द पुढीलप्रमाणें आहेतः– 'निमित्य कीं आपले मुलकास दुष्ट राजा फिरंगी आहे. तो खणून काढावा. माराष्ट्रराज्य करावे. देवधर्म माराष्ट्र स्थापावे. व तीर्थें क्षेत्रें मुक्त व्हावीं. वतनदारांची पुरातन वतनें स्थापावि. आपलें वतन पूर्वापार स्थापावें. हा संकल्प श्रीमोरयाजवळ केला होता. त्यास सर्व आलें. परंतु वतनदारांची वतनें वृत्त्यांशि ब्राह्मणाच्या वृत्ति न सुटत आपलेहि वतन न सुटे व देसायाचे वतन न सुटे' ज्यांना आपण मदतीस घेतलें त्यांचीं व ब्राह्मणांची वतनें व स्वतःचे वतन सुटलें नाहीं म्हणून त्यांना त्याबद्दल जितकें दुःख झालें त्यापेक्षा कितीतरी पटीने 'माराष्ट्रराज्य झाले' 'देवधर्म माहाराष्ट्र स्थापिले' 'तीर्थें क्षेत्रे मुक्त झालीं' त्यामुळें आनंद झाला होता हें 'त्यास सर्व आले' ह्या त्यांच्या शब्दावरून सिद्ध होतें.

आधी स्वधर्म स्वदेश व नंतर इतर व्यवसाय अशा रीतीची स्वतःची मनोभूमिका तयार करुन आपल्या सर्वा भावांची व सोइरेधाइरे याची तशीच मनोभूमिका तयार करणाऱ्या महापुरुषास, व डोळ्यासमोर इनक्विझीशनचा राक्षसी छळ उभा असतांनाही मनाची तयारी तशीच सतत २२ वर्षें कायम ठेवून आपल्या सगळ्या मदतनीसासही तशीच धैर्यवृत्ति धरावयास लावणाऱ्या राष्ट्रपुरुषास महाराष्ट्रानें विसरावयाचें असेल तर कांहीं म्हणणें नाहीं. गंगाजी नाईकांच्या ठायीं अत्यंत स्पृहणीय धैर्य व मुत्सद्दीपणा असल्याविना पाश्चिमात्यासारख्या दुर्दमनीय शत्रूबरोबर तुटपुंज्या साहित्यानें वारंवार होणाऱ्या निराशेचे स्थितींतही आपलें वैर सतत २२ वर्षें कायम ठेवणें हें त्यांना शक्य झालेंच नसतें. हेंच वैर त्यांनीं स्वतःच्या मदतनीसाकडूनही तितक्याच धैर्यानें व चिकाटीनें प्रत्यक्ष फिरंग्याच्या अमलाखालील मुलखांत चालू ठेविलेले होते. भयंकर अशा शिक्षा प्रत्यक्ष अनुभवास येत असतांही त्यांनीं स्वतः कारागृहवास पत्करला आपल्या मदतनीसांनांही पत्करावयास लावला, भालेराव बंधूंनीं तर आपल्या प्राणांच्या आहुतीही ह्या कार्यांत दिल्या, इतक्या सर्व गोष्टी त्यांनीं केल्या व करवल्या पण एकही मनुष्य आपल्या शिकवणीच्या बाहेर जाऊं दिला नाहीं किंवा फिरंग्यांना फितूर होऊ दिला नाहीं. ह्यावरून त्यांच्या शिकवणींतील कणखरपणा, तेज व पाविच्य दिसून येते. पेशव्याचे लोक आंतील मनुष्याची खात्री करून घेण्याकरितां वारंवार येऊं लागल्या वेळीं गंगाजी नाईकांच्या माणसांनी थोडी भीति प्रदर्शीत केली. त्या वेळीं गंगाजी नाईकांनीं त्यांना स्पष्ट सांगितलें कीं 'जर मजला श्रीदेवानें अभय दिधलें आहे. त्या भरवशावर देवाचे अभय घेतो. तेव्हां तुम्हांकडे मनुष्य पाठवितों. तुम्ही मोरयाचें स्मरण करुन जें काम पडेल तें करा. मनांत कपट येउं देऊं नको. हा सेवाधर्म येकनिष्ट करा. तुम्हास बाजीरायाचे हातचि वस्त्रें येतात. तुम्ही बाजीरायाचे चाकर खरे आपण बहुत काळानें सेवा पूर्वजामागें अंगिकारिली ॥ तर ही सेवा एकनिष्ठपणें करावि. यामुळें बऱ्यावाईटाचे संकल्प देवापुढें ठेवावे, बरे जाले तर आपण आपलीं वतनें खाउ आणि पुण्य पुरुषार्थ वाढेल, किर्ति परमार्थ प्राप्त होईल वाईट जाहले तर या महत् कार्याचा व आपले कुटुंबाचा संकल्प करावा. आपला संकल्प ऐसा आहे तुम्हास किंवा आम्हास दगा येखादे माणसास जाला म्हणजे आपण आपल्या कुटुंबासुद्धां अग्निकाष्टे भक्षण करुं हा आपण निर्धार करुन तुम्हाकडेस आलों. देव तुमचा निभाव करिल, तेविशि तुम्ही चिंता न करावि' ह्यावरुन आपणास काय दिसून येतें ! गंगाजी नाईकाचा परमेश्वराच्या न्यायनिष्ठेवरील अत्यंत श्रेष्ट प्रकारचा भरंवसा दिसून येत आहे.

त्या वेळीं जवळ जवळ साठ-सत्तर हजारपर्यंत हिंदु लोक बाटविले गेले होते. जर हा संग्राम त्या वेळीं न घडता तर सर्व कोंकण प्रान्त ख्रिस्तमय झाला असता. शिव-

रायाच्या जन्मानें शेंडी राहिली असें जसें म्हणता येतें तसेंच गंगाजी नाईकाच्या जन्मानें बाप्तिस्माचा प्रसार थांबला असेंच म्हणतां येतें. अशा रीतीनें धर्म व राष्ट्र अशा दुहेरी कार्यास वाहिलेल्या गंगाजी नाईकांना—आपलें हिंदुत्व कायम राखणाऱ्या ह्या धर्मवीराला मुंबई, वसई, साष्टीप्रान्त, अष्टागरप्रान्त वगैरे कोंकणच्या ह्या भागांतील हिंदूंनीं तरी विसरून चालावयाचें नाहीं. माझिनीप्रमाणें त्यांनीं ह्या प्रान्तांतील लोकांना धर्म व देश ह्यांच्या सेवेचें बाळकडू पाजिलें व गॅरिबॉल्डीप्रमाणें सतत १८ वर्षें युद्धाचें थैमान कायम ठेवून धर्म व देश ह्यांची फिरंग्याचे हातांतून मुक्तता केली. असो; ह्या बखरीच्या प्रकाशनाने कोंकण प्रान्तातल्या राजकीय इतिहासाचें एक दालन उघडलें जात आहे.

वृद्धांच्याकडून कळलें कीं गंगाजी नाईकांना मदत करणाऱ्या वसईच्या गुजाबाई सुतारणीचें नांव दमयंती होते. ज्या वृद्ध गृहस्थांनीं हें नांव सांगितलें त्यांनीं गंगाजी नाईकांची रोजनिशि वाचलेली होती त्या बाईच्या सर्व कारस्थानांची हकिकत त्यांनीं तींत वाचल्याचें सांगितलें आहे.

पेशव्यांनीं वसईतील कोणा गृहस्थास उमेळ्याची वाडी त्या वेळीं बक्षिस दिली होती कै. विनायक राघोबा गोरक्ष त्यांच्या पूर्वजांना ती वाडी बक्षिस देण्यांत आली होती असें म्हणतात. अर्थात् बखरींतल्या नारायणजी सुतार ह्यांच्याच कामगिरीबद्दल त्यांचे वंशजाना ही वाडी मिळालेली दिसते. अर्थात् गोरक्ष हे नारायणजी सुतार ह्यांचे वंशज असावेत. फिरंगी किरिस्ताव मंडळी गोरक्षांच्या कुटुंबियाना 'सपावले' म्हणत असत.

हें महत्वाचें कार्य बरींच वर्षें पडून राहिलें होतें. माझे परममित्र श्री. भगवंतराव म्हात्रे व श्री. माधवराव केशवराव चेंबूरकर ह्यांच्या मदतीनें हें कार्य ह्यापूर्वीच होणार होतें. ९।१० वर्षांपूर्वी त्यांनीं ही बखर छापण्यास दिली होती व १५० रुपयेपर्यंत त्यांनीं खर्चही केले होते पण छापखान्याच्या जप्तीमध्यें हें काम तसेंच राहिलें. पुढें श्री. भगवंतराव म्हात्रे ह्यांनीं ह्या बखरीचें संशोधन करण्यास मला पुन्हां सांगितल्यावरून मी हें संशोधन केलें आहे. ही बखर छापण्यास, जिचा दहा लक्ष रुपये निधी आहे अशा वरळी गोपचार व भोये संस्थान ह्या पाठारे क्षत्रिय ज्ञातींतल्या सार्वजनिक कार्यें करणाऱ्या संस्थेनें मला मदत करावी अशा तऱ्हेच्या माझ्या अर्जानंतर संस्थानच्या विश्वस्तांनीं मला मदत करण्याचें मोठ्या आनंदानें ठरविलें. श्री. भगवंतराव जनार्दन म्हात्रे, बी. ए. संस्थानच्या विश्वस्तमंडळाचे अध्यक्ष, ह्यांनीं मित्रप्रेमानें मला सर्व प्रकारची मदत करण्याचें कबूल केलें व त्याचप्रमाणें दोन विश्वस्त श्री. वसंतराव दामोदर रावते व संस्थानचे सर्वसाधारण चिटणीस श्री. वसंतराव दामोदर म्हात्रे ह्यांनींही तितक्याच प्रेमानें व आस्थेनें मला मदत करण्याचें आश्वासन दिलें. ह्या सर्वांचा सुपरिणाम होऊन हातीं घेतलेलें हें संशोधनाचें

कार्य जास्त नेटानें व हुरूपेनें मी चालूं ठेविलें. हें घेतलेलें कार्य लवकर पार पाडण्यास माझे नेहमीचे हितचिंतक व प्रिय मित्र क. भू. श्री. शान्ताराम जनार्दन पाठारे, संपादक, क्षात्रवृत्त, ह्यांनीं मला फार प्रेमानें निकड लाविली, व सर्व प्रकारची मदत मिळवून देण्याचें आश्वासन दिलें. तें आश्वासन त्यांनीं माझ्या अपेक्षेबाहेर पुरें केलें आहे. ह्या पुस्तकाच्या मुद्रित करण्याचा बाजूचा सर्व भार मी त्यांच्यावर ठेवला होता. आपलीं स्वतःचीं पुस्तकें मुद्रित करितांना त्यांनीं घेतली नसती इतकी मेहनत आपुलकीच्या भावनेनें त्यांनीं माझ्या पुस्तकाकरितां घेतली. श्री. वसंतराव म्हात्रे यांनीं ह्या पुस्तकांतलीं सर्व छायाचित्रें तयार करण्याकरितां अनेक ठिकाणीं उन्हांतान्हांतून, अन्नपाण्याविना ते फिरले व हा संस्मरणीय भाग त्यांनीं पुरा केला. ह्या सर्व छायाचित्रांचें श्रेय श्री. वसंतराव म्हात्रे यानांच आहे. माझे प्रिय मित्र भगवंतराव म्हात्रे यांनीं हस्तलिखितें स्वतः वाचण्याचें करून अनेक उपयुक्त सूचना केल्या; नंतर छापखान्यांत हस्तलिखितें देतांना श्री. शान्ताराम पाठारे ह्यांनीं तीं वाचून अनेक वेळां दुरुस्त केलीं. गोपचार संस्थानची सहानुभूती ह्या ग्रंथाकडे वळण्यास श्री. भगवंतराव म्हात्रेच कारणीभूत झाले आहेत हें विसरून चालणार नाहीं. श्री. वसंतराव म्हात्रे यांच्या शिफारसीनें व श्री. शान्तारामजींच्या मध्यस्तीनें प्रो. केतकर मास्तरांनीं मुऱ्हारजी नाईकांचा देह पाडल्याच्या प्रसंगाचें चित्र व बखरींतल्या निरनिराळ्या प्रसंगांचीं चित्रें विनामूल्य तयार करून दिलीं. ह्या सर्वांचे मी ह्या ठिकाणीं फार कृतज्ञताबुद्धीनें, त्यांनीं केलेल्या मदतीकरितां आभार मानतो. गोपचार संस्थानच्या विश्वस्तांनीं जर हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठरविलें नसतें तर माझे सर्व मनोरथ जमीनदोस्त होणार होते. म्हणून त्यांचे आभार मला प्रथमतः मानले पाहिजेत. बखरीकरितां गोपचार संस्थाननें नेमलेल्या इतिहास मंडळांतील श्री. मुकुंदराव जनार्दन गोरेगांवकर, संपादक, क्षात्रदूत, यांचेहीं आभार मला ह्या ठिकाणीं विशेष मानले पाहिजेत. त्यांनींहि माझ्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत पाहून मला मोठें प्रोत्साहन दिलें. इतकेंच नव्हे तर इतिहासमंडळाच्या अहवालाव्यतिरिक्त स्वतःचा निराळा अभिप्रायही त्यानीं पाठविला आहे. अर्थात् माझें पुस्तक मान्य करणाऱ्या उपरोक्त इतिहास मंडळाचे आभार मानतांना श्री. मुकुंदराव गोरेगांवकरांचेही विशेष आभार मी मानणें जरूर आहे. प्रो. नीळकंठराव सदाशिव ताकखाव, एम्. ए., आय् ई. एस्. व तपस्वी रामजी लक्ष्मण घरत यांना माझ्या बखरीच्या प्रूफकॉपी पाठविल्यानंतर त्यांनीं आपापले अभिप्राय व उपयुक्त सूचना त्वरीत पाठविल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. प्रो. ताकखावांच्या सूचना फारच उपयुक्त आहेत. त्यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक व अभ्यसित वृत्तीनें माझें पुस्तक वाचून अगदीं थोड्या वेळांत फार विस्तृत रीतीनें सूचना पाठविल्याबद्दल मी त्यांचे फार कृतज्ञताबुद्धीनें आभार मानतो. त्यांच्या बहुतेक सूचनांचा विचार मी आधींच निरनिराळ्या परिशिष्टाचें रूपानें केलेला होता हें त्यांना त्या प्रूफकापवरून कळणें शक्य नव्हतें. पुढें ते मुंबईत

आल्यावर स्वतः भेटून त्यांची खात्री करून दिल्यावर त्यांनीं आपला सविस्तर अभिप्राय पाठविला आहे. तपस्वी घरत मास्तरांनीं फार उपयुक्त अशी सूचना थोडक्यांत पाठवून अभिप्रायही पाठविला आहे. त्यांची अर्नाळ्याच्या किल्ल्यावरील श्लोकांसंबंधाची टीप मी माझ्या पुस्तकाचे शेवटीं दिलेली वाचकांस दिसून येईलच. तपस्वी घरत मास्तरांनीं स्वतः भेटल्यानंतर दिलेल्या आशीर्वादाबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

सद्भक्ति प्रकाश प्रिंटिंग प्रेसचे मॅनेजर व कामगार मंडळी ह्यांनीं पुस्तक छापून देण्यांत जी तत्परता दाखविली व काळजीपूर्वक हें काम केलें त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. श्री. दत्ताराम श्रीकृष्ण पाटील ह्यांनीं ह्या पुस्तकास जोडलेला नकाशा तयार करून दिल्याबद्दल मी त्यांचेहि आभार मानतों. गांवांची व स्थलांची माहिती मिळवितांना अणजूर शाळेचे हेड मास्तर श्री. कृष्णाजी काशिनाथ साठे ह्यांनीं केलेल्या मदतीबद्दल मी त्यांचा आभारी आहे. मुद्दाम सवड काढून आपुलकीच्या भावनेनें अल्पावधींत ग्रंथाचें संशोधन करून आपला चैतन्ययुक्त अभिप्राय व्यक्त करणाऱ्या डॉ. नारायणराव सावरकरांचे आभार मानावे तितके थोडेच होतील.

ज्या ग्रंथकारांचे ग्रंथ मी ह्या पुस्तकाचें संशोधन करण्याकरितां आधारास्तव घेतले आहेत त्या ग्रंथकारांचा मी फार आभारी आहे. श्री. सरदेसाई यांचे 'मराठी रियासत–मध्य-विभाग' ह्या पुस्तकाचा व श्री. पारसनीसांचें 'ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर यांचें चरित्र' ह्या पुस्तकांचा मला फार उपयोग झाला.

गंगाजी नाईकांचें हस्ताक्षर मिळविण्याच्या प्रयत्नांत नाशीकचे श्री. अनंत रघुनाथ बेळे ह्यांनीं फारच श्रम घेऊनही त्यांना तें मिळालें नाहीं हें दुर्भाग्य होय. त्यांनीं घेतलेल्या श्रमांबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

ज्या जगन्नियंत्याच्या कृपेनें, हातीं घेतलेलें हें कार्य, हातावेगळे होण्याचा सुप्रसंग प्राप्त झाला, त्या दयाघन परमेश्वराचें कृतज्ञतापूर्वक आभार मानून व 'न्यूनपूर्ण क्षमा केलें पाहिजे' ह्या समर्थांच्या शब्दांत वाचकांना विनंति करून त्याचप्रमाणें

'यदक्षरं पदभ्रष्टं मात्राहीनं तु यद्भवेत् । तत्सर्वं क्षम्यतां देव नारायण नमोस्तुते ॥
यादृशं पुस्तकं दृष्ट्वा तादृशं लिखितं मया। यदि शुद्धमशुद्धं वा मम दोषो न विद्यते ॥'

ह्या श्रीमद्भागवतांतील श्लोकाकडे लक्ष्य वेधून ही प्रस्तावना पुरी करितों.

ता. १२ मे १९३५
मु. अणजूर, ता. भिवंडी.

गजानन गोविंद नाईक

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. .....
ग्रंथ शाखा (२३७)

वसईच्या तहाबद्दल मराठ्यांना मिळालेलें प्रशंसापत्र

डानव्हर्स आपल्या ग्रंथांत म्हणतातः—

'On the departure of the Portuguese from Bassein, the Maharattas took possession of that place and testimony is borne to the fact that they **faithfully** observed all the conditions of the capitulations, permitting all who wished to remain in peace."

Page 412.

WORLI GOPCHAR & BHOYE SAMSTHAN

Resolution dated 29th July 1934.

Read letter received on 1st July 1934 from Bro. G. G. Naik making various suggestions.

Further resolved that the Samsthan do undertake the work of collecting and preserving all the materials relevant to the History of the caste and also of writing the History of the caste. Further resolved that Bro. G. G. Naik be and he is hereby appointed the sole collector of the said Historical records and documents and he be paid all his costs, charges and expenses for the aforesaid work. Further resolved that the Samsthan do open, start, conduct and develop an independent and separate department called the Historical Research Dept., whereat all work relating to the History of our caste should be carried out and Bro. G.G. Naik be kept in charge of the said department. Further resolved that a suitable iron cupboard and other furniture be purchased for the said department from the permanent Building Fund. Further resolved that the secretary in consultation with the chairman do take such other steps and do all such acts, deeds and things as will be helpful in writing an authentic History of our caste which has not been written as yet though attempts in that direction were made by various institutions such as Kshatriya Union Club and S. K. V. Samaj since 1906.

Resolution dated 16th December 1934.

Read letter of 10th Sept. 1934 from Bro. G. G. Naik relating to the Historical writings and Bakhar of our caste. Resolved that

the Historical writings mentioned in the said letter and called **आपल्या ज्ञातीच्या इतिहासाची रूपरेखा** and to be written by Bro. G. G. Naik the Historian and writer of the caste be examined when ready by Bro. B. J. Mhatre the chairman of the Board and Bro. S. J. Pathare, the editor of Kshatravritta and that the said writings be printed, published and distributed if possible at the time of the Golden Jubilee celebration of the Kshatriya Union Club. Further resolved that having regard to the status, dignity influence of, and the beneficial work done by the said club, in the interest of the members of the caste, the Historical writing of said G. G. Naik mentioned in the said letter and called **"वसई रणसंग्रामाची बखर"** if ready be dedicated to the said club on the most momentous and Historical accession of the Golden Jubilee celebration. Further resolved that the manuscript of the said writing by G. G. Naik be examined by Bros. Mukundrao Janardan Goregaonkar and Bhagwant J. Mhatre, who may be at liberty to consult those (persons) whom they deem to be fit and proper persons for examining Historical writings of our caste and that the said writings when examined and approved of as afoer-said be printed, published and distributed, as the publication thereof will be in the interest of our caste in as much as it will disclose Historical truths about our caste. which truths have either been suppressed or ignored by the Historians of Maharashtra Further resolved that the secretary be and he is hereby authorised to pay all costs, charges and expenses of and incidental to the writings, printing and publishing and distributing the said writings called **"आपल्या ज्ञातीच्या इतिहासाची रूपरेखा"** and **"वसई रणसंग्रामाची बखर"** with such forewords and prefaces, photos and pictures, plans, maps, sketches, drawings etc., as may be relevant to be subject matter of the said writings. Further resolved that Historical writings, works, booklets, leaflets etc., written by the said Bro. G. G. Naik or any other writer not belonging to our caste in the future be examined by Bros. M. J. Goregaonkar, S. J. Pathare, V. D. Raote, G. G. Naik, B. J. Mhatre, with powers to add to their number and that the said persons be called "Pathare Kshatriya Historical Research Committee" and that Bro. B. J. Mhatre be and he is hereby appointed the chairman of the said committee and Bro. S. J. Pathare be and he is

appointed the secretary of the said committee. Further resolved that the Secretary of Samsthan be and he is hereby authorised to print, publish, distribute such writings as are approved of by the said Committee.

काव्येतिहास-संग्रहकर्त्यांनीं छापलेल्या साष्टीचे बखरींत प्रस्तुतची बखर संपली आहे त्यापुढें खालील मजकूर आहे:—

"साष्टीचे किल्ल्याचे संरक्षणार्थ महादजी शिंदे पांचशें लोकांनिशीं होते ते पुढें हिंदुस्थानांत गेले. त्या वेळेस रामाजी महादेव हे साष्टीचे सुभेदार होते. त्यांच्या पाठीमागें त्यांचे पुत्र आनंदराव राम सुभेदार होते. शके १६९६ त इंग्रजांनीं मुंबईहून पलटणें आणून ठाण्याचा किल्ला सर करून घेतला, त्या समयीं आनंदराव सुभेदार यांनीं मोठी लढाई दिली. किल्ल्यांतील फौज सारी पडली. त्यापैकीं आनंदराव सुभेदार व एक हवालदार असे राहिले होते. त्यापैकीं हवालदार यांस कपतान साहेब यांनीं गोळी घालून मारले व विसाजीपंत कळव्यांस फौजेनिशीं होते त्यांनीं फितूर होऊन बायबार केले व किल्ल्याच्या मैदानांत घरबंदी होती यामुळें आंतील फौजेचा इलाज चालला नाहीं यामुळें किल्ला हस्तगत झाला. दुसरे किल्लेही इंग्रजांनीं सर करून घेतले. आनंदराव सुभेदार यास मुंबईस नेऊन, त्याच्या सन्मानार्थ तोफा वगैरे मारून व गव्हरनर साहेब त्यास सामोरे जाऊन, मोठा मान देऊन, मुंबईत ठेविला. नंतर श्रीमंतांकडून पत्र आल्यावर त्यास पुण्यास रवाना केलें.

इकडे साष्टींत इंग्रजी अम्मल झाला. त्या वेळेस कितीएक आपलीं घरेंदारें टाकून अणजुरास व दुसरेकडे गेले. इंग्रज सरकारनें जाहिराती लाविल्या कीं, जो वतनदार असेल त्यानें वतनावर हजर व्हावें. नंतर साष्टीचे सरपाटील हजर झाले. हें वर्तमान श्रीमंतांकडे गेले व सरपाटील हे इंग्रजास मिलाफी झाले, तेव्हां पाटील यांजपासून ७००० रुपये दंड घेण्याविषयीं हुकूम आल्यावरून मामलेदार यांनीं सरपाटील यांजपासून ७००० रुपये दंड घेतला व वतन घेतलें. पुढें श्रीमंतांकडे जाऊन साष्टीविषयीं विनंती केली तेव्हां श्रीमंतांनीं सांगितलें कीं, "तुही वतनावर हजर कां झाला? तें राज्य आपण घेऊं" पुढें साष्टीचे मुद्दल माहादजी शिंदे यांस मध्यें घालून तिप्पट ९ लक्षांचा मुलूख शिंद्यास देऊन मुंबईच्या लगत साष्टी तीन लक्षांची इंग्रज यांनीं ठेविली."

शुद्धिपत्र.

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३	११	घेतली घारापुरी	घेतली, व घारापुरी,
७	३१	८७ का.	८७; का.
,,	,,	प. वा. ले.	प. या. ले.
१७	१०	च्या आधीं	च्या किति तरी आधीं
,,	११	होता. १६८९	होता. म्हणजे १६८९
,,	१२	असें दिसतें	असें स्पष्ट दिसतें.
२०	१२	आपलि या	आपलिया
२४	६	१७३९	१७२९
,,	३१	वेंच	तेंच
२७	२८	१७१९	१७२९
३२	१२	१७३९	१७३३
३५	६	ते सुद्धां हें	ते हें
३६	१४	the the	the
४५	१३	राजबारा व	राजबाराव
,,	१६	मोरच्याचें एक	मोरच्याचें हल्ल्याचें एक
४६	१	अखेरीस	अशेरीस
,,	८	माग	मागा
,,	२६	कउदिन	कडदिन
४८	१९	१७३७	१७३९

बखरींतली नाईकांची कामगिरी.

३	४	कविल्यास	कबिल्यास
,,	२२	ध्यावे ध्यावे	ध्यावे धावे
४	२२	वाघटाकें	वाघटाकें
,,	२३	वाघटाकें	वाघटाकें
५	२२	जयवंतजी	जसवंतजी
७	७	१७३८	इ. स. १७३८
,,	८	भीमराव	भीवराव
,,	१२	४ सोमवंशी क्षत्रिय ५ भंडारी	४ भंडारी ५ सोमवंशी क्षत्रिय

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
,,	२२	वेसावें मढाच्या	वेसावें–मढाच्या
८	२१	पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या महासभेचे	पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या साष्टींतील महासभेचे
,,	२९	नामजी	नामाजी
१०	१५	ठरविल्याप्रमाणें	ठरविलें त्याप्रमाणें
,,	१६	१७२७	१७२०
,,	१७	काढळल्यास	काढल्यास
१३	१८	ल. को. प्रा. ग. बा.	उ. को. प्रा. गं. ब्रा.
१४	२५	उ. भा. प्रा. गं. शु.	उ. को. प्रा. गं. शु.
१५	४	म्हणून हे एक	म्हणून एक
१८	३	घोटड्याखाली	घोटवड्याखालीं
,,	२६	गणेश हरि व वासुदेव हरि, रघुनाथ	गणेश हरि, वासुदेव हरि व रघुनाथ
१९	११	हे त्यांचे आजोबा	हे त्यांचे वडील बंधु
,,	१३	कुळकर्णी	कुळकर्ण
२३	१	जुलमाचे	जुलुमाचें
,,	१३	याय	यास
२५	५	व.	ब.
२८	२	प्रत्यांत	प्रतीत
३२	१८	वाजीराव	बाजीराव



अणजूरकर नाईकांना पेशव्यांकडून आलेलीं पत्रें.

२	२७	सायेबान	सायेवान
६	शेवट	श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान बाळाजी बाजिराव मुख्य प्रधान.	श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान बाजिराव बल्लाळ प्रधान

विषय			पानें
फिरंग्यांच्या जुलमाचें बखरींतील वर्णन...	...	...	२३–२४
गंगाजी नाईक यांचें तत्वज्ञान व उपदेश	...	...	२४–२५
खंडेराव दाभाडे यांचें बुबाजी नाईकांस आश्वासन	...	...	२५
रामचंद्रपंतांनीं गंगाजी नाईकांना दिलेलीं आश्वासनें	...	...	२५–२६
पांचा भावांचा विचार	...	...	२६
गंगाजींचे कामगिरीबद्दल कांहीं ग्रंथकारांचीं मतें व बखरकारांचें म्हणणें		...	२६–३२
वसईच्या किल्ल्याची दुर्भेद्यता	...	...	३३
अणजूरकर नाईकांना पेशव्यांकडून आलेलीं पत्रें	...	...	१—९
बखरींतल्या कांहीं प्रसंगांसंबंधानें पेशवे दप्तर व इतर ठिकाणचीं पत्रें		...	१०–२६
वसईच्या तहाचीं कलमें	...	...	२६
बखरींतील गांवें, खाड्या, किल्ले इत्यादि स्थलांची सूची	...	...	१–२१
कठीण शब्दांचे अर्थ	...	...	२२–२५
अाणखी कांहीं माहिती	...	...	२६

सनदा वगैरेंतील संक्षिप्त शब्द

शु।।—शुद्ध
ता।—तर्फ
ता।मोक—
श्री।—श्रीमंत
मा।।निले—मशारनिले
सु।।—सुद्धर
ना।, ना।।—नाईक
स्ने।।—स्नेहांकित
पो।—पोष्य
सं।।, सा।।—साष्टांग
रा।।।, रा।—राजश्री।
पा।।—पाटील
पा।।—पाठविली, पाठवितो
लि।।—लिहिलें
ता।।—तागायत
बा।।—
डि।।—
बा।।—बराबर
मो।, मा।।—मोकाम, मुकाम
कृ।। सा।। दं।। ता।।—कृतानेक साष्टांग दंडवत तागायत
बि।।—बितपशील
वि।।—विशेष
प्रो।—प्रमाणें
रा।।—रवाना
पा।।—पाहिजे
सिरसं।।।—शिरसाष्टांग
ई।।—
रू।।—रुपये
सं।।।—सांगून

. आधारभूत ग्रंथांचे संक्षेप

इ. वृ. १८३५-८७:—भा. इ. सं. मंडळ, इतिवृत्तें.

का. सं. प. या. ले. ४०२ पा. ५०४:—काव्येतिहाससंग्रह पत्रें यादी वगैरे लेख ४०२ पान ५०४

म. री. भा. ३
म. री. म. वि. पा.
म. री. पा.
म. री.
} मराठी रियासत–मध्यविभाग

शा. म. रो. ले., प. ६—शाहूमहाराजांची रोजनिशि लेख पत्रें.

ब्र. स्वा. च. ले.—ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांचें चरित्र व पत्रव्यवहार लेखांक

चे. ब. खं. ले.—चेऊलची बखर खंड–लेखांक.

ठा. जि. वर्णन
ठा. जि. व.
} —ठाणे जिल्ह्याचें वर्णन.

उ. कों. ग. ब्रा.
उ. ग. शु. ब्रा.
उ. कों. प्रा. ग. शु. य. ब्रा.
उ. कों. शु. ग. ब्रा.
उ. कों. प्रा. ग. ब्रा.
उ. कों. ग. शु. य. ब्रा.
} —उत्तर कोंकणांतील प्राचीन गङ्गातीरस्थ शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण.

का. स. श.—काव्येतिहाससंग्रह शकावली.

पे. द. रु.—पेशवे दप्तर रुमाल.

रा. खं.
रा. खं. ले.
} —राजवाडे खंड, लेखांक.

पा. क्ष. ज्ञा.—पाठारे क्षत्रिय ज्ञातीचें.

ब. पा.—बखर पान.

का. इ. पत्रें
का. सं. ऐ. पत्रें
} —काव्येतिहाससंग्रह ऐतिहासिक पत्रें.

म. चा. उ.—मराठ्यांचे संबंधानें चार उद्गार.

उ. को. प्रा. इ.
उ. को. इ.
} —उत्तर कोंकणाचा प्राचीन इतिहास.

पे. धर्म—पेशवाईतील धर्मसंग्राम.

हे. च.
हेमाद्रि
} —हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत यांचें चरित्र.

प. बा. पेशवे—पहिले बाजीराव पेशवे.

आधारभूत ग्रंथ

१ साष्टीची बखर इ. स. १८८२—काव्येतिहाससंग्रहकर्ते यांनीं छापलेली.

२ मराठी रियासत—मध्यविभाग, (इ. स. १७०७–१७४०) इ. स. १९२०—गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

३ ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांचें चरित्र व पत्रव्यवहार. इ. स. १९००.—दत्तात्रय बळवंत पारसनीस.

४ हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत इ. स. १९३१—केशव आप्पा पाध्ये ॲडव्होकेट.

५ उत्तर कोंकणाचा प्राचीन इतिहास. इ.स. १९२६—रावबहादुर पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी, पी. एच्. डी., एफ्. आर. जी. एस्., जे. पी., फेलो-मुं. यु. कॉबेल गोल्ड-मेडलिस्ट.

६ उत्तर कोंकणांतील प्राचीन गङ्गातीरस्थ शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण. शके १८०६–नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरे पुणताम्बेकर.

७ श्रीगणेशपंचपदी समूह. इ. स. १८९५—सखाराम गणेश इस्लामपूरकर ऊर्फ गणपतिबोवा.

८ ठाणें जिल्ह्याचें वर्णन. १८९१—जनार्दन बाळाजी मोडक.

९ पेशवाईंतील धर्मसंग्राम. इ. स. १९३०—विठ्ठल वामन हडप.

१० पेशवे दफ्तर रु. १६, वसईची मोहीम (१७३७–३९) इ. स. १९३१.

११ पेशवे दफ्तर रु. ३४ वसईची मोहीम (पुरवणी) (१७००–४०) इ.स. १९३३–गो. स. सरदेसाई, बी. ए.

१२ पहिले बाजीराव पेशवे इ. स. १९३०—प्रो. नारायण केशव बेहरे, एम्. ए., बी. एस्सी.

१३ पेशव्यांची बखर इ. स. १९२५—रा. ब. काशिनाथ नारायण साने, बी ए.

१४ वसईचा रणसंग्राम—श्री. सिताराम केशव दामले.

१५ क्षात्रवृत्त मासिक—सं. क भू. शांताराम जनार्दन पाठारे.

१६ भारतवर्ष–पंतप्रतिनिधींची बखर.

१७ महाराष्ट्र इतिहास मंजरी–पूर्वार्ध, शके १८४५—दत्तात्रय विष्णु आपटे.

१८ भयंकर धर्मक्रांति अथवा १५४१ तील पाद्री लोकांचें बंड. स. १९२२—लेखक–व्ही. एन्. पालेकर.

साष्टीची बखर ऊर्फ वसईचा दुर्धर धर्मसंग्राम

ह्या पुस्तकावरील

कर्नाटक कॉलेजचे प्रोफेसर नीळकंठराव सदाशिव ताकखाव M. A, I. E. S.

यांचा अभिप्राय

I have great pleasure to congratulate Mr. Gajanan Govind Naik on the successful manner in which he has edited the old **Sashtichi Bakhar** or the Chronicle of Salsette dealing with the Siege of Bassein. He has studied his sources in a scholarly manner and made a comparative estimate of the history of the subject as related by the different authorities. My opinion is that none of our other sources of information takes the reader into the genesis of the cause of this war as this **Bakhar** does. There can be no doubt about the genuineness of the account of the war as it is related here. The authenticity of the documentary evidence is unimpeachable. Corruptions in the text of the narrative have crept in as they must always creep in Manuscript texts before they go through the baptism of the Printer's type; and especially when copies of texts are transcribed in the Mod[i] character. But the author has successfully handled these corruptions and explained them parenthetically or by means of foot-notes and presented the Bakhar text to the reader as he found it, in its own virgin modesty and directness of utterance. It is a naked prosecution of facts as they are understood by the original author of the Bakhar and it does him great credit for the accuracy it displays in matters of Chronology and geographical detail and the clear evidence it gives of his knowledge of the currents of political events in the midst of which the great siege of Bassein took place. The author's statements about the sequence of events are corroborated by other documents bearing on Maratha History and are in full agreement with what has been known about the History of the Portuguese in India. The Bakhar may be called **Epic of Gangaji Naik.** That stalwart figure rises before us in heroic dimentions almost from every page. It was his war, fought for his religion, fought for his country, fought for the Bhonsle King. But the first attempts in that direction were

made by his father Nimbaji in the unfortunate reign of Sambhaji Bhonsle. The liberation of Bassein was the dream and ideal of Gangaji's life. The sacred legacy left to him by his father, the one great devouring passion before which all else pales into insignificance. And he achieved it with the help of Bajirao and Chimnaji Appa. How often did he appeal to the Peshwa's Ministers and Governors! And now when the Portuguese Authorities took the fortification of Thana Fort into their hands he at last exclaimed that the Peshwa should frankly call off his hands from the proposed task, if he failed to begin his campaign before the fortification of Thana were completed. Antaji Raghunath Kavle to whom the late Rao Bahadur P. B. Joshi gave the honour of inspiring the war puts in his appearance only later in 1729, while Gangaji began his overtures with the Peshwa in 1720, not to speak of the labours of his family before that date far into the times of Sambhaji. The War was Gangaji's inspiration and aspiration both at the same time. He had to inoculate the Peshwa and his great men with his great idea and often and again to lash the latter forth from their lethargy.

The reader who goes patiently through these pages will have the satisfaction to make his acquaintance with Gangaji Naik, Murarji Naik and other men of heroic proportions, and to transport himself into the past of Salsette and the environments of modern Bombay, and for this gratification he ought to feel very grateful to the able editor who has brought upon his labours an amount of historical scholarship and acumen which has seldom been seen in the history of this part of the country; and readers of the **Pathare** caste,—a term repeatedly used in this Bakhar—will especially be gratified to read the heroic story of the heroic deeds of one of their great ancestors—the only deed of heroism in which the "Pathare Caste" as such has borne a conspicuous part since the fall of the Yadava Dynasty of Devgiri.

DHARWAR,

2nd May 1935.

Sd. **N. S. Takakhav.**

कर्तव्यपूर्ति

वैशाख शु. ९ मी शके १६६१ शुक्रवार रोजीं कोटावर जें मोठें भांडण झालें, त्यांत चारहजार माणसें व मुरारजी नाईकहि पडले. बुरुजावर मराठ्यांचें निशाण लागलेलें पाहून मुरारजीनें आपले डोळे मिटले.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ४३३९

॥ श्रीसिद्धिविनायकप्रसन्न ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ४३३९ नं.
ता.
ठा.

साष्टीची बखर

उर्फ

वसईचा दुर्धर धर्मसंग्राम

श्रीगणेशायनमः ॥ ठाणे कोकण बिंबस्थान हें राज्य फिरंगी[2] याणें घेतले. घेउन कुबुद्ध धरिलि. जमिदारांचि वतने बुडविली. ॥ गावाचा गाव धरून बाटविला किरिस्ताव केले सासष्ट गाव व आगर वसईचा बहुतेक लोक धरून

---

१ ह्या बखरीची एक प्रत काव्येतिहास–संग्रहकर्ते ह्यानीं इ. स. १८८२ सालीं छापिली आहे. त्या प्रतींत व ह्या प्रतींत कांहीं ठिकाणीं मजकूर कमी जास्त आहे. ह्या प्रतींत, गंगाजी नाइकानें इकडे ज्या हालचाली केल्या, श्रीसिद्धिविनायकाचा प्रसाद मिळविला, त्यांचें व इतर तशाच बाबींचें सविस्तर वर्णन केलेलें आहे. तेवढें निरनिराळ्या ठिकाणचें वर्णन काव्येतिहास संग्रहकर्त्यानीं छापलेल्या प्रतींत वगळलेलें आहे. ह्याशिवाय इतर सर्व बाबतींत दोन्ही प्रती जवळजवळ सारख्याच आहेत. मात्र ह्या प्रतीचा शेवट गंगाजी नाईकानें कल्याणास राहण्याचें ठरविलें तिथेंच झाला आहे. इंग्रजांनीं शके १६८६ (सन १७७४)त ठाण्याचा किल्ला घेतल्याबद्दलचा व त्यावेळीं अणजूरचे सरपाटील इंग्रजांचे दरबारास ठाणें येथें गेल्याबद्दल पेशवे सरकारांनीं सरपाटीलाजवळून रुपये ७००० दंड घेतल्याबद्दलचा मजकूर काव्येतिहास-संग्रहाच्या प्रतींत जास्त आहे. प्रस्तुत बखरीची प्रत कै. लक्ष्मण यशवंत राणे, ठाणें, यांच्याकडून मला फार पूर्वी मिळालेली आहे. ह्या बखरीचा पूर्वार्ध मजजवळ आहे पण त्या प्रतीची पहिली ९ पानें अर्धवट फाटलेलीं आहेत.

बाटविले. बाप मेला म्हणजे घरांत प्रेत असतां त्याची पोरें जी असतिल ती नेऊन बाटवावि. ऐसा उपद्रव महाराष्ट्रासि मांडिला मग लोक कष्टि जाहाले. पलोन कोण्हि कोण्हि दक्षण प्रांति जाउन राहिले क्रिया कर्में लोप जाहला देवधर्म बुडाला प्रान्ताचीं तीर्थें क्षत्रें लोपलि देव देवालयें फोड तोड केलि आपलि देवळे

कै. आत्माराम मोरेश्वर पाठारे ह्यांच्या हस्ताक्षरांतील ह्या बखरीच्या पूर्वार्धाची प्रत माझे वडील कै. गोविंद विनायक नाईक ह्यांच्या दप्तरांतून मला मिळालेली होती. तो पूर्वार्ध-ह्या पूर्वार्धाबरोबर मी ताडून पाहिला होता. कै. दादाजी बाबाजी नाईकांनीं तो पूर्वार्ध माझ्याजवळून नकल करण्याकरितां नेला तो त्यांनीं एका बंधूकडे दिल्याचें समजतें, अद्यापपावेतों मला मात्र तो पूर्वार्ध मिळालेला नाहीं. त्या पूर्वार्धावरून पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या आगमनकालाचा, स्थायिकत्वाचा, आलेल्या मार्गांचा व एकंदर स्थित्यंतरांचा इतिहास जुळविण्यास व पूर्ण निर्णय ठरविण्यास बरेंचसें साहाय्य इतिहासलेखकांस मिळण्यासारखें आहे. ही प्रत अगदीं अस्सल मूळ बखरीची नकल आहे. हींत वर्णिलेल्या प्रसंगाच्या तारखा व इतर नोंदीं, घडलेल्या गोष्टी वगैरे त्यावेळच्या कोंकणच्या व महाराष्ट्राच्या इतिहासाबरोबर प्रत्येक ठिकाणीं ताडून पाहिलेल्या आहेत त्यावरून, ही बखर पूर्ण विश्वसनीय आहे हें सिद्ध होत आहे. बखरींतल्या निरनिराळ्या नोंदीखालीं मी टीपा देऊन तुलनात्मक दृष्टीनें त्या त्या प्रसंगांचें सत्यत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे, तो कितपत साधला आहे हें इतिहासज्ञ ठरवितील.

२ **फिरंगी** हा शब्द 'फ्रांक' ह्या शब्दाचा अपभ्रंश असून फारशी भाषेंतून मराठी भाषेंत आला आहे. सर्व युरोपियन राष्ट्रांचा उल्लेख मुसलमान लेखक ह्याच शब्दानें करीत असत. येथें फिरंगी म्हणजे पोर्तुगीज लोक होत. इ. स. १४९७ मध्यें पोर्तुगीज लोक व्यापाराच्या उद्देशानें हिंदुस्थानांत कालिकोट येथें वास्कोडिगामा ह्या सरदाराच्या बरोबर आले. गोवें येथील गव्हरनर डॉन डी आल्मिडा याचा मुलगा लोरेन्झो आल्मिडा यानें चौल व दाभोळ ह्या बंदरावर स्वारी केली. इ. स. १५०८ मध्यें डॉन डी आल्मिडो ह्यानें दीव येथें गुर्जर नृपतीच्या सत्तेचा नाश केला. इ. स. १५२७ त वांद्रें येथें हल्ला केल व मुसलमान अधिकाऱ्याचा नाश केला. इ. स. १५२९ मध्यें उत्तर कोंकणांतील प्रसिद्ध ठिकाणें ठाणें, वांद्रें, करंजा, साष्टि हीं पोर्तुगीजांनीं घेतलीं व इ. स. १५३३ त गुजराथच्या बहादुरशहापासुन वसई घेतली. तारापूर हस्तगत केलें. इ. स. १५३३ त साष्टि व वसई प्रान्त हस्तगत झाल्यावर त्यानीं वसई, असेरी, तारापूर, माहीम, दवण, व चौल येथें विशेष मजबूत किल्ले बांधले. वाटावर कोट व मेढेकोट बांधले. गांवांवर बुरुज बांधले. इ. स. १५५६ त अशेरी व मनोर, घेऊन दमण व तारापूर ह्यांतील सुपीक प्रान्त बळकाविला. वसईचा किल्ला सोळाव्या शतकाचे अखेरीस त्यांनीं बांधला. इ. स.

फिरंगी याणे बांधलि फिरंगी धर्म चालवावयास लागले ॥ मुलकांत ब्राम्हण फिरता कामा नये ॥ कोणिह ग्रहस्तानें काहि कार्य होम उद्यापने आरंभिलि म्हणजे ग्रहस्ताचे घर अवघे धरावे सेजारी पाझारी त्याघरांत सांपडले त्यांसहि धरून न्यावे बंदिकष्टि करावे ॥ बंदिखानियांत कुजवावे असा अनर्थ मांडिला त्या मुलकाचे

१५६० पर्यंत दमण ते कंरज्यापर्यंत सगळा समुद्र किनारा त्यांना मिळाला. अशा रीतीनें सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत कोंकणचा बहुतेक सर्व प्रदेश पोर्तुगीजांचे अंमलाखालीं आला होता. इ. स. १६७३ त सगळें साष्टि बेट त्यांचे ताब्यांत होतें.

३ इ. स. १५४८ त सेंट फ्रॅन्सिस झेविअर यानें वसईस धर्मशिक्षणाची शाळा काढली. इ. स. १५५२ सालीं त्यानें वसई, ठाणें, चौल येथें धर्मोपदेशक पाठविले. इ. स. १५६० ह्या वर्षीं फॅन्सिस्कन धर्मोपदेशकांनीं कान्हेरी व मंडपेश्वर येथील हिंदुसाधु व योगी यांनां घालवून तीं ठिकाणें घेतलीं धारापुरी, कान्हेरी व मंडपेश्वर येथील हिंदुच्या पवित्र खोदकामाचा नाश केला. मंडपेश्वर येथें गुहेच्या जागीं ख्रिस्ति देऊळ बांधिलें. साष्टि येथें धर्मशिक्षण देण्याकरितां कॉलेज स्थापिलें व हिंदुंच्या धर्मसंस्थांच्या वतनाचें उत्पन्न, बाटविलेल्या मुलांच्या शिक्षणाकरितां काढलेल्या ख्रिस्ति संस्थांकडे लाविलें. इ. स. १५४६ सालीं पोर्तुगीज गव्हरनराच्या हुकमानें वसई प्रान्तांतील सार्वजनिक किंवा खाजगी देवळांत हिंदूंस पूजा करण्याची मनाई करण्यांत आली. 'मूर्ती फोडण्यांत याव्या, मूर्ती करणारे व हिंदूचे संस्कार चालविणारे यांना शिक्षा करण्यांत याव्या व मशिदीवर कर बसविण्यांत यावा' म्हणून हुकूम सोडण्यांत आले. पण त्यांचा अंमल विशेषसा न बसल्यामुळें पुन्हां हेच हुकूम इ. स. १५५५ मध्यें फर्माविण्यांत आले उत्सव, संस्कार, ब्राह्मणांचा धर्मोपदेश, स्नान ह्या गोष्टींनां प्रतिबंध करण्यांत आला. ज्याच्याजवळ मूर्ति आढळतील त्याला पकडून गुलामासारखे तारवावर खपण्याकरितां पाठवीत व त्यांची जिंदगी जप्त करीत. कांहीं काळपर्यंत परवाने देऊन ह्या हुकमाची टाळाटाळ करण्यांत येत असे पण १५८१ सनापासून ह्या हुकमांचा अंमल कडक रीतीनें सुरु करण्यांत आला.

४ पोर्तुगीज लोक हे ख्रिस्ती धर्माच्या रोमन क्याथोलिक शाखेचे होत. जबरदस्तीनें आपला धर्म वाढवावा असें त्यांचें एक धर्मतत्व आहे. त्याकरितां जेसूट–जेसुइट–नांवाच्या धर्मोपदेशकांनीं 'इंक्विझिशन' नांवाची एक मोठी संस्था स्थापन केली. त्या संस्थेच्या शाखा निरनिराळ्या ठिकाणीं उघडण्यांत आल्या. इ स. १५६० मध्यें हें धर्माच्या नांवाखालीं अनन्वित जुलुम करणारें इंक्विझिशन कोर्ट गोवें येथें स्थापन करण्यांत आलें. पुढें इ. स. १५८० पर्यंत ह्या कोर्टाचे 'कमिसरि' नांवाचे हस्तक चौल, वसई, दमण या प्रान्तांत येऊन दाखल झाले होते. ते अपराध्यांस गोवें येथें पाठवीत असत. त्यांनीं

ब्राम्हण पैद (१) होउन फिरावयास लागले माराष्ट्रधर्माचे कर्म अवघेच राहिले मुलकांत कोणे एक गांवावर सेंदराचा धोंडा सुपारी एवढा सापडला म्हणजे तो गांव धरुन नेउन बाटवावा हर कोण्हि दुस्मानगिरीनें च्यार साहिदि उभे करावे ॥ दुस-मान पाँद्रिजवळ जाउन येकाध्यानें वाळं (ट) घ्यावें आणि ते शाइदि नेउन शाइदि देवावि ॥ म्हणजे त्या ग्रहस्ताचे घर नेउन बाटवावे ॥ न्याय अन्याय पाहावयाचा दर्कार नाहि ॥ या जातिचा उपद्रव महाराष्ट्रास मांडिला माहाराष्ट्रास अभय देता कोण्हि नाहिं ॥ त्यामध्यें पाठारे ज्ञातिचे मराठे लोक त्याची पाठ हात धुवुन घेतलि त्या ज्ञातिचे लोक बहुत बाटविले वरकड शेणवी व प्रभु व वाणि उदमी यास उपद्रव थोडा पाठारे ज्ञातिस उपद्रव फार केला तो श्रीदेवास न सोसे मग पूर्वी वांदरें गाव अवघेच धरून बाटविले त्यामधून साळोके

उपदेशिल्याप्रमाणें कोणीही त्यांच्या धर्माचा स्वीकार न केल्यास बंदींत टाकणें, उपाशी मारणें, चाप लावणें, तापलेल्या तव्यावर उभे करणें, जाळणें, तेलाचीं डगलीं अंगांत घालून पोळणें, पोत्यांत घालून समुद्रांत बुडविणें इत्यादि अमानुष उपाय सरसहा अम-लांत आणून आपल्या धर्माचा प्रसार करण्याचे हुकूम सदर 'इंक्वीझिशन' सभेकडून सुट-लेले होते. गोवें येथील हें कोर्ट इ. स. १७७४ त बंद करण्यांत आलें. पुन्हा इ. स. १७७९ त सुरू करण्यांत आलें व इ. स. १८१२ मध्यें तें कायमचें बंद केलें गेलें.

५ पाद्रि [पा द्रे]=पिता=फादर=उपदेशक.

६ पोर्तुगीजांच्या असह्य धर्मच्छलामुळें त्यांच्या राज्याचा लौकर नाश झाला असाच ध्वनि मुंबई गॅझिटिअरकारांच्या खालील उद्गारावरून निघतो. "The intolerance as to religious matters from which the Native subjects of Portugal suffered has already been described and it is said that the Hindu inhabitants of Salsette complained of the intemperate zeal with which it was attempted to convert them to the Roman Catholic Faith and to subject them to the terrors of the Inquisition." "पोर्तुगीज लोकांचे धर्मोपदेशक मूर्खपणानें धर्मप्रसा-रार्थ फाजील खटपट करीत आणि आपल्या मुलुखांतील हिंदु व मुसलमान लोकांना पोर्तु-गीज लोक फार कडक रीतीनें वागवीत यामुळें त्यांचें ह्या प्रान्तांतलें राज्य नष्ट झालें" असें गव्हरनर डेकन यानें इ. स. १८०८च्या पहिल्या कायद्याचें बुकांत लिहून ठेविलें आहे.

७ इन्क्वीझीशन कोर्टाचा एक हस्तक मॅन्युएल गोम्स ह्या नांवाच्या फॅन्सीस्कन पंथी ख्रिस्ती धर्मोपदेशकानें साष्टी बेटांत इ. स. १५७५ ते इ. स. १५९८ पर्यंत पुष्कळ

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. क्र. सं. ८०८
दि.

या रायापैकीं बैालनाईक देश नारगोडे व त्याचे भाव दोघेजण मधिल भिवनाईक व धाकटा राननाईक ते समई आपल्या बायका व हातरें सांभाळून निघाले ते

लोकांना बाटविले. वांद्रें येथील लोकांना १५८० पर्यंत बाटविलें नव्हतें. ह्यावेळीं साष्टी-बेटांतले जवळ जवळ ६०, ००० साठ हजार लोक बाटून ख्रिस्ति झाले, असें इतिहासज्ञांचें मत आहे. एकट्या वांद्रें गावांत ह्यावेळीं ६००० सहा हजार लोक बाटविल्याचें इतिहासांत नमूद आहे.

८ पेशव्यांनीं अणजूरकर नाईकांना दिलेल्या सनदेंत म्हटलें आहे कीं, 'गंगाजी नाईक व बुगाजी नाईक व जनार्दनजी बिन मुऱ्हारजी नाईक व सिवजी नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महीमानराउ कुळी सोळोंखी ज्ञात पाठारे पुरातन वास्तव्य कसबे वानरे तर्फ मरोळ परगणे साष्टि' ह्याच बखरीत शेवटीं बखरकार म्हणतात कीं, 'जमीदार साळोखे रायापैकीं राणे कुळचे कार्यसंमधि गंगाजी नाईक व गणेशजि नाईक' ह्या दोन्ही उल्लेखांवरून हें स्पष्ट होतें कीं, नाईकांचें पूर्वीचें आडनांव राणे हें होय. त्यांना नाईक ही पदवी बिंबराजाच्या तिसऱ्या किंवा चवथ्या पुरुषानें दिलेली आहे. ह्या बखरीच्या पूर्वार्धावरून ही गोष्ट सिद्ध होत आहे. तो पूर्वार्ध यदाकदाचित् प्रकाशित झाल्यास ही हकीकत उजेडांत येईल. ठाणें येथील राणे व अणजूरचे नाईक ह्यांचें देवीगोत्र एकच असल्यामुळें वरील विधानास बळकटी येतें. साळोखी हा चौलुक्य ह्या शब्दाचा उघड अपभ्रंश आहे. अर्थात् अणजूरकर नाईक हे चौलुक्य वंशांतील राणे होत हें ओघानेंच सिद्ध होतें.

९ बाळ नाईक व त्यांचे दोघे भाऊ फिरंग्यांचे जुलुमास त्रासून वांदरें इ. स. १५८० नंतर बाटविल्यामुळें कळव्यास आले व तेथून अणजूरास आले. बाळ नाईकाचा पणतु निंब नाईक हा होय. निंब नाईकानें संभाजी महाराजाकडे ह्या बाबतींत दाद मागितली होतीं असें बखरींतील मजकुरावरून दिसतें. संभाजी महाराजांना इ. स. १६८९ मध्यें औरंगजेबानें पकडून नेलें. अर्थात् १६८९ च्या आधीं ही हकिकत घडलेली आहे. शिवाजी महारांजांनीं इ. स. १६६३ त इकडे फौज जमविली इ. स. १६६६ त शिवाजिमहारांजाचा अंमल कल्याणास होता. इ. स. १६७३ त साष्टी बेट फिरंग्यांचे ताब्यांत संपूर्ण आलें. अर्थात् इ. स. १६८० ते १६८९ पर्यंत केव्हां तरी प्रल्हाद जोशाला निंब नाईकानीं संभाजी महाराजाकडे पाठविलें असल्याचा संभव आहे. एकूण चार पिढ्या मागें गेलें असतांना बाळ नाईकाचा वांद्र्याहून प्रयाण केल्याचा काल ठरविता येतो. इ. स. १५८० पर्यंत वांद्र्यास कोणासही बाटविलेलें नव्हतें. पण १५९० पर्यंत वांद्र्यास ६००० लोक बाटविले गेले. अर्थात् इ. स. १५८० ते १५९० पर्यंतच्या दहा वर्षांच्या काळांत केव्हां तरी बाळ नाईकानें वांद्रें सोडल्याचें दिसतें, हा जुलूम पुढें फार जोरांत चालू

मराठी ग्रंथ संग्रहालय
दादर.

कळञ्यास आले तेथून अनजुरास आले गांवि येक थडि येउन लपून राहिले येक थडिच्या मुलखास उपद्रव नव्हता त्याची वंशवृद्धि वाढलि वडील भाव बाळनाईक त्याचा पुत्र लक्षुमण नाईक ॥ त्याचा पुत्र अर्जुन नाईक त्याचा पुत्र निंब नाईक असता भोसले सिसोदे राणे पैकी भोसला राजा संभाजि दक्षणेचे राज्य करुं लागला त्याजकडे पैगम निंब नाईकाहि केला प्रल्हाद जोशि ब्राम्हण पाठविला तेवढ्यात राजा संभाजिवर मोगलाचि चढाई जाली अवरंगशा पातशहानें संभाजि राज्यास धरून नेले राज्य भोसल्याचे विस्कळित जाले मग तो मनसुभा राहिला ॥ संभाजि राजाचा पुत्र राजा[10] शाहु त्याणें राज्य उभारिले त्याचा बाळाजि[11] विश्वनाथ प्रधान व श्रीपतराव[12] प्रतिनिधि व खंडेराव[13] दाभाडे सेनापति ॥ तो राज्य करितां देशनारगोडियापैकि निंबाजि[14] नाईक अणजुरास त्यास पुत्र साहाजण जाले. निंबाजि नाईकास देवआज्ञा जाहलि त्याचा वडिल पुत्र शामजि नाईक प्रथम

होताच. इ. स. १५९४ मध्यें रोमचा पोप व पोर्तुगालचा राजा ह्यांच्याकडून एतद्देशीय लोकांना जुलमानें ख्रिस्ती करण्याबद्दल हुकूम आला, त्यामुळें अनेक देवळांचा नाश करण्याची व वसई प्रान्तांतील लोकांस लुटण्याची पोर्तुगीज धर्मोपदेकांनीं पुन्हां जोरानें सुरवात केली.

१० शाहूमहाराजांची कारकीर्द (इ. स. १७०८-१७४९) माघ शु. १ शके १६२९ (ता. २३ जा. १७०८) ते मार्गशीर्ष व. ३ शके १६७१ (१५ डि. १७४९).

११ बाळाजी विश्वनाथाची कारकीर्द नवंबर १६ सन १७१३ ते १७२० च्या एप्रील २ तारखेपर्यंत.

१२ श्रीपतराव उर्फ श्रीनिवास प्रतिनिधि. शके १६४० जेष्ठ शुद्ध ८, (तारीख २७ मे १७१८) रोजीं परशरामपंत प्रतिनिधी वारल्यानंतर श्रीपतरावाला प्रतिनिधिपद मिळालें. कारकीर्द: इ. स. १७१८ ते १७४६.

१३ खंडेराव दाभाडे. इ. स. १७१७ त शाहूनें दाभाडे यांस सेनापतिपद दिलें. मृत्यु १७२९.

१४ बाळाजी विश्वनाथ, श्रीपतराव प्रतिनिधि, खंडेराव दाभाडे, ह्यांना त्यांचें अधिकार उर्फ पदें मिळालीं असतांना निंबाजी नाईक अणजुरांत होते, असें बखरीवरून दिसतें. श्रीपतरांवाना प्रतिनिधिपद इ. स. १७१८ मध्यें मिळालेलें होतें. अर्थात् इ. स. १७१८ त निंबनाईक जिवंत होते हें सिद्ध होतें. पुढें निंबाजींना देवाज्ञा झाली असें बखरकार म्हणतो त्यावरून असें दिसतें कीं, इ. स. १७१८ त किंवा त्याच सुमारास निंब नाईकांना देवाज्ञा झाली असावी,

स्त्रीचा पुत्र विभक्त जाला धाकटे स्त्रीचा पुत्र वडील गंगाजि नाईक त्याचा धाकटा बुबाजि नाईक त्याचा धाकटा मुऱ्हारजी नाईक त्याजपेक्षां धाकटा शिवजि नाईक त्याचा धाकटा नारायणजि नाईक मग वडील गंगाजि नाईक आपले धाकटे भावांशि विचार केला जर आपले पित्याने प्रयोग केला होता जर भोसले या राजाशि शरण जावे आणि आपले राज्य सोडवावे म्हणजे सर्वांस स्वस्तपण होईल आणि आपलि वतने चालतिल आपला जिर्णोद्धार होइल ऐसा विचार केला होता तो राजा मारला मग तो विचार राहिला आतां त्याचा पुत्र शाहु माहाराज राज करित आहे त्यास आपण शरण जाउ वतनदाराचे वंशि आपण जन्म घेतला आहे आपले पूर्वजिं पराक्रम उत्तम संपादिला आपण त्याचे वंशि जन्म घेतला आहे तर आपण हें कर्म आचरु जर साधले तर पुण्य पुरुषार्थ अर्थ आणि किर्त न साधे तर येकला मृत सत्यभूत तो सर्वांस आहे परंतु कीर्ति विरळा वाट्यास आलि आपुण हे राज्यात दुष्ट राजा आला आहे आपले वडिलाचि घरे या राजाने बुडविलि आणि आपलि वतने बुडविलि हे तवकल आपण करु याजवर बुगाजि नाईक व मुऱ्हा-रजि नाईक व शिवजि नाईक व नारायणजि नाईक या चौघा भावाच्या मनास आलें मग बोलिले जर वडिली जो विचार केला आहे तो उत्तम नरदेहास यावे तर कांहिं कित्ति स्वार्थ राहे ही गोष्ट करावि नरदेहि येऊन व्यर्थ मरु नये ऐसा पाच भावाचा विचार जाहला-"मग वडिल भाऊ गंगाजि नाईक याणे आपले मनि विचार केला जे या कर्मास देवाचा आश्रय असावा त्याचा कुलस्वामि सिद्धि-विनायक मग गंगाजि नाईक मोरेश्वरास जावयास निघाले तेवेळी देश वोसाड बेरडाचे भय हिंगण गावास दमाजि[15] थोरात राजा शाहूशिं बदलला आहे त्याणि देशिं बेरड घालुन मुलुख ओसाड पाडला आहे मार्ग चालत नाहिं ते प्रसंगीं देशावरून लोक धामधुमीमुळे कोकणात येउन राहिले होते त्याजवळ मार्गाचि सोय पुसिलि मग जुना शेला एक व जुन धोतर येक व जुने मुंडासे

---

१५ दमाजी थोरात हा मूळपासून ताराबाईच्या पक्षाकडील होय. त्यानें पाटस तर्फेतील हिंगणगावांस गढी करून संभाजी व ताराबाई ह्यांच्या वतीनें पुंडावा मांडला होता. त्याजवर शाहूनें एकंदर तीन स्वाऱ्या करविल्या. पहिली १७१२-१३ त बाळाजी विश्वनाथ व पुरंदरे ह्यानीं केली. बाळाजीस कैद प्राप्त झाली. दुसरी सचीव व मुतालिक रोझेकरांनीं केली. ही स्वारी १७१४-१५ त झाली असावी. त्यावेळीं सचीवास तीन वर्षे थोराताची कैद भोगावी लागली ही तिसरी स्वारी शके १६४० सालीं म्हणजे १७१८ सनांत बाळाजीनें करून त्यास कैद केलें. पुरंदरास ठेविलें. हिंगणगांवची गढी पाडून मूळा नदींत टाकली. (इ. वृ. १८३५-८७ का. सं. प. वा. ले. ४०२ पान ५०४)

येक व अर्धा रुपया घेउन आपले देहाचा संकल्प करून गंगाजि नाईक निंबाळे[16] मनि संकल्प केला जर तूं माझा कुळस्वामी आहेस तर आपण हाचि हेतु धरून निघालो किं जर हें राज्य आपले राजास शाहू व्हावे आणि आपले पूर्वज्याचि वतने आम्हास व्हावि आपण मुलखाचे कारभारि वतनदारि करावि मराष्ट्र देवधर्म चालवावा हे आपण आपले डोळां देखावें या इछेस्तव आपण निघालों श्री मोरेश्वरा तुझे पाय पाहूं जातों ये जन्मी तू आपले पाय दाखउन सुखाचा सोहळा दाखविशिल तर उत्तम नाहिं तर जन्मातरिहि याद असोन तुझी सेवा घडून हे कार्य सिद्धिस पाववावें हे ऐसें मनि चिंतुन आपले देहाचा संकल्प करून निघालों मार्गी मनुष्य नाहि वोसाड वस्ति गावें घाटावर ते गाव चिंचवड व पुणें ॥ व पिलाजि[17] जाँधवरायाचि वाडि व जेजुरी ये खेरिज गाव वस्ति नाहिं. मार्गी बेरड भेटतात ते बहुत कष्टि करित परंतु श्रीनें मारु दिधले नाहिं वाडिहून निघालो पुढे वोसाड रानात पडलो जेजुरीचा मार्ग चुकलो दिशाभुलि जाहालि कोणिकडे जावे हे न सुचे मग श्रीपाई हृदयीं चिंतिले तेव्हा माहार येक भेटला त्याणे वृत्तात पुसिला मग तो माहार म्हणे तुजला मोरगावा पावेतो मी नेतो त्या माहारानें मोरेश्वरापावेतो नेलें मग श्रीचे पाय देखिले चवदा दिवस येक निर्धार

---

१६ निंबनाईकाचा मृत्यु इ. स. १७१८ त किंवा त्याच सुमारास झाला असें वर दिसून आलें आहे. इ. स. १७१८ तच दमाजीचें बंड हिंगणगांवास जोरांत होतें त्याच वर्षी बाळाजी विश्वनाथानें त्याला कैद केलें आहे. निंबनाईकाचे मृत्युनंतर त्याचे वर्षी गंगाजी नाईक श्री मोरेश्वरास जाण्यास निघाले असें बखरीवरून दिसतें. त्यांना पुढें वाटेंत थोराताचे बेरडानीं लुटलें व त्रास दिला असेंही बखरीत नमूद केलें आहे. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, गंगाजी नाईक इ.स. १७१८ त श्री मोरेश्वरास गेले होतें. निंबाजीचा मृत्यु, थोराताचे बंडाचा शेवट व गंगाजी नाईकांचें श्री मोरेश्वरास प्रयाण ह्या तीनही गोष्टी इ. स. १७१८ त घडलेल्या आहेत. दमाजीच्या भयानें लोक कोकणांत त्यावेळीं पळून गेल्याबद्दल नमूद करण्यांत आलेलें आहे.

१७ पिलाजि जाधवराव (कारकीर्द १७२५-१७४६ ब स्वा. च. ले. १८१) हे पुणें-जेजुरीजवळील वाघोलीचे राहणारे. इ. स. १७१०।११ मध्यें जाधवराव बाळाजी विश्वनाथांचे पथकांत होते. तेव्हांपासून बाजीरावाचे मृत्यूपर्यंत व नंतरही ते पेशव्यांचे वतीनें सर्व उलाढालींत भाग घेत असत. वसई, जंजिरा, उत्तर हिंदुस्थान, माळवा वगैरे ठिकाणीं झालेल्या बहुतेक सर्व स्वाऱ्यांत व लढायांत पिलाजि जाधवराव हजर असल्याचें दिसून येतें. पेशव्यांच्या सर्व कारस्थानांत ते भाग घेत असत. वसईच्या रणसंग्रामांत त्यानें केलेली कामगिरी पुढें क्रमशः दिसून येईल. [म. री. भा. ३].

गंगाजी नाईक श्री मोरेश्वरास जात असतां वाटेंत त्यांना
शोरातांच्या बेरडानीं लुटलें. (बखर पान ८)

धरणे धरिले घरिच्या अन्नासि मार्गी दिवस सात व देवळि दिवस १४ येकून दिवसं येकवीस उपवास निराहार जाले मग श्रीदेव रात्रि भागिं स्वप्नभास जाला कोणि येक ब्राम्हण येउन बोलिला जे तु आपले मनि चिंतिलें आहेस ते तुझे मनोरथ सिद्धिस पावतिल परंतु विलंब लागेल तुं आता भगवंताचे घरि सकाळी पारणे करून च्यार दिवस सावध होउन आपले घरि जावे मग गंगाजि नाईक सावध जाहले चहुकडे पाहु लागले ॥ मनिंच विचारिलें जर देव मजला ठकिवितो म्हणून निजला तव पाहांट जालि तव भगवंत गोसावि पुजारी देवाचा होता तो पाहात आला मग बोलु लागला जर तुजला देवाचि आज्ञा जालि आहे तुं पारणे करावे आणि मजला आज्ञा जालि कीं तुजला च्यार दिवस ठेउन पायतणें बांधउन दोन गुरव सगें देउन चिचवडास पावते करावे तु आता आज पारणे करावे मग गुरव व आणीक ब्राम्हण बोलिले जर तुजला कांहिं दृष्टांत झाला असेल ते खरेंच सांग त्याजवर गंगाजि नाईकानें रात्रिचा भास सांगितला तेव्हा ते ब्राम्हण व गुरव पुजारे बोलिले कि तु आता देवाशि हटनिग्रह करू नको ॥ हटनिग्रह केल्याने तुजवर देवाचि कृपा आहे ति अवकृपा होईल सर्वाच्या सांगितल्यावरून गंगाजि नाईकाने पारणे केलें च्यार दिवस मोरगावि राहून चिचवडास आले तेव्हां श्रीनारायर्णदेव होते त्यास देवानें आज्ञा केली किं चितामणि देवापासून गंगाजि नाईकास अनुग्रह द्यावा परंतु देवाचे आज्ञेवरून गंगाजि नाईकास अनुग्रह दिधला वस्त्रे व वाटखर्चिस रुपये ५ पांच व गुरव पांच ॥ पाच संगे देउन अणजुरास चिचवडकर देवाहि पोहचविले व आपला धाकुटपणिचीं देव पूजेस दिधला गंगाजि नाईक घरि आला श्रीदेवाचे

---

१८ नारायण देव हे मूळचे चिंचवडचेच रहाणारे होत. ते मोरया गोसावींचे नातु होत. त्यांचे वडील पुत्र चिंतामण देव होत. शके १५०० च्या सुमारास मोरया गोसावी हे चिंचवडास रहात होते. चिंचवड हें संस्थान आहे. सरकारांतून नगद इनाम आहे. देवांचे वंशज हल्लीं पुणें येथें राहतात. ह्या घराण्याचीं हल्लीं बरींच कुटुंबें आहेत. माघ वद्य ६ स चिंचवडास फार मोठा उत्सव होत असतो.

१९ सन १८९५ मध्यें छापलेल्या 'श्रीगणेशपंचपदी'तल्या बखरींत गंगाजी नाईकांच्या अनुष्ठानाची हकीकत थोड्या निराळ्या स्वरूपांत दिलेली आहे. 'साष्टि, वसई ह्या ठिकाणीं फिरंगी लोकांनीं हिंदुधर्म बुडवावा हा यत्न सुरु केलेला पाहून अंजूरकर गंगाधर नाईक हे पेशव्यांचे ठिकाणीं कांहीं दाद लागत नाहीं हें जाणून चिंचवड मुक्कामीं जाऊन त्यानें उपदेश घेऊन एकवीस दिवस अनुष्ठान केलें. पुढें नारायण महाराज स्नानास आले असतांना त्यास दंडवत घालून प्रार्थना केली कीं आज एकविस दिवस गुरुकृपेनें अनुष्ठान पुरें झालें व मोरयानें स्वप्नीं येऊन आपणास शरण जाण्यास सांगितलें. आपणास

पाइं निष्ठा धरून कारभारास लागले, आपले भाउ बुगाजि नाईक व मुऱ्हारजि नाईक व शिवजि नाईक व नारायणजि नाईक ॥ व नामाजि देसाई मालाडकर मेहुणे व मायाजि राउत कवळेकर मामा व नारायणजि सुतार वसईकर जावाई व लाडकोजि हैवतराव भाईनेरकर व्याहि व बेडजि देसाई मालाडकर साले यास बोलाउन पाच भाउ व सोईरे बैसोन विचार केला जर या महत्कार्यास देवानें अभय दिधलें आहे आम्ही कार्यास प्रवर्ततो तुम्ही साहित्य काहि कराल मग नामाजि देशाई हे बोलिले जर तुम्ही श्रीदेवाजवळ काहि मागितलें आणि श्रीनें तुम्हास काय दिधले हें आधिं आम्हास सांगावे मग गंगाजि नाईक बोलिले आम्ही श्रीचे पाय चिंतुन घरिहून निघालो ते श्रीने आपले पाय दाखविले. मग आपण श्रीजवळ बसलो ते समई त्या देवळात निकटवासि ब्राम्हण व पुजारे व गुरव याहिं पुशिलें जर तुं उघडा बोडका निपदरि आणि लंघनि कोठून आलास आणि धरणें काय म्हणुन धरिलेस तुझे मनि काय असेल ते आम्हाजवळ सागावें तु वेडा नव्हेस आणि भिकारि दरिद्रि नव्हेस शाहाणा आणि मातबर सुखवासि तुझें शरिर अैसे परि तू हे शरीर कष्टि काय म्हणून करितोस ते आम्हाजवळ सांगावें आम्हि देवाचे निकटवासि तुजविशिं देवाजवळ प्रार्थना करून मग ते गोष्ट आमचे ध्यानास आलि त्याजवळ सांघायास लागलो माझा मुलूख पश्चम समुद्र तिरि मुलूख चवदा गांवणे आहेत तेथिल मी जमिदार सांप्रत माझा मुलुख

विचारावें असा प्रभूचा हुकूम झाला आहे तर माझेवर कृपा करावी. नंतर महाराजांनीं कळविलें कीं, तूं क्षत्रियवंशांत उत्पन्न होऊन स्वधर्मरक्षण करण्यास यत्न करितोस तर तुजला मी तरवार देतों ती ही घे व हा उजव्या शुंडेचा गणपति देतों हा कार्यसिद्धि करिल असें म्हणून पाण्यांतून एक धोंडा काढून दिधला तो उजव्याच सोंडेचा गणपति दिसला ' प्रस्तुतच्या बखरींत व ह्या मजकुरांत काळ, व स्थळ ह्या बाबतींत तफावत आहे. अनुष्ठान, दृष्टांत व प्रसाद ह्याबद्दल ऐक्य आहे. प्रसादाचा गणपति अणजूर येथें हल्लीं आहे. पण तरवार असल्याचें ऐकिवांत नाहीं. भाद्रपद शुद्ध चतुर्थीस अणजुरांस पांच दिवस श्री गणरायापुढें कीर्तन-उत्सव होत असतो.

२० कोंकणच्या ह्या भागांत दमणप्रान्तांत चार परगणे व वसईप्रान्तांत ७ परगणे होते. ह्या परगण्याचे प्रत्येक विभागास ठाणेदारी असे व प्रत्येक ठाणेदारींत एक ठाणेदार नांवाचा अधिकारी असे. प्रत्येक ठाणेदारींत कसवें, मांडव्या, खेडीं, गावठीं (सडेतारे), पाखाड्या, ठिकाणें व वाड्या असत. दमणचे संजाण, डहाणु, तारापूरव माहीम हे चार परगणे होत. वसईचे अशेरी, मनोर, खुद्द वसई उर्फ सायवान, साष्टि, मुंबई, बेलापूर उर्फ शहाबाद व करंजे हे ते सात परगणे होत. अशेरीस ३८ खेडीं व ६ पाखाड्या, मनोरीस

स्थळ प्रत
सं. ३ नं. २०८
ता.

म्लेंछ फिरंगी म्हणोन आहे [तेथील मी जमीदार साप्रत [illegible]]त्याज.

---

४२ खेडीं व १ गावढें होतीं. सायवान परगण्याचे लहान लहान सहा परगणे होते. पहिला वसई परगणाः त्यांत १६ पाखाड्या १८ वाड्या होत्या. दुसरा परगणा कसबें आगाशीः त्यांत २० पाखाड्या १० वाड्या होत्या. तिसरा साळगें परगणाःह्यांत १८ खेडीं ३ ठिकाणें. चवथा विरार परगणाः त्यांत २० खेडीं होतीं. पांचवा कामन परगणाः त्यांत २५ खेडीं व २ गांवढीं होतीं. साहवा अणजुर परगणाः त्यांत १८ खेडीं व ७ गांवढीं होतीं. साष्टि-बेटांत दोन भाग होते. पहिला खुद्द साष्टि बेटः यांत १ परगणा व ९९ गांव होते. दुस-ऱ्यांत ठाणें शहर ब ८ पाखाड्या होत्या. बेलापूर उर्फ शहाबाद ह्या भागांत तीन लहान परगणे होते. पहिला पराशिक डोंगराचे पूर्वेचा पंचनद परगणाः यांत तीस खेडीं होतीं. ठाण्यापासून तुर्भ्यापर्यंतची किनाऱ्याची पट्टी–खैरणपट्टी–हा दुसरा भागः ह्यांत १७ खेडीं होतीं. तिसरा खुद्द बेलापूर उर्फ शहाबादः ह्यांत १७ खेडीं होतीं. करंजे बेट उर्फ उरणभागः यांत १ करंजे कसबा; २ मेंडक्लें ठिकाण; ३ नांवें, शिवें, घारापुरी हीं बेटें असे तीन गट होते. [ठा. जि. व. ७६, ७७, पानें] ह्यावरून असें दिसतें कीं, सायवानांतले ६ परगणे, साष्टी बेटांतील २ भाग, बेलापूरांतील ३ परगणे व करंजे बेटांतील वरील तीन भाग हे ते १४ परगणे असावेत. ' परगणे साष्टी प्रान्त वसई ह्यांत तर्फ मालाड ५६ व तर्फ मरोळ ५२ मिळून १०८ देह म्हणजे गांव होत, परगणे सायवान तर्फ आडगाव ह्यांत देह म्हणजे गांव २६ होत ' (नाईकांना पेशव्यांनीं दिलेल्या सरपाटिलकीच्या सनदेंतला मजकूर) हें १४ परगण्यांचें वतन गंगाजी नाईकांचे पूर्वजांकडे चालत आलेलें होतें असें दिसतें. पेशव्यांनीं गंगाजी नाईकांना कबूल केलेलें दिलें नाहीं अशाबद्दलचा जो मजकूर बखरीचे शेवटीं आहे तो ह्याच परगण्याचे वतनाला उद्देशून लिहिला असावा. " बाळाजी बाजीराव वतनदारांची वतनें देत नाहीं म्हणों लागले ... मग देसायांचें वतन बुडविलें व देशनारगौडियाच्या वतनास नांव देशमुख ठेविले. आपले गुमास्ते पाठविले. देशपाड्ये याचे वतनास आपले गुमास्ते पाठविले सरपाटेल हे वतनी स्थापिले व आपले गुमास्ते ठेविले प्रगणे मालाड व प्रगणे मरोळ व तर्फ आडगांव प्रगणे साहिवान याचे सरपाटलकीच्या सनदा गंगाजि नाईकांचे हाति दिधल्या " " आपलेहि वतन न सुटे " ह्यावरून हे स्पष्ट होते कीं, पेशव्यांनीं फक्त सनदेंत दिलेल्या वतनापेक्षां जास्त कांहीं न देतां गंगाजी नाई-कांचीं इतर वतनें बुडविलीं. दंतकथा अशी आहे कीं गंगाजी नाईकानीं पेशव्यांना भर दरबारांत शाप दिला व अणजुरास न येतां वैताग घेऊन आपल्या बहिणीसहवर्तमान काशीस निघून गेले व तेथेंच त्यांचें देहावसान झालें. अंताजी रघुनाथ यांनीं नानासाहेब पेशव्यांना ' तुम्ही वचनभंग केल्यामुळें तुम्हांस पुत्रशोक लागेल ' असा शाप दिल्याचें उत्तरकोंकणचे इतिहासकर्ते कै. जोशी त्यांच्या पुस्तकांत लिहितात.

ठाणे

खालि आहे ॥ तो दुष्ट राजा देव धर्म माराष्ट्रचा चालु देत नाहि रयत बाटविलि व आमचि घरे बाटविलि । आमचि वतने बुडविलिं आमचे वडिलाचे वडिलांचे सोइरे भाउबंद बहूत बाटविले आमचे वडिलास जात वाचवायाचि मुस्किल जाली मग वतने आणि संसार कैसा ऐसा तो दुष्ट राजा माराप्ट् देवधर्म आणि आमचि क्रिया कर्मे सारिंच राहिलीं त्या मुलखांत आम्ही शूद्रवत होउन जात मात्र राखोन राहिलो त्यास श्रीदेवाचि प्रार्थना जर ते माझे मुलखाचें राज्य राजा शाहूस व्हावें आमच्या जमिदाऱ्या आपले इछापूर्वक कराव्या व जो राजा माराष्ट्र होईल त्यासन्निध सेवाधर्म संपादावा आपले मुलखातचे रयतेचा प्रतिपाळ करावा ॥ जे आपुण केलेलें राजानें मान्य करावें ॥ आपले वडिलाचे चालत आलें ते चालवावें आपलि देवालये तिर्थें क्षेत्रे मुक्त व्हावि मराप्ट् राजा मराप्ट् धर्म व्हावा हें कार्य आपले हांति व्हावे हे देवाने करावे म्हणून या हेतुस्तव आपले घरिहून नेम उपवास करित आलो तो येथे श्रीने आणिलें तुम्ही पुशिलें म्हणून तुम्हास सागीतले व आपण काहि घरिहून आणिले नाहि अर्धरुपयाचे सामान देवपूजेचे होतें मार्गी वेरडाहि नेले म्हणून देवाचे निकटवासियाजवळ सांगितले मग कोण्हि कोण्हि बोलिले जर राज्य बदलायचें काम दुस्तर आहे तुझे वतन नेलें असेल तर देवास संकट घालून आपलें वतन साधून (घे) पर ते राज्य बदलावे ही गोष्ट राहु दे मग आपूण बोलिलो जर त्या राजाने आपुलिं घरें बुडविलि आणि आमचि वतने बुडविलि तो राजा आम्हास नसावा मराष्ट्र राजा असावा मराप्ट् राजा जाला म्हणजे अर्थ स्वार्थ आणि परमार्थ होइल यास तुम्हि माझे मनांत भ्रांत घालु नको मग कोणी कोणी बोलिले जर आकाशाचें फळ आहे कोणि कोणि बोलिले मुख्यभाव कारण आहे कोणि बोलिले जे देव करील तें होईल ॥ ऐसे आपलाले परि बोलिले त्याजवर चवदा दिवस जाहाले निरशन उपोषण केले चवदे (चवदावे) रात्रिस स्वप्न जाहाले येक ब्राम्हण मूर्ति सुंदर भव्य पुरुष येउन बोलिला की जें तू मनिं चितिलें आहेस ते तें तुझें सिद्धिस पावेल परतु विलंबे पावेल ऐसे बोलु(न) येक भाकर हाति दिधली पुन्हा ती भाकर घेउन चुरलि त्यात गुळतूप घालुन चुर्मा लाडु [लाडू] करुन दिधला आणि सांगीतलें कीं तु सकाळीं भगवंताकडे पारणे करून आपले घरी जावें तुझे मनोरथा सिद्धिस पावतील हें सांगोन तो ब्राम्हण गेला ज्यागृत जालो तो कोणिच नाहि मग आपलेच मनि विचारिलें जर देवानें मजला टाकिलें इतक्यात पाहाट जाहलि भगवंत गोसावि चिंचवडकर देवांचा भाचा त्याजकडून पुजारी तेथे आहे तो आला त्याणे अवघेजण मेळउन सांगीतलें जर तूं आज पारणे करावें ऐसि देवाचि आज्ञा जाहलि कि तुजला चवदा दिवस देउन पायास पायतण बांधून आणि चवदा

गुरव तुझे संगे देउन रवाना करावें ऐसि साक्षेप आज्ञा केलि आहे ॥ तुजला कांहिं दृष्टांत जाला असेल तो खरा सांग मग त्यास रात्रिचे स्वप्नभास सांगितला आणि मी बोलिलों की ही गोष्ट माझे कामाचि नाहि मजला कांहिं हाती धरावयास दिधले नाहि जे स्वप्निचे खरे केवि मानावे मग जानक भारति महापुरुष तेथे आहे तो बोलिला दृष्टांत जो जाहला तो खरा आहे जर तुझा भाव पाहुन देव तुला साध्य प्रसन्न जाला येक दाखला दोन्हि जागी आला त्यास लठका भास न बोलावे हे तुजला सांगीतले आहे तें खरेच आहे तू आता पारणे करावे आणि आपले घरि जावें त्याजवरून गुरव आणिक ब्राम्हण बोलिले कि देवाशि (सं)शय कल्पना करु नये देवाचा क्षोभ होईल त्यास मी बोलिलो की कोय (काय?) घेउन जावें ॥ कसि-याचे बळें प्रयोग करावा मग ते बोलिले जे तुला काहि नलगे तूं चिचवडास जाउन देवास सांगावें तो चालता बोलता देव आहे तो सांगेल तेच करावे मग पारणें करून सावध होऊन निघालो भगवंतानें गुरव दोन दिधले आणि चिंचवडास आलो तेथें नारायण देव आहे त्यांचा वडिल पुत्र चिंतामण देव त्यापासून मजला अनुग्रह करविला॥ त्याचा सांप्रदाय कोणास अनुग्रह न करित परंतु देवाचे चित्तास आलें म्हणोन मजला प्राप्त जाला आणि आपला धाकटेपणिचा देव मी न मागतां मजला दिधला वस्त्रें देउन गुरव संगें देउन मजला घरि पाठविलें या प्र(मा)णें वर्तणुक जाहलि ॥ आतां तुमचा विचार काय म्हणून गंगाजि नाइकाने पुसिलें त्यास बुगाजि नाईक बोलि(ले)जे तु या जिवाचे हाल करून देव प्रसन्न केला आतां आपण हईगई करावि तर आपुल्या ऐसे आळसि आणि भ्याड पृथिवीत नाहि याजकरिता हा प्रयोग करावा त्यावर नामजि देसाई व मायाजि मामा मग सारेच बोलले की तुम्ही प्रयोग करावा आम्हास जें साहित्य सांगाल ते आम्ही आपल्या सामर्थ्यासारिखें करुं ॥ ऐसा सर्वाचा विचार घेतला मग कान्होजी[21] आंगरें

---

२१ कान्होजी आंग्रे कारकीर्द:—इ. स. १६८०–१७२९ (ब्र. खा. च. ले. ४) इ. स. १७१३ मध्यें सांवतवाडीपासून मुंबईपर्यंतची कोकणपट्टी त्याचे ताब्यांत असून, शिवाय अलीकडे मुंबईच्या उत्तरेकडील पेशव्यांचे ताब्यांतील कल्याणप्रान्त काबीज करून राजमाची, लोहगड वगैरे घाटमाथ्यावरचे किल्ले त्यानें हस्तगत केले होते. इ. स. १७१३ त शाहूचे पेशवे बहिरोपंत पिंगळे व निळो बल्लाळ यांना आंग्र्यानीं कैद केलें. त्यावेळीं बाळाजी विश्वनाथानें त्याच्याबरोबर त्याच सालीं तह केला. इ. स. १७१५ त 'वसई-पासून सांवतवाडीपर्यंत पूर्ण स्वतंत्र किंवा अंशतः परतंत्र असे अधिकारी येणेप्रमाणें होते. (१) वसई, ठाणें, चेऊल ह्या ठिकाणी पोर्तुगीज लोक (२) मुंबईस इंग्रज (३) जंजिऱ्यास हबशी (४) अलिबागेस आंग्रे (५) सावंतवाड़ास सावंत (६) मालवण

याजकडे गंगाजि नाईक गेले कुलाबे मुकामि आंग्र्यास भेटलें तेथे विचार पाहता त्याचे मनात मुलूख काबिज करावा ऐसे नाहि मग तो विचार टाकुन घरि आले ॥ नंतर कोणि फिरंगीयाजवळ चाहाडि केलि की गंगाजी नाईक तुझे राज्य घेण्या-करिता आंग्र्याकडेस गेले होते मग फिरंगी याणे गंगाजि नाईकास धरुन नेउन तुरगांत घातले तें(व्हा) हे कर्णे देवास संकट पडून खर्च रुपये पाचशे करून गंगाजि नाईक घरि आले त्याजवर बुगाजि नाईक श्रीपंढरिचे यात्रेस गेले त्याचा गुरु देहूकर नारोबा[22] गोसावि त्याजवळ हकीकत सांगीतली त्याहि खंडेराय दाभाडे[23]

ते पन्हाळ्यापर्यंत कोल्हापूरकर (७) गोव्यास पोर्तुगीज (रा. खं. २) (म. री. म. विभाग पा. ७२) अशा ह्या कोंकणच्या परिस्थितींत गंगाजी नाईक कान्होजी आंग्रे याजकडे गेले हे स्वाभाविकच होय. इंग्रज पोर्तुगीजाबरोबर आंग्र्यांच्या लढाया सारख्या चालू होत्याच. इ. स. १७१५ मध्यें मुंबईस ब्रून गव्हरनर आला. त्यानें १७ एप्रिल १७१७ पासून १७२१ पर्यंत तीन वेळां नवीन आरमार बांधून विजयदुर्ग, खांदेरी आणि अलिबाग ह्या तीन किल्ल्यावर हल्ले केले. तिसऱ्या हल्ल्यांत पोर्तुगीज सामील होते. ह्या तीनही वेळां इंग्रजांना खरपूस मार मिळाला. अशा रीतीनें महाबलाढ्य अशा कान्होजीकडे फिरंग्यांच्या अत्याचाराविरुद्ध गंगाजी नाईकांनीं प्रथम मदत मागितली. ह्यांत गंगाजी नाईकाचें योग्य तेंच धोरण दिसून येतें. पण अनेक व्यवसायामुळें कान्होजांनें गंगाजीची मागणी नाकारली. वरील विवेचनावरून हें दिसून येतें कीं, इ. स. १७१८ च्या शेवटीं किंवा १७१९ च्या आरंभीं ही मदत मागितलेली असावी. ही मदत कुलाब्यास सखोजी आंग्र्यांकडे मागि-तली असें पारसनीस ब्र. स्वा. च. पान ६४ वर म्हणतात पण ही त्यांची चूक आहे. कान्होजी जिवंत असतांना सखोजीकडे मदत मागण्याचें कांहींच कारण नव्हतें. शिवाय ज्या साष्टीच्या बखरीवरून पारसनीस असें म्हणतात त्या का. स. च्या प्रतींत कान्होजी आंग्रे असें स्पष्ट लिहिलेलें आहे. इ. स. १७२० त रामचंद्र महादेवांकडे गंगाजीनीं मदत मागितली. त्याच्या आधीं थोडेच महिने त्यांनीं सेनापती दाभाडेकडे मदत मागि-तली होती व त्याचे आधीं कान्होजीकडे मदत मागितली होती. अर्थात १७१९ हेंच साल ह्या प्रसंगाचें ठरतें.

२२ संतशिरोमणि तुकाराम महाराजांचे तिसरे पुत्र नारोबा उर्फ नारायण गोसांवि हे होत. ह्यांचा जन्म शके १५७२ आषाढ--श्रावण महिन्यांत म्हणजे इ. स. १६५० च्या जून-जुलै महिन्यांत झाला होता. शाहू महाराजांनीं त्यांना शके १६२६ सन १७०५ मध्यें देहू गांवची सनद दिली होती. बुगाजी नाईक त्यांचे शिष्य होते हें वर आलेले आहेच. ह्यावरून असें अनुमान निघतें कीं, बुगाजी नाईक वारकरी असून बखरींत लिहिल्याप्रमाणें ते आषाढी एकादशीकरितां पंढरपूरास गेले होते. हा आषाढ महिना

सेनापतिस देहूस बोलाउन त्यास बुगाजि नाईक भेटविले हकीकत सांगितलि सेनापति बहूत खुशाल जाहला मग बोलिले की तुम्हि तुमचा मुलूख आम्हास दिधला तर तुमचे सर्व साहित्य आम्ही करुन तुमचिं वतने तुम्हास चालउ त्या-खेरिज तुमचे मुलखाचा कारभार तुम्हिच कराल जे तुम्हि आपले मुलुखात कराल

१७२० सनांतला होता हें पुढें ओघानेंच आलें आहे. बुगाजीच्या शाखेंत त्रिठोबाची भक्ति जास्त असावी असें दिसतें. त्यांच्या शाखेंतले श्री. वसंतराव पुरुषोत्तम नाईक हे वारकरी असून नेहमीं पंढरी, आळंदी, देहू ह्या ठिकाणीं जात असतात. गंगाजी नाईकांची पूर्ण भक्ति श्रीमोरयाचे ठिकाणीं होती. म्हणून ते चिंतामणी देवांचे शिष्य झाले होते. त्या शाखेंतल्या मंडळींची हल्लींही श्रीमोरयावर दृढभक्ति आहे.

२३ खंडेराव दाभाडे ह्यांना शाहू महाराजांनीं मानसिंग मोरे ह्याजकडून सेनापतिपद काढून इ. स. १७१७ त दिलें (शा. म. रो. ले. १ प. ६ ता. १० सपर सव्वां अशर मया व आलफ स. १७१७). सेनापति दाभाडे इ. स. १७२० च्या बाळापूरच्या लढाईंत स्वतः हजर होते. पुढें वृद्धापकाल झाल्यामुळें त्यांचा मुलगा त्रिंबकराव हा गुजरातेंत अंमल बसवूं लागला. सेनापति दाभाडे सन १७२९ त मरण पावले. शाहूनें ता. ८ जानेवारी १७३० (माघ शुद्ध १ शके १६५१) मध्यें त्रिंबकरावास सेनापतिपद दिलें (म. री. पान २४१) ब्र. स्वा. च. पान २० मध्यें लिहिलें आहे कीं, त्रिंबकराव दाभाडे यांना इ. स. १७२१ च्या मे महिन्यांत सेनापतिपदाचीं वस्त्रें शाहूमहाराजांनीं दिलीं. इ. स. १७२० च्या नंतर सेनापति खंडेराव दाभाडे यांनीं वृद्धापकाळामुळें ह्या सर्व खटाटोपींतून अंग काढून घेतलें होतें हें वर आलें आहे. त्यामुळें १७२१ मध्यें त्रिंबकरावांस सेनापतिपद मिळालें असल्याचा संभव आहे. कदाचित् तसें नसलें तरी एवढी गोष्ट निर्विवाद खरी आहे कीं, त्रिंबकराव हे सेनापतीचें काम आपल्या वडिलांचेकरितां त्यावेळीं करीत होते. सेनापति खंडेराव इ. स. १७२९ त मृत्यु पावल्यानंतर सेनापति-पदाचीं वस्त्रें प्रत्यक्षरीत्या त्रिंबकरावांना १७३० मध्यें मिळालीं असावी. पण अधिकार मात्र इ. स. १७२१ त मिळालेला दिसतो. बखरींत खंडेराव दाभाडेचा उल्लेख सेनापति ह्या पदानें केला आहे. त्यांना इ. स. १७१७ त सेनापतिपद मिळालें. व ते १७२० च्या बाळापूरच्या लढाईनंतर निवृत्तकार्य झाले असें दिसतें. अर्थात् ही बुवाजी नाईकांचे बरोबर झालेली त्यांची भेट बाळापूरच्या आधीं किंवा लगेच नंतरची म्हणजे १७२० तील होय. १७१८ नोव्हेंबर ते १७१९ जुलईपर्यंत खंडेराव दाभाडे औरंगाबाद येथें व तेथून पुढें दिल्लीच्या प्रयाणास गुंतलेले होते. दिल्लीस सय्यदांच्या मदतीस बाळाजी विश्वनाथ हेही त्यावेळीं निघाले होते. जून १९ सन १७२० त खांडव्याची लढाई झाली व आगष्ट १० सन १७२० त बाळापूरची लढाई झाली. निजाम उल्मुलुख व दिलावर अल्ली

ते आम्ही मान्य करु आमचे नावें निशाण मात्र चालवावें वरकड तुम्हि आपलि जमिदारि व आमचा अमल तुम्हीच चालवाल ऐसे बोलणें विठोबाचे देवालयांत नारोबा गोसावियाचे गुजारतिन केले पुढे आश्वीन माशि येउन फोज घेउन जावे म्हणून करार करून बुगाजि नाईक घरि आले गंगाजि नाईकास वृत्तांत सांगितला नामाजि देसाई आणिक कार्याचे लोक बोलाउन आपले लागमाग ठिक केले तेव्हा त्याचेवर्षी[२४] श्रावणमाशिं बाजीराव बाळाजि विश्वनाथाचा पुत्र शाहूचा मुख्य प्रधान

यांचेबरोबर लढण्यांत सेनापतीचा आतांपर्यंतचा काळ गेलेला दिसतो. तेव्हां बाळापूरच्या लढाईनंतर १७२० च्या आगष्ट महिन्यानंतर किंवा त्या सुमारास जेव्हां आषाढी एकादशी आली असावी, त्यावेळीं यात्रेच्या समयीं बुगाजी नाईकांची व खंडेराव सेनापतीची भेट झालेली आहे. सेनापतीचेकडे मदत मागण्याचे अगोदर गंगाजी नाईकांनीं आंग्र्याकडे मदत मागितली होती तें साल १७१९ होतें हें मागें ठरलेलें आहे. त्यानंतर गंगाजीची कैद व सुटका झालेली आहे. अर्थात् ही बुगाजीची व सेनापतीची भेट १७२० च्या आषाढांतीलच होय हें सिद्ध होत आहे. सेनापती व बुगाजी हे दोघे नारोबांचे शिष्य असावेत तसेच हे दोघेही वारकरी असावे असें दिसून येतें. ह्यावेळीं सेनापतीचा अंमल गुजराथ ते वसई ह्या मधल्या प्रान्तावर बसलेला होता. अर्थात् त्यांना हें कारस्थान त्यामुळें पटलेलें दिसतें.

२४ सन १७२० त बाजीराव पेशव्यांच्या बायकोचा भाऊ रामचंद्र महादेव जोशी चासकर ह्यानें कल्याण प्रान्त जिंकून कल्याण हें सुभ्याचें ठिकाण केलें. व पेशव्यांचा अंमल ह्या प्रान्तीं चालू झाला. बखरींतील 'त्याचवर्षी' हे शब्द बऱ्याच महत्त्वाचे आहेत. त्याचवर्षीं ह्या शब्दावरून हें सिद्ध होतें कीं रामचंद्र जोशीनीं कल्याणास ज्यावर्षीं अंमल बसविला त्याचवर्षीं बुगाजी नाईकानीं देहूस सेनापति खंडेराव दाभाडे यांची भेट घेऊन फौजा आणण्याचें निश्चित केलें होतें. ह्या दोन्ही गोष्टी एकाच सालीं घडल्या आहेत. १७२० त कल्याण प्रान्त पेशव्यांच्या सत्तेखालीं आला हें इतिहासांत नमूद झालेलें आहे. टीप २३ मध्यें केलेल्या विधानास त्यानें दुजोरा मिळतो. इ. स. १७२० च्याच आषाढांत सेनापति खंडेराव दाभाडे व बुगाजी नाईक ह्यांची भेट झाली होतीं हें निर्विवाद ठरतें. इ. स. १७२० च्या आश्विन महिन्यांत सेनापतींची फौज आणण्याचेंही मुक्रर केलेलें होतें हें बखरीच्या मजकूरावरून स्पष्ट होत आहे. इतक्यांत आषाढ व आश्विन ह्यांच्या मधल्या श्रावण महिन्यांत पेशव्यांचा अणजूरपासून ७।८ मैलांवर कल्याण येथें सुभा स्थापन झाला. अशा स्थितींत पुढें सेनापतीकडील संधान गंगाजी प्रभृतीनी सोडून पेशव्यांचेकडे चालूं केलें हें साहजिकच होय. एकंदरींत ही गोष्ट सिद्ध होत आहे कीं, इ स. १७२० च्या श्रावण महिन्यानंतर पेशव्यांकडे गंगाजी नाईकांनीं वसईच्या कारस्थानास सुरवात केली.

वसईच्या किल्ल्यांतील कांहीं भाग

निशाणाचा बुरूज

पोर्तुगीज राणीचा महाल

—साष्टीची बखर.

Photos by: Vasantrao D. Mhatre.

त्याचा शाला कल्याणास आला कल्याणचि मोगलाई उठविली भोसल्याचें निशाण लागले अमल रामचंद्र माहादेव हे करु लागले मग गंगाजि नाईकाने आपले भाउ बुगाजि नाईक व मुऱ्हारजि नाईक व शिवजी नाईक व नारायणजि नाईक येउन बैसले विचार केला की राजा शाहूचें राज्य दुर होते परंतु आता सेजारि आलें हा शकून उत्तम जाला परंतु आपले कार्यास चिकट (तिकट?) पडलि सेनापतिचि फौज घेउन आपण मुलखांत शिरोन मग बाजीराव प्रधान पंतांचि फोज येइल दोघांचि दुइ पडेल दोघेहि मुलूख मोडतिल ही दोन्हि मुडे (दोही–दुहीमुळे ?) राजाचि दोन भुंजा यातच चकमक झडेल हे निमित्य आपल्यावर येईल तर आतां तो

पुढें त्याची इतिश्री इ. स. १७३९ मध्यें सतत १९ वर्षांच्या अनेक खटाटोपीनंतर व गंगाजीच्या स्तुत्य चिकाटीनंतर मराठ्यांना अनुकूल अशी झाली आहे. १७२० च्या आधीं निंब नाईकानें ह्या कार्यास आरंभ केला होता. १६८९ च्या आधीं ह्या मोहिमेचा उपक्रम झालेला होता असें दिसतें. १७२० सालापासून गंगाजी, त्यांचे चार भाऊ व त्यांचे आप्त-इष्ट सोईरे ह्यानीं सतत १९ वर्षें अव्याहत केलेल्या परिश्रमावर व त्या इतिहासावर आतां कोणालाही पडदा ओढतां येणार नाहीं. जास्त खोल विचार केला असतांना आपल्या नजरेस येतें कीं, ह्या वसईच्या धर्मसंग्रामाची मूळ मुहूर्तमेढ इ. स. १६८९ च्या पूर्वी केव्हां तरी म्हणजे १७३९ च्या आधीं पन्नास वर्षांच्याही पूर्वी केव्हांतरी रोवली गेली असून ती निंब नाईकांनीं रोवली होती. अशा स्थितींत ह्या मोहिमेचें व पहिल्या कल्पनेचें श्रेय इतरांना देणें हा अधर्म होय. गंगाजी आपल्या भावांना स्पष्ट सांगतात कीं, वडिलांचें कार्य आपणास पुढें चालवावयाचें आहे. गंगाजी नाईकानें वडिलाचें कार्य आत्मसात करून शेवटास नेलें ह्यांत त्यांची थोरवी दिसून येते. रामचंद्रपंताचा अंत १७२८ त झाला, तेथपर्यंत ते कल्याणचे सुभेदार होते. १७३० त कृष्णराव कल्याणचे सुभेदार झाले. मध्यंतरीच्या काळांत फिरंग्यानीं कल्याणावर केलेल्या हल्ल्यांत रामचंद्रपंताची पत्नी जानकीबाई हिनें आपल्या हातांतले गोट व वेळा तोडून शिपायांना दिल्या व गंगाजी नाईक व शंकराजीपंत ह्यांच्या मदतीनें तो हल्ला परतविला.

२५ सेनापति व पेशवे हे दोघेही छत्रपतींचे नोकर होत. असें असतांना एकाची मदत घेतली तर दुसऱ्यास वैमनस्य वाटेल, असा संशय गंगाजी नाईकांना जो आला त्यालाही तसेंच कारण असलें पाहिजे. सेनापति व पेशवे ह्यांचें ह्यावेळीं वैमनस्य इतरत्र असलें पाहिजे व ही गोष्ट गंगाजी नाईकांना ठाऊक असल्यामुळें त्यांनीं सावधगिरी ठेवण्याचा प्रयत्न केला व त्या दोघांतले जास्त बलाढ्य पेशवे हें जाणून त्यांचेकडेच आपले अनुसंधान ऐक्य करण्याचें ठरविलें. ह्यांत गंगाजी नाईकांची मुत्सद्देगिरी दिसून येते. खरें पाहतां बाळाजी विश्वनाथ व खंडेराव दाभाडे ह्यांचे आपापसांत दुमत नसावें असें दिसतें. सेना-

आपला मनसुबा खंडेराव दाभाडे सेनापति याजकडिल सोडावा हें सेजारी राज्य जालें मुख्य प्रधान याजकडे हा मनसुबा करावा तें सर्वाचे मनास आलें मग गंगाजि नाईक चिचवडास जाउन श्रीदेवाचें कागद घेउन रामचंद्रपंतांसि कल्याणास जाउन येकांति भेटले आपला वृत्तांत सांगितला रामचंद्रपंत आइकून बहूत खुशाल जाला मानसन्मान करून आपले मनपूर्वक गोष्टि गंगाजि नाईकाशि केल्या मग आपलिं माणसें संगें दिधलिं हरजि नाईक गाईकवाड व अंतोजि माहाजन त्यांस गंगाजि नाईक घेउन अणजुरास आले त्या दोघास साष्टिचा व वसईचे आंतिल लोकांचा लागमाग व बोलिचालि करून गेले रामचंद्रपंतापासि सांगितले मग रामचंद्रपंताहि गंगाजि नाईक व बुगाजि नाईक याशि आपलि क्रीयापूर्वक वचन दिधले जर तुमचि वतने आहेत ती तुम्हास बाहल आहेत याशिवाय तुमचे उर्जित (करील) तुमचे दांरि हति झुलवविल तो बाजीरावे[२६] असा

पति बाळाजींचे बरोबर दिल्लीस गेलें होते. महाराष्ट्राच्या उत्तर सरहद्दीवर राहून खानदेश, वऱ्हाड, गुजराथ, ह्या तीन प्रांतावर त्यांनीं नजर ठेवली होती. वागलाण व वसई ते सुरत-पर्यंतचा कोंकणप्रांत त्यांनीं जिंकून ठेवला होता. १७२० सालांत बाजीरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं व त्याचवेळीं त्रिंबकराव दाभाडे १७२० त आपल्या वडिलांच्या वृद्धापकाळामुळें सेनापतींचे काम पाहूं लागले होते. दोघेही पुरुष तरुण कर्तृत्ववान व तडफदार होते. अशास्थितींत दोघांमध्यें महत्वपद प्राप्त करून घेण्याच्या बाबतींत चुरस लागली असण्याचा संभव आहे. बाजीराव पेशवे झाल्यामुळें सेनापतींचेंही कार्य तेच करूं लागले व त्यामुळें सेनापतींना वैषम्य वाटणें साहजिकच होतें व त्यामुळें त्रिंबकराव दाभाडे व बाजीराव ह्यांच्यात वैमनस्य उत्पन्न होणें शक्य होते; असें सरदेसाईचे अनुमान आहे व तें खरें असण्याचा पूर्ण संभव आहे. बखरींतल्या सदरहू मजकुरावरून असें स्पष्ट दिसतें कीं, त्यांच्यांत वैमनस्य होतें हें गंगाजींना ठाऊक होतें म्हणूनच त्यांनीं तशी भीति प्रदर्शित केली होती. ह्या दुहीचें निमित्य आपल्यावर येईल व दोघांत पुढें लढाई होण्याचा संभव असल्यामुळें त्या आपापसांतल्या लढाईचे खापर आपल्या मस्तकावर फुटूं नये असें गंगाजींना वाटले होतें. ज्या आपापसांतल्या दुहीला गंगाजी नाईक भीत होतें, ती दुही पुढें विकोपास गेली. दोघांची लढाई खंडेराव दाभाडेच्या मृत्यूनंतर झाली व १७३१ सालांत डभई येथें लढाईत त्रिंबकराव दाभाडे पडले. 'हे घरचें कजिये' पेशव्यांना कसें नडत होतें त्याचें वर्णन बाजीराव पेशव्यांनीं ब्रह्मेंद्र स्वामींना २० मार्च १७३९ रोजीं लिहिलेल्या पत्रांत आहे. [ब. स्वा. च. ले. ४१]

२६ बाजीरावाचा जन्म इ. स. १६९८ त झाला. बाळाजी विश्वनाथ पेशवे हे मूळचे श्रीवर्धनचे राहणारे होत. त्यांचें आडनांव भट होतें व ते श्रीवर्धनचे देशमूख

आहे बाजीरावाने कितेंक वाढविले आहेत तुम्हि पाहातच आहा आणि तुम्हि जमीदार जमिनिसुध्धा बाजीरायाचे पदरि पडत आहां तुमच्या भारास जोडा नाहि ऐसें बोलोन देव्हाऱ्याजवळ गंगाजि नाईकांस व बुगाजि नाईकांस घेउन रामचंद्रपंत गेले गंगाजि नाईकास रामचंद्रपंत बोलिले जर देवाजवळ आम्हि तुम्ही क्रिया करावि जर तुम्ही बाजीरायांखेरिज दुसऱ्याचि आण वाहावि आणि आम्हि क्रिया करितो मग रामचंद्रपंताहि बाजिरायाचि शिकेकटार आणिलि मग रामचंद्र-पंत बोलिले आम्हि या शिक्याचे चाकर हा शिका तेच बाजिराव तुमचे बोलणे जें असेल तें बोला मग गंगाजि नाईक व बुगाजी नाईकाने आपलें मुदे लिहून दिधले त्यासि रामचंद्रपंतानि मुदे कबूल केले त्याच्या सनदा शिक्याशिं करून देउ म्हणून बोलिले मग गंगाजि नाईक बोलिले जरि आम्हि तुम्हास आपले मुलखात नेउन ते राज्य तुम्हास देउन मग तुमच्या सनदा शिक्याशि घेउ परंतु त्या आमुच्या मुद्याच्या पत्रावर बाजिरायाने आपले हस्ताक्षरिं हे दिलें म्हणोन लिहूंन द्यावें ते रामचंद्रपंति मान्य केलें आणि बोलिले की हे तुमच्या लिहिल्याप्रमाणे करून देउ मग आणीक रामचंद्रपंत बोलिले हा बाजिरायाचा शिका मज (ज) वळ आहे मी बाजिरायाचा मुकत्यार आहें मी केले ते बाजीरायानि केलें आणि बोलिले

होते. बाळाजी विश्वनाथांचा दुसरा मुलगा चिमणाजीआपा हा होय. ह्याचा जन्म इ. स. १७०८ मध्यें झाला. बाळाजी विश्वनाथला सेनाकर्तें हा किताब इ. स. १७११ त मिळाला व १६ नोव्हेंबर १७१२ रोजीं पेशवाईपद मिळालें. इ. स. १७२० च्या २ एप्रिलला बाळाजी मृत्यु पावले व १७ एप्रिल १७२० रोजीं बाजीरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. बाजीराव नर्मदा नदीचें काठीं रावेर मुक्कामीं २५ एप्रिल १७४० रोजीं मरण पावले.

२७ गंगाजी नाईकांचे मुद्दे आज आपल्यापुढें नाहींत. बखरींतील मजकुरावरून गंगाजींच्या मागण्याचा अंदाज आपणास करतां येतो. नानासाहेबांनीं चवदा परगण्यांचें वतन तर दिलें नाहींच किंबहुना देशनारगौडीचें वतन बुडवून सरपाटीलकी व तीही तर्फ मालाड व तर्फ मरोळ पुरतीच दिली. ह्यावरून दिसून येतें कीं, पेशव्यानीं आपणास फस-विलें ह्याबद्दलचे बखरींतले गंगाजी नाईकांचे उद्गार खरे आहेत. नाईक खरे मुत्सद्दी होते व म्हणून त्यानीं बाजीरावाच्या हस्ताक्षरीं 'हें दिलें जावें' अशी मागणी केली. पण रामचंद्रपंतानीं बाजीरावाच्या शिक्केकटारीवर व शाळीग्रामावरील तुळशीवरच निभावून नेलें. बाजीरावानें स्वतः लिहून दिलेला दस्तक असता तर नानासाहेबांना गंगाजी नाईकांना वाटण्याच्या अक्षता लावतां आल्या नसत्या, गंगाजीचे मदतनीसांना तर अजिबातच कांहींही दिलेलें नाहीं,

तुमच्या लिहिल्याप्रमाणें तुम्हास दिधलें याशिवाय तुमचे कार्यसंमंधि लोक आमुचि इछा धरित आहेत त्याचि वतने व शिळोत्रें वाड्या फाजिनें पुरातन असतिल ती व तुम्हि सांगाल तिं त्यास देउन व तुमचि तुमच्या मुलखात सत्ता साहेबि चालेल तुम्ही आपल्या मुलखात जे कराल ते आम्हास मान्य आहे दिवसास तिन खून कराल ते तुम्हास माफ आहेत हे इतके बोलोन मग शाळिग्रामावरिल तुळसि उचलोन रामचंद्रपंताने गंगाजि नाईकाचे हाति दिधल्या मग गंगाजि नाईक बोलिले आमचा प्रांत आमचि मायभूमि तीजवर राजा आहे तो दुष्ट आम्हास फार कष्टि करितो आमि (म) चि वतने बुडविली मुलखाचा देवधर्म बुडविला आमचे लोक बाटविलें ऐसा उपद्रव करित आहे म्हणोन आम्हि जमीदार आपला मुलुख तुम्हास दिधला आमचि वतने आम्हास तुम्हि नविच दिधली हे खरें आणि आपल्या मुलखासहित आम्हि तुमचे पदरिं पडलों तुम्हा खेरिज आम्हि कोण्हाचें नाव घेणार नाहि आपला संकल्प हाच कि आपलि या मुलखास राजा भोसला म्हावा तर जो राजा तोच प्रधान म्हणोन समजोन उमजोन तुमचे अंकित जालो तरि तो आपला मुलूख तुम्हास साध्य करून द्यावा मग आपलिया वतनाचा व याशिवाय तुम्हि जे दत्त घ्याल त्याचा उपभोग करावा बाजिरायाचि सेवा येकनिष्ठा करावि मनि कृत्रिम गोष्ट न आणावि हें बोलोन गंगाजि नाईकाने माहादेवावरिल बेल उचलोन रामचंद्रपंताचे हातिं दिधला मग रामचंद्रपंत बोलिले कीं तुमचे शब्दावर आम्हि तवकल करितो तरि तुमचा कौउर्ले आमचे हातिं असावा हे महत्कार्य आहे मग गंगाजि नाईक बोलिला जरि तुम्हांस माझा विश्वास नसेल तरी मी आपले कुटुंब घेउन तुम्हांजवळ येतों. मग रामचंद्रपंत बोलिले हि गोष्ट उत्तम आहे मग गंगाजिनाईक व बुगाजी नाईक अणजुरास आले ॥ नंतर नामजि देसाई मालाडकर व मायाजि राउत कळवेकर व नानजी सुतार वसईकर ॥ व लाडको

---

२८ गंगाजी नाईकानीं रामचंद्रपंताचे आणाभाकांवर विश्वास ठेवला. रामचंद्रपंतांनीं मात्र गंगाजी नाईकांबद्दल अविश्वास धरला व त्यांचा कौल मागितला. पेशव्याशिवाय इतर कोणाचें नांवही न घेण्याचें वचन गंगाजी नाईकांनीं पूर्णपणें पाळलें. पेशव्यांचे बाजूनें मात्र तसें झालें नाहीं. बाजीराव, चिमाजिआपा, रामचंद्रपंत हे तिघेही मरण पावल्यामुळें नानासाहेबांनीं खर्च जास्त झाला ह्या सबबीवर आपल्या पूर्वीच्या पेशव्यांनीं, धाकट्या श्रीमंतांनीं किंवा त्यांच्या पदरच्या माणसांनीं दिलेलीं वचनें ताटकन मोडिलीं. 'वचनें मोडण्याकरितां द्यावी लागतात' ह्या पाश्चिमात्य राजनीतीचा त्यांनीं पुरा अवलंब केला. गंगाजींना मायभूमि आणि मायधर्म सोडवावयाचा होता. नानासाहेबांना मुलुख मिळवावयाचा होता.

हैबतराव भाईंदरकर व बेडाजि देशाई मालाडकर या सर्वांस बोलाविले मागील जाहलें वर्तमान सर्व विदित केलें आणि सागीतलें या कार्यास्तव मि आपलें कुटुंब घेउन कल्याणास जातो मागील साहित्य जे पडेल ते तुम्हि करावे मग मायाजि राउत कळवेकर बोलिला जरि तुमचि फौज कलवियास आलि म्हणजे मी ठाणियास उतरुन देइन व नारायणजि सुतार बोलिले जर तुमजि फौज दादरचे खाडि-आत आलि म्हणजे मि वसईच्या किल्ल्यावरुन नेईन व लाडकोजि हैबतराव बोलिला की मी धाराविस फौज नेइन व नामाजि देसाई व बेडजि देसाई याणी वादरे वेसावे कबूल केले ऐसें सर्वांचे मत एकएक जाले सर्व आपले घरोघर गेले त्याजवर गंगाजि नाईक व बुगाजी नाईक व मुऱ्हारजि नाईक व शिवजि नाईक व नारायणजि नाईक पाचहि भाउ एक जागे बैसोन विचयार केला की आपण आपले मुलखात सगे सोइरे सोडुन येक श्रीदेवाचे अभये करुन ठिकाण सोडुन येथुन जावे या गोष्टिस आपणास मागां कोणि बरे बोलणार नाहि कां जर हे कर्म भले नाहि आपण भरले भाणीया वरुन उठावे ऐसे ते निंद्य कर्म आहे परंतु कर्णार देव समर्थ आहे मग निघायाचा विचयार सर्वांहि केला ॥ ते प्रसंगीं गंगाजि नाईकाचें कुटुब बायका खाशा व कुळबिणि येकुन चाळीस पुरुष २७ मुले ३१ ऐसे कुटुब भारि निघायास फावत नाहि त्याजवर पिलाजि जाधवराव याचि फौज या मुलखात सायवान व मनोर तारापुर दवण पावेतो मारिले ते प्रसंगी निघायास संध सांपडली तीन तारवे भरुन कल्याणेंचे बंदरि गंगाजि नाईक गेले ॥ तेथें रामचंद्रपंतानि त्याचा बहुमान केला घर ठिकाण करून दिधले खाशाचि वस्ति तेथें केलि व गुरे वासरे शिंगरं बडकी (बटकी) हे खटले लोनाड गावाचा सजा करून खोतिनें दिधला तेथे खटले ठेविले मग त्या उपरांत रामचंद्रपंत बोलिले जर या कर्मास खर्च भारि लागेल तरि येक लाख रुपयाचा ऐवज तुम्हि स्वारि शिकारि करुन मेळवावे मग गंगाजी नाईक बोलिले येवढा ऐवज साष्टि वगर मिळणार नाहि मग रामचंद्रपंत बोलिले जे साष्टिस जाउन काम साधाल तर तुमचि मर्दानकी खरि मग रामचंद्रपंताचे माणस पंच्या

---

२९ इ. स. १७२१ च्या जानेआरीनंतर बाजीराव जुन्नरास आले होते. त्यावेळीं पिलाजी जाधवराव बरोबर होते. ह्या ठिकाणीं करीमबेगबरोबर युद्ध करून त्याचा त्यानीं पाडाव केला. त्यानंतर पिलाजी जाधवरावांना घेऊन त्यांनीं माळव्यांत १७२२ फेब्रुआरी-मे मध्यें स्वारी केली. तेव्हां १७२१ च्या शेवटीं किंवा १७२२ च्या आरंभीं पिलाजी जाधवराव सायवान दवणपर्यंत आले असावेत. त्या संधीचा फायदा घेऊन त्यावेळीं गंगाजी नाईक सहकुटुंब कल्याणास आले असें दिसतें.

(स) व गंगाजि नाईकाचि माणसे पन्नास येकु (नें) माणसे शंभर घेउन गंगाजि नाईक व शिवजि नाईक मरोळचे पाद्रिचा लाग करून मरोळचि माडि फोडाया-करिता साष्टिस गेले त्याजवर ही गोष्ट कल्याणास फुटलि मग यादवजिप्रभु कोल्हे-रकर तो फिरगाणे रामचंद्रपंताकडे चाकर होता त्याणे फिरंगी यास सविस्तर लिहून पाठविलें की गंगाजि नाईक दोनसें माणसें घेउन साष्टींत मरोळचि माडि फोडावयाकरिता गेला आहे मग ठाण्याहून फिरंगी याणे पन्नास रेनोळ मरोळास पाठविले आणि घोडबंदरापासून ठाण्याचे बंदराचे बाहेरचा पाणबुरुजापावेतो तार-वाचा वेढा बैसविला गंगाजि नाईक साष्टित पाच दिवस कोंडिला मग साष्टिस नामाजि देसाई व बेडजि देसाई व बापुजि ठाकूर व बापुजि गोरगावकर याहि बरेचसे साहित्य केले साहावे दिवशे हबाजिहिंदुराव व जिवाजि भालेराव याहि लाग करून गलबत घेउन बाळखूमचे बंदरिं आले दोहिकडे दोन मचवे व मधि॰ रात्रभागी त्या तारवावर येकशे माणुस व गंगाजि नाईक आलिकडे उतरले मग फिरंगी याणे साष्टिचे व अणजुरचे मीळोन दोनसे माणुस नेउन तुरंगांत घा (त) ले गंगाजि नाईकाचे सोइरे धाइरे व भाउ सर्व नेउन राखले तेव्हां त्याणी लाच व खंड देउन सुटले च्यारपाच महिने कष्टि जाहाले गणे (श) जी

---

३० ही हकिकत इ.स. १७२२ च्या फेब्रुआरी ते मे पर्यंत केव्हांतरी घडलेली आहे. गंगाजी नाईक १७२१ च्या शेवटीं किंवा १७२२ च्या आरंभींच कल्याणास आलेले असावेत असें मागील टीपेवरून दिसतें. लगेच त्यांना पैसा मिळविण्याकरितां रामचंद्रपंतानीं पाठविले होतें असें बखरकार म्हणतो. अर्थात्, १७२२ च्या पावसा-ळ्याच्या आंत ही गोष्ट घडलेली दिसते. इ. स. १७२२ च्या जुलई सप्टेंबर मध्यें बाजी-राव साताऱ्यास होते. ह्याच वेळीं साताऱ्यास पेशवे प्रातेनिधि ह्यांचा वाद चालला होता. नंतर इ. स. १७२३ त बाजीराव माळव्याकडे गेले. गंगाजीनाईक 'सल्लास अशरीन' इ. स. १७२२–२३ मध्यें आपल्या चारहि भावांसुद्धां साताऱ्यास जाऊन पेशवे व छत्रपति ह्यांना भेटल्याचें व त्यांच्या कानावर हें गाऱ्हाणें स्वतः घातल्याचें ब्र. स्वा. चरित्राचे ६५ पानावर पारसनिसांनीं लिहिलें आहे. अर्थात् जुलई ते सप्टेंबर १७२२ मध्यें ही हकिकत घडली असावी. नाईकांना पेशव्याकडून मिळालेल्या सनदेंत ह्या मुलाखतीचा उल्लेख आहे. बखरींत तो उल्लेख नाहीं. पारसनीसांनी ह्या सनदेवरूनच तो मजकूर आपल्या पुस्तकांत घेतलेला दिसतो. ही भेट १७२२ च्या जुलई सप्टेंबरांत झाली होती असें कायम झाल्यानंतर साहजिकच ह्या प्रसंगाची वेळ १७२२ च्या फेब्रुआरी ते मे ह्या दरम्यानची ठरते. गंगाजी नाईकांचीं दोनशें माणसें ह्यावेळी फिरंग्यानीं धरलीं. तीन माणसांना पोर्तुगीजांचे अत्याचारास आपले प्राण बळी द्यावे लगाले. अशावेळीं गंगाजीनाईक एकदम

प्रभु व गंगाजि प्रभु व हरजि ठाकूर व जिवाजि भालेराव व हबाजि हिंदुराव हे पळोन लोनाडास गेले व रुपाजि भालेराव व त्याचे भाऊ दोन नारोजि व तानकोजि हे सर्व अन्याई करुन गोव्यास नेउन आंगी तेलाचें डगले घालुन जाळिले वरकड सारे सुटले त्याजवर सराईस मनसुबा साधावा तो अनामतखान दिलिहून सुभा जाला किलीजखान कबूल न करि मग बाजिराव किलीजखानास मदत गेला बाजिराव व किलीजखान मिळोन अनामतखान गोदड्या ऐसिहजार राउत बुंडविलें बाजिराव येशवंत जाले ते सालि मनसुबा राहिला मग गंगाजि नाईक व नारायणजि नाईक हे पाच भाउ बैसोन विच्यार केला की आपल्या मनसुभ्यास व लागास व भेदास मागास जो खर्च पडेल तो आपला आपण करु फौजेस जो खर्च पडेल तो रामचंद्रपंत करितिल आपण जमिदार आपले राज्य अकलेशयास(१) द्यावे म्हणजे आपले चाकरीचा मजुरा होईल ऐसा विचार पाचा भावाहि केला तो विचार रामचंद्रपंतासि सांगितला रामचंद्रपंत खुशि जाले मग तिसरे वर्षी जुनरावर बाजिरायाचि स्वारि जाली तेथें गंगाजि नाईकास बोलाउन नेले तेथें मनसुब्याचा ठराव केला संताजि धाईभोर व रामचंद्रपंत व शंकराजिपंत व माहादाजि कृष्ण प्रभु हे सरदार नेमिले तव पिलाजि जाधवरावाहिं मनसुबा राहविला फौजा

साताऱ्यास गेले असतील हें अगदीं क्रमप्राप्तच ठरते. बाजीरावाची व छत्रपतींची गंगाजीनाईकाबरोबर हीच पहिली मुलाखत होय असें दिसतें.

३१ १७२२ च्या जुलै सप्तेंबरांत साताऱ्यास वसईच्या मोहिमेबद्दल जें ठरलें त्याप्रमाणें करण्यास १७२४ पर्यंत बाजीरावांना फुरसद मिळाली नाहीं. इ. स. १७२३ च्या डिसेंबर ते १७२४ च्या जूनपर्यंत बाजीरावांची सर्व हालचाल उत्तरेकडे माळवा, बऱ्हाणपुर, मोंगलाई वगैरे ठिकाणच्या धामधुमीकरितां चालली होती. इतक्यांत बादशहाबरोबर निजामउल्मुलुखाचें न पटल्यामुळें तो वजिरी सोडून १७२३ च्या आक्टोबरांतून दक्षिणेंत येण्यास निघाला. तो हळुहळू दक्षिणेकडे येत होता. त्यानें शाहुकडे बादशहाविरुद्ध मदत मागितली. शाहुमहाराजांनीं १७२४ इ. च्या जानेवारींत सर्वांना पत्रें लिहिलीं (म. री. पा. २१०) व बाजीरावासही मदतीस जाण्यास सांगितलें. बाजीरावांचे मदतीनें निजामानें मुबारीजखानाचा पराभव केला. 'अनामतखान दिल्लीहून सुभा आला होता. तो व त्याकडील सरदार इब्राहीमखान व अबदुलखान हे मयत झाले.' (म. री. पा. १९८) ही हकीकत बखरींतल्या हकीकतीबरोबर तंतोतंत जुळतेही. साखरखेड्याची लढाई इ. स. १७२४ च्या आक्टोबरमध्यें २ तारखेस झाली. (म. री. पा. १९६) म्हणजे १७२४ च्या अखेरपर्यंत ह्या वसईच्या मनसुभ्यास सुरवात झाली नाहीं. ह्याही वर्षीं हा मनसुभा राहिला असें बखरकार म्हणतो.

श्रीरंगपट्टणावर गेल्या चवथे वरुषि करावा तव किलीजखानाचा व बाजिरावाचा बिघाड जाला सा महिने बाजीराव मोगलासिं भाडले मग मोगल कोडिला मोहरेचे सेर अनाज व रुक्याचे येक कटोरा पाणी मोगलाचे लस्करात जाले दुकाळ पडला मोगल लोक घोडे कापून खाउ लागले किलीजखान तहस (तहास) आला मग सला जाला बाजिराव येशवंत[32] जाले तेच वर्षी रामचंद्रपंत[33]स

---

२२ बाजीरावांची १७२० ते १७३९ पर्यंतची एकंदर हालचाल पाहिली म्हणजे असें दिसते कीं, इ. स. १७२९ च्या अखेरपर्यंत बाजीरावास ह्या मनसुभ्याकडे लक्ष देण्यास फावलें नाहीं. इ. स. १७२४ नोव्हेंबर ते १७२५ मार्चपर्यंत बाजीराव माळव्यांत होते. इ. स. १७२५ एप्रील ते सप्तेंबरपर्यंत बाजीराव साताऱ्यास होते. इ. स. १७२५ सप्तेंबरपासून १७२६ च्या जूनपर्यंत बाजीराव कर्नाटकाच्या मोहिमेंत गुंतले होते. (म. स्त्रा. च. ले. ३०) ही कर्नाटकांतली पहिली स्वारी होय. १७२६ च्या जून ते सप्टेंबरपर्यंत पुन्हा साताऱ्यास बाजीराव होते. ह्यावेळीं बाजीराव केव्हांतरी पुणें येथें आले असावेत व त्यावेळीं गंगाजी नाईकांची त्यांच्याबरोबर जुन्नरास मुलाखत झालेली असावी, असा एकंदर बखरीच्या मजकुराचा इत्यर्थ निघतो. कारण त्यानंतर लगेच श्रीरंगपट्टणावर स्वारी झाल्याचा मजकूर आहे. तशांत बखरींत तिसरे वर्षी जुन्नरावर स्वारी झाली अर्थात् अनामतखानाला १७२४ त मारल्यानंतर १७२६ हें तिसरें साल येतें व 'पिलाजी जाधवरावानें श्रीरंगपट्टणावर स्वाऱ्या नेल्या व मनसुबा राहविला' ह्या बखरींतल्या मजकुराची संगति जुळते. कर्नाटकाचे मोहिमेचें काम पुरें करावें म्हणून बाजीराव व सेनापति यांना पुन्हा इ. स. १७२६ च्या विजयादशमीच्या मुहूर्तावर शाहू महाराजांनीं कर्नाटकांत पाठविलें. ते तेथें १७२७ मेच्या अखेरपर्यंत होते. ह्यावेळीं बाजीराव थेट श्रीरंगपट्टणावर गेल्याचा उल्लेख शा. म. रोजनीशींत आहे. अर्थात् इ. स. १७२७ सांतली ही हकीगत होय. १७२७ च्या आक्टोंबरांत मनसुबा करावा तर १७२७ सप्टेंबर ते १७२८ फेब्रुआरी अखेरपर्यंत बाजीराव निजामावरील स्वारींत गुंतले होते. ही पालखेडची लढाई होय. ता. २५ फेब्रुआरी १७२८ ला बाजीरावानें निजामास पालखेडमध्यें कोंडून त्याचें दाणापाणी बंद केलें. व त्यानंतर मुंगी शेवगावीं लगेच तह झाला. १७२८ च्या अखेरपर्यंत बाजीरावाचा मुक्काम साताऱ्यास होता. इ. स. १७२९ च्या जानेआरी ते जुलईपर्यंत बाजीराव वऱ्हाड, माळवा, बुंदेलखंड ह्या ठिकाणीं फिरत होते. चिमणाजी आप्पा माळव्याची व्यवस्था करण्यांत गुंतले होते. आगष्ट ते डिसेंबरपर्यंत त्यांचा मुक्काम पुणें सातारा येथें होता (म. री. पा. १७९-१९०) अर्थात् बाजीरावांना १७२९ पर्यंत ह्या मोहिमेकडे लक्ष देतां आलें नाहीं.

३३ वेच वर्षी म्हणजे १७२८ सालांत, मार्च महिन्यांत मुंगीशिवचा तह झाला.

पोर्तुगीजांचें गोवें येथील इन्क्विझिशन कोर्ट

गंगाजी नाईक मरोळचा माडी लुटण्याकरितां गेले असतां फिरंग्यांनीं साष्टी बेटाला तारवांचा वेढा देऊन कोंडलें; त्यावेळीं त्यांना साष्टीतून कल्याणास जाण्याकरितां ज्यांनीं गुप्त रीतीनें तारवांची सोय केली त्यांपैकीं रुपाजी भालेराव व त्यांचे बंधु नारोजी व तानकोजी यांना गोव्यास नेऊन इन्क्विझिशनपुढें अंगांत नेलाची डगली घालून जाळण्यांत आलें. (बखर पान २३)

देवआज्ञा जाली त्याचा भाउ कृष्णराव यास कल्याणचा अमल जाला त्याहिं आपले कारभारि विठलपंत व चिमणाजिपंत ठेविले ते फिरंगीयासि बहुत स्नेह चालविला मनुसुभ्याचि गोष्ट करु देत नाहि व कृष्णरायाचि स्वारि रामनगराकडे गेलि होति तीकडे दवण प्रांताचे गाव दोन नारगोळ वगैरे मारुन वळित (?) केले कृष्णराव घाटावर गेला नंतर पाउस पडला आषाढाचे महिन्यात फिरंगी याणे कल्याण मारिलें तेथे दुर्गाडिस शंकराजि केशव व गंगाजि व

त्याच सालांत त्यासुमारास किंवा पुढेंमागें रामचंद्रपंतास देवाज्ञा झाली होती पारसनीसांनीं रामचंद्रपंतांचें मृत्यूचें साल १७३० होय असें ब्रह्मेंद्र स्वामीच्या चरित्रांत म्हटलें आहे व त्याचाच अनुवाद सरदेसाई यांनीं मराठी रीयासत मध्यविभागांत केला आहे. पण तें साल चुकीचें दिसतें. पारसनीसांनीं ह्या सालाकरितां आधार घेतला आहे तो हा कीं १६ आक्टोबर १७३० त कृष्णरावास मामलत मिळाल्याचा उल्लेख बाजीरावाचें पत्रांत आहे. रामचंद्रपंताच्या मृत्युनंतर ही मामलत कृष्णरावास मिळाली ह्यावरून पारसनीसांनीं अनुमान काढिलें कीं त्याच सालांत रामचंद्रपंत मृत्यु पावले असावेत. पण बखरींतल्या उल्लेखाकडे पाहतां मुंगीशीवच्या तहाच्या सालीं रामचंद्रपंत वारले. ह्या सालाच्या सत्यतेचा बखरींत आणखी एक पुरावा सांपडतो. १७२८ च्या आषाढ महिन्यांत अर्थात् रामचंद्रपंताचे मृत्युनंतर फिरंग्यांनीं कल्याणावर हल्ला केला. त्यावेळीं रामचंद्रपंत हयात असते तर त्यांची बायको जानकीबाई हिला आपले गोट वेळा तोडून शिपायांना वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें. फिरंगी परत गेल्यानंतर पुन्हां 'दोहोवर्षीं' कल्याण परत मागूं लागला. ही फिरंग्यांकडून आलेली मागणी बाजीरावांना कळल्यावरून त्यानीं पिलाजी जाधवरावांना गंगाजीकडे पत्र देऊन कोकणांत पाठविले तेव्हां १७३० च्या मे महिन्यांत पिलाजी जाधवराव व गंगाजी नाईक यांनीं कांव्यास वेढा दिला अर्थात् १७३० सनाच्या मागे दोन वर्षें गेले म्हणजे १७२८ हेच साल रामचंद्रपंताच्या मृत्यूचे ठरतें. त्यांचा मृत्यु १७२८ च्या आरंभी झाला असावा. कारण त्यानतर, कृष्णरावांनीं कल्याणास आपला अंमल बसविला व ते लगेच घाटावर गेले. पुढें आषाढात फिरंग्यांचा हल्ला झालेला आहे. पुढें कृष्णराव हे १७३० च्या कांव्याच्या लढाईनतर मामलतीचीं वस्त्रें घेऊन कल्याणास आले. तोंपर्यंत रामचंद्रपंताचे कारभारी अंमल करीत होते असे दिसतें.

३४. १७२८ च्या पावसाळ्याचे आरंभीं कृष्णराव घाटावर गेले. इकडे फिरंग्यांनीं कल्याणावर हल्ला केला. पण चिमणाजिपंत व विठ्ठलपंत ह्यांनीं फिरंग्यांचेबरोबर सलोख्याचे धोरण ठेविलें. कृष्णराव जे रामचंद्रपंताचे मृत्यूनंतर गेले ते गेलेच. कांव्याच्या लढाईनंतर ते कल्याणास आले. इकडे सर्व कारभार कारभाऱ्याच्या हातांत असल्यामुळें दोन वर्षांनीं पुन्हा फिरंग्यांनीं कल्याणची मागणी केली. त्यामुळें बाजीरावास पिलाजी जाधव-

दादाजि व माहादाजि कृष्ण व शिवजि नाईक व नारायणजी नाईक अणजूरकर याजवर च्यार हिरिच्या केल्या तेथें शंकराजिपंताने बरीच सर्यत केली आपले कानच्या कुडक्या शिपायास दिधल्या व जानकीबाई रामचंद्रपंताचि स्त्रि व तिच्या वेळा व गोट तोडुन तुकडे करून शिपाई बरकंदाज यास दिधले फिरगी मोडुन घातला कल्याणचे चावडिवर जमा जाले दुर्गाडिच्या तोफा जाया जाल्या मग गंगाजि नाईक लोनाड सोडु (न) आला व बाबाजी अडठराव वसदा होउन (?) आला कल्याणचे कोटावर चढले मग फिरंगी झाडुन बंदरावर चावडित जमा जाला बाबाजि आडठराव दुर्गाडिवर चढला गंगाजिनाईकानें कोटावरचि तोफ दुर्गाडिवर नेलि दुर्गाड़िचा मार शंकराजि केशवाने केला मग फिरंगी तारवाव (र) चढोन गेला त्याजवर सला जाला फिरगाणाचे मसलतिचि चर्चा कोणि करु देत नाहि त्याजवर दोहो वर्षीं पुन्हा फिरंगी वैशाखमासि कल्याण मागण्याचे भिडेस पडला मग बाजिरायाहि पीलाजि जाधवराव नामजाद पाठविले त्याबराबर गंगाजिनाईकास कागद आला जर जाधवरायास सामील होउन फि (र) गाणाचे जे काम होईल ते करावे चवऱ्याशि देशपाडे यापैकि मालाडकर अंताजि रघुनाथ कवळे

रावास पाठविणें भाग पडलें. ह्यावेळचें बाजीरावांनीं गंगाजि नाईकांना पाठविलेलें पत्र व इतरही पत्रव्यवहार उपलब्ध नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट होय. ह्या सर्व वेळीं कृष्णराव घाटावरच होते. ह्याच सुमारास फिरंग्यांनीं वतन जप्त केल्यामुळें अंताजी रघुनाथ गंगाजी नाईकांकडे कल्याणास आले होते. त्यांचा व पेशव्यांचा १७२९ सालांत झालेला आरंभीचा पत्रव्यवहार उपलब्ध आहे. ह्या सर्व जुलमाचा व कृष्णरावांच्या दिरंगाईच्या धोरणाचा विचार करूनच बाजीरावानें पिलाजी जाधवरावांना १७३० त कल्याणास पाठविले. ह्या दिरंगाईमुळें कृष्णरावास मामलत मिळण्यास उशीर झाला असावा.

३५ अंताजी रघुनाथ ह्यांचें वतन १७२९ च्या सुमारास जप्त झालेलें दिसतें १७२० त सर्व वसई प्रांतांत पोर्तुगीजांचा अंमल जारी सुरु झाला होता. त्याचवर्षीं इन्क्वीझीशनचा जोर पुन्हां सुरु झाला. अंताजी हे त्यावेळीं मालाडचे देशपांडे होते व प्रमुख उपाध्याय म्हणून त्यांचें त्यावेळीं त्या प्रांतांत बरेंच वजन होतें. पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या लोकांचे ते उपाध्याय होते. अर्थात् गंगाजी नाईकांसारख्या त्यांच्या यजमानांना जो भयंकर जुलुम सोसावा लागत होता त्याची झळ ह्यावेळी अंताजी रघुनाथ व त्यांचे भाऊबंद यांनाही लागली. अर्थात् ह्या सुमारास त्यांचें वतन जप्त होऊन त्यांना जीवाच्या भयानें पोर्तुगीजांचा मुलुख सोडावा लागला व ह्या कारणानें पोर्तुगीजांचे मुलुखापासून आपण दूर रहावें असें पेशव्यांनीं त्यांना पुढें लिहिलें. ह्यावेळीं अंताजी रघुनाथ गंगाजी नाईकांचे जवळ कल्याणास होते असे बखरकारांनीं म्हटलें आहे. ते १७३० च्या कांब्याचे लढाईच्यावेळीं

(कावळे) आले होते ते गंगाजिनाईकाजवळ होते मग गंगाजिनाईक व अंताजि रघुनाथ जाधवरायासि भेटले येउन काबियेंस[३६] वेढा घातला कल्याणाहुन विठलपंत व चिमणाजिपंत आले कोटास मोरचे लाविले मग फिरंग्याचि कुमक मचवे दोन काबे खाडित आले पिलाजी जाधवराव व गंगाजि नाईक धाउन खाडित उड्या घालून मचवे घेतले त्या मचव्यावर सामान दारुगोळा तोफा बारा सांपडल्या त्याच तोफा लाउन माडि फोडिली फिरंगी कोलास आला आठ फिरगि खासे सांपडले व हजार मनुष्य रयत व सोळाशे शिपाई पाडाव करून झोडिले मग गंगाजि नाईकाने ठाण्याचि खबर आणविलि तव साष्टीत उतरायाचा मार्ग मोकळा आहे ति खबर जाधवरायास सांगितली मग जाधवराव व विठलपंत व चिमणाजिपंत व गंगाजि-नाईक व अंताजि रघुनाथ हे मीळोन साष्टित जावयाचा विचार केला तंव कृष्णराव

व पुढील साष्टीच्या हल्ल्याच्यावेळीं गंगाजी नाईकांचेबरोबर होते. १७२९ पासून अंताजींचा संबंध या मोहिमेंत येऊं लागला आहे; असें बखरीवरून व श्री. के. अ. पाध्ये व कै. रा. जोशी ह्यांच्या लिखाणावरून तसेंच कै. पुरंदरे पुणतांबेकर ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या पत्रव्यवहारावरून सिद्ध होते. अशा स्थितींत सर्व इतिहास 'साष्टीच्या बखरी'च्या रूपानें प्रसिद्ध असतांही कै. रा. जोशी ह्यांनीं ह्या मोहिमेच्या पहिल्या सूचनेचें व पेशव्यांना मिळालेल्या प्रोत्साहनाचें श्रेय अंताजी रघुनाथ ह्यांना दिल्याचें पाहून व त्याचाच अनुवाद श्री. बेहरे व श्री. पाध्ये यांनी केल्याचें वाचून फार आश्चर्य वाटतें. १७३४ त पेशव्यांनीं मुंबईच्या गव्हर-नरास अंताजीच्या वतनाबद्दल लिहिलें होतें. आपणास ह्यांत हात घालतां येत नाहीं असें त्यांचें उत्तर आलें. ह्यावरूनही हेंच सिद्ध होतें कीं १७२९ च्या सुमारास किंवा त्याच-वेळेस केव्हां तरी अंताजीचें इनाम वतन जप्त झालें व म्हणून गंगाजीच्या मध्यस्तीनें ते ह्या राजकारणांत सामिल झाले. जोशी व पाध्ये यांच्या म्हणण्याप्रमाणें अंताजींच्या मध्यस्तीनें गंगाजी नाईक ह्यांत सामील झाले हें खरें नव्हे. कै. पारसनीस, श्री. सरदेसाई व श्री. हडप ह्यांच्या म्हणण्याचा इत्यर्थ मात्र आमच्या म्हणण्याप्रमाणेंच आहे. सरदेसाई तर गंगाजी नाईकांना ह्या युद्धाचा 'उत्पादक' म्हणतात. हडपांनीं व पारसनीसांनीं वसईच्या ह्या मोहिमेच्या पुरस्कर्तृत्वाचें स्थान गंगाजींना दिलें आहे. ह्या तिघांही लेखकांच्यामतें अंताजी रघुनाथ मागाहून ह्या राजकारणांत सामील झाले होते. पेशव्यांचें एखादे गौरवपर पत्र घेऊन त्यावरून इतिहाससंगत नसलेलें एखादें चुकीचें अनुमान काढणें इतिहासलेख-कास योग्य नव्हे. अंताजी रघुनाथाला १७१९ सालीं पेशव्यांकडून आलेल्या पहिल्या पत्राच्या कितीतरी आधीं गंगाजी नाईक व त्यांचे कितीतरी पूर्वी निंबाजी नाईक ह्यांनीं राज-कारणास आरंभ करून अनेकप्रकारचे परिश्रम घेतले होते.

३६. ही कांव्याची लढाई स, १७३० च्या मे महिन्यांत झाली.

घाटावरुन आले मग गंगाजि नाईकाने आपले लोक मायाजि राउत यास खबर धाडिली उताराचे कोळि सिद्ध केले व साष्टित नामाजि देशमुख व आपले लोक तयार केले मग कांबियाहून चालिले भालावर जमाव जाधवराव व कृष्णराव [भालावर] जमा जाले जाधवराव व गंगाजि नाईक सहरोलिस (?) लाविले गंगाजि नाईक व बुगाजि नाईक व मुऱ्हारजि नाईक व शिवजि नाईक व नारायणजि नाईक व कृष्णाजि नाईक व चागनाईक (नाक ?) वगैरे सिपाई लोक निशाण घेउन बिनिस चालिले खिडखाळेवर गेले कृष्णॅराव आंगे घोडे दटाउन गंगाजि नाईकाचे निशाण आपले हातिं घेउन मागा आणून हतिवर हिधलें ते देखुन जाधवराव खटे जाले पुढे चालतां लोक वाटोवाट बसले डोगरा आलिकडे पलीकडचे लोक राहिले गंगाजि नाईक व भाव वगैरे लोक पंचविस व रायाबा त्रिटणीस व दत्ताजि मुके व अंताजि रघुनाथ वगैरे लोक पंचविस येकून पंन्नास माणुस कळव्याचे खिडिखावर जाउन उभे राहिले मागे कोणी नाहि तव गंगाजि नाईकाने रव चालावयास हवे मधें मधें ठेविले होते ते मागून आले त्याहिं सांगितलें जर सारे लोक वाटेचे बैसले निजले कोणि पुढे पाई घालित नाहि गंगाजि नाईक तव रायाबास व अंताजिपंतास घेउन जेथे पिलाजि जाधवराव व कृष्णराव दिघ्यावर बैसले होते तेथें सारेच गेले मग जाधवराव बोलिले जर लोकाहि घालविले तेथें ठ्याई काई आता आल्यासरसे हे कळवे मोडावे कळव्याचि माडि व बाहेरचा बुरुज वसता (बसता ?) आहे मग गंगाजि नाईक इटाव्याकडुन कळव्यात शिरला पाठिवर सुभानजि म्हपाळ पाई उतारा घेउन चालिले तव उजेडले मग सारिच शाहि कळव्यांत शिरलि कळवे

---

३७ कृष्णराव १७२८ त घाटावर गेले ते १७३० च्या मे नंतर इकडे कोकणांत आले. त्यावेळीं पावसाळा संपल्याबरोबर ह्या मोहिमेस जोर आला होता. कृष्णरावांच्या ढिलाईच्या धोरणाचा पेशव्यांना राग आलेला होता असें दिसतें. कारण त्यांनीं इकडे चढाईचें धोरण चालू करण्यास गंगाजी नाईकांना जाधवरावाबरोबर पत्र पाठविलें व कृष्णरावांना मामलत देण्यास उशीर केला. तरीसुद्धां मामलत घेऊन आल्यावर कृष्णरावांनीं आपलाच हेका चालविला असावा असें दिसतें. कारण आपल्या अपमानाचा सूड घ्यावा एवढ्याच इराद्यानें साष्टीवर चढाई करण्यास निघालेल्या फौजेच्या आघाडीस गंगाजी नाईकांचे हातांत असलेलें निशाण त्यानीं स्वतः घेऊन मागें हत्तीवर दिलें. ह्यानें जाधवराव फार खट्टु झाले व फौजही नाराज झाली; फौज पुढें जाईना. आपल्या धीरोदात्त वर्तनानें गंगाजींनी पुष्कळ प्रयत्न केला तरी फौज त्या त्या ठिकाणींच बसली. शेवटीं गंगाजी नाईकांनीं ठरविलें कीं, आतां अगदीं तसेंच परत जावयाचें बरें नव्हें तेव्हां कळवें तरी लुटावें. कृष्णरावांचें खुनशीवर्तन कुठें व गंगाजींचें उदारधोरण कुठें !

लुटले मायाजि राउताचे घर गंगाजि नाईकाने राखिले मग कळवे लुटून सारि फौज खडखाळियावर च्यार दिवस मुकाम करून भीव डोगरिस तळ दिधला मग माडवि घेतलि व जिवधण टकमक तादुळवाडि कामर्णेदुर्ग हे किल्ले वसविले ॥ तेव्हां गंगाजि नाईकाचे सेहिरे साष्टितिल बावीस माणूस फिरंगी याणे बंदिस घातले पु (ढे) करणें देवास ते खंड देउन आपणास सोडविले त्याजवर जाधव-राव घाटावर गेले कृष्णरायानें फिरंगीयासी सैन्य केला त्याजवर कृष्णरायाचा अमल निघाला वासुदेव जोशि अमल कल्याणास करू लागले त्याच्याहि अमलात फिरगाणचा मनसुभा राहिला गंगाजि नाईक लागामागाचे लोकांस देणे कबूल होते ते देताना हयास आला पंचवीसहजार रुपये घरांतील ऐवज मोडतोड करुन भरले व दाहा हजार रुपये कबिल्यास कर्ज जाहाले मग पाचहि भाउ बसून विचार केला की आता कसे करावें संसार सोडुन वैराग्य घ्यावे तर ब्रम्हस्व जाले यास काय करावें मग मनसुबा तोहि केला नाहि अणि (आणि) ज्यास देणे कबूल केलें आहे ते त्यास दरसाल घ्यावे लागेल न दिले तर पुढे आपलिं पत खुडकलि रुपया मिळत नाहि आणि ज्या मनुष्यास देणे ते न दिल्हे तर तो हातचा गेला आज बारॉं वर्षें जे खाविलें तेहि व्यर्थ गेले ऐसा प्रसंग आपलेवर पडला मग या विचा-

---

३८ इ. स. १७३० च्या डिसेंबरांत कळवें घेतलेलें दिसतें. पुढें ही मोहीम चालूच राहिली त्यावेळीं वरील हे किल्ले घेतलेले आहेत. १७ फे. इ. स. १७३१ त मनोहर (मनोर) मराठ्यांनीं घेतले असें ब्र. स्वा. चरित्रांत पारसनीस म्हणतात. अर्थात् वरील किल्ले ह्याच सालांत घेतलेले दिसतात.

३९ पिलाजी जाधवराव ही मोहीम आटपून घाटावर गेल्याबरोबर कृष्णरावानें लगेच आपलें पूर्वीचें धोरण चालू केलें. त्यानें फिरंग्याच्या बरोबर सल्ला केला. ही गोष्ट पेशव्यांनाही आवडलेली दिसत नाहीं. बाजीरावानें स. १७३१ त अंताजी रघुनाथाला एक पत्र लिहिलें आहे त्यांत ते लिहितात. 'फिरंगीयाचें सल्याचें ठांक जाहलें नाहीं व होईल सारखा भरोंसाही नाहीं यास्तव हेवा लागे जे आहेत त्यांचा संग्रह केला पाहिजे, त्यास ग्राम, धाम, ठाण द्यावें म्हणून लिहिलें होतें. ऐशीयास रा. कृष्णराव ह्यास पुनरुक्त दर्श-नास यावयाची आज्ञा केली आहे.' इ. स. १७३१ च्या शेवटीं किंवा १७३२ च्या आरंभीं कृष्णरावांचा अंमल दूर करण्यांत आला; व त्या ठिकाणीं वासुदेव जोशी ह्यांना कल्याणचा सुभेदार केले. १७३१ च्या डिसेंबरांत बाजीराव साताऱ्यास होते.

४०. १७१८ त गंगाजीनें परमेश्वराचें साहाय्य मिळविलें व इ. स. १७१९ त प्रथम आंग्र्याकडे व नंतर १७२० त सेनापति दाभाडेंच्याकडे असें क्रमशः ह्याबद्दल प्रयत्न केले

रास गंगाजि नाईक आपले बंधुसि बोलिले कीं तुम्ही दम धरुन राहावे मि गुजराथेत जातो त्या प्रांति आमे (आमचे ?) मीत्र सावकार लोक बंदरोबंदरी आहेत ते आम्हास जाणतात तर मी त्याजकडे जाउन माल मागुन घेउन आणुन लोकाचे देणे वारुन नंतर आपण कविल्यासुद्धा देशांतरास जाउ परंतु आपण समर्थाचे पदरि आहो त्यास आज्ञेवाचुन जाणे निट नाहि मग बुगाजि नाईक व शिवाजि नाईक अंताजि रघुनाथ या तीघास पुणियास रवाना केले ते पुणीयास जाउन बाजिरायास हकि(क)त सांगितली मग बाजिरायाने भिकाजि हरिभक्त बराबर देउन कल्याणास पाठविले मग भिकाजि नाईकाचि खातरि केलि उतराचा मार्ग व दादर वेसावे धाराबि दाखविलि आंतिल लोकाचि बोलिचालि केलि व वसईचि निशा केलि गंगाजि नाईकाने आपलि हाल हकिगत दाखविली मग भिका नाईकाने पुणीयास जाउन बाजीरायास व चिमाजि आपास सकळ वर्तमान समजाविले मग त्याजवरून दोघा बंधुही मनावर धरिले जर हा मनसुबा सिद्धिस न्यावा हा सिद्धांत जाला त्याजवर बाजिराव व आपा याहि सरदारास व शंकराजिपं (त) हशमनिस व खंडोजि मानकर व वासुदेव जोसि व मोराजि सिंदकर यास बोलाउन सांगितले की आपणास फिरगाणाचा मनसुबा करावा लागतो तुम्हि सरदार आमुचे पदरिं आहा हे काम आमुचे करून घ्यावें मग शंकराजिपंत बोलले जर गंगाजि नाईकाने आमचि निशा करावि म्हणजे आम्हि हमि भरु मग शंकराजिपंताहि आपले तर्फेन येशवंतराव येरुळकर व बाजिराव बेलोसे व उदाजि पाटिल उतेकर नेमिले व वासुदेव जोशि याहि आपले तर्फेने नारोपंत व खंडोजि मानकरि

स. १७२० त रामचंद्र महादेवाबरोबर गंगाजीनें करारमदार केले. लागमाग हेवेदावे वैगरेचा सर्व खर्च गंगाजीनें करण्याचें ठरविलें. फक्त शिबंदीचा खर्च पेशव्यांनीं करावा. त्याप्रमाणें स. १७३१ पर्यंत गंगाजीनें अनेक प्रकारें ह्या कार्याकारितां खर्च केला. गंगाजीचे एकदां दोनशें व दुसऱ्या वेळीं २२ माणुस फिरंग्यानें पकडून कैदेंत घातले. एकदां स्वतः गंगाजीनाहीं कैद भोगावी लागली. ह्या प्रत्येकवेळीं लांच व खंड देऊन गंगाजीनें त्यांची व स्वतःची सुटका केली. भालेराव बंधूपैकीं तिघे जणांना फिरंग्यानीं तेलाचीं डगलीं घालून जाळले. इतका अतुल स्वार्थत्याग गंगाजी स्वधर्मस्थापना व स्वराज्यरक्षणाकरितां करीत असतांना १७२८ ते १७३१ पर्यंत कृष्णरावानें फिरंग्याच्याबरोबर मैत्री ठेवण्याचें आपलें धोरण सारखें चालू ठेवलें होतें. त्यामुळें साहजिकच गंगाजी नाईकांना वैताग आला. व त्यांनीं देशांतरास जाण्याचें ठरविलें. वासुदेव जोशीच्या अमलांतही तसेंच होईल ह्या भीतीनें गंगाजीनें ह्या बारा वर्षांच्या एक तपाच्या तपश्चर्येनंतर आपला देशांतरास सहकुटुंब जाण्याचा निश्चय पेशव्यांना कळविण्यास आपल्या भावांना पुण्यास पाठविलें,

(माणकर) याहि येसजि सनस व गंगाजि यास विचारे (विचारे यास) नेमिले मोराजि सिंदे याहि विठोजि डोकळे व आबाजि टांकळकर नेमले त्यास रावबाजि बोलिले जर याचि निशा करुन द्यावि म्हणजे आम्हि तुमच्या मुलखाचा मनसुभा सिद्धिस पाववितो आणि तुमचे लोकांचे उर्जित करु आणि तुम्हास वतनावर बैस-विन हेंच माझे वचन खरे जाणावे मग [मग] गंगाजि नाईक घरि कल्याणास आले मागून जो येत जाईल त्याचि निशा करावि लागेल निशा ऐशिजे मनुष्य कळण्यास न्यावें वरचे बुरजाखालें उतरावें वादरें वेसावे माहाड (पाहाड?) धारावि व घोडंबदर दाखवावें आणि नामाजि देसाई व अैसे लोक सामील त्याच्या बोल्या चाल्या त्या माणसाने कराव्या मागा कळण्यास लक्षुमणजि राउताचे घरी येउन उताराचे कोळी यास आणून बोलि करावि मग कल्याणास यावे अणि (आणे) वसईस जाण्याकरिता कामणचे रानात पाणि व दबे पाहात जावे राजावळि (चा) तारा उतरावा उमेळयास कुकर चौधारियाचेकडे राहावे तेथुन सुतार वोळी(त) यावे व गणेशजिने कोटात तो ग्रहस्त न्यावा आणि लागाचे कपतानासि भेटवावा कपतानाने बुरजावर नेउन तोफा जंग्या दाखवाव्या बोलिचालि भारवक्रिया कराव्या मग बोलित (वोलित) आणून गुजाबाई सुताराणिचे घरि त्या माण-सास आणुन जेवणाखाण्याचें करावें पुन्हां रात्रिचें ते मनुष्य व गणेशजि मिळोन बुरजाखालि येउन जाउन उभे राहावे त्या कपतानाने येउन खुग मुद्रा करावि मेजाचि दोरि वरुन द्यावि मग तो ग्रहस्त ओळित येउन आगरचा व खाडिचा व डोगराचा लागमाग पाहून जावें ऐसि यकूनयेकाचि निशा जालि मग आतिल लोक बोलो लागलें की वारंवार तुम्हि येउन खातरि करितां परंतु हे वर्तमान बाहेर फुटले तर आमचि घरे सध्या तुम्हि बुडवितां कोणत्याही कामाचि खातरि येक दोन वेळ करून घ्यावि वारंवार तुम्हि माणसे पाठविता तर आम्हि खातरि किती करावि कदाचित समजले तर आमचि घरे सध्या बुडतलि मग तुम्हि निसूर राहाल ऐसें बोलु लागले त्यास गंगाजि नाईक बोलिला जर मजला श्रीदेवाने अभय दिधलें आहे त्या भरवशावर देवाचे अभय घेतो तेव्हा तुम्हाकडे मनुष्य पाठावितो तुम्हि मोरयाचे स्मरण करून जें काम पडेल ते करा मनात कपट येउ देउ नको हा सेवाधर्म येकनिष्ठ करा तुम्हास बाजिरायाचे हातचि वस्त्रें येतात तुम्हि बाजिरायाचे चाकर खरे आपण बहुत काळाने सेवा पुर्वजामागे अंगिकारिली तर हि सेवा येकनिष्ठपणे करावि यामुळें बऱ्यावाईटाचे संकल्प देवापुढे ठेवावे बरे जालें तर आपण आपलि वतने खाउ आणि पुण्य पुरुषार्थ वाढेल कीर्ति परमार्थ प्राप्त होईल वाईट जालले तर या महत्कार्याचा व आपलें कुटुंबाचा संकल्प करावा आपला संकल्प ऐसा आहे तुम्हास किंवा आम्हास दगा येकादे माणसास जाला

म्हणजे आपण आपल्या कुटुंबासुद्धां अग्निकाष्टे भक्षण करुं हा आपण निर्धार करुन तुम्हाकडेस आलो देव तुमचा निभाव करिल तेविशि तुम्हि चिंता न करावि म्हणोन गंगाजि नाईक व नामाजि देसाई व भिकाजि हैबतराव व गणेशजि सुतार व लक्षुमणजि राउत व आणखि ग्रहस्त समाधियास प्रबोध करून श्रीदेवाचें अभय त्यास देउन रवाना केले ते आपलाले घरि गेले त्याजवर निशा करावयास जो ग्रहस्त येईल त्याचि निशा होउन जाईल याप्रमाणें बेत गंगाजि नाईकाने करून ठेविला मग बाजिराव कल्याणास आले तेवेळी अंताजि रघुनाथ व गंगाजि नाईक आपले साहित्य करुन वाटे मार्गाचे लोक संगे घेउन कुलाविर्यास[41] गेले परंतु ते वर्षी मनसुबा राहिला तेच वर्षि फिरंगी याणे विचार केला जर आपले मुलखात साष्टि व आगरात मराठे लोक आहेत ते यकदाच धरुन बाटवावे ऐसि वरदि दोलुइसबुतेल[42] जरालाने विजुरेचि आणुन तमाम मुलखातिल

---

४१ ही हकीकत १७२५ सनाच्या एप्रिल-मे मध्यें घडली असावी. कारण म. री. पान २७३ वरून दिसतें कीं हबशावर शाहूमहाराजांनीं बाजीरावाला १७२३ च्या एप्रिलांत पाठविले होते; त्यावेळीं ते कुलाब्यास आले होते. स. १७३२ त भिकाजी हरिभक्त कल्याणास आला होता. त्याची खात्री गंगाजीनें केली. नंतर शंकराजीपंत, खंडो माणकर, वासुदेव जोशी, मोराजी सिंदे ह्यांनीं आपापले सरदार खात्री करून घेण्याकरितां पाठविले. त्यांची निरनिराळ्या वेळीं खातरजमा करून दिली. गंगाजीचे मदतनीस भिऊं लागले. 'कार्य होऊं' असें गंगाजीला झाले होते ह्या सर्व घडामोडींत वर्ष-दीडवर्ष सहजच निघून गेलें. १७३२ च्या मध्यापासून १७३३ च्या आरंभीच्या काळांत बाजीराव मावळा, उत्तर हिंदुस्थान ह्या प्रान्तात होते. १७३३ सांत आरंभीं छत्रसाल मरण पावला. ह्यामुळें बाजीराव त्याकाळांत कोंकणांत येऊं शकले नाहींत. १७३३ च्या एप्रिलांत शाहूंच्या आज्ञेवरून बाजीराव कोंकणांत आले. १७३३ च्या मे-जूनमध्यें गंगाजी व अंताजी कुलाब्यास पेशव्यांना भेटले.

४२ स. १७३२ त पांड्रो मास्करीना कोंटड सांडो मिल हा एप्रिल व मे मध्यें गोव्यास गव्हरनर झाला. त्यानें हिंदुस्थानांत येतांच धर्मच्छलास व युद्धास प्रारंभ केला. ता. ८-५-१७३४ ला लुई बोतेलो (दो लुईस बुतेल) हा वसईस किल्लेदार होता. त्यानें साष्टींतले व आगराचे लोक एकदम वाटविण्याचें ठरविलें तें ह्याच सालीं होय. ह्याच सालीं ३ मार्चला पेशव्यांनीं इंग्रजाना अंताजीच्या वतनाबद्दल पत्र लिहिलें. पोर्तुगीजाचे धर्मच्छलाबद्दल गंगाजीनें नारायण जोशीकडून व नंतर बाजीरावाच्याजवळून ह्याच सालांत पोर्तुगीजांना दटावून पत्रें लिहिलीं. १७३४ च्या शेवटीं पोर्तुगीजानीं ठाण्याच्या किल्ल्याचें काम जोरानें सुरू केलें.

वसईच्या किल्ल्यांतील कांहीं भाग

वालेकिल्ला

पडलेली भिंत

गुप्तद्वार

—माझीच्या वखर.

Photos by: Vasantrao D. Mhatre.

रयतेचि घरें माणसे कागदि लिहिलि देवळि जमा होणे म्हनुन हुकुम केला त्याजवर मुलकात खळाळा पडला कीतेक गंगाजि नाईकास सांगावयास कल्याणास गेले मग गंगाजि नाईक नारायण जोशि याजवळ जाउन बाजिरायाचे नावें दटाउन कागद लिहिला फिरंगियास पाठविला त्याजवर कागद गंगाजि नाईकाने बाजिरायास फिरंगीयाचि हकि(क)त लिहिलि त्याजवरुन रायाचें पत्र फिरगीयास दुसरे मागाहून आले मग फिरंगी व पाद्रि जमा होउन विचार केला जर ठाण्याचा कोट पुरा होइल मग हा प्रयोग करु आधि कोटावर लगट करुन कोटास काम चालु केले जराल येउन ठाण्यास बैसेला[४३] काम लाविले मग दुसरे सालि राव हिंदुस्थानावर गेले व चिमणाजिआपा साताऱ्यास होते तव सिदि सात जंजिऱ्याहून चेउल सुभ्यात रेवसाचे बंदरि उतरले तों मानाजि आगऱ्यास न आटापत मग चिमणीजि आपास जासूदजोडि पाटविलि आपासाहेब साताऱ्याहुन तीन दिवसात धाउन येउन सिधि समुद्रांत[४४] बुडविले आपा कुलाब्यास[४५] गेले तेथे अंताजि रघुनाथ व गंगाजि नाईक आपले साहित्यासि गेले तेहि वर्षी फिरगाणाचे काम राहिले ठाणियास कोट बाधायास लगट फार केला ते समई साष्टिचे पाठाऱ्या ज्ञातिचे या चातेना[४६] व पाचकलशे

---

४३ बाजीराव १७३५च्या जानेवारी ते एप्रील पर्यंत कुलाब्यास होते (म.रा.पा.२८८). स. १७३५ च्या शेवटीं चिमाजीआपा साताऱ्यास होते. ह्या 'दुसरे सालीं' म्हणजे १७३६ च्या नोव्हेंबरांत बाजीराव उत्तर हिंदुस्थानांत गेले होते. अर्थात् ठाण्यास जनरल येउन बसल्याचें साल १७३५ हेंच ठरतें.

४४ मार्च २० स. १७३६ रोजीं शाहूनें आपास कोंकणांत सिद्दीसातावर पाठविलें (म. रा. पा. २८८). चरईनजीक रेवास येथें चिमाजी आपानें १९--४--१७३६ रोजीं सिद्धिसातांचें शिर उडविलें (ब्र. स्वा. च. पा. ६०) पण ही तारीख १५--४--१७३६ अशी म. रा. त दिली आहे. (म. रा. पा. २८९) (चे. ब. खं. ३ लें. ५६८)

४५ स. १७३६ च्या मे महिन्यांत अखेरीस आप्पा कुलाब्याहून पुण्यास परत गेले. (म. रा. पा. २८९) अर्थात् ही भेट मे महिन्यांत किंवा अगोदर झालेली आहे. १७३६ तही हा मनसुभा राहिला.

४६ 'पाठाऱ्या ज्ञातीचे' ह्या शब्दांच्यापुढें बखरींत 'या चातेना' अशीं अक्षरें आहेत; त्यामुळें काहींच अर्थबोध होत नाहीं. हीं अक्षरें 'या पातेना' अशी वाचलीं तर अर्थाची सुसंगति लागते. 'पाठाऱ्या ज्ञातिचे या पातेना व पाचकळशे लोकास' असें हें वाक्य तयार होतें. येथें 'या' ह्याशब्दाचा अर्थ 'याशिवाय, आणीक, आणि,' असा आहे. पूर्वकालीं ह्या अर्थानें हा शब्द भाषेंत रूढ होता. ज्ञानेश्वरी अध्याय ९ ओवी ३१५ मध्यें 'स्वर्ग नरकु या' असा शब्द प्रयोग आहे; त्या ठिकाणीं 'या' ह्याशब्दाचा अर्थ 'आणि' असाच आहे.

रयतेचि घरें माणसे कागदि लिहिलि देवळि जमा होणे म्हनुन हुकुम केला त्याजवर मुलकात खळाळा पडला कीतेक गंगाजि नाईकास सांगावयास कल्याणास गेले मग गंगाजि नाईक नारायण जोशि याजवळ जाउन वाजिरायाचे नावें दटाउन कागद लिहिला फिरंगियास पाठविला त्याजवर कागद गंगाजि नाईकाने बाजिरा-यास फिरंगीयाचि हकि(क)त लिहिलि त्याजवरुन रायाचें पत्र फिरगीयास दुसरे मागाहून आले मग फिरंगी व पाद्रि जमा होउन विचार केला जर ठाण्याचा कोट पुरा होइल मग हा प्रयोग करु आधि कोटावर लगट करुन कोटास काम चालु केले जराल येउन ठाण्यास बैसेला[४३] काम लाविले मग दुसरे सालि राव हिंदुस्थानावर गेले व चिमणाजिआपा साताऱ्यास होते तव सिदि सात जंजिऱ्याहून चेउल सुभ्यात रेवसाचे बंदरि उतरले तों मानाजि आगऱ्यास न आटापत मग चिमणाजि आपास जासूदजोडि पाटविलि आपासाहेब साताऱ्याहुन तीन दिवसात धाउन येउन सिधि समुद्रांत[४४] बुडविले आपा कुलाब्यास[४५] गेले तेथे अंताजि रघुनाथ व गंगाजि नाईक आपले साहित्यासि गेले तेहि वर्षी फिरगाणाचे काम राहिले ठाणियास कोट बाधा-यास लगट फार केला ते समई साष्टिचे पाठाऱ्या ज्ञातिचे या चातेना[४६] व पाचकलशे

४३ बाजीराव १७३५च्या जानेवारी ते एप्रील पर्यंत कुलाब्यास होते (म.री.पा.२८८).

स. १७३५ च्या शेवटीं चिमाजीआपा साताऱ्यास होते. ह्या 'दुसरे सालीं' म्हणजे १७३६ च्या नोव्हेंबरांत बाजीराव उत्तर हिंदुस्थानांत गेले होते. अर्थात् ठाण्यास जनरल येउन बसल्याचें साल १७३५ हेंच ठरतें.

४४ मार्च २० स. १७३६ रोजीं शाहूनें आपास कोंकणांत सिद्दीसातावर पाठविलें (म. री. पा. २८८). चरईनजीक रेवास येथें चिमाजी आपानें १९--४--१७३६ रोजीं सिद्धिसातांचें शिर उडविलें (ब्र. स्वा. च. पा. ६०) पण ही तारीख १५--४--१७३६ अशी म. री. त दिली आहे. (म. री पा. २८९) (चे. ब. खं. ३ लें. ५६८)

४५ स. १७३६ च्या मे महिन्यांत अखेरीस आप्पा कुलाब्याहून पुण्यास परत गेले. (म. री. पा. २८९) अर्थात् ही भेट मे महिन्यांत किंवा अगोदर झालेली आहे. १७३६ तही हा मनसुभा राहिला.

४६ 'पाठाऱ्या ज्ञातीचे' ह्या शब्दांच्यापुढें बखरींत 'या चातेना' अशीं अक्षरें आहेत; त्यामुळें काहींच अर्थबोध होत नाहीं. हीं अक्षरें 'या पातेना' अशी वाचलीं तर अर्थाची सुसंगति लागते. 'पाठाऱ्या ज्ञातिचे या पातेना व पाचकळशे लोकास' असें हें वाक्य तयार होतें. येथें 'या' ह्याशब्दाचा अर्थ 'याशिवाय, आणीक, आणि,' असा आहे. पूर्वकालीं ह्या अर्थानें हा शब्द भाषेंत रूढ होता. ज्ञानेश्वरी अध्याय ९ ओवी ३१५ मध्यें 'स्वर्ग नरकु या' असा शब्द प्रयोग आहे; त्या ठिकाणीं 'या' ह्याशब्दाचा अर्थ 'आणि' असाच आहे.

लोकास बिगार लाविली त्या लोकाहि बहुत उपाय केला जे हे नवि कानु तु आम्हावर घालितोस मग जरालाने जाब केला कि ठाण्याचा कोट होईतो परयंत

'महमदअल्ली व ते एकत्र आहेत या अलाहिदा आहेत' का. स. ऐ. पत्रें वगैरे (३१) पत्र ४५७ ह्या वाक्यांतील 'या' शब्दाचा अर्थ 'ह्याठिकाणीं' 'अथवा' असा आहे. एकंदरींत हें सिद्ध होते कीं 'या' हा शब्द त्याकाळीं आणि, अथवा, शिवाय इत्यादी अर्थानें अनेक ठिकाणीं वापरला जाई. 'पाठाऱ्या ज्ञातीचे लोकांस, पातेना लोकांस, व पाचकळशे लोकांस' असा त्या वाक्याचा अर्थ होतो. 'पातेनां' म्हणजे पाताणे प्रभू होत. हा पातेना-पातेणा-शब्द त्यावेळीं पाताणे ह्या शब्दाबद्दल योजला जात असे. पेशव्याचे दप्तर रुमाल १६ मध्यें ९८ नंबरचें एक पत्र आहे; त्यांत 'दादाजी प्रभु वसईकर पातेणा प्रभु' असें एक वाक्य आहे. 'पाठारे ज्ञातीचा' 'पाठारे ज्ञात' अशा शब्दसमुच्चयानें 'पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा' उल्लेख सदरहू बखरींत सर्वत्र केलेला आहे. मध्यंतरी कांहीं कालपर्यंत 'पाचकळशी' हा शब्द पाठारे क्षत्रिय ज्ञातीला लावलेला आपणास आढळतो त्यामुळें पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या कांहीं सज्जनांना असा भ्रम उत्पन्न झाला आहे कीं 'पांचकळशी' हेंच नांव सहरहूं ज्ञातीचें होय. हा वाद तूर्त बाजूस ठेवला तरी सदरहू भ्रमामुळें 'पाठाऱ्या ज्ञातीचे' व 'पाचकळसे' असें दोन निरनिराळे नांवदर्शक उल्लेख एकाच ज्ञातीबद्दल येथें कां आले आहेत असा प्रश्न कांहीं जणाना उत्पन्न होण्याचा संभव आहे. पण वस्तुस्थिति तशी नाहीं हे येथें दाखविणें जरूर आहे. कोणताही लेखक एकाच जातीबद्दल एकाच वाक्यांत दोन निरनिराळीं नावें लिहील हें संभवतच नाहीं. एकाच वाक्यांत हे दोन निरनिराळे शब्दसमुच्चय आलेले आहेत ह्यावरूनच असें सिद्ध होते कीं हे शब्द समानार्थक नसून दोन निरनिराळ्या वस्तूच दर्शवित आहेत. बखरकार 'पाठारे क्षत्रिय जातीला' "पाठारेज्ञात' असेंच सर्वत्र संबोधतो; पाचकळसें हा शब्द फक्त येथेंच आला आहे. पेशव्याचे जे कागदपत्र व सनदा वगैरे उपलब्ध आहेत त्यासर्वांत 'ज्ञात पाठारे' असाच उल्लेख 'पा. क्ष. ज्ञातींबद्दल केलेला आहे. 'साष्टिचे क्षत्रि देसाई पैकिं' असा एक उल्लेख बखरींत आढळतो. पण 'पाठारे क्षत्रिय' ज्ञातीबद्दल 'पाचकळशे' असा निराळा उल्लेख बखरींत कोठेंहीं आढळत नाहीं. 'पाठारे ज्ञात' व 'साष्टिचे क्षत्रि' हे दोन शब्दसमूह एकत्र पाहिले म्हणजे 'पाठारे क्षत्रिय ज्ञात' हेंच ह्या ज्ञातीचें नांव होय असें कोणासही थोड्याशा विचारांतीं पटेल. अशा स्थितींत 'पाचकळशे लोकास' ह्या शब्दांची संगति येथें कशी जुळवावयाची हें एक कोडें पडतें. थोड्याशा विचारांतीं हें कोडें सहज सुटतें. 'पाचकळशी' हा शब्द खरोखर अमक्या एकाच ज्ञातीचें नांव नव्हे. बिंबराजाबरोबर ज्या ज्ञाति येथें आल्या त्यांत क्षत्रिय वर्णाच्या काहीं ज्ञाति होत्या. 'पाताणे प्रभु, पाठारे क्षत्रिय' हीं नावें ह्या क्षत्रिय ज्ञातींचीं होत. पाताणे प्रभू ही ज्ञात लेखक

म्हणून बिंबाबरोबर आली असें इतिहासकार म्हणतात काहीं ज्ञाति क्षत्रियत्वाची खूण म्हणून त्यावेळीं सिंहासनास म्हणा किंवा लग्नकार्याच्यावेळीं म्हणा पांच कलश उपयोगांत आणीत. अर्थात् ' पाचकळशें ' हें नामाभिधान क्षत्रित्वाची खूण म्हणून त्यावेळीं उपयोगांत आणलें गेलें असावे. काहीं क्षत्रिय ज्ञाति त्यावेळीं आपणास हें नामाभिमान लावून घेण्यांत मोठा अभिमान बाळगीत. बिंबराजाचें आधीं जे क्षत्रिय येथें होते ते सुद्धां हें विरुद आपल्या ज्ञातीस लावित असत असें दिसतें. पण बिंबराजाचे वेळीं आलेल्या क्षत्रियांनीं जेते म्हणून त्यांचें विरुद आपल्या नांवापुढें लावलेले असावे. व त्यामुळें ' चौकळशी व पांचकळशी ' हे दोन शब्द उत्पन्न झाले. ज्यांचा एका कळशाचा हक्क नाहींसा झाला ते चौकळशी असा ह्याचा अर्थ होतो परंतु दोन्ही ज्ञाति क्षत्रियच होत [म. चा. उ.] ह्यावरून आपणास असें दिसून येतें कीं ' क्षत्रियत्वाच्या ' अभिमानाचे म्हणून वापरले जाणारे हें पद अमुक एका विशिष्ट ज्ञातीचें नांव नव्हे. काहीं क्षत्रिय ज्ञातींचे हें क्षत्रियत्वदर्शक बहुमानाचें पद होय. पण पाठारे क्षत्रिय ज्ञातीकडे जेतेपणाचा मान आल्यामुळें त्यानीं हें पद दुसऱ्या क्षत्रिय ज्ञातीकडून जणूं काढून घेऊन आपल्या ज्ञातीस लावलें असावें. पुढें फिरंग्याच्या उत्तरकालीं ह्या शब्दाचा सरांस उपयोग होऊं लागला व हा ' पाचकळशे ' शब्द क्षत्रियत्वाचे श्रेष्ठत्वदर्शक होता तो काहीं कालानें ज्ञातिवाचक झाला असें दिसतें. पाठारे क्षत्रिय लोक आपणास जसे पांचकळशे म्हणवूं लागले तसेच दुसरे क्षत्रियही आपणास पाचकळशेच म्हणवूं लागले. हल्लीं पाठारे क्षत्रिय ज्ञातिशिवाय इतर ज्ञातीचे लोकही आपणास पाचकळशे म्हणवितात. काहीं ख्रिश्चन लोकही हल्लीं आपणास पांचकळशी ख्रिश्चन म्हणवितात ह्या विवेचनावरून हे आपणास दिसून येते कीं नखरींतला ' पाचकळशे ' हा शब्द त्यावेळीं ' पाठारे क्षत्रिय ज्ञाती ' बद्दल योजलेला नसून त्या शब्दांत त्या वेळच्या 'पाचकळशे' हा हुद्दा मिरविणाऱ्या सर्व क्षत्रिय ज्ञातींचा समावेश करण्याचा लेखकाचा उद्देश दिसून येतो.

४७ " This delay caused great discontent to the people of that town, (Thana) besides which those employed in its erections, were unpaid & unfed. The latter were at last driven to such desperation that they invited the Maharattas to take possession of the Island of salsette, preferring the rule of those barbarians (?) to their present persecutions & oppressions." [Donvers's The Portuguese in India Vo. II Page 402] ह्याच ग्रंथांत पुढें नवीन कायद्याबद्दल डानव्हर्स लिहितो. His (लुई

पुण्यास गेले श्रावणमासि बाजिरायास व चिमाजि आपांस हकीकत सांगितली की फिरंगीयाणे ठाण्याचे कोटावर लगट केला आहे यंदाचे वर्षाने कोट पुरा करिल मग तुमचे मसलतीचा कारभार राहिल यंदा तुम्हि मसलत करता तर करावि सालमजकुरि तुम्हास न फावेल तर मजला निरोप द्यावा या मनसुब्यानें माझे बरच जालें आता मजला दोहोतिल येक जाब द्यावा म्हणोन स्पष्ट जाब केला ! ! तीन महिने हजामत करविलि नाहि बाजिराव दिलिकडे गेले फिरगाणचि मसलत आपांस सांगितली आपाहि आपले सरदार व माडळिक (मांडलीक) विचाराचे लोक बापुजि श्रीपत व वासुदेव जोशि व मोरसेट व

बोतेलोचा) first project was to construct a fleet of small vessels for the defence of that coast against the depredations & insults of the Angria...To this end he demanded a heavy tribute from those same fishermen in order to provide the necessary funds. This demand was however, considered an act of great injustice by the the fishermen and the collection of the tax had, in many cases, to be carried out by means of force." [Page 41, Vol. II]

४८. स. १७३६ च्या जून ते जुलै १२ पर्यंत बाजीराव कोंकणांत होते. (का. स. श. पृ. ६) १७३६ च्या नोव्हेंबरांत बाजीराव नर्मदा उतरून पार गेले होते (ब्र. स्वा. च. ले. ४६) स. १७३७ च्या जानेआरी १६ ला चिमणाजी आपाचा मुक्काम अलेगांव पाटस येथें होता. १७३६ च्या नोव्हेंबरांत बाजीरावानीं हें काम आपाकडे सोंपवून आपण गेले होते. अर्थात् हा श्रावण महिना म्हणजे स. १७३६ च्या आगष्ट महिना होय. त्यावेळीं १७३७ च्या चैत्रमासीं मोहीम करण्याचें ठरवून १७३६ च्या नोव्हेंबरांत गंगाजीनाईक पुण्याहून आलें असें दिसतें. ह्यावेळीं १७३७ त पोर्तुगीजांनीं मानाजी आंग्रेंच्या वतीनें कुलाब्यावर स्वारी केली (ब्र. स्वा. च. ७२) त्यामुळें ही १७३७ त वसईच्या स्वारीची मोहीम कायम करण्यांत आली. कल्याणास आल्यावर गंगाजीनें भवानीचा गोंधळ घालून त्या निमित्तानें आपलें साह्यकारी एकत्र मेळविलें. हा गोंधळ आपानें पुण्यास घातला. व तेथें शंकराजीपंत वगैरे सरदारांना कामें वाटून दिली असें रीयासतकार म्हणतात. पण ती चूक होय. कारण पुण्यास सरदारांना जमा करण्याकरितां गोंधळ घालण्याचें कांहींच कारण नव्हतें. गंगाजीचे साह्यक इकडे फिरंग्याचे राज्यांत असल्यामुळें त्याना एकत्र करण्यास असें काहीं तरी दिखाऊ कारण हवें होतें. म्हणून हा गोंधळ गंगाजीनें कल्याणास घातला हें बखरकारांचेंच म्हणणें सयुक्तिक दिसतें,

शंकराजीपंत व रामचंद्रपंत व चिमणाजि भिवराव व मोराजि बनकर व करनाजि शिंदे व खंडोजि मानकरि व होनाजि बळकवडे व मोकाशि राजपुरकर हे सारे मेळउन चिमणाजि आपा त्यास बोलिले की आता फिरगाणचे मसलतिचि योजना करावि मग सर्व मिळोन गंगाजि नाईकाचे विचारे चैत्रमासि मुईम करावि असा ठराव करून शंकराजिपंतास साहित्य करावयास सांगितले गंगाजिनाईकास कल्याणास धाडिलें गंगाजिनाईकाने कल्याणास येउन भवानीचा गोंधळ धालु आरंभिला त्या गोधळाचे नावें साष्टिचे लोक नामाजि देशमुख व भिकाजि हैबतराव व मालजि जित व हिराजि ठाकूर व मुऱ्हाराजि ठाकूर व बापुजि गोरेगांवकर व जसवंतजि दहिसरकर व लक्षुमणजि राऊत कळवेकर व हासा कोळी वैगरे कोळी व गणेशजि व रघुजि वसइकर व लखम चौधरि व खंडोजि लोढ्या वैगरे लोक कार्याचे समंधिं तमाम बोलाविले गोंधळ समाप्त जाला मग सर्वांस गंगाजि नाईकानें कामे सांगोन जेथेचे तेथे ठिक कामावर ठेविले तव बाजिराव बेलोसे व उदाजि पाटिल उतेकर मांगे कल्याण पाहावयास आले। त्याचि निशा करून धाडिले गंगाजि नाईक घाटींवर पुणियास गेले मसलत नेमिलि मसलतिस दिवस चैत्रशुद्ध षष्टि उपरांत सप्तमि नेमिलि व सरदार शंकराजिपंत व मोराजि सिंदे व बाळाजि चंद्रराव व येशवंतराव व बाजिराव बेलोसे वैगरे मोकाशि लोक व बाजे लोक पाइचे व खंडोबा प्रभु येकून दोन हजार माणूस पाइचे यास सरदार शंकराजिपंत पाटिवर फौज चिमणाजि भिवराव व बखाजि पाटिल ताकपिर व नारोजि कडु व माहादाजि केशव हे फो (ज) सुद्धां पाठिवर नेमिले पुढे फौज नेयास बिनिस गंगाजि नाईक व शिवजि नाईक व कासिबा हिदुराव व वाटेचे लोक व बाजे लोक हे वसईकडिल नेमणुक केलि व साष्टिची नेमणूक सरदार खंडोजि मानकर व होनाजी बळकवडे व रामाजीपंत पायगडकर पाठिवर वासुदेव जोसि व रामचंद्रपंत व नारायणजि शिव पाटिल फौजसुद्धा खुद आपासाहेब व पुढे फौज चालावायास बिनिस बुगाजि नाईक व मुऱ्हाराजि नाईक व नारायणजि नाईक व कृष्णाजि नाईक व बाजे लोक फकीर महमद जमादार व चागनाक परवारि नेमले साष्टिकडिल फौज राजमाचिखालि दव्यास ज(मा)व जाला वसईकडिल फौज माहोलिखालिं दव्यास जमा(व) व्हावे ऐसा निर्धार करून गंगाजि नाईक कल्याणास आले नेमिले दिवसि कृष्णाजि

---

४९. भवानीचा गोंधळ संपवून गंगाजी नाईक पुन्हां पुण्यास गेले. १७३७ च्या चैत्र महिन्याची सप्तमी ठरविली. पुण्याहून येणाऱ्या सरदारांचीं कामें वगैरे ठरवून गंगाजी नाईक परत आले, हे १७३७ च्या फेब्रुआरीमध्यें घडलें असें दिसतें.

नाईक राजमाचिखालि फौज आणावयास पुढे पाठविला व शिवजि नाईकास माहुलिखालिं फौजेसमोर हेर पाठविला तेव्हड्यात खबर वसइकडून आलि की राजावळि व गोखरवे व आंचोळे व कोहिइ चिंचोटि हे गांवें[५०] येके रात्रिने कोण्हि येउन मारले म्हणून राजावळिच्या ताब्यावर चौकि फिरंग्याचि बैसलि म्हउन (म्हणून) ताबडतोब बातमि गंगाजिनाईकाकडे कल्याणास आलि गंगाजि-नाईकाने बातमीचा कागद माहुलीस शंकराजिपंताकडेस धाडिला नेमणुकिप्रमाणे फौजा आल्या गंगाजि नाईकाने आपले भावास बुगाजि नाईकास व मुऱ्हारजि नाईकास व नारायणजि नायकास व फकीर महमद जमातदार व धागनाक परवारि व बाजे लोक मनुष्य दीडशे व कोळि घेऊन बावामलंगाचे वाडास (वाडीस) मोहरे रवाना केले व गंगाजि नाईक व लोक व खंडोजि लोबर व खंडोजि गायकवाड व पोसजि कुवर व माहदजि तैलंगे व राघनाक परवारि हे लोक घेउन गंगाजि नाईक घोटवड्याखालि कोसिंबड्यावर गेले तव सिवजि नाईक व कासिबा हिंदुराव फौज घेऊन आले तैसिच फौज गउळवाविवर (?) (द) वा दिधला तेथें बातमि आलि की चौकीस माणुस बाविस होते तेथुन कुच करून तुंगारचे रानात बाग टाकिवर दबा दिधला तेथिलचि बातमि चौधरि व माहदजि आबेमोडा बातमि घेऊन आला मग त्यास माघारे गलबताकारणे पाठविले त्याहिं गणे(श)जिस सांगितले जर फौजा आल्या परंतु गलबते आणविलि असे (नसे?) इकडे तेच दिवसि वासुदेब जोशि व नारायण जोशि व रामचंद्र हरि व रामाजि माहादेब व खंडोजि मानकर व बाजे लोक मनुष्य नउसे पावेतो बाबामलंगा-खालि पल्यास आले बाजे लोक पाठिवर होनाजि बळकवडा मार्गे परबळा (प्रबळा) खाले राहिले पल्याच्या थाग्यास नउसे मनुष्य आले अंताजि रघुनाथ व सर्वाहि विचार केला की आजचा दिवस येथें मुकाम करावा या(स) सर्वाहि समत दिधलें बुगाजि नाईक समत राहावयाचे देत नाहि व बुगाजि नाईकाने आण घातली की मी आपले आइवर नाडा सोडिन तर आज येथें राहिन आज शंकराजि केशव व गंगाजि नाईक वसरवर (वसईवर) चढतील मग उद्या येथें इलाज राहिला म्हणउन उडी घेउन चालला पाठिवर रामाजि माहादेव खासमतदाराचा भार व आनंदराव येरुळकर व उदाजि कोन्होजि व सुभानजि केशरकर हे सरदार उडिने चालले वासुदेव जोशि व नारायण जोशि व रामचंद्र हरि व खंडोजि मानकर मागेपुढे फौज सावरित चालिले तेच दिवसि कर्नाळकर किलेदार पिरजादा त्याणे जरालास पत्रें लिहून बातमि धाडिलि की आज गलीम

५०, ही हकिकत १७३७ च्या मार्चमध्यें घडलेली दिसते.

तुम्हावर आला पुढे करणे देवास त्या फिरंगीयास भूल पडलि बातम्या अमान्य केल्या फौज मोहरे मुन्हारजि नाईक व बुगाजि नाईक व नारायणजि नाईक व कृष्णाजि नाईक व फकीर महमद जमातदार व चागनाक परवारि आपले लोकानशि चालले राव (रव) बाळखिडि (शिळखिंडी) आले (आलि) तव लक्षुमणजि राउत व हांसा कोळि व चाह्या कोळि समोर भेटले फौज कंळव्यावर घटका येक स्छिरावलि मग खारिचे बुरुजासमोर गेले त्या बुरुजकऱ्यास गंगाजि नाईकाने जाव देनु जारा हाति पाच रुपयाचे कैफसरा खावविला होता तेणेकरून बुरुजकरि धुंध होते तेव्हां आत फौज आलि अर्ध खाडित पावले तेव्हां हटकिलें मोहरे मुन्हारजि नाईक होते त्याणे त्या पाहारेकऱ्यास दाबले त्यास पळ सुटला कपतानाने दोन च्यार तोफा डागल्या दारुचे बरेळ उडाले तोहि उडाला तव फौज उतरलि पाणबुरुज घेतला मुन्हा(र)जि नाईक फौज घेउन माझिवडयावर गेले बुगाजि नाईकाने पाणबुरुजाचि बंदोबस्ति केलि मग फौजेत सामिल जाला मग रामचंद्र हरि व खंडोजि मानकरि (मानकर) व रामाजि माहादेव व बाजे लोक सुमार मनुष्य च्यारशे बुगाजि नाईक च्यारि भाव बाजे लोक मिळोन पन्नास येकून सारि फौज घोणसाळियावर जमा जालि ठाणे शाहार फुटलें लोक रानभर जाले फिरंग्याचा भार फुटला दोळुईस जराल व बाजे फिरंगी पाद्रि बैसून विचार करु लागले तेव्हां आपासाहेबिं बदलापुरचे मुकामि ठाण्याच्या तोफा आईकिल्या तेव्हांच जिनबंदि करविलि गंगाजि नाईकाचा परवारि गणनाक तेथे फौज न्यावयास ठेविला होता त्यास पुढे घालुन दिवट्या लाउन निघाले दिवस उगवतां कळव्यावर आले तेव्हां लक्षुमण राउत मोहरे जाउन हकिकत सांगितलि जे आपले लोक पलाड गेले तो बुरुज फत्य जाला तेच आपासाहेबिं फत्तेबुरुज ऐसे नाव ठेविले आपासाहेबिं पायउतारा घेउन आपल्या हातें पेंढा चिखलावर घालून लगट करुन घोडाचे जेरबंद तोडणे फौज पलाड घातलि फिरंगी निघोन बतेल्यावर चढोन गेला शे (शके) १६५९ पिंगलनाम संवत्सरे माहे चैत्र शु॥ ७ रविवारि ते दिवसि साष्टिस पै वस्ति जाली लस्कर ठाणियांत गेले इकडे वसईकडे कामणचे डोंगरांत वाघ टाक्यावर दबा (दिधला) तेथे शंकराजिपंत व गंगाजि नाईक व मोराजि सिंदे पैसोन विचार केला कीं गलबत नये तर काय करावें गंगाजि नाईक बोलिला आपण आताच कंबरा बांधून

---

५१. २७ मार्च १७३७ मध्ये ठाण्याचा किल्ला व शहर काबिज करण्यांत आलें. [म. री. ३२७ पा.] ब्रम्हेंद्रस्वामींना चिमणाजी आपानें ठाण्याहून ३१ मार्च १७३७ रोजीं पत्र पाठविलें आहे. त्यांत ठाणें जिंकण्याचें व वानरें, वेसावे, बेलापूर ही ठिकाणें मजबूद असल्याचें वृत्त लिहिलें आहे. (ब्र. स्वा. ले. ४७)

हळुहळु रान टाकावें सारीच फौज घेउन राजावळीवर जाउ गलबत आले तर त्या-सारखा विचार करु नाहि तर ताऱ्यावर जाउन मोहरे आपले लागे आहेतच चौकि-दार हटकितिल तर त्यास सांगो जे आम्हि राजावळीचि रयत इकडे चोर आले आहेत म्हणोन आम्हि पळोन आंत येतों ते गावचि खाणखुण पुसतिल तर आम्हि सांगो राजावळी(चा) माहादजि आवेमोडा आपले जवळ आहे राजावळीचे लहानथोर तो सांगेल अथवा चौकिदार सांपडले ते धरुन मारु आणि त्याच लग-टासिं कोटावर जाउ बोब न जाइ तितक्यात आपण कोटाजवळ पावलो म्हणजे काम जाले या विचारास येशवंतराव येरुडकर व बाजीराव बेलोसे व विठोजि डोकळे हे बोलिले जर काम आटोक्याखालिं आहे म्हणउन विचार करुन कंबरबस्ति केलि शिडया बांधोन दिधल्या आणि चालिले मोहरे लागे सिवजि नाईक चालिले पाठिवर मोराजि शिंदे व मोकाशि लोक मधि शंकराजिपंत फौज सावरित गंगाजि नाईक पुढें मार्ग दाखवित चालले कांकड दाहाडाचे पाणि चालता घेउन काढोळखिंडिस गणेशजि व कुक चौधरी व माहदजि हे उमेळचे बंदरिं तारु मुडे पंधराचें लाउन काढोळिखिंडिस मोहरे आले रवेस भेटले मोराजि शिंदे व शिवजि नाईक व यशवंतराव व बाजिराव व गंगाजि नाईक हे सारे मिळोन रव तसिच बैसउन शंकराजिपंताजवळ आले सर्वाहि विचार करून सवासे माणुस खासे निवडुन सरदार व शिवजि नाईक व मोराजि सिंदे व येशवंतराव व बाजिराव व बाजे लोक व माहादाजिपंत येकुन सवासे माणसे निवडुन गलबतावर गेले त्यास सांगितले तुम्ही पलाड उतरु (न) मागिलेकडे येउन चौकीचे लोक धरावे मारावे येक जाउ देउ नये हें सांगोन रवाना केले वरकड सारि फौज राजावळिखालि बैसलि गंगाजि नाईक व गुणाजि सिंदें व पंचविस मनुष्य जाउन खाडिचेकडेस बैसले मोराजि सींदे व शिवजि नाईक व सारे लोक सवासे मनुष्य गलबताजवळ गेले तो खाडीत तराफे लांकडाचे दोन जातात त्यादेखत तारवावर चढतां नये म्हणोन च्यार घटका लोक चिखलातच बसले तों तराफे खालि गेले मग लोक तारवावरून दो खेपाने पलाड उतरले तो चंद्र अस्तास गेला मग ते लोक उमेळयाखालुन व माणिकपुऱ्याखालून चवकीवर गेले चवकीचे लो (क) बाविस माणूस धरून मारले तव खाडिस भरति आली फौज कडेस आलि तंव तारा बुडला उतार मोडला लोक आलिकडील आलीकडेच राहिले व पलीकडिल पलिकडेच राहिले गणेशजि सुतार खाडि पाहुन गंगाजि नाईकाजवळ आला तराफे बांधोन लोक उतरायास लागले गंगाजि नाईक दीडसे माणूस घेउन पलाड गेले आतुन दादरावर जाउन पोचले तों दादरकरि पळाले दादर मोकळा जाहला तेवड्यात बखाजि ताक-पिर कल्याणचा सुभा व चिमणाजि भीवराव आपले फौजेसुद्धा आले मा(हा)दाजि केशव

आले मग शंकराजिपंत व राउत पाईचि फौज माणिकपुऱ्यावर जमा जाले गंगाजि नाईक बोलिले जर दादराचि बळकटि करून तळ पापडिवर धावा (द्यावा) त्याज-वर राणोजि कडव बोलिले जर मागा गलाठा फार जाला आहे बाजारबुणगा येउ द्यावा येथे लोकाचे जेवणाचे करु द्यावे मग पुढे जाउ हा साऱ्याचा विचार जाला तव दिवस पाहार येक आला मग जेवायाचे करु लागले तेव्हड्यात वसईचे कोटाचा कप-तान व सोलदाद सिपाई व भंडारि येकून माणूस तीनसे मिळोन पापडिवर आले ते माणिकपुऱ्याहुन देखिले गंगाजि नाईक बोलि (ला) की हा जमाव मैदानात येउ द्यावा यास आपण देखावा दाखउ नये आगरातुन रव बाहेर आलि म्हणजे चढे घोड्यानिशि कोटापावेतो जाउ हि गोष्ट सर्वांस मानलि तव फिरंगी मिठआगरा-खालता उतरला तव फौजा उठावल्या तव फौजेचा ढिग देखोन फिरंगि मागाच पळोन गेला फौज मागें फिरलि थोडिशि फौज व गंगाजि नाईक पापडिवर गेले मागून लोकानि पापडिवरिल लुट घेउन माणिकपुऱ्यावर चालिले रावताचि भरड पडलि पाईचे लोक मागा चालिले पुरियास संकराजिपंताने लोक जेवणावरून उठविले कंबरबस्त करून पापडिवर जावे तो राउताचि फौज फिरोन माणिकपुरियास गेलि मग ते राहिले गंगाजि नाईकहि मागुन पुरियास गेले ते दिवशिं मुकाम पुरियावर जाला लोक प्रहर रात्रिस अन्नास मिळाले चिमणाजि भिवराव व राणोजि देशमुख व बरवाजि पाटिल फौज व शंकराजिपंत व मोरोजि शिंदे व गंगाजि नाईक रात्रिच जाउन बाहादुरपुरा मागां टाकून कोटाखालि गोळीचे टप्पावर मोरचे देउन निशाणे राउत (रोउन ?) बैसले कोटाखालिं आसपास रयतेने गडग्याचा कोट करून तोडिं बरकंदाज ठेउन राहिले मग गंगाजि नाईकाने रयतेस कौउल पाठविला आणि फिरंग्याने धाडा (?) दिधला रयत व मोठे लोक येउ लागले इकडेस हे वर्तलें तव साष्टिस आपासाहेब उतरले वाद्ऱ्यास व वेसाऱ्यास फौजा पाठवायास बुगाजि नाईक मागत होता मागिल पुढिल लोक जमा जाले दिवस तीन भरले वाद्ऱ्या वेसाबियास लोक मराठे विजिस गेले होते ते लोक गंगाजि नाईकाचे लागाचे होते जर रविवारि फौज पोहचलि म्हणजे फिरंग्याचि माणसे पाच सात होतिं ति दस्त करुन किल्लयावर निशाण द्यावे तो लाग राहिला फिरंगी याणे ते लोक बाहेर घातलेत णे-(ने) तोजि देसाई व बापुजी गोरगावकर व मालजि ठाकुर व मुऱ्हारजि ठाकुर मालाड-कर व हरजि ठाकूर बाजे लोक मराठे रखवालिस होते ते फिरंग्यानें बाहेर घातले ते ठाणियास बुगाजि नाईकाजवळ गेले बंडजि देसाई व मालजि बापभुइकर व जस-वंतजि व भिकाजि हैबतराव हे वेसाऱ्यास मढावर गेले परंतु साध्य जाले नाहि नारायण जोशि जाउन परिसिक घेतलें व बेलापुरास मोरचे लाविले नारायणजि नाईक व गोपाळ व बळोख (महादेव ?) व मनुप्य सातसें धाराविस जाउन

बैसले हे साष्टिंत वर्तले वसईस बखाजि पाटिल जाउन जीवधन घेतले व माडविस मोरचे लाविले चिमणाजि भिवराव व संकराजिपंत व गंगाजि नाईक याहि वसईला मोरचे लाविले मोराजि शिंदे व बाळाजिराव व येशवंतराव व शिवाजि नाईक मोरच्यास राहिले शंकराजिपंत व चिमणाजि भिवराव व गंगाजि नाईक हे बसोन विच्यार केला जर अरनाळयाचा विचार पाहावा गंगाजि नाईकानें कौल लिहून गोविंदजी कासाराबराबर अरनाळेयास पाठविला तेव्हां बोलिला जर मुसलमान आपलिं तेविस गलबते घेउन बाळज्यास (बोळंज्यास) आले तेथे खंड पाटिल ठेविले होते त्याहि लेहून पाठविले जे गलबते तेविस बोळंज्यास (आलि) आपले प्रस्तान आज (करावे) संकराजिपंताहिं गंगाजि नाई (क) व बाजिराव बेलोसे रायाजि सुरवें व बाजे लोक च्यारसे अरनाळचे लागावर रवाना केले आगाशिस फौज गेलि तंव गलबते बोळज्यास सुखियावर लागलि तो दिवस मुकाम जाला मग गंगाजि नाईक व बाजिराव बेलोसे मिळोन खंड पाटिल शंकराजिपंताजवळ पाठविले तेव्हां शंकराजिपंत आगाशिस गेले सारे लोकाचा दिलासा करून व गलबतवाल्याचा दिलासाय करून ग (ल) बतामध्ये बसून रात्रिस अरनाळयाचे बंदरि गेले बंदरात फौज उतरलि तेव्हां रयत आगरचि त्याचे भेटिस आलि तीस कौल दिधला व कपतानासहि कौल घेतला गंगाजि नाईकाने तो कपतान व त्याचि माणसे व रयतहि तारवावर चढउन आलाड उतरवलि सारे पापडिवर आले मग बैसोन विचार करुन बाजिराव व च्यार (च्यारसे) माणसे अरनाळयास ठेविलि इकडे रयत तमाम आलि माडवी व तादुळवाडि व टकमक व वेसावा व काळदुर्ग व मनोर व बेलापुर इतकि ठिकाणे सारि पहिले वर्षि साष्टिचे बराबर आलि तव पाउसकाळ आला संकराजिपंत व मोराजि सिंदें व गंगाजि नाईक वसईस ठेविले व खंडोजि मानकर व रामाजिपंत व बुगाजि नाईक ठाणियास ठेउन व नारायण जोशि बेलापुरास ठेउन व विठ्ठलपंतास मनोहरास ठेविले आपासाहेब पुणियास गेले जागोजाग इमारति मेढे यास काम लाविलें शंकराजिपंत व गंगाजि नाईक व मोराजि सिंदें व येशवंतराव व बाजिराव व कर्णाजि सिंदे व सारे लोक बैसोन विचार केला की वसईस हला करावा आषाढाचे महिन्यांत[52] वसईस वर उत्तरेकडे

---

५२ मार्च १७३७ त सुरू केलेली ही मोहीम १७३७च्या पावसाळ्यापर्यंत चालवून नंतर वसईस मोर्चे भिडवून, इकडे घेतलेल्या सर्व ठिकाणीं बंदोबस्त करून आपासाहेब १७३७ च्या १ जुलैला पुण्यास गेले. (म. री. पा. ३२८) (ब्र. स्वा. च. पा. ७५)

५३ आपासाहेब १७३७ च्या जुलैत पुण्यास गेल्यानंतरच्या आषाढांत गंगाजी नाईकादि इकडील सरदारांनीं वसईवर हल्ला केला. ह्यावेळीं बाजी भीवराव व रामचंद्र हरी इकडे येऊन परत पुण्यास गेले.

कोटावर शिड्या लाउन चढावे तो शिड्या चिखलाचे पायाने चिकट जाल्या उभ्या करायास फावत नाहि मग फिरंग्याने बहुत मार केला गुणाजि सिंदा व खंडोजि बागराव व दादाजि नाईक व भंडारि व भले लोक पडले कितेक जखमि जाले काम साधले नाहि त्याजवर बाजि भिवराव व रामचंद्र हरि पुणियाहुन आले तेव्हां हला केला तेव्हांहि साधला नाहि मग बाजि भिवराव व रामचंद्रपंत पुणियास गेले तो दिलिचे कागद आले किलिंजखान मोगल पातशहाच्या फौजा घेउन दक्षणेवर येत आहे ऐकोन बाजिराव आपलि फौज घेउन सामोरे नरमदा उतरोन माळव्यांत गेले व चीमणाजि आपाने लस्कर व राउत पाइचे लोक नेमणूक (केलि) रामाजि माहादेव ठाण्याहोन (जाउन) धाराविस मेढा घातला तोफा जोडून मारा दरहांत रोखला व शंकराजिपंत व गंगाजि नाईक व कर्णाजि सिंदे व मोराजि सिंदे व खंडोजि मानकर व माहादजि केशव बैसोन विचार केला जर आपण केलल्या माहिमास मोरचे लावावे माहादजि केशव व कर्णाजि सिंदे व शिवजि नाईक व खंडोबा प्रभु हे माहिमास जाउन मोरचे लाविले व आपासाहेबिं पुणियाहून रामचंद्र हरि जीवाजि (ढ)मढेरें व आपाजि सितोळे व चिमणाजि बापुजि व वाघोजि राणोजिराव खानिवलिकर हे नामजाद कुमक माहिमास पाठविले व वासुदेव जोसि व रघुनाथजि प्रभु हे फौजेसुद्धा रवाना केले ते येउन सिरगांवास मोरचे लाविले तिकडे किलिजखान दिलिचि फौज घेउन आला बाजिरायाने त्याचा मुकबला

---

५४. १७३७ च्या मार्चमध्यें बादशहाचा झीलतलावावर पराभव केल्यामुळें निजामउल्मुलुख बादशाही फौज घेऊन दक्षिणेंत येण्यास निघाला. इ. स. १७३७ च्या आक्टोबरच्या २५ तारखेस बाजीरावानें भोपाळकडे कूच केलें. त्यांचेबरोबर त्यावेळीं आप्पा होते. सांगवी येथून बाजीराव भोपाळकडे गेले व आप्पा खानदेशांतून तारापूर साष्टि येथें आले (ब्र. स्वा. च. ले. १३४)

५५. खांदेरीवर आरमार आणून फिरंग्यांनीं स. १७३७ च्या आक्टोबर माहिन्यांत केळवे माहीम ह्या ठिकाणास शह दिला. (ब्र. स्वा. च. पा. ७५). आप्पांनीं पाठविलेल्या मदतीच्या बळावर गंगाजी नाईकादि मंडळींनीं माहिमास व शिरगावांस मोरचे लाविले. पण शंकराजी केशवानें शत्रूची भीति खाऊन ही मोहीम सोडून दिली. त्यामुळें बाजीरावास फार राग आला. ' फिरंग्यांचें आरमार खांदेरीच्या बाऱ्यावर ही खबर अणजोरकरांनीं शंकराजी केशव यांस लिहिली. त्यावरून त्यानीं सलाबत खाऊन माहीम येथील लोक उठवून माघारे नेले.....' वगैरे शब्दांनीं पेशव्यांनीं शंकराजी केशवास ठपका दिला आहे. सदरहू पत्र बाजीरावांनीं रामचंद्र हरीस लिहिलें आहे. (म. री. म. वि. पा. ३२९. ब्र. स्वा. च. पा. ७६)

घेतला झुंजे[५६] मोठें जालें किलिजखान हतगर्व करून भूपाळगडाखालि वेढला रुपयाचे अनाजें[५७] सेर येक मिळो लागले मोगलाचे कटकात दुकाळ पडला इकडे आपासाहेबिं ठाण्यास फौज पाठविलि [वसईस] व्यकंटराव घोरपडे व संभाजि सिंदे वसईस रवाना करून आपण बऱ्हाणपुरास गेले औरंगेबिजाचि कुमक किलिजखानास जाईल म्हणोन पुढे गेले मग किलीजखान कौलास आला बाजिरांयासिं सला केला मग मुलूक दरोबस्त बाजिराजास देउन मोगल दिलिस गेला बाजिराव मुलूखगीरिस गेले इकडे गोंव्याहून फिरंगी पेद्रु दमेल या नावाचा जराल होउन कुमक घेउन आला अरमार वसईस आले गंगाजि नाईकाने आतुन कोटातिल नाजुक खबर आणलि तव फिरंग्याचि मसलत ठाण्यावर हला करायाचि आहे ते ऐकोन गंगाजि नाईकें ठाणीयास गेले पाणबुरजास लादण्या करविल्या मग धारावीस गेले तेथे रामजिपंतास हि (ह) कीगत सांगितलि जे फिरंगी ठाणेयावर जायाचे

---

५६ छ ३ रमज़ानीं ता. १५ डिसेंबर इ. स. १७३७ गुरुवारीं एक युद्ध झालें. दुसरें युद्ध ७ जानेआरी १७३८ शनिवारीं झालें. नबाब भोपाळगडाचे आश्रयास गेला. (ब्र. स्वा. च. ले. ३६) ह्या पैकीं लेखांक ३२ मध्यें छ ३ रमजानचा तारीख २५ डिसेंबर १७३७ ही दिली आहे. हा फरक कां ?

५७ 'दाणा, गल्ला, घांस, लकडी बंद केली, एक रुपयास एक शेर अन्न झालें. तेंही कोणास प्राप्त कोणास अप्राप्त. मोंगल पठाणांनीं माड्याचे वैल खाल्हे. रजपुतांस तों केवळ उपास पडुं लागले.' (म. री. पा. ४१३) (ब्र. स्वा. च. ले. ३६)

५८ 'औरंगाबादेस सुलतानजी जानोजी वगैरे मोगली फौज दहा बारा हजार जमा आहे. आम्ही लौकरच गंगातीरास येऊं.' आपासाहेबांनीं वरीलप्रमाणें पत्र ब्र. स्वा. स लिहिलें आहे (ब्र. च. ले. १३४). हींच फौज अटकावून धरणेस बाजीराव पेशवे आप्पास खालीलप्रमाणें लिहितातः 'दक्षिणेची फौजेची आशा यास बहुत होती, त्यास तुम्ही तिकडे आहां तुमच्या शहामुळें तेही येऊन पावे ऐसा अर्थ नाहीं' (ब्र. स्वा. च. ले. ३५). 'ते (दक्षिणेची) फौज येऊन सामील झाली तर नबाब भारी होतील, याकरितां फौजास अटकाव होय तें करणें' (म. री. पा. ४१२). 'त्याला आपा, यासमयीं जरी तिकडील तिकडे फौजेस तुमचा शह बसोन आटकली तरी हे फौज बुडवावयास असाधान्य दुसरा येणार नाहीं' (ब्र. स्वा. च. ले. ३३). ह्यावरून हें दिसतें कीं १७३७ च्या दिसेंबराचे मध्यावर आप्पा बऱ्हाणपुरास गेले होते.

५९ ता. ८ जानेआरी १७३८ रोजीं दुराईसराईनजीक तह झाला (म. री. ४१३ पा.) (ब्र. स्वा. च. ले. ३५). बाजीराव पेशवे १७३८ च्या जुलई महिन्यांत पुण्यास आले. (म. री. पा. ४१४)

सामान करित आहे सांगोन गंगाजि नाईक ठाणेयांस आले ठाणे या [या]चा बंदोबस्त नव्हे म्हणोन खंडोजि मानकरासि बोलिचा विरोध पडला तिकडे माहिमचे मोरचे कोटाखालिं भिडले तोफा लागुन कोट ढासळायास लागला खब (र) वसईस पाठविलि मग फिरंग्याने ठाणियाचि मसलत ठेविलि अरमारावर बैसोन माहिमास कुमक गेलि माहिमास मोरचे तिन माहादाजिपंताचा व वर्णाजि (कर्णाजि ?) सिधाचा (सिंद्याचा ?) व खंडोजिचा व माहादाजिपंताचा व वाघोजिराव खानिवलकर याचा मोरचा पश्चिमेस दरियाजवळ भिडला होता त्याजवर फिरंग्याने मोरच्यावर थोडे माणसाने रोखला रामचंद्रपंत व सितोळे व ढमढेरे व राउताहि उचल केलि परंतु कोटाचा मार व रेनोळयाच्या गडद्या आल्या त्याचा मार फार जाला राउताचा ईलाज नाहि रामचंद्र हरिस गोळि लागलि उजवि बाहि मोडलि व आणिक जखमि जाले आणि राउत फिरले मोरच्यावर लगट केला हात गरनाळा व हुके दारुचे नळे व दारुचि मंडकीं टाकून मोरचा अग्निने भरून काढला तेथें माहादाजि केशव व वाघोजिराव खानिवलकर व राजबारा व बुरडकर व बापुजि क्षिरसागर व आणिक लोक मनुष्य तीनसें भले धारकरि व सरदार कामास आले मग तेहि मोरचे दोन्ही उठविले मग फिरंगी सिरगावास गेला सिरगावचा मोरचा उठविला

---

६० ह्या माहीमच्या मोरच्यांचें एक पत्र २४-११-१७३७ चें वासुदेव जोशी व रघुनाथ हरी ह्यांनीं आपास लिहिलेलें उपलब्ध आहे. तें पत्र ब्र. स्वा. चें चरित्रांत पान ७८।८१ वर छापलेलें आहे. त्या पत्रांतली हकिकत बखरींतील हकीकतीशीं अगदीं तंतोतंत जुळते. रामचंद्र हरीच्या हाताची उजवी बाही जखमी होणें; माहादाजि केशव, वाघोजिराव खानविलकर, राजबाराव बुरुडकर यांचा मोरच्यांतला मृत्यु; एकंदर मृत्यु व जखमी यांची बेरीज ३०० ह्या गोष्टी अक्षरशः एकमेकांबरोबर जुळतात. ह्यावेळीं आप्पासाहेब इकडे आले ते पावसाळ्यापर्यंत ह्या प्रान्तीं होते. तरीसुद्धां ह्यावर्षीं मोहीमेस जोर आला नाहीं. सरदेसाईंचें (असे) म्हणणें आहे कीं हें पत्र १३-१२-१७३८ चें आहे. बखरींतल्या मजकूरावरून पाहतां पारसनीसांचें म्हणणें खरें आहे असें दिसून येतें. माहीमावर दोनदां हल्ले झाले. ही गोष्ट सरदेसायांचे ध्यानीं नसल्यामुळें त्यांचा घोंटाळा उडाला आहे. बाजीराव आप्पा ही मंडळी भूपाळगडाच्या लढाईंत गुंतली असतांना झालेला माहीमावरील हा पहिला हल्ला होय व ह्यावेळीं रामचंद्र हरीची बाही मोडली. हा हल्ला १७३७ च्या नोव्हेंबरांतला आहे म्हणून ह्यावेळचें हें पत्र आहे. ह्यावेळीं माहीम काबीज झालें नाहीं सरदेसायांचे ध्यानात दोन हल्ले झाल्याचें न आल्यामुळें ह्या पत्राच्यानंतर माहीम काबीज झालें असें चुकीचे विधान त्यांनीं केलें आहे. माहीम ह्या पत्राचें शेवटीं मिळालें नसून तें स. १७३८ त पुढें मिळालें आहे. ह्यावेळीं सर्वत्र मराठ्यांची पिछेहाटच झालेली आहे.

तारापुरास गेला रवेरा (?) घेऊन अखेरीस चालला मग माहिमाचि फौज व शिरगावचि फौज फिरंगीयाचे मुकाबलिस गेलि झुंज करु पाहातात तो फिरंग्याचा आगीचा मार फार जबळ ठरो देत नाही जुमस खात नाही सभोवताला आरा बांधउन सावरून चालिला राउताचा उपाय नाहिं म्हणोन मराठि फोज होति ति निघालि असेरिस पंताजिपंताचे मोरचे दरवाज्याखालि गेले होते असेरि जेर झालि होति येका महिन्याचे सामान किल्यावर होते तेव्हां फिरंगी पावला पंताजिपंत निघाले विठलपंत मनोहर पाहून निघाले फिरंगी आशेरीस खजिना चढउन माग चालिला फिरंगी बाहेर पढला म्हणोन आपासाहेबास लिहिले गेले आपासाहेब बऱ्हाणपुराहून मजल दरमजल धावणे करून आले तव फिरंगी तारापुरास पावला तेव्हां गंगाजि नाईक व संकराजिपंत घ मोराजि सिंदे सर्व बैसोन विचार केला जर आपासाहेबास माहिमाकडे न जाउ द्यावे ठाणियास आणावे हा विचार करुन संकराजिपंत आपास सामोरे गेले तव फिरंगी वसईस आला ठाणेयास जावयाचि मसलत केलि तिकडे कडदिनाने मोडलि आधि धाराविस जाधयाचा करार केला धाराविवर गेला तेथे अमृतराव खानिवलकर मेढ्यात होता व नारायणजि नाईक देवळात होता व राउताचा तळ खालि होता फिरंगी याणे तळावर चालो घेतले गडताचा मार सोसवत नाहिं मग फौज निघालि देउळाचे लोकास धिर धरवत नाहि तेहि निघाले नारायणजि नाईक व बापुजि प्रभु चिटणिस व आणीक लोकानि दिवसात दोनच्यार हिरिग्या केल्या मारापुढे माणसे पळो लागली फिरंगी धाराविचे डोंगरावर चढला मेढ्यावर गेला बापुजि चिटणिस व नारायणजि नाईक व बाजे लोक पाउणसे माणसानि धाराविचे डोगरास चढले मराठे लोक मागांच राहुन खालचे राउत खालि थोपोन मेढ्यास झुंज लागलें सकाळपासून तिसराप्रहर जाला तव खंडोजि मानकर ठाण्याहून धाउन आले त्यास खालिच थोपोन फिरंगी याणे मेढ्यावर लागट केला मेढा आगिने भरुन काढला तेथे अमृतराव खानवलकर खासे खासे लोक कामास आले धाराविचे मेढ्यास फिरंगी कोट बाधु लागला आपासाहेब ठाणियास गेले ठाणियास वसईस बळकटि जालि कटक येउन बैसले फिरंगी मोढ्यात (?) गोव्याहून कउदिन नावाचा आला जराल वसईस आला त्याणे फौजबंदि करून धाराविचा मेढा घेतला तेथें अणजुरकरांचा फकिर महमद व वैजनाक परवाहि पडला फिरंगी याणे मुडदे येथे माडीस मेढा घालुन खाडीचे तोंड धरून धाराविचें बेट मागां घालावें हा विचार करून फौज मुढव्यास उतरली दारुगोळा तोफा सुत्धा आला तेव्हां खंडोजि मानकर व रामाजि महादेव व मुऱ्हारजी नाईक व कुकजी हंबतराव व नारायणजि नाईक व कृष्णाजि नाईक व जसवंतजि सुरवा व बाजे लोक साष्टिचे

पाठारे ज्ञातिचे सामी जाउन फिरंगी मोडला तोफा ८ पाडाव केल्या फिरंगीयाचे मनुष्य पांचसें मारलें कांहिं बुडविले त्याचि मसलत ठाणियावर[६१] जावयाचि राहिलि पेद्र दमेल जरालानें गोव्यास लिहून पाठविले जर ठाण्याचि मसलत कडदिनाने मोडलि त्याजवरून कडदिनास अन्यायात आणुन गोव्यास पाठविले मग पाऊसकाळ आला आपासाहेबि वसईचि व ठाण्याचि बळकटि करून पुणियास गेले मग पाउसकाळिं फिरंगी वसईस कोटातून दिवसाचा बाहेर निघोन बहादुर-पुऱ्याचे मेढ्यावर चालून आला त्याजवर मोराजि सिंदे मेढ्यातून बाहेर पडोन आडवे जाले शंकराजिपंत गंगाजि नाईक व खंडोबा प्रभु सारिच फौज धावलि फिरंगीयास मुरडवोन मारित कोटाखालि घातला गोडे विहिरीजवळ हातघाय जाहालि फिरंगीयाचे मनुष्य व मराठियाचे मनुष्य दोनशें पाडाव जालें वर्तमान लिहून पुणियास पाठविलें मग बाजिराव व आपा [साब] साहेब दोघे बंधु मिळोन विचयार केला की फिरगी याचि निशा येकवेळ करावि सालदरसाल शिव-बांदिचा (शिबंदिचा) खर्च भारि पडतो याजकरिता सारिच फौज नेउन फिरंगी खणोन काढावा हा सिद्धात करून मल्हारजि होळकर पुढे ठाणियास पाठविला फिरगी पेद्रदमेल जरालाने साहित्य घेउन मुबईवरुन ठाणियावर आला पाणबुरुजा-वर मार केला गरनाळींचे गोळे बुरुजावर टाकिले बुरुजास लादण्या केल्या होत्या त्यावर पडून फुटल्या खालिं लोक निसूर भांडत येक गोळा लादणि फोडोन आत फुटला तेणे लोक जाया जाले वरकड घाबरे जाले मोहरे कर्णे देवास ते बुरुजाचा गोळा जाउन जराल खासा पेद्रदमेल पडला[६२] मग फिरंगीयाचा मोड जाला मग वसईस गेला त्याजवर बाजिराव थोडकि फौज घेउन माळव्याकडे गेले. आपासाहेब[६३]

---

६१ फिरंगी एकेक ठिकाण काबीज करीत होते. फिरंग्यांनीं ठाण्यावर हल्ला केला. आपासाहेब ठाण्यास होते. मुल्हारजी नाईक नारायणजी नाईक वैगेरे पाठारे ज्ञातीचे लोकांनीं फिरंग्याचा पराभव केला. १७३८ च्या पावसाळ्याच्या वेळीं ही मोहीम तात्पुरती थांबली.

६२ १७३८ च्या नोव्हेंबरांत स्वतः आपासाहेबानीं ह्या मोहीमेची जंगी तयारी केली. पेट्रो डीमेलो ह्यानें ६-१२-१७३८ रोजीं ठाण्यावर हल्ला केला पण ८-१२-१७३८ रोजीं पेट्रो डीमेलो स्वतःच मारला गेला (ब्र. स्वा. च. पान ८१). मल्हारराव होळकर ह्या युद्धाच्या वेळीं ठाण्यास होते (म. री. पान ३३२). आपासाहेबानीं मल्हारबाला मुद्दामच पुढें पाठविलें होतें.

६३ आपासाहेब २८ रमजान म्हणजे ३१ डिसेंबर १७३८ रोजीं कोकणांत आले. (ब्र. स्वा. च. ले. ३७).

कोकणात आले सटवाजिराव जाधवाने दबणेचे रोखे (लोक) पाठविले खासे आपा-साहेब माहिमावर जाउन मोरचे दिधले तेथे बुगाजि नाईक व मुल्हारजि नाईक गेले संकराजिपंतहि वसईस गंगाजि नाईक व कर्णाजि सिंदे ठेउन मोराजि सिंदे व शिवजि नाईक व रायाबा व खंडोबा यास घेउन माहिमास गेले माहिमास मोरचे भिडउन सुरंग लावले सटबाजि जाधवराव याही बारडापारडिस मोरचे लावले इकडे माहिम कौलास आले कळवे चढे घोडेंयानसि घेतलें तारापुरास गेले तेथे मोरचे भिडउन सुरंग लावले तीकडे राणोजि सिंदे याहि बंदर किनाऱ्याचे गाव साळसुबे व खतळवाडे व नारगोळ व डाकु (डाणु) व बाजे गाव मोडित तारापुरास गेले तारापुरचे बुरजास सुरंग लावले सुरंगानें बुरुज उडाला मग किल्याव (र) हला केला तेथे बाजी भिवराव पडले कोट फर्त्ये जाला अशेरि कौलासि आलि मग साऱ्या फौजा घेउन वज्रयोगिणिस गेले तेथुन गोविंद हरि व तुकाजिपंत साष्टिस पाठउन आपण खुद्द फौज घेउन वसईस आले वसईस मोरचे लाँवले पिलाजि जाधवराव व मल्हारजि होळकर व राणोजि

---

६४ माहाम छ ९ सवाली मंगळवारीं ता. ९ जानेवारी १७३९ रोजीं घेतलें. दुसरेच दिवशीं छ. १० सवालीं बुधवारीं १० जानेआरी १७३९ रोजीं केळवें घेतलें. (ब्र. स्वा. ले. ३९). माहीमास मोरचे ता. ३०।१२।३८ रोजीं लागलेले होते. (ब्र. स्वा. ले. ११९)

६५ ह्याच वेळीं तारापुरास मोरचे बसविले होते. ६ छ सवालीं बुधवार ता. २४ जानेवारी १७३७ रोजीं तारापूर घेतलें. त्याच दिवशी बाजी भिवराव मृत्यु पावले. (ब्र. स्वा. च. ले. ४९ व ४०) बाजी भिवराव ८-३-१७३९ रोजीं मृत्यु पावले असें सरदेसाई म्हणतात (म. री. पा. ३३४). पण ती तारीख चुक असावी कारण २४।१।३९च्या आपांचे पत्रांत बाजी भिवरावांच्या शेवटच्या पराक्रमाचें वर्णन आहे. माहीम, केळवे, शिरगांव, तारापूर, डाहाणू, नारगोळ, खत्तलवाडा हीं ठिकाणें २०।१।१७३९ पर्यंत जिंकली होतीं. (ब्र. स्वा. च. ले ५०)

६६ अशीरगड उर्फ अशेरी हा किल्ला छ २ जिल्काद ता. १ फेब्रुवारी १७३९ रोजीं जिंकला गेला. खंडोजी माणकरानें छ ७ जिल्काद फेब्रुआरी ६ सन १७३९ रोजीं वेसावें घेतलें. (ब्र. स्वा. च. ले. ४०)

६७ माघ शुद्ध दशमी, ७ जानेवारी १७३९ रोजीं वसईस मोरचे बसविले होते (ब्र. स्वा. च. ले. ५२). मोहीमेच्या आरंभीं सरदारांना निरनिराळीं कामें वाटून दिली होतीं. त्याप्रमाणें निरनिराळ्या जागा धरून पेशव्याचे सरदार बसले होते. तारापूर, वेसावें इत्यादि ठिकाणें काबीज झाल्यानंतर आपासाहेब वज्राबाईस गेले असावेत व नंतर मार्चमध्यें आप्पासाहेब खुद्द वसईला गेले असावेत असें दिसतें.

सिंदे व राणोजि सितोळे व गणपतराव ब्राह्मण व रामचंद्र हरि व बापुजि भिवराव व कंठाजि बांडे व विभूतराव सतक व पाईचे लोक व संकराजिपंत व करणाजि सिंदे व खंडो चिमणाजि व रायाजि शंकर व आपाजिराव खानवेलकर व गणोजिराव खानवेलकर व रुद्राजी सिंदे व विठोजि कदम व जिवाजिराव विचोरे व सुभानजि नाईक पाईचे भले लोक व सरदार व कारकुन अवघियाहि हिमत धरुन वसईस मोरचे लाविले जमेदार साळोखे रायापैकि राणेकुळचे कार्य-संमधि गंगाजि नाईक व गणेशजि नाईक व नामाजि देसाई व भानजी देसाई व गंगाजि देसाई व कुकजि हैबतराव हे सर्व व बाबनजि प्रभु व सुदजि प्रभु व गणेशजि प्रभु पाताणे व तुंग चोरघा भंडारि हे सर्व गंगाजि नाईकासंगे साहित्यास लागले मोरच्यास व दमाम्यास व सुरंगास व तोफास सामान बंगले व वाडे व तटे व झाप व सोडशिड्या दारुगोळा सामान शंकराजिपंतास व गंगाजि नाईकास पुरवावयास लागले तिन महिने अहोरात्र दिवस जमीनिस आग (आंग) लावले नाहि तीकडे साष्टित गोविंद हरि व तुबाजिपंत व खंडोजि मानकर व कृष्णाजि नाईक जाउन मढचे कोटास मोरचे लाविले व वसइहून मढास मुऱ्हारजी नाईक पाठविले तेथे साष्टिचे लोक अणजुरकरसंगे नानोजि देसाई व हराजि ठाकुर व बापुजी ठाकूर बोरगावकर व हिराजि ठाकूर व पोसजि ठाकुर व पदमणजि देसाई व मालजि बापभुईकर व भिकाजी हैबतराव याहि मोरच्याचें साहित्य करुन आपला मोरचा पुढें बंदराकडे चालउन मढचें बंदर घेतले व खंडोजि मानकर व गोविंद हरि व तुंबाजिपंत याहि मोरचे चालउन तोफा लाउन कोटाचि सफेल फोडोन लेस (?) केलि मग रात्रिचा फिरंगी चोरवाटेने उतरुन गलबतावर चढोन पळोन गेला मढचा कोट सर जाला मग धाराविस गेले तेथे नारायण जोशि व मुऱ्हाराजि नाईक याहि गायमुखाचा मोरचा चालउन बंदर घेतले वरून तोफा लाउन सफेल फोडलि तोहि फिरंगी कौलास आला धारावि काबिज जालि तेहि फौज वसईस (आली) मानकर व नारायण जोशि व शिवाजि नाईक अणजूरकर वसईस आले इकडे शृंग (सुरंग) कोटाजवळ जात ते फिरंगी वरून मोडतो तोंफा उफ-राट्या डागून शृंगावर (सुरुंगावर) गोळे मारतो वरुन लांकडे टाकितो व चंद्रस गंधक टाकून आग करितो व पाणियाचे पनळ वरुन सोडितो सुरंग भिडो देत नाहि येक येक सुरंग पाच सात वेळां मोडिले सुरंगाचे काम राहिले चालो देत नाहि मग खालून तोफा तिस लाउन कवलारि बुरुज व समोरच्या दुसाळी फोडोन साफ केल्या दमदमे दोन जवळ उभे केले त्याजवरून बर (कं) दाजि बुरजावरून चालली तेणेकरून फीरंग्याचा मार कमि जाला सुरंग आड

कोटास तयार जाले दारुचे बुधले भरून सारि फौज हल्यास तयार जालि सुरंग उडविले कोटावर हला करावा तो सुरंगांनें उफराट्या दगडि येउन माणुस फार जाया जालें उतरेचे कोनाचा सुरंग राणोजि सिंदे याचा उडाला व पश्चमेचा सुरंग बतिवर दगडि पडोन विझाला बाजे धाकटे सुरंग उडाले पश्चिमेचे बुरुजावर लगट जाला तव विभूतरायाचा सुरंग उडाला त्याणे आपलेच लोक खराब केले बाजे लोक कचमोहरे जाले त्याचवेळेस फिरगी च्यार खोपावर उतरला आग लाविलि तेथे कृष्णाजी नाईक आपले लोकानसि धावोन फिरंगी मोडला शिरें पाडून ठाणियास पाठविलि तेथुन लिहिली पुणियास गेलिं मग दुसरे दिवशि श्रृंग (सुरंग) म्होटा पश्चिमेचा बुरुंज अर्धा उडाला मग सारे शाहिचा हल्ला जाला सारि बाजिरायाचि फौज घोडे राउत पाईउतारा आले व मावले धारकरि व मुलुकचे लोक व साष्टिचे क्षत्रि देसाईपैकि नेतोजि देसाई व त्याचे भाव वारिस गंगाजि देसाई व पदमणजि देसाई व भाईदरकर हैबतरावपैकिं भिकाजि व कुकजि हैबतराव सुरव्यापैकिं जसवंतजी सुरवे सारे पाठारे यातिचे लोक साष्टिपैकी व वसईपैकी माराष्ट्र धर्मासाठि जिवाचि आशा सोडून कोटास लागले गंगाजि नाईक व त्याचे बंधु बुगाजी व मुऱ्हारजी व शिवजि व नारायणजि नाईक हे पाच बंधु व गंगाजि नाईकाचा पुत्र गणेशजि नाईक आणिक पुतण्ये व भाचे जावाई हे **आपलें कार्य म्हणून तुटोन कोटावर पडले** व वाजिरायाचि सलतान नावनिशि लिहिता भारत होते कोटावर लगट मोठा जाला भांडण मोठें जालें त्या दिवशि च्यार हजार माणुस पडले व मुऱ्हारजि नाईक पडले त्याचा मुरदा (मुडदा) गंगाजि नाईकानि काढिला सर्व बंधु मुऱ्हारजिसाठि कष्टि जाले म (ग) भांडण राहिलें

---

६८ वैशाख शुद्ध पंचमी ता. १ मे इ. स. १७३९ मंगळवारीं प्रथम त्या दिवशीं हल्ल्याची सिद्धता करून हल्ल्यास सुरवात करण्याचें ठरविलें. हें बखरीतलें वर्णन ब्र. स्वा. च. ले. ५२ च्या पत्रांतील वर्णनाबरोबर जुळतें.

६९ वैशाख शुद्ध षष्ठी ता. २ मे १७३९ बुधवारीं सुरंग उडाला व त्यानें उफराट्या दगडि येउन आपलेच लोक जाया झाले हें वर्णन त्या पत्रांतील वर्णनाबरोबर तंतोतंत जुळतें (ब्र. स्वा. च. ले. ५२). म. री. पा. ३३५ वरील पत्रांतही आपल्याच सुरंगानें आपले लोक जाया झाल्याचें वर्णन आढळतें. अर्धा बुरुज उडाल्याची ही हकिकत त्यांत आहे.

७० दुसरे दिवशीं म्हणजे वैशाख शुद्ध सप्तमी मुरुवारीं ३ मे १७३९ रोजीं उजवे बाजूचा सुरंग उडाला. त्यानें अर्धा बुरुंज उडाला. असेंच हुबेहुब वर्णन ब्र. स्वा. च. ले ५२ मध्यें आहे.

(१२१) ५३३६

फिरंगी कौलांस आला सांता दिवसांचा वायदा मागोन तारवें भरोन फिरंगी गोव्यास गेला शके १६६१ सिद्धार्थी नाम संवात्सरि वैशाख शुद्ध नवमिस फिरंगाण मोडले [बखरींत १६६२ शक आहे पण तो शक चूक आहे.] **महाराष्ट्र महादेवी भोसल्याचे राज्य जाले** फिरंगि दवणेस राहिला व इंग्रज मुंबइच्या बेटात राहिला मग चिमाजि आपाने मुलखाचा वंदोबस्त करून पुणियास चालिले ते समई गंगाजि नाईकास सांगितलें की तुम्ही पुणियास चलावें तुम्हास बाजिरायापासून वतनाचे भोगवट्याचि पत्रें देवितों हे सांगोन आपासाहेब पुणियांस गेले मग शंकराजि केशव व गंगाजि नाईक व बुगाजि नाईक व नामजि देसाई व कार्यसमंधीं लोक सर्व मिळोन पूणियास गेले इतकीयांत बाजीराव मुलूखगीरिस जाँवयासि निघाले भेटि जाल्या बाजि-

---

७१ अष्टमी ता. ४ मे १७३९ गुरुवार रोजीं फिरंगी शरण आले (ब्र. स्वा. च. ले. ५२)

७२ बखरींत फिरंगाण मोडल्याची मिती नवमी म्हणजे ता. ५ मे १७३९ शुक्रवार ही लिहीलेली आहे व वायदा ७ दिवसांचा आहे ब्र. स्वा. च. च्या ५२ लेखांकात वायदा ८ दिवसांचा असून अष्टमी ता. ४-५-३९ रोजीं फिरंगी शरण आला असें लिहिलें आहे. पोर्तुगीज लोक पांढरे निशाण हातीं घेऊन ता. ५ मे १७३९ रोजीं शरण आले व ता. १२ मेला शर्तीं ठरून किल्ला १३ मेला मराठ्यांचें हाती मिळाला असें रीसायतकार म. री. पान ३३६ वर म्हणतात. वायदा सहा दिवसांचा होता असें त्यांचे म्हणणें आहे. ब्र. स्वा. च. ले. ५२ मध्यें वसईतून फिरंगी १२ मे १७३९ रोजीं निघून गेला असें म्हटले आहे. चिमाजी आप्पानीं ता. १६ मे १७३९ रोजीं त्यांच्या सर्व अटी कबूल करून फिरंग्यास जाऊं दिलें असें ब्र. स्वा. चरित्र पान ८३ वर पारसनीस लिहितात. फिरंग्याच्या दिवसांत व आपल्या दिवसांत १२ दिवसांची तफावत होते ती निराळीच.

" सोळाशतें दशक सा वरी एक आहे। सिद्धार्थ वत्सर तया प्रती नाम पाहे ॥
वैशाख वद्य द्वितीयेसह भानुवारीं। शाहूनिशाण चढलें वसई दुपारीं ॥ १ ॥ "

७३ ता. ३ सप्तंबर १७३९ रोजी आप्पासाहेब पुण्यास गेले (ब्र. स्वा. च ले ५८) ता. ४ सप्तंबर रोजीं आप्पा पुण्यास आले असे ले. १३९ मध्ये लिहिलें आहे. पुरंदरे यादी-मध्यें ते ३ सप्तंबरला पुण्यास आल्याचें लिहीलें आहे (म. री. ४२७) बाजीराव २९ जुलै १७३९ मध्यें खानदेशांतून पुण्यास आले होते.

७४ ता. १२ डिसेंबर १७३९ रोजीं बाजीराव नासीरजंगावर चालून गेले (म. री. पा. ४२८) ८ फेब्रुवारी १७४० मध्यें चिमाजी आप्पाही बाजीरावाला अहमद-नगरास मिळाले. २७ फेब्रुआरी १७४० मध्यें नासीरजंगाचा पराभव झाला. ७ मार्चला

रायाने बहुत मान करुन सांगितलें कीं तुमच्या वतनाच्या सनदा देण्याविशि आपास सांगीतले आहे मग बाजीराव मुलुखगिरिस गेले नंतर चिमाजि आपानि गंगाजिस सांगीतले कीं तुम्हि आपले मुलुखास चला आम्हि मागुन येतो तुमचि सर्वांचि वतने चालतिं करितो हे सांगोन रवाना केले ते सर्व घरि आले इतकीयांत तिकडे बाजिरावास देवआज्ञा जाली त्यामागें चिमाजि आपासाहेवास देवआज्ञा जालि मग बायाचा (रायाचा?) पुत्र बाळाजि [बाजि] बाजीराव यांशि शाहूराजाहि प्रधानकी दिल्हि पुणियाँस आले मग शंकराजिपंत व गंगाजि नाईक बुगाजि नाईक शिवाजि नाईक व नामजि देसाईसुद्धा पुणियास गेले भेटी जाल्या चयाँर महिने पुणियास राहिले बाळाजि बाजिराव वतनदारांचि वतने देत नाहि म्हणो लागले याचे कारण तुमच्या मुलकामुळे आम्हास कोट रुपये खर्च जाला मग देसायाचें वतन बुडविलें व देसनाडगौडियाच्या वतनास नाव देशमुख ठेविले आपले गुमस्ते पाठविलें व देशपांड्येयाचे वतनास [घस] आपले गुमस्ते पाठविलें व सरपाटेल हे वतनी स्छापिले व आपले गुमस्ते ठेविले प्रगणे मालाड व प्रगणे मरोळ व तर्फ आठगाव प्रगणे साहिवान याचे सरपाटिलकिच्या सनदा गंगाजि नाईकाचे हातिं दिल्या वरकड वतने कोणाचि देत नाहि व प्रगणे माहिम येथील कुळकर्ण शंकराजि केशवास दिल्हे मग बाळाजि बाजीराव प्रधान मुलूखगिरिस गेले व गंगाजि

बाजीराव उत्तर हिंदुस्थानांत गेले. १२ मार्च १७४० रोजीं आप्पासाहेब औरंगाबादेहून निघून १ एप्रील १७४० रोजी पुण्यास आले. (ब्र. स्वा. च लें. ५५ व म. री. पा ४२८)

७५ बाजीराव ता. २८।४।४० रोजीं– छ १२ सफरी–नर्मदातीरीं रावेर येथें मृत्यु पावले. (ब्र. स्वा. च. ले. ६०) मराठी रीयासतीच्या पान १९१ वर ता. २८।४।४० ही दिली असून पान ४२८ वर २५।४।४० ही तारीख दिली आहे. चिमाजी आपा १७ दिसेंबर १७४०–८ सवालीं-वारले (ब्र. स्वा. च. ले. ६०) (म. री. ४३०)

७६ नानासाहेबास पेशवाईचीं वस्त्रें आषाढ शुद्ध १२ बुधवार, शके १६६२ ता. १४ जून १७४० रोजीं दिवसा दहा घटकास साताऱ्यास मिळाली. आप्पा बरोबर होते. उभयता चुलते पुतणे ३ आगष्ट १७४० रोजीं पुण्यास आले. (ब्र स्वा. च. ले. ५७) त्या लेखांकांत १७४१ हें साल चुकीनें पडलें आहे.

७७ नानासाहेबास १७४० चे जूनमध्यें पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं व चिमाजी आप्पा १७४०च्या दिसेंबरांत मरण पावले. गंगाजी नाईक ४ महिने पुण्यास होते. ते १७४० च्या आगष्ट सप्टेंबर पासून १७४१ च्या जानेआरी फेब्रुआरी पर्यंत तेथें असावें, असें दिसतें म्हणजे नानासाहेबानीं १७४१ मध्यें गंगाजी प्रभृतीना सरपाटीलकीची सनद दिली असावी, सनदेंतला सन ' सुद्दूर सन इसने आर्बेन मया व अलफ हा आहे. '

साष्टीची बखर

बाळाजी बाजीराव पेशवे हे सर्व वतनदारांचीं वतनें देत नाहींत असें पाहून गंगाजी नाईक पुण्याच्या दरबारांतून खिन्न वदनानें परत जात आहेत. (बखर पान ५२)

नाईं(क) व सारे मिळोन कल्याणास आले मग गंगाजि नाईंकानि आपला लेक व भाउ त्यास सनदा देउन मुलुकात पाठविले भोगवटा घ्यावयाकरिता आपण गंगाजि नाईक कल्याणास राहिले निमित्य की आपले मुलकास दुष्टराजा फिरंगी आहे तो खणून काढावा मराष्ट्र राज्य करावें देवधर्म माराष्ट्र स्छापावे व तियें क्षेत्रें मुक्त व्हावी वतनदाराचि पुरातन वतने स्थापावि आपलें वतन पूर्वापार स्छापावे हा संकल्प श्रीमोरयाजवल केला होता त्यास सर्व आलें परंतु वतनदारांचि वतने व वृत्यांशि ब्राह्मणाच्या वृत्ति न सुटत व आपलेहि वतन न सुटे व देसायाचे वतन न सुटे म्हणून गंगाजि नाईक कल्याणास राहिले तेथे कल्याण सुभ्यांत मौजे कांबें तर्फ अमरनाथ या गावावरि तळे खगले मातुश्रीचे (स्मरणार्थ) नाव देकाळे ठेविले.....

[ॐ शान्तिः । शान्तिः । शान्ति ।]

साष्टीची बखर

ह्या हस्तलिखित ग्रंथाच्या प्रथम पृष्ठाचें छायाचित्र

बखरींतली नाईकांची कामगिरी

धर्मसंग्रामाच्या कल्पनेचे उत्पादक

निंबाजि नाईक अणजूरकर:—वसईच्या धर्मसंग्रामाचे मूळ कल्पक व उत्पादक. संभाजी राजाकडे अनुसंधान.

गंगाजी नाईक:—वडीलांची कल्पना आत्मसात करून व जीवाभ्य मेहनत करून सतत २२ वर्षांच्या अखंड व निरलस चळवळीनतर अत्यंत स्पृहणीय अशा चिकाटीनें, सहकुटुंब देहाचा संकल्प करणारे व शेवटीं ती योजना सिद्धीस नेऊन ह्या कोंकण भागांत 'माराष्ट्रधर्म' व 'माराष्ट्रराज्य' स्थापून त्याची ध्वजा फडकविणारे स्वराष्ट्र व स्वधर्मसेवक.

वुगाजी नाईक
मुऱ्हारजी नाईक
शिवजी नाईक
नारायणजि नाईक

वडील बंधूंचा स्वार्थत्याग पाहून त्यांच्या उपदेशान्वयें पांडवाग्रमाणें त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आमरणान्त अत्यंत नि:स्वार्थतेनें, कमालीच्या निरलसतेनें व घराद्याराचा संकल्प करून, एकाच ध्येयानें प्रेरीत होऊन, सतत २२ वर्षें ह्या धर्मसंग्रामाची तयारी करून जीवाच्या मोलानें तो संग्राम यशस्वी करण्याकरितां तन-मन-धन व प्रसंगीं प्राणही अर्पण करणारे गंगाजीचे सख्खे भाऊ

गंगाजी नाईकांचें मंत्रीमंडळ

गंगाजी नाईक:—मुख्य सूत्रचालक

वुगाजी नाईक:—प्रमुख सल्लागार

मुऱ्हारजी नाईक:—सभासद

शिवजी नाईक:— ,,

नारायणजी नाईक:— ,,

प्रथमच्या बैठकीनंतर श्रीमोरेश्वराचा प्रसाद गंगाजी नाईकांनीं मिळविला. त्यानंतरचें वाढविलेलें, **'युद्धमंडळ'** असें यथार्थ नांव शोभणारें मंत्रीमंडळ.

अणजूरकर	साष्टीकर
१ गंगाजी नाईक	६ नामाजी देसाई मालाडकर, मेहुणे
२ बुगाजी नाईक	७ मायाजी राउत कळवेकर, मामा
३ मुऱ्हारजी नाईक	८ नारायणजी सुतार वसईकर, जावई
४ शिवजी नाईक	९ लाडकोजी हैबतराव भाईंदरकर, व्याही
५ नारायणजी नाईक	१० वेंडजी देसाई मालाडकर, मेहुणे

मंडळाचा प्रथमचा निर्धार:-" त्यास बुगाजी नाईक बोलिले जे तु (गंगाजी नाईक) या जिवाचे हाल करून देव प्रसन्न केला. आतां आपण हईगई करावि तर आपुल्या ऐसे साळासि आणि भ्याड पृथ्वींत नाहि. याजकरितां हा प्रयोग करावा. त्याजवर नामाजि देसाई व मायाजि मामा मग सारेच बोलिले कीं तुम्ही प्रयोग करावा. आम्हास जे साहित्य सांगाल ते आम्ही आपल्या सामर्थ्यासारिखें करुं. ॥ "

ह्याशिवाय निरनिराळ्या प्रसंगी ह्या युद्धमंडळाच्या प्रसंगोपात ८ बैठकी झालेल्या आहेत; व त्या त्या प्रसंगांसअनुरुप असें त्या त्या वेळीं ठरलेलें आहे. बखरीचें सूक्ष्म अवलोकन केलें असतांना हें दिसून येतें. द्विरुक्ति नको म्हणून मी तें सर्व येथें देत नाहीं. ह्या मंडळाचें हें विशेष आहे कीं, भीतीनें वा लोभानें ह्या मंडळांतून २२ वर्षांत कोणीही फितुर झाला नाहीं किंवा कार्यविन्मुख झाला नाहीं. मायाजी राउत, लाडकोजी हैबतराव, व नारायणजी सुतार हे तिघेजण इ. स. १७३२ च्या सुमारास कालवश झाले असतांना त्यांची जागा अनुक्रमें लक्ष्मण राउत, भिकाजी हैबतराव व गणेशजी सुतार ह्यांनीं पत्करून आपापल्या वडिलांचें कार्य आमरणान्त चालविण्याचें धोरण पत्करलेलें आपणास दिसून येतें. ह्यावरून गंगाजी नाईकांची योग्यता जास्तच भासते. अनेक संकटांत सांपडले असतांनाहीं त्यांच्या अनुयायांपैकीं कोणीही मनुष्य त्यांना सोडून फितूर झाला नाहीं किंवा कार्यविन्मुख झाला नाहीं, ह्यावरून लोकसंग्रह करण्याच्या त्यांच्या बुद्धीची तारीफ करावी तितकी थोडीच होईल.

कृष्णाजी नाईक:-शामजी नाईकांचा वडील मुलगा. ह्यानें ह्या मोहीमेंत बऱ्याच महत्त्वाची कामगिरी बजाविली आहे.

अणजूर येथील नाईकांची माडी

दर्शनी बाजू



माडीच्या मागील बाजूस असलेलें 'मुलगय' तळें

—नाईकांचा बंगला.

Photos by Vasantrao D. Mhatre.

गंगाजी नाईकांचें कर्ज

"गंगाजी नाईक लागामागाचे लोकांस देणें कबूल होतें ते देताना हयास आला पंचविस हजार रुपये घरांतील ऐवज मोडतोड करून भरले व दाहाहजार रुपये कविल्यास कर्ज जाहाले" बखर पान २९

"

पोछ ८ रमजान. पुरवणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

"अणजूरकरास कर्जदार उपद्रव करिता(त); त्यास ताकीद करणें म्हणोन लिहिलें तरी त्यास कोणी गोष्टीचा उपद्रव लागणार नाहीं व स्वामीनी लिहिलें... अणजूरकरासहि सांगितलें आहे." पे. द. रु १६ पत्र ३१

"

श्री.

पुरा राजश्री पंतप्रधान स्वामीचें सेवेसी.

विनंती उपरी. राजश्री कृष्णराव काली भिवंडीस आले. गंगाजी नाईक आणजोर यास कर्जाची निकड लाविली आहे. आणजोरकर याचे हाल कठीण आहे. आपणास कळावे याकरितां लिहिले असे. बहुत काये लिहिणे हे विनंती. पौछ २२ मोहरम पे. द. रु ३४ पत्र १३

"

श्री.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती. रा॥ गंगाजी नाईक बहुत कामाचे माणूस आहेत, परंतु सांप्रत याचा कारभार कर्जामुळें व खर्चवेचामुळें बहुत अपत्त जाला आहे. जेणेकरून या गृहस्ताची उठवण मोडे आणि धंदा याचा सज होउन येई तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत....." पे. द. रु ३४ पत्र २१०

"अणजुरकर यांचेकडे लोकाचे कर्ज बहुत देणें द्यावयासी ऐपत नाहीं... हसेबंदी प्रमाणे द्यावे द्यावे...तुम्ही त्यास सक्त तगादा केला आहे...जाजती तगादा न करावा....,दुरलोकीक तुमचा होतो तरी काडीभर उपद्रव न द्यावा"

शंकराजी केशवाचें रामचंद्रपंतास पत्र ब. प. पे. पत्र ७

ह्या मोहीमेस एक कोट रुपये खर्च झाल्यामुळें नानासाहेब पेशव्यांनीं वतनदारांचीं वतनें बुडविली मग आमरणान्त कर्जात बुडालेल्या गंगाजी नाईकानें ह्यांतून सुटण्यास कोणता मार्ग काढावा! 'मराष्ट्र राज्य करावे, देवधर्म माराष्ट्र स्थापावे. तिथें क्षेत्रे मुक्त व्हावी' हा श्रीमोरयाजवळ केलेला संकल्प पुरा झाला एवढेंच समाधान मानून गंगाजी नाईक स्वस्थ राहिले.

गंगाजी नाईकांचें कर्ज

"गंगाजी नाईक लागामागाचे लोकांस देणें कबूल होतें ते देताना हयास आला पंचविस हजार रुपये घरांतील ऐवज मोडतोड करून भरले व दाहाहजार रुपये कविल्यास कर्ज जाहाले" बखर पान २९

" पोछ ८ रमजान. पुरवणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

"अणजूरकरास कर्जदार उपद्रव करिता(त); त्यास ताकीद करणें म्हणोन लिहिलें तरी त्यास कोणी गोष्टीचा उपद्रव लागणार नाहीं व स्वामीनी लिहिलें... अणजूरकरासहि सांगितलें आहे." पे. द. रु १६ पत्र ३१

" श्री.

पुरा राजश्री पंतप्रधान स्वामींचें सेवेसी.

विनंती उपरी. राजश्री कृष्णराव काली भिवंडीस आले. गंगाजी नाईक आणजोर यास कर्जाची निकड लाविली आहे. आणजोरकर याचे हाल कठीण आहे. आपणास कळावे याकरितां लिहिले असे. बहुत काये लिहिणे हे विनंती. पौछ २२ मोहरम पे. द. रु ३४ पत्र १३

" श्री.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती. रा॥ गंगाजी नाईक बहुत कामाचे माणूस आहेत, परंतु सांप्रत याचा कारभार कर्जामुळें व खर्चवेचामुळें बहुत अपत्त जाला आहे. जेणेकरून या गृहस्ताची उठवण मोडे आणि धंदा याचा सज होउन येई तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत....." पे. द. रु ३४ पत्र २१०

"अणजुरकर यांचेकडे लोकाचे कर्ज बहुत देणें द्यावयासी ऐपत नाहीं... हसेबंदी प्रमाणे द्यावे द्यावे...तुम्ही त्यास सक्त तगादा केला आहे...जाजती तगादा न करावा....,दुरलोकीक तुमचा होतो तरी काडीभर उपद्रव न द्यावा"

शंकराजी केशवाचें रामचंद्रपंतास पत्र ब. प. पे. पत्र ७

ह्या मोहीमेस एक कोट रुपये खर्च झाल्यामुळें नानासाहेब पेशव्यांनीं वतनदारांचीं वतनें बुडविली मग आमरणान्त कर्जांत बुडालेल्या गंगाजी नाईकानें ह्यांतून सुटण्यास कोणता मार्ग काढावा! 'मराष्ट्र राज्य करावे, देवधर्म माराष्ट्र स्थापावे. तिथें क्षेत्रे मुक्त व्हावी' हा श्रीमोरयाजवळ केलेला संकल्प पुरा झाला एवढेंच समाधान मानून गंगाजी नाईक स्वस्थ राहिले.

गंगाजी नाईकांचा मार्ग व सैन्याचे मार्ग

इ. स. १७१८

गंगाजी नाईकांचा मोरेश्वरास जाण्याचा मार्गः—अणजूरा हून निघाल्यावर गंगाजी नाईक बोरघाटांतून गेले किंवा भीमाशंकराच्या घाटांतून गेले हें निश्चित कळण्यास साधन नाहीं, अणजूर ते कर्जत, कर्जत ते खंडाळें किंवा भीमाशंकर, घाटांतून उतरल्यावर चिंचवड, चिंचवड ते पुणें, पुणें ते जाधवरायाची वाडी, वाडी ते जेजूरी, जेजूरी ते मोरगांव. अंदाजी मैलांची लांबी अणजूर ते कल्याण १० मैल कल्याण ते कर्जत व कर्जत ते खंडाळें किंवा भीमाशंकर ५० मैल घाटमाथा ते चिंचवड ३० मैल, चिंचवड ते पुणें १० मैल, पुणें ते वाडी १० मैल, वाडी ते जेजूरी २५ मैल व जेजूरी ते मोरगांव ८ मैल; एकूण अणजूर ते मोरगांव अंदाजी १४३ मैल लांब आहे.

इ. स. १७३०

कांबे जिंकल्यानंतर गंगाजी नाईक व पिलाजी जाधवराव सैन्यासह सातींत आले तो मार्गः—कांबे ते सहरोली, सहरोली ते भाल, भाल ते खिडखाळे खिडखाळे ते पनवेल डोंगराच्या कौसेजवळील कौसे खिंडीतून शिळखिंडी गांवा वरून दिघें, दिघें ते कळंब्याचा खिडीक, कळंब्याचा खिडीक ते इटावें, इटावें ते कळवें, कळंब्यावरून परत फिरल्यावर खिडखाळें, खिडकाळें तें कल्याणची भींव डोंगरी.

इ. स. १७३७

माहुलीच्या किल्ल्यावरून वसईस सैन्य आलें तो मार्गः-माहुली-किल्ला ते कोशिंबडें गांव, कोशिंबडें ते घोटवड किल्ला, घोटवड ते गउळबाव, गउळबाव ते तुंगारचें रानांतील बागटाकें, बागटाकें ते कामणचे रानांतील वाघटाकें, वाघटाकें ते काकडदाहाड, काकडदाहाड ते काढोळखिंड, काढोळखिंड ते राजावळी राजावळी ते उमेळे, राजावळीचा तारा व उमेळे बंदर ह्या दोन ठिकाणाहून सैन्य उतरल्यावर माणीकपुरा, माणीकपुरा ते पापडी व पापडी ते बहादुरपरा—वसई.

इ. स. १७३७

राजमाची किल्ल्यावरून सातींत ठाण्यावर सैन्य आलें तो मार्गः—राजमाचीचा किल्ला ते परबळाचा (प्रबळाचा) किल्ला, प्रबळ ते बावामलंगाची वाडी, वाडी ते पला, पला ते बाळाखिडी, (बाळागांव) बाळाखिडी ते (खिडखाळें), (खिडखाळें) ते कळवे, कळवें ते ठाणें, ठाणें जिंकल्यावर ठाणें ते माझीवडे व परत माझीवडे ते घोणसाळी.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ३ नं. ४०६
ता.
ठा

बखरींतले हल्ले, लढाया वगैरे

इ. स. १७२२ गंगाजी नाईक व शिवजी नाईक **मरोळची माडी फोडा-** वयास गेले. (बखर पान २२)

इ. स. १७२८ फिरंग्यांचा **दुर्गाडीवर** (कल्याण) हल्ला; गंगाजी नाईक, शिवजी नाईक, व नारायणजी नाईक होते. (ब. पा. २५।२६)

इ. स. १७३० **कांब्याची लढाई**:—गंगाजी नाईक, अंताजी रघुनाथ व पिलाजी जाधवराव होते. (ब. पा. २७)

इ. स. १७३० गंगाजी नाईक वगैरेनीं **कळवें लुटलें**. मागें पिलाजी जाधवराव व कृष्णराव महादेव होते. [डिसेंबर १७३०] (ब. पा. २८।२९)

इ. स. १७३७ शके १६५९ चैत्र शुद्ध ७ रविवारीं मुऱ्हाजी, गंगाजी, बुवाजी, ह्यानीं सैन्यासह जाऊन **ठाण्याचा किल्ला** हस्तगत करून घेतला. (ब. पा. ३९)

इ. स. १७३७ **वसईच्या मिठागरांत** उतरलेल्या फिरंगी सैन्यावर गंगाजी नाईकादी मंडळींचा हल्ला (ब. पा. ४१)

इ. स. १७३७ गंगाजी नाईकादि मंडळींनीं भर पावसाळ्यांत **वसईचे कोटावर** शिड्या लावून केलेला हल्ला. (ब. पा. ४२।४३)

इ. स. १७३७ **माहीमच्या मोरच्यावर फिरंग्यांचा** हल्ला. रामचंद्र हरीस गोळी लागली, तीनसें लोक मेले. (ब. पा. ४५)

इ. स. १७३८ **धारावीचें मोठें युद्ध.** अणजूरकरांचा फकीर महंमद व वैजनाक परवारी पडला. खंडोजी माणकर, रामाजी महादेव व पाठारे क्षत्रीय ज्ञातीचे मुऱ्हाजी नाईक, कुकजी हैबतराव, नारायणजी नाईक, कृष्णाजी नाईक, जयवंतजी सुरवा इत्यादि मनुष्यें लढाईंत होतीं. फिरंग्यांचीं ५०० मनुष्यें मेलीं. (ब. पा. ४६।४७)

इ. स. १७३८ **फिरंग्यांचा बहादुरपुऱ्यावर हल्ला.** गोडे विहीरीवर लढाई. गंगाजी नाईक मंडळीनीं हल्ला परत फिरविला. (ब. पा. ४७)

इ स. १७३८ **पेद्रुदमेलाचा ठाण्यावर हल्ला** पेद्रुचा मृत्यु (ब. पा. ४७)

इ. स. १७३९ **मराठ्यांनीं माहीम व केळवें** एकदम घेतलें. [ता. ९ ते १० जानेवारी १७३९] (ब. पा. ४८)

इ. स. १७३९ **मराठ्यांचा तारापूरवर हल्ला.** तारापूर घेतलें. येथें बाजी भिवराव पडले. [ता. २४।१।१७३९] (ब पा. ४८)

इ. स. १७३९ **मढची मोठी लढाई.** गोविंद हरी, तुंबाजीपंत, खंडोजी माणकर, ह्याशिवाय कृष्णाजी नाईक, मुऱ्हारजी नाईक, नानोजी देसाई, हरजी ठाकूर, बापूजी ठाकूर बोरगांवकर, हिराजी ठाकूर, भिकाजी हैबतराव, इ. पाठारे क्षत्रिय ज्ञातीचे सरदार स्यांत होते. मढ घेतलें. (ब. पा. ४९)

इ. स. १७३९ **धारावी घेतली.** नारायण जोशी व मुऱ्हारजी नाईक यानीं गायमुखाचा मोरचा चालवून धारावी घेतली. (ब. पा. ४९)

इ. स. १७३९ **घसईची अखेरची लढाई.** मुऱ्हारजी नाईक पडले. मराठ्यांचे चार हजार माणूस कामास आले. (ब. पा. ४९)

गंगाजीप्रभृतींचा कारागृहवास

इ. स. १७१९ फिरंग्यांनीं गंगाजी नाईकास धरून नेउन तुरुंगांत टाकलें. पांचशें रुपये दंड भरुन सुटका झाली. (ब. पा. १४)

इ. स १७२२ गंगाजी नाईक साष्टींत पांच दिवस कोंडले...फिरंगी याणें साष्टीचे व अणजूरचे दोनसें माणूस-गंगाजी नाईकांचे सोईरे व भाउ मिळून-तुरुंगांत घातले. लांच व खंड देऊन सुटले. (ब. पा. २२)

इ. स. १७३१ गंगाजी नाईकांचे साष्टींतील बावीस सोहिरे फिरंग्यांनीं धरून बंदित घातले. पुढें ते खंड देऊन सुटले. (ब. पा. २९)

बखरींतील हुतात्मेः—लढाईंत पडलेले सरदार वगैरे

गंगाजी नाईकांचे मदतनीसांपैकीं

इ. स. १७२२ रुपाजी भालेराव, नारोजी भालेराव व तानकोजि भालेराव ह्यांना फिरंग्यांनीं धरून गोवें येथें नेऊन तेलाचीं डगलीं आंगांत घालून जाळून मारले. (ब. पा. २३)

इ. स. १७३७ वसईवरील हल्ल्यांत दादाजी नाईक व भंडारी व खंडोजि बागराव व गुणाजी शिंदे पडले. (ब. पा. ४३)

इ. स. १७३८ फकीर महंमद जमातदार व वैजनाक परवारि धारावीच्या मेढ्यांत पडले, (ब. पा. ४६)

इ. स. १७३९ वसईच्या शेवटच्या लढाईंत गंगाजी नाईकाचे भाऊ मुन्हारजी नाईक पडले. (ब. पा. ५०)

पेशव्यांच्या सरदारांपैकीं

इ. स. १७३७ माहादाजि केशव, वाघोजिराव खानविलकर, राजबाराव वुरुडकर, बापुजी क्षिरसागर हे माहीमवरील मोच्यांत मृत्यु पावले. एकूण तीनसें माणुस मेले, (ब. पा. ४५)

१७३८ धारावीचे मेढ्यांत अमृतराव खानविलकर मृत्यु पावले. (ब. पा. ४६)

इ. स. १७३९ तारापूरचे हल्ल्यांत वाजी भीमराव पडले, (ब पा. ४८)

बखरींतील सरदार, योद्धे वगैरे

गंगाजी नाईकांचे सहकारी व मदतनीस

१ पाठारे क्षत्रिय २ शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन ब्राम्हण ३ पाठारे व चांद्रसेनीय प्रभु ४ सोमवंशी क्षत्रिय ५ भंडारी ६ कोळी ७ ख्रिश्चन ८ आगळे ९ मराठे १० मुसलमान ११ इतर मंडळी यांची माहिती.

१ पाठारे क्षत्रीय ज्ञातीची मंडळीं

१ गोरेगांवकरः—बापूजी गोरेगांवकर हे गंगाजी नाईकांना साष्टींत कोंडले होतें, त्यावेळीं मदतीस आले. नंतर कल्याणचे गोंधळाचे वेळींहि ते हजर होते. पुढें वेसाव्याच्या लागावर होते. मढचे कोटास मोरचे लावले व मढ घेतलें त्यावेळींही ते हजर असावेत असें दिसतें. कारण त्याठिकाणचे बापूजी ठाकूर बोरगांवकर ते हेच गोरेगांवकर असावेत असें दिसतें; कारण उ. को. प्रा. गं. शुक्ल. ब्राह्मण ह्या ग्रंथांत पुरवणी ६२ पानावरील कोलावर बापोजी ठाकूर मौजे गोरगाउ अशी सही आहे. हा कौल इ. स. १७३१ तला आहे.

२ जीतः—मालजी जीत हेच मालजी बापभुईकर (बाभईकर) असावेत असें दिसते. हे कल्याणचे गोंधळाचे वेळीं पहिल्यानें आलेले दिसतात. पुढें वेसावें मढाच्या लाग्यावर गेले व नंतर शेवटच्या मढाच्या हल्ल्याचे वेळीं, मढ घेतले तेव्हां हजर होते.

३ ठाकूरः—ह्या ठाकूर घराण्यापैकीं हराजि ठाकूर, हिराजी ठाकूर, पोसजी ठाकूर बापूजी ठाकूर, (हे मात्र गोरेगांवकर ठाकूर नव्हेत.) मालजी ठाकूर, मुन्हारजी ठाकूर असे सहा पुरुष ह्या मोहिमेंत गुंतले होते. हे मालाडचे असावेत असे 'मुन्हारजी ठाकूर मालाडकर' ह्या उल्लेखावरून वाटते. बापूजी ठाकूर गंगाजी नाईकांना साष्टींत कोंडलें होतें त्याचवेळीं दिसतात. पुढें ते कुठेही दिसत नाहींत. हिराजी ठाकूर कल्याणचे

गोंधळाचे वेळीं होते व मदचे बंदर घेतले त्यावेळींहि हजर होते. मुऱ्हारजी ठाकूर गोंधळाचे वेळीं व वेसाव्याचे लागाचे वेळीं हजर होते हरजी ठाकूर गंगाजी नाईकांना साष्टींत कोंडले त्यावेळीं, वेसाव्याचे लागाचे वेळीं व मढाचें बंदर जिंकलें त्यावेळीं हजर होते. मालजी ठाकूर वेसाव्याचे लागावर हजर होते व पोसजी ठाकूर मढाचें बंदर घेतलें त्यावेळीं हजर होते. आप्पासाहेबांना कृष्णाजी नाईकांनीं पाठविलेल्या पत्रांत पोस ठाकूरावद्दल शिफारस करितात कीं, 'पोस ठाकूर बरखंदाज शिपाई जदीद चाकरीस राहवयासी आला असे. कल्याणास ह्याची वस्ती आहे. शिपाई खबरदार असे. तैनात करार करावयाचा हुकूम करणार वडील समर्थ आहेत. शिपाई चांगला आहे. तैनात रुो आठ करावयासी आज्ञा केली पाहिजे. तैनात करार जालेयावर चाकरी मुरारजी नाईक यांचे जमावात करील' (पे. द. रु. ३४ पत्र २३) अखरींत दुसऱ्या ठिकाणीं उल्लेखलेला पोसजी कुवर तोच पोसजी ठाकूर असावा असें वाटतें.' ठाकूरांच्या घराण्यांतले अरेच पुरुष स्वधर्म संग्रामात होते असें दिसतें. पोसजी कुवर घोटवड्याखालीं कोशिंबड्यास फौज आणावयास इतरांबरोबर गेले होते. पे. द. रू. ३४ पत्र १५६ मधील भगवंत ठाकूर हे ह्याच ठाकूर घराण्यांतील असावेत.

४ देसाई:—नामाजी देसाई मालाडचे राहणारे. बेंडजी देसाई हेही मालाडकर होत नामाजी देसाई गंगाजी नाईकांचे मेहुणे व बेंडजी देसाई साले होते असें बखरकार म्हणतात. म्हणजे गंगाजी नाईकांची बहीण नामाजी देसायांची बायको असून बेंडजी देसाईंची बहिण गंगाजी नाईकांची बायको होय. एकाच घराण्याबरोबर हा अदलाबदलीचा सेईरेसंबंध होता. गंगाजी नाईकांना निदान एकतरी बहीण होती हें ह्यावरून सिद्ध होतें. बखरींत पुढें नामाजींना देशमुख म्हटलें आहे; म्हणजे देसायांचे घराण्यांत मालाडची देशमुखी होती हें सिद्ध होतें. पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या महासभेचे देसाई हे अधिकारी होत. नामाजी देसाई व बेंडजी देसाई गंगाजी नाईकांचे कामांत अथपासून इतिपर्यंत मदतगार होते असें दिसतें. युद्धनिर्धाराच्या प्रथम बैठकीच्या वेळीं नामाजी देसाई व बेंडजी देसाई हे दोघेही हजर होते. पुढें गंगाजी नाईकांनीं सहकुटुंब कल्याणास राहण्यास जाण्याचा विचार केला त्यावेळीं पुढें कोणी कोणती मदत करावयाची ह्याचा विचार केला. त्यावेळीं वांदरे वेसाव्याचे खाडीपार सैन्य नेण्याचें व वाटा दाखविण्याचें नामाजी देसाई व बेडंजी देसाई यांनीं कबूल केले. नामाजी देसायानीं साष्टीचे वेळीं मदत केली. गंगाजी नाईकांना साष्टींत कोंडलें त्यावेळीं मदत करावयासही हे दोघे देसाई पुढें आले. तसेंच लागाचे मसलतींत नामजी देसाई प्रथमपासून होते. कल्याणचे गोंधळाचें वेळीं फक्त नामाजी देसाई हजर होते. नामाजी देसाई पेशव्यांच्या सरदाराचे स्वागत करण्याचे प्रसंगाच्या बैठकींत हजर होते. वेसाव्याचे व मढाचे लाग्यास बेंडजी देसाई

गेले होतें पुढें बेंडजी देसाई बखरींत दिसत नाहींत. तेव्हां (इ. स. १७३७ च्या समयास) ते वारले असावे असें वाटतें. नामाजी देसाई हे वसईस मोरचे लावले त्यावेळीं मोरच्यांत हजर होते. पुढें युद्ध संपल्यानंतर दोन वेळां गंगाजी नाईक पुण्यास गेले त्या दोन्हीवेळां नामाजी देसाई त्यांच्याबरोबर पुण्यास गेले होते. वांदऱ्या वेसाव्याचे लागाचे वेळीं नेतोजी देसाई पुढें आलेले दिसतात. भानजी देसाई व गंगाजी देसाई हे वसईच्या मोरच्याचे वेळीं मोरच्यांत हजर होते. मढाचे मोरचे लावले त्यांत नानोजी देसाई व पदमणजी देसाई होते. वसईस सुरुंग उडाल्यावर कोटास सैन्य लागले त्यांत नेतोजी देसाई, गंगाजी व पदमणजी देसाई हे होते. गंगाजी देसाई व पदमणजी देसाई हे नेतोजीचे भाउ होत. हे तिघेजण नामाजी देसायांचे मुलगे असावे असें वाटते. एकूण ह्या संग्रामांत मालाडच्या देसाई घराण्यांतल्या पुष्कळ लोकांनीं भाग घेतलेला होता. भानजी व नानोजी हे बेंडजी देसायांचे मुलगे असावेत.

नाईकः—बाळ नाईक हे आमच्या नाईकांचे पूर्वज होत. भिव नाईक व तान नाईक हे त्यांचे भाऊ होत. हे तिघेही इ. स. १५८० ते १५९० च्या दरम्यान वांद्याहून कळवें व कळवें ते अणजूर असे आले व अणजूर येथें स्थाईक झाले. हे पाठारे क्षत्रिय ज्ञातीचे गृहस्थ असून ह्यांचें साळोंखें उर्फ चौलुक्य कुळ होय. नाईकांचें पहिलें उपनांव **राणे** होतें. ह्यांचें गोत्र वसिष्ट व देवी हरबाई आहे. प्रवर त्रिप्रवर आहे. वेसाव्याच्या समोरील मढ बेटांत ह्या देवीचें देऊळ आहे. तेथें हरडाई व हरबाई अशा दोन देवी आहेत. बिंबाच्या वंशजापैकीं एका राजपुत्रास व त्याच्या आईस अत्यंत जीवावरच्या प्रसंगांतून वांचविल्यामुळें ह्यांच्या पूर्वजांना नाईक ही पदवी मिळालेली आहे. ठाणें येथील राणे व नाईक ह्यांची देवी व गोत्र एकच आहे. तेव्हां फार पूर्वी हीं दोन्ही घराणीं एकच होतीं असें म्हणावें लागतें व ह्यांना नाईक ही पदवी मिळण्याच्या पुष्कळ आधीं ह्या दोन शाखा विभक्त झाल्या असाव्या. नाईकांना **महिमानराऊ** हें राजवैभव दर्शक पद मिळालेलें होतें. व **देशनाडगौडीपणा**चें वतन फार पूर्वीपासून ह्या कुळाकडे चालत आलेलें आहे. साळोंखी कुळ, राणे हें उपनांव, व महिमानराऊ ही पदवी ह्या तीन गोष्टींचा एकत्र विचार केला तर प्रस्तुतचे नाईक हे राजपुतान्यांतील एखाद्या रजपूत राजघराण्यांपैकीं असावेत असें दिसतें. बाळ नाईकाचा मुलगा लक्ष्मण नाईक, त्याचा मुलगा अर्जुन नाईक व त्याचा मुलगा निंब नाईक असा क्रम बखरींत असून नाईकांच्या छापलेल्या वंशावळींत हरजी नाईकाचा मुलगा लक्ष्मण नाईक असें आहे. बाळ नाईकांसच हरजी नाईक म्हणत असावेत. हल्लीं अणजूरकरांत कोतवाल आडनावांची मंडळी आहेत. त्यांचा व नाईकांचा तीन दिवसांचा सुहेर सुतकाचा संबंध आहे. ह्यावरून असा तर्क करितां येतो कीं भीव नाईकाचे किंवा तान नाईकाचे ते वंशज असावेत व अणजूरास आल्यावर त्यांना कोतवाल ही संज्ञा मिळून त्यांचा सुहेर सुतकाचा संबंध दुरावला असावा. कोतवा-

लांची हल्लीं वस्ती अणजूरास नसली तरी ते पूर्वापारचे अणजूरचेच राहणारे आहेत. गंगाजी नाईक हे बाळ नाईकांचे प्र–प्रपौत्र म्हणजे निपणतु होत.

गंगाजी नाईकांचे वडील निंब नाईक ह्यांनीं प्रल्हाद जोशी नांवाचा एक ब्राम्हण संभाजी राजाकडे पाठविला होता. पण पुढें संभाजीच्या वधामुळें हा मनसुबा राहिला. बखर टीप १४ पाहतां असें दिसून येईल कीं १७१८ पर्यंत निंब नाईक जिवंत होते. संभाजीच्या वधामुळें निंब नाईकांची इच्छा असतानाही त्यांना ही मोहीम पुढें चालवितां आली नाहीं. जिथें मराठ्यांचें राज्यच विस्कळीत झालें होतें तिथें नवीन मोहीमी कोण हातांत घेणार ! राजाराम महाराजांचें आसन डळमळीत होऊन मराठी राज्यच लयास जातें कीं काय असा संशय उत्पन्न झालेला असतां निंबाजी नाईकाच्या इच्छेस कोण पुसणार ! पुढें १७०८ त शाहू महाराजांचा अंमल सुरु झाला. पण कोल्हापुराविरुद्ध व तत्सम इतर अडचणी दूर करून त्यांना आपलें राज्य प्रथम स्थिर करावयाचें होते व त्यामुळें त्यांना सुद्धां ही मोहीम हातीं घेणें शक्य झालें नाहीं. इ. स. १७१८ च्या सुमारास थोडथोडी स्थिर-स्थावरता होत चालली होती. **' घरांतील कजीये '** मधील तिखटपणा कमी होत होता. अशावेळीं शहाजीची मराठी राज्यस्थापनेची इच्छा ज्याप्रमाणें शिवाजीनें पुरी करण्याचें ठरविल्याप्रमाणें गंगाजी नाईकांनीं आपल्या वडीलांची इच्छा पूर्ण करण्याचें ठरविलें. इतक्यांत इ. स. १७२७ त पेशव्यांचा कल्याणास अंमल बसला. वसईच्या मोहिमेचा प्रश्न मराठे मंडळांत कोणी काढळल्यास त्याबद्दल स्वस्थपणें विचार करण्या-सारखी परिस्थिति ह्यावेळीं उत्पन्न झाली होती. श्रीमंत बाजीराव पेशव्यांच्या आकांक्षांना ह्यावेळीं हिंदुपद पादशाही सर्वत्र दिसत होती. अर्थात् पश्चिमेकडे लक्ष्य देण्याच्या स्थितीपर्यंत पेशवे आले होते. इतक्यांत निंब नाईक वृद्ध होऊन मरण पावले व गंगाजी नाईकांनीं फिरंग्यांच्या जुलमाचा प्रश्न हातीं घेऊन शेवटास न्यावयाचें ठरविलें.

निंब नाईकांना दोन स्त्रिया होत्या. पहिल्या पत्नीचा मुलगा शामजी होय. दुसरी पत्नी मायाजी राऊत कळवेकरांची बहिण ही असून हिच्यापासून त्यांना १ गंगाजी २ बुबाजी ३ मुऱ्हारजी ४ शिवजी व ५ नारायणजी असे पांच पुत्र झाले. गंगाजी नाईकांनीं कांबे–अंमरनाथ येथें मातोश्रीच्या स्मरणार्थ तळें बांधलें व त्याचें नांव देकाळें ठेविलें. ह्यावरून त्यांच्या आईचें नांव देवकी असावें असें वाटतें. शामजीचे वंशज व गंगाजी आदीकरून पांच भावाचे वंशज अणजूर येथेंच रहात असत. वरची आळी व खालची आळी अशा दोन आळ्या अणजूरांत आहेत. वरच्या आळींत शामजीचे वंशज राहतात व खालच्या आळींत ह्या पांच भावांचे वंशज राहतात. अणजूर हे गांव पांच भावांना पेशव्याकडून इनाम मिळालेलें आहे. त्यांतला कांहीं हिस्सा ह्या पांच भावांनीं शामर्जाचे वंशजानांही दिलेला आहे. हे पांच भाऊ लढाईत गुंतले असतांना शामजी नाईक लोनाडास विभक्त राहत होते.

त्यांचे पुत्र कृष्णाजी नाईक ह्यांनीं ह्या मोहिमेंत फार महत्त्वाची कामगिरी बजाविली होती हें बखरीवरून दिसून येतें. पेशव्यांचे दप्तर रु. ३४ प. १२२ मध्यें मदनाजी नाईक अणजूरकर ह्यांचा उल्लेख आहे. पण हे मदनाजी नाईक कोण हे समजण्यास मार्ग नाहीं. भीव नाईक किंवा तान नाईकांपैकीं कोणाचे तरी ते वंशज असावेत, तसेंच पे. द. रु. ३४ प. ३६ व प. १३१ मध्यें बाबूजी नाईकांचा उल्लेख आहे तेही वरीलपैकीं कोणाचे वंशज असावेत किंवा बुबाजी नाईकाचे ऐवजीं बाबूजी नाईक असे उलट नांव पडलें असण्याचा संभव आहे. 'गंगाजी नाईकांचा जांवई गणोजी नाईक' असा एक उल्लेख पे. द. रु. ३४ पत्र ६ मध्यें आला आहे. पण हे गणोजी नाईक कोण हें समजत नाहीं. साष्टींत अणजूरकर नाईकांशिवाय नाईक नाहींत. अणजूरकर नाईक सर्व सगोत्री आहेत. तेव्हां गणोजीचे आडनांव निराळेंच असावें व त्यांना पत्रकारानें चुकून नाईक म्हटलें असावें असें दिसतें. गंगाजी नाईकांना मुलगी होती हेंमात्र ह्यावरून सिद्ध होतें.

बुबाजी नाईक फार करून ठाण्यास राहात असत. त्यांचें देहावसान ठाण्यासच झालें. साष्टीची सुभेदारी ते करीत, नंतर शिवजी नाईकानीं ती केली. शिवजी नाईक अणजूर येथें मृत्यु पावल्यानंतर ही सुभेदारी रामजी सुभेदाराकडे गेली असें म्हणतात. इ. स. १८०८ तल्या इंग्रजांच्या ठरावांत त्यांच्या कामगिरीचा व त्यांच्याकरितां बसविलेल्या कराचा उल्लेख आहे. त्यांची वडील बायको त्यांच्या प्रेतासहवर्तमान सती गेली. तें ठिकाण कोपिनेश्वराचे देवळाच्या आवारांत आहे. हल्लीं जेथें धर्मशाळा आहेत तेथेंच पूर्वी स्मशानभूमी होती. त्या देवळाचे आवारांत जें एक जुनें तुलसी वृंदावन आहे तेंच सतीचें ठिकाण असण्याचा संभव आहे. कोतवालांच्या घराण्यांतील एक बाई अणजूरला सती गेली होती. नाईक हे पूर्वीचे रजपूत घराण्यांतील असावेत अशा वरील विधानास ह्या सती जाण्याच्या पद्धतीनें दुजोरा मिळतो. मुन्हारजी नाईक रणांगणावर धारातीर्थी पडल्यानंतर त्यांची स्त्री येसूबाई हिनें तीन वर्षेंपावेतों सूर्यदर्शन अथवा दीप-दर्शनहि घेतलें नाहीं अशी आख्यायिका आहे.

गंगाजीनाईक आपले बहिणीसहवर्तमान काशी येथें गेले व पूर्ण संन्यस्तवृत्तीनें त्याठिकाणीं राहिले. पुढें कांहीं काळानें त्यांचें देहावसान शांतचित्तानें व संतमहंताच्या सहवासांत मिळण्याच्या समाधानानें झालें. गंगाजींची एक रोजनीशि होती, त्यांत त्यांची सर्व दिनचर्या लिहिलेली होती. आज ती रोजनिशी असती तर वसईच्या धर्मसंग्रामाचा इतिहास लिहिणेस फार मदत झाली असती. नाईकांच्या घराण्यांतील कै. रामचंद्र सखाराम नाईक यानीं ती कै. रामचंद्र मंत्री यांचेकडे दिली होती असें सांगण्यांत येतें पण पुढें ह्या बाबतींत काय झालें तें समजत नाहीं.

६ राऊत;—मायाजी राऊत हे कळव्याचे राहणारे. हे गंगाजींचे मामा होत. हे युद्ध-निर्णयाच्या प्रथम बैठकींत हजर होते. गंगाजी नाईक सहकुटुंब कल्याणास आले त्यावेळीं मायाजी राऊत त्या बैठकींत होते त्यांनीं गंगाजींचें सैन्य कळव्यांतून ठाण्यास नेण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें साष्टीचें हल्ल्याच्यावेळीं मदत केली. इ. स. १७३० च्या कळव्याचे लुटींत गंगाजीनीं ह्यांचे घर बचावलें. इ. स. १७३१।३२ च्या सुमारास हे वारले असावे असें दिसतें. कारण पुढें स. १७३२ च्या सुमारास पेशव्यांचे सरदारांची खात्री करण्या-संबंधानें जी बैठक झाली त्यावेळीं व कोळ्यांच्या बोला चाली झाल्या त्यावेळीं लक्ष्मण राऊ-ताचें नांव त्यांत आहे. ह्यावेळेपासून पुढें मायाजी राऊताचें नांव बखरींत नसून लक्ष्मण राऊताचेंच नांव आहे. लक्ष्मण राऊत मायाजी राऊताचे मुलगे दिसतात. लागाचे उतारांचे कोळी लोकांच्या बोला चाल्या लक्ष्मण राउताचे घरीं होत असत. ह्यावेळीं गंगाजीनी लक्ष्मण राऊताना बोध केला आहे. पुढें अणजूरास भवानीच्या गोंधळाचे वेळीं लक्ष्मण राऊत कल्याणास गेले होते. पेशव्यांचे सैन्य बाळागांवास आले त्यावेळीं लक्ष्मण राऊत त्या सैन्यास आणण्यास पुढें गेला व ठाणें घेतल्यानंतर आप्पासाहेब ठाण्यास आले त्यावे-ळींहि लक्ष्मण राऊत सामोरे गेले होते. ह्यावरून असें दिसतें कीं लक्ष्मण राउतानें विशे-षतः लागमागाचें काम केलें आहे.

७ वसईकर:—नारायणजी सुतार हे वसईकर होत. हे गंगाजीचे जांवई होते. अर्थात् १७१८ सनाच्या वेळीं गंगाजींना मोठी मुलगी असली पाहिजे. हे प्रथमचे युद्ध-निर्णयाचे बैठकीस हजर होते. नंतर नानजि उर्फ नारायणजी सुतार हे गंगाजी नाई-कांनीं कल्याणास सहकुटुंब जाण्याचा निर्धार केला त्या बैठकीस हजर होते. त्यावेळीं त्यानीं फौज दादराचे खाडीपार नेण्याचें कबूल केलें. पुढें पेशव्यांचे सरदारांना लागमाग दाख-वावयाचे वेळीं व त्यानंतरचे बैठकीस गणेशजी सुतार हजर होते. ह्यापुढें नारायणजी सुतार मरण पावले असावेत. गणेशजी, रघुजी हे नारायणजींचे मुलगे असावेत. कल्याणचे गोंधळाचे वेळीं गणेशजी हजर होते व त्यावेळीं रघुजीही होते. गणेशजी पेशव्यांचे माणसांस उभेळ्याहून सुतार ओळीत व तेथून कोटात नेत व लागमाग दाखवीत. तुंगारचे रानांतल्या फौजेस गलबतें आणण्याचे कामावर गणेशजी होते. उभेळ्याच्या खाडीचे कांठी गणेशजी त्या फौजेस पार नेण्यास गेले होते. गुजाबाई सुतारीण हीनें ह्यावेळीं फार मोठी मदत केली अशी आख्यायिका आहे. ही सुतार आळींत रहात होती. ह्या सर्व गुप्त बैठकी व हालचाली ह्या बाईचे घरीं चालत असत. गंगाजी नाईकांची रोजनिशी होती. त्या रोजनिशींत गंगाजी नाईकांची दिनचर्या लिहिलेली होती. त्या रोजनिशींत ह्या कारस्थानीव राजकारणी बाईची पुष्कळ माहीती होती असें ती रोजनिशी वाचलेले गृहस्थ सांगत असत. साहानी, रायकर, पत्की (पदके) दांडेकर हीं वसईकरांचीं घराणीं आहेत. ह्यापैकीं कोणत्या

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं..... नं.....
ता.....

घराण्यांतील वरील नारायणजी वगैरे मंडळी आहेत तें तपास करूनही अद्यापि समजले नाहीं. वसईस पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या वस्तीच्या ठिकाणास सुतारआळी म्हणतात.

८ **सुरवे दहिंसरकर:**—पाठारे क्षत्रिय ज्ञातींत सुरवे असें आडनांव पूर्वी असावें असें ह्या उल्लेखावरून वाटते. मात्र हल्लीं हें नांव रुढ असलेलें दिसत नाहीं. कल्याणास गंगाजी नाईकांनीं भवानीचा गोंधळ घातला त्यावेळीं हे जसवंतजी दहिंसरकर प्रथम हजर होते असें दिसतें. अर्थात हे जसवंतजी भाईदरजवळच्या दहिंसर गांवचे राहणारे होत. पुढें जसवंतजींचा उल्लेख वेसावे–मढचे लागाचे वेळीं केलेला आहे. रायाजी सुरवेना अरनाळ्याचे लागावर पाठविलेले होते. हे रायाजी जसवंतजींच्या घराण्यांतील असावेत. मुधें येथील फिरंग्यावरील हल्ल्याचे वेळीं व वसईच्या कोटावर शेवटचा निकराचा हल्ला केला त्यावेळीं जसवंतजींचें नांव येतें व ह्या दोन्ही ठिकाणीं त्यांना सुरवे म्हटलेलें आहे. जसवंतजी सुरवे व जसवंतजी दहिसरकर एकच समजण्याचें कारण असें आहे कीं दोन्ही ठिकाणी ह्यांचा साष्टीचे पाठारे ज्ञातीचे असा उल्लेख बखरींत आहे तेव्हां दोन्ही जसवंतजी एकच असावेत.

९ **हैबतराव:**—लाडकोजी हैबतराव हे भाईंदरचे राहणारे होत. ह्यांची मुलगी गंगाजी नाईकांचे मुलाला दिलेली होती व त्याबद्दलचें एक पत्र भाईदरचे पाटील श्री. दिनानाथ शिवराम यांचे जवळ होतें त्यांनीं तें पत्र एका गृहस्थांस दिलेले आहे. त्यांच्याकडून त्यांना तें अद्यापि परत मिळालेलें नाहीं. दिनानाथजी हे लाडकोजींचे वंशज आहेत असें ते म्हणतात. पण त्यांची वंशावळही उपलब्ध झालेली नाहीं. ह्यांचें आडनांव ठाकूर असावें. कारण ल. को. प्रा. ग. बा. ह्या पुस्तकाचे पान ६४ वर त्यांची लाडकोजी ठाकूर भाईंदरकर अशी सही आहे. युद्धनिर्णयाचे पहिले बैठकीस हे हजर होते. गंगाजी नाईक सहकुटुंब कल्याणास गेले त्यावेळच्या बैठकीस हे हजर राहून फौज धारवीस नेण्याचें त्यांनीं कबूल केलें होतें. पुढें इ. स. १७३१।३२ सालांत हे मरण पावले असावेत. कारण पुढें बखरींत ह्यांचे नांव नसून पेशव्याच्या लोकांची खात्री करण्याकरितां लागमागाचे निर्णयाकरितां झालेल्या बैठकीस भिकाजी हैबतराव हजर राहिलेले होते. भिकाजी हैबतराव व कुकजी हैबतराव हे दोघेजण लाडकोजींचे बंधु असावेत असें दिसतें. कल्याणचे गोंधळाचे वेळीं भिकाजी हैबतराव हजर होते. मढाचे लागाचे वेळीं भिकाजी हजर होते. मुर्ध्याचे हल्ल्याचे वेळीं कुकजी हैबतरावांचें नांव वाचावयास मिळतें. मढचें बंदर घेतांना भिकाजी हैबतराव होते. व शेवटच्या वसईवरील हल्ल्याचे वेळीं कुकजी व भिकाजी हे दोघेही हजर होते.

२ शुक्लयजुर्वेदीय माध्यंदिन ब्राह्मण

अंताजी रघुनाथ कावळे ह्यांनीं ह्या मोहिमेंत बऱ्याच महत्वाची कामगिरी बजाविली आहे. हे माहीमचे वतनदार होते. ह्यांचे वतन फिरंग्यानें इ. स. १७२९ च्या आगेमागें

जप्त केलें होतें असें दिसतें. पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या लोकांचे हे उपाध्याय असून ह्यांचे त्यावेळीं त्या प्रान्तावर मोठें वजन होतें. अशा स्थितींत भयंकर धर्मच्छलानंतर व वतन जप्त झाल्यानंतर त्यांनीं ह्या मोहिमेंत भाग घेणें साहजिकच होतें इ. स. १७३० च्या कांबेच्या लढाईत ते गंगाजी नाईकांबरोबर होते. पुढेंही अनेक लढायांत व उलाढालींत त्यांनीं गंगाजी नाईकांचे बरोबर भाग घेतला होता. पुण्यास व कुलाब्यास बऱ्याच वेळा हे गंगाजींच्या बरोबर गेलेले होते असें बखरीवरून दिसते. १७३४ त त्यांनीं पेशव्यांचे कडून इंग्रजांना आपल्या वतनाबद्दल पत्र पाठविलें होतें पण त्याचा उपयोग झाला नाहीं. हल्लीं कावळे ऊर्फ जावळे हे त्यांचेच वंशज आहेत. अंताजी रघुनाथ, रामचंद्र रघुनाथ, गणेश रघुनाथ, जगजीवन रघुनाथ असे हे चौघे बंधु होते असें दिसतें. ह्यांना सरदेसाई व सरदेशपांडेपणाचीं वतनें मिळालेलीं होतीं. मुंबईहून फिरंग्यांच्याकडून बातमी आणण्याचें काम ते करीत असत. ते शीघ्रकोपी होते असें म्हणतात. (उ. को. इ. पान २६) त्यामुळें त्यांचें व इकडील वासुदेव जोशी वगैरे अधिकाऱ्यांचें मुळींच पटत नसें असें दिसतें. त्यांच्याबद्दल जोशी वगैरे मंडळी नेहमीं साशंक असत असें पे. द रु. ३४ व १६ मधील कांहीं पत्रें वाचली असतां दिसतें. ह्या पत्रांतून त्यांच्या बद्दल अनेक वेळां पत्रलेखकांनीं पेशव्यांकडे तक्रारी केलेल्या दिसतात. (पे. द. रु. १६ पत्र ३८ पे. द. रु. ३४ पान ५३ पे. द. रु. ३४ पत्र ८४) पण स्वतःवर केलेल्या कांहीं आरोपांच्या निरसनाबद्दल व कल्याणच्या सुभ्यास कांहीं गोष्टी न कळविण्याबद्दल अंताजीनें पेशव्यांना पत्रें लिहिलेलीं आहेत (पे. द. रु. ३४ पत्र ५१ व पे. द. रु. १६ पत्र २४) पण पेशव्यांनीं अंताजी रघुनाथ व गंगाजी नाईक यांना घेऊनच हें राजकारण करीत जावें असें वारंवार इकडील सुभेदारांना लिहिलें आहे. (पे. द. रु. १६ पान ८ व पत्र ३७ व पत्र ३१) अंताजी रघुनाथांना पेशव्यांनीं कबूल केल्याप्रमाणें वतनें दिलीं नाहींत असें रावबहादुर जोशी आपल्या उ. को. इ. मध्यें पान २६ वर म्हणतात. व तें खरेंही आहे. कारण बखरींत गंगाजी नाईक म्हणतात 'वतनदाराची वतनें व वृत्त्यांशी ब्राह्मणांच्या वृत्ती न सुटत तव आपलेही वतन न सुटे' अंताजी रघुनाथांना पेशव्यांकडून आलेलीं पत्रें हेमाद्री, उत्तर कोंकणचा इतिहास, उ. भा. प्रा. गं. शु. ब्राह्मणच्या ग्रंथांतून छापलेलीं आहेत.

३ पाठारे व चांद्रसेनीय प्रभू ज्ञातीची मंडळी.

गणेशजी प्रभू व गंगाजी प्रभू हे पाठारे प्रभू लोनाडास गंगाजी नाईकांचेकडे पळून गेले होते. त्यानंतर गंगाजी, दादाजी व माहादाजी कृष्ण हे कल्याणावरील फिरंग्याचा हल्ला परतविण्यांत प्रमुख होते. रायबा चिटणीस व बापुजी प्रभु चिटणीस हे चिटणीस ह्या आडनांवावरून कायस्थ प्रभू असावेत असें दिसतें. रायबा कळवें

लुटण्यास हजर होते. बापूजी क्षिरसागर हेही कायस्थ आहेत. हे क्षिरसागर माहीमचे मोरच्यांत लढाईत पडले. रायबा व खंडोबा पुन्हा माहीमास मोरचे लावले त्यावेळीं होते. बापूजी चिटणीस हे धारावीचे हल्ल्याचे वेळीं हजर होते. माहादाजी कृष्ण प्रभू म्हणून हे एक दुसरे निराळे पेशव्यांचे मोठे सरदारच होते. गंगाजी, गणेशजी, व दादाजी व माहादाजी हे एकमेक भाऊ असावेत. माहादाजी सरदार व हे माहादाजी प्रभु एकच आहेत किंवा काय तें समजण्यास साधन नाहीं. खंडोजी प्रभू वसईकडील आघाडीस होते. खंडोबा प्रभू दोनही वेळच्या माहीमचे मोरच्यांत होते. (पे. द. रु. १६ पत्र ९८ व १३४) धारावीच्या मोरच्यांत खंडोबा होते. (पे. द. रु. ३४ पत्र १३४) रायबा मरतन सिरवेलचे हवेलीस होते. (पे. द. रु. ३४ पत्र १६१) बाबनजी प्रभू सुदजी (सुंदरजी) प्रभू, व गणेशजी प्रभू हे सर्व वसईवरील हल्ल्याचे वेळीं सर्व साहित्य करण्यास गंगाजी नाईकांचे बरोबर होते. सुंदरजी प्रभू हे दादाजी अनंत प्रभू ह्यांचे भाऊ होत. बबनजी उर्फ बाबनजी हेही त्यांचे जवळचे भाउबंद असावेत. दादाजी प्रभू व त्यांचा मुलगा माहीमच्या मोरच्यांत पडले 'दादाजी बरासा, मर्दाना व शाहाणा मनुश होता त्याचे गुणानुवाद केती ल्याहावे ? बरे.' 'दादाजी बहुतसा शाहाणा माणूस माहीत होता...दादाजी मातबर मनसबेबाज होता' अशारीतीनें सुंदरजीचे भावांचे वर्णन केलेलें आढळतें (पे. द. रु. १६ प. ९८ व १२१) सुंदरजीची बायको व कबीला इंग्रजाचे ताब्यांत मुंबईस होता. म्हणजे हे मुंबईचे रहिवाशी होतें असें दिसतें 'याणी आल्या ताा श्रमहि बहुत केला. पुढें करीत आहेत' असें सुंदरजीबद्दल म्हटलें आहें. (पे. द. रु. १६ पत्र १२१) यादवजी प्रभू कोल्हेरकर हे गंगाजीचे मदतनीस नव्हते पण रामचंद्रपंताकडे फिरंग्यांचे हेर म्हणून नोकरीस होते. गंगाजी नाईक मरोळची माडी लुटण्यास जात असल्याची खबर ह्यांनींच फिरंग्यांना दिली.

४ भंडारी ज्ञातीची मंडळी.

बखरींत तुंग चोरघा भंडारींचें नांव वसईवरील हल्ल्याचे वेळीं येतें. पण ह्यांनीं ह्या मोहिमेंत बरीच महत्वाची कामगिरी केलेली असावी. पेशव्यांकडून त्यांना गेलेलें एक अस्सल पत्र आमच्या संग्रहीं असून त्यावरून तसें अनुमान निघतें. जेवढे परवारी आहेत ते सर्व भंडारी ज्ञातीचेच गृहस्थ होते असें दिसतें. चागनाक परवारी हे कळव्याचे हल्ल्याचे वेळीं व साष्टीची फौज आणण्याचें वेळीं हजर होते. धागनाक परवारी बावामलंगास फौज आणणाऱ्यांचेबरोबर होते धागनाक परवारी हे बाऊा खेड्यापर्यंत पुढें गेले होते. ठाण्याच्या किल्ल्यावरील तोफांची सरबत्ती ऐकल्यानंतर चिमणाजी आप्पाना गणनाक परवारी यानेंच ठाण्यास रात्रीचे रात्रींच आणलें. भर पावसाळ्यांत वसईचे कोटावर हल्ला करीतांना, दादाजी नाईक व इतर भले भले भंडारी लोक मृत्यु पावले. राघनाक परवारी

हे घोटवड्याकडे माहुलीची फौज आणावयास पुढें गेले होते. हे भंडारी लोक वसईचे किंवा त्याच्या आजूबाजूच्या गांवचे राहणारे असावेत. ह्या मंडळींनीं लागाचे व वाटाड्याचे काम मुख्यतः केलेलें दिसतें. वैजनाक परवारी धारावीचे मेढ्यांत मृत्यु पावला. खंडनाक १३ राऊतांसह शिरगांवास मोरच्यांत होता. [पे. द. रु. १६ प. ७ व १२८ पे. द. रु.३४ पत्र १४६] धागराउत व गणराउत शिंदे भंडारी यांना पेशव्यांचेकडून आलेलें अस्सल पत्र आमच्यापाशीं आहे. ह्यावरून हे वसईचे राहणारे दिसतात. व त्यांचें आडनांव राऊत असावें असें दिसतें.

५ सोमवंशी क्षत्रिय ज्ञातीची मंडळी.

उमेळ्यांस राहणारे चौधरीच फक्त ह्या बखरींत आहेत. पा. क्ष. ज्ञातींतही चौधरी आहेत. पण हे चौधरी सोमवंशी क्षत्रीय असावेत असें दिसतें. गंगाजीचे लोक ज्यावेळीं पेशव्यांचे सरदारास खात्री करण्याकरितां आणीत त्यावेळीं उमेळ्यास कुकर चौधरीकडे राहात असत. लखम चौधरी हे कुकर उर्फ कुक चौधरीचे भाऊ असावेत. गंगाजीच्या भवानीच्या गोंधळाच्या वेळीं लखम चौधरी आले होते. तसेंच हे चौधरी तुंगारचे रानांत बातमी देण्याकरितां राहिले होते. पुढें उमेळ्याचे बंदरीं कुक चौधरीनें फौज उतरावयास एक गलबत आणलें होतें. माहादाजी आंबेमोडा हे सुद्धां सोमवंशी क्षत्रियच असावेत तुंगारचे रानांत व उमेळ्यास गलबत आणण्याचे वेळीं चौधरीबरोबर आंबेमोडा हजर होते. राजावळीच्या तान्यावर उतरून चौकीवर जातांना वाट दाखविण्यास आंबेमोडाच होते. ह्या मंडळींनीं वाटाड्याचें व लागाचें काम विशेषतः केलेलें दिसतें.

६ कोळी ज्ञातीची मंडळी.

मायाजी राउत कळव्यास राहत होते. त्यांना गंगाजीनें निरोप पाठवून कांव्याहून साष्टींत जाण्याचे वेळीं कोळी लोकांना तयार राहण्यास सुचविलें. अर्थात् हे ठाण्याचे चेंदणींतील किंवा इटाळ्याचे कोळी असावेत. गंगाजीनीं भवानीचा गोंधळ घातला त्यावेळी हांशा कोळी कल्याणास आला होता. तसेच लक्ष्मण राउताचे बरोबर बाळाखेड्यापर्यंत सैन्याचे पुढें वाट दाखविण्यास हांशा कोळी व चाह्या कोळी आले होते.

७ खिश्चन ज्ञातीची मंडळी.

वसईच्या किल्ल्याच्या बुरुजावरील कपतान गंगाजीला वश होता, हा खिश्चन होता. तसेंच अरनाळ्याच्या किल्ल्यांतीलही एक खिश्चन कपतान गंगाजीस वश होता. वसईचा कपतान पेशव्याचे लोकांना बुरुजावरून सर्व माहिती देत असे. गंगाजी नाईकांनीं अरनाळेच्या कपतानास वसईस आपल्याबरोबर नेलें. तसेच जावदेनु जारा-

४३३

हातीं गंगाजी नाईकांनीं ठाण्याचे किल्ल्याचे हल्ल्याचे वेळीं पहारेकऱ्यांनां पांच रुपयांचा अफू पाजली होती. पे. द. रु. ४३ पत्र ६ व १३९ पत्रांमध्यें ज्या कपतानाचा उल्लेख केला आहे तोच हा वसईचा कपतान होय.

८ आंगळे (कुणबी) ज्ञातीची मंडळी.

खंड पाटील हे बोळंज्यास राहत होते असें दिसतें. गलबतांची सोय करण्याकरितां त्यांना गंगाजीनें बोळंज्यास ठेविलें होतें. नारायण शिव पाटील हेही खंड पाटीलापैकींच असावेत असें वाटतें. हे साष्टीवर चालून जाणाऱ्या फौजेंत होते.

९ राव (मराठे) ज्ञातीची मंडळी.

हबाजी हिंदुराव व काशीबा हिंदूराव तसेंच भालेराव बंधु हे रावज्ञातीपैकीं किंवा मराठे असावेत. हबाजी हिंदुराव व काशिबा हिंदुराव ह्यांनीं गंगाजी नाईकांना प्रथमपासून शेवटपर्यंत मदत केलेली आहे. गंगाजी नाईक साष्टींत कोंडले होते त्यावेळीं हबाजी हिंदुराव व जिवाजी भालेराव ह्यानींच बाळखूमच्या बंदरीं गलबत नेऊन त्यांना उतरून पार आणलें, त्यामुळें त्यांना फिरंग्याचे भयानें लोनाडास पळून जावें लागलें. पण रुपाजी भालेराव व त्याचे भाउ नारोजी व तानकोजी ह्यांना फिरंग्यांनीं गोव्यास नेऊन जाळलें. दोघे हिंदुराव हे भाऊ भाऊ असावेत व जिवाजी भालेराव वगैरे हे चौघे भाउ असावेत. वसत–शेलवलीचा राहणारा बाबाजी आडठराव हाही राव असून तो दुर्गाडीचे हल्ल्याचे वेळीं कल्याणास होता. वसईकडील फौजेचे अघाडीस इतरांबरोबर काशिबा हिंदुराव होते. ते माहुलीहून फौज घेऊन कोसिंबड्यावर आले.

१० मुसलमान लोक.

फकीर महंमद जमादार किंवा जमातदार बावामलंगाचे वाडीस सैन्य आणणाऱ्यांच्या बरोबर कांहीं कोळी व दीडशें लोक घेऊन गेला होता. फौज घेऊन बाळाखेड्यांपर्यंत हा आला होता. हा अणजूरकरांचा एकनिष्ठ जमातदार फकीरमंहमद धारावीचे मेढ्यांत मृत्यु पावला. गंगाजीनें हा फकीर महंमद तेरा असामीसह शंकराजी केशवाकडे पाठविलेला होता असें दिसतें (पे. द. रु. ३४ पत्र १३९)

११ इतर मंडळीची माहीती.

गोविंद कासाराबरोबर गंगाजीनें अरनाळ्यास कौल पाठविला.

दत्ताजी मुके हे कळव्याच्या लुटीचे वेळीं सैन्याबरोबर होते.

खंडोजी लोढ्या हे भवानीच्या गोंधळाचे वेळीं कल्याणास हजर होते. हे खंडोजी पे. द. रु. ३४ पत्र ६ मधील खंडोजी घुडे असावेत.

खंडोजी लोवर, खंडोजी गायकवाड व माहादाजी तैलंगे हे घोटड्याखालीं कोशिंबड्यापर्यंत फौज आणावयास गेले होते. पे. द. रु. १६ पत्र १४२ त माहादाजी लिंगोजी आहेत; ते हे तैलंगे असावेत.

नारायणजी नाईकांबरोबर धारवीस गेलेले हे गोपाळ पे. द. रु. १६ प. ११ मधील गोपाळ महादेव असल्यास नकळे.

खंडोजी बागराव हे वसईस किल्ल्यावर पावसाळ्यांत हल्ला केला त्यावेळीं मरण पावले. बाजी बागराव देसाई बासोरकरांचा हा मुलगा सुलतानढवियाचे ठिकाणीं शिडीवर चढतांना मृत्यु पावला. बाजी भिलारे हाही त्याच शिडीवर मृत्यु पावला. ही शिडीची हकिकत व बखरींतली शिडीची हकीकत एकमेकांबरोबर जुळते. पे. द. रु. ३४ पत्र ७२

पेशव्यांचे सरदार वगैरे

हरजि नाईक गायकवाड
अंतोजि महाजन } हे रामचंद्रपंतांचे पदरीं कल्याणास होते.

संताजी घाईभोर:—हे पेशव्यांचे पदरचे सरदार.

रामचंद्रपंत महादेव:—हे कल्याणचे प्रथमचे सुभेदार. कृष्णराव महादेव हे त्यांचे भाऊ होत. हे चासकर जोशी होत. लोहगड किल्ल्याचा कारभार ह्यांचे वडीलांकडे होता. कृष्णरावांना चासगांव पेशव्यांनीं सरंजाम दिला होता. ह्यांची बहीण बाजीराव पेशव्यांना दिली होती. कृष्णरावांनीं वसईच्या संग्रामांत व इतरत्र बाजीराव पेशव्यांचे वेळीं बरीच कामगिरी केली आहे. कांहीं वर्षें कृष्णराव हे कल्याणचे सुभेदार होते. गंगाजी नाईकांनीं ह्या मोहीमेची मसलत प्रथम रामचंद्रपंतांबरोबरच केली व ती निश्चित झाल्यानंतर पेशव्यांकडे अनुसंधान लाविलें. रामचंद्रपंत १७२८ त मरण पावले. कृष्णराव कांह्याचे लढाईंत हजर होते. ह्यांचे वंशज हल्लीं कल्याणास आहेत. त्यांना लोनाडगांव इनाम आहे.

रामचंद्रपंत हरि:—हे पटवर्धनापैकीं आहेत. गणेश हरि व वासुदेव हरि, रघुनाथ हरि हें ह्यांचे बंधु होत. ह्यांनीं वसईच्या मोहीमेंत महत्वाची कामगिरी बजावली आहे. माहीमचे हल्ल्यांत ह्यांच्या उजव्या हातास गोळी लागली. हे पेशव्यांचे सरदारांपैकीं होत.

माहादाजी कृष्ण प्रभू:—बाजीरावाचे सरदारांपैकीं एक सरदार.

स्थळ प्रत
सं. ..... सं. .....
ता. .....
हा जो.

शंकराजी केशव फडके:—माहादाजी केशव व हे सख्खे बंधु होत. शंकराजीपंतांनीं वसईच्या मोहीमेंत फारच वाखाणण्यासारखी कामगिरी केली. माहादाजीपंत हे माहीमचे मोर्च्यांत पडले. कल्याणच्या हल्ल्यापासून ते शेवटपर्यंत, शंकराजीपंतांनीं ह्या मोहीमेंतला महत्वाचा कार्यभाग उचलला होता. ह्यांना पुढें वसईचे सुभेदार केलें असें म्हणतात. ह्यांचे वंशज हल्लीं पुण्यास हशबनीस नांवानें प्रख्यात आहेत. ह्यांना ठाणें जिल्ह्यांत बऱ्याच ठिकाणीं पेशव्यांचे वेळचीं इनामगांवें आहेत. गंगाजी नाईक ह्यांना सहावे बंधु मानीत असत असें म्हणतात ह्यांना अणजूरगांवचे गुमास्तेगिरीकरितां नाईकांनीं आपल्या इनामांतला सहावा हिस्सा लिहून दिल्यामुळें हल्लीं त्यांना अणजूर गावांतला इनामाचा सहावा हिस्सा मिळतो. ह्यांना देशपांडेपणाचें वतन होतें. बाळाजी केशव, शंकराजी केशव व धोंडो केशव हे तिघे बंधु असून माहादाजी केशव हे त्यांचे आजेबा होत. त्यांचें सूत्र अश्वलायन गोत्र अत्रि होय. ह्यांचे पुरातन वतन मौजे मुरधे, तर्फ पावस, प्रांत राजापूर येथें होतें. पेशव्यानीं प्रगणें माहीम येथील कुळकर्णी शंकराजी केशव ह्यांना दिलें.

विठ्ठलपंत व चिमणाजीपंत:—कल्याणचे सुभेदार कृष्णराव यांचे हे कारभारी. ह्यांनी शेवटपर्यंत ह्या मोहींमेंत भाग घेतला होता. विठ्ठल शिवदेव हे पेशव्यांचे दुसरे सरदार होते. ते हे विठ्ठलपंत नव्हत.

भिकाजी हरिभक्त (नाईक):—बाजीरावांचे सरदार. प्रथम ह्यांना गंगाजीकडे बाजीरावानें पाठविलें. वसईच्या मोहीमेंत ह्यानीं वेळोवेळीं कामगिरी बजाविली आहे.

खंडोजी माणकर:—हे कानोजी माणकर ह्यांचे बंधु होत. पेशव्यांचे प्रमुख सरदारांपैकीं ते होते. ह्यांनीं वसईच्या मोहिमेंत प्रत्यक्ष लढाईस सुरवात झाल्यापासून भाग घेतलेला होता. ठाणें, वेसावें इत्यादि ठिकाणच्या कामगिरीवर हे असत. हे पाठारे प्रभू होत. ह्यांनीं वसईच्या मोहींमेंत अनेक ठिकाणें काबीज केलीं. खरवली (ता. माणगांव) हा गांव ह्यांना इनाम आहे. ह्यांचे वंशज खरवली (ता. माणगांव) येथें हल्लीं आहेत.

वासुदेव जोशी:—हे कृष्णराव रामचंद्राच्या नंतर कल्याणचे सुभेदार झाले व ते शेवटपर्यंत तेथेंच होते. नारायण जोशी व रामचंद्र जोशी असे ह्यांचे दोन बंधु होते. नारायण जोशी–वडील बंधु हे बेलापूरच्या किल्ल्याचे अधिकारी होते. ह्या जोशीबंधूंनीं मोहींमेंत मोठी महत्वाची कामगिरी बजावलेली आहे. वासुदेव जोशींनीं तर प्रथमपासूनच ह्या मोहीमेचा भार आपणावर घेतला होता. ह्यांना 'मुरुडकर जोशी' असें म्हणतात. हे एक पेशव्यांचे प्रमुख सरदार होते.

येशवंतराव येरूळकर व आनंदराव येरूळकर:—हे शंकराजीपंताचे जवळ असत.

बाजीराव वेलोसे:—हे प्रथम शंकराजीपंताजवळ कांहीं दिवस होते. पुढें हे पेशव्यांचे अारमाराचे सुभेदार झाले (पे. द. रु. १६ पत्र ३१). ह्यांनींही ह्या मोहीमेंत बरीच कामें केलीं आहेत.

उदाजि पाटील उतेकर उर्फ उदाजि कान्होजी पाटील उतेकर—हे पेशव्यांच्या पदरचे सरदार होते. उदाजी पाटलांनींही बरीच कामगिरी केलेली आहे.

नारोपंत:—वासुदेव जोशी यांचे आश्रयास असलेले गृहस्थ. नारोजी कडु ते हेच असावेत. राणोजी कडव हे ह्यांच्यापैकींच असावेत.

येरुजि सभस:—खंडोजी माणकरांनीं नेमलेले गृहस्थ.

गंगाजी विचारे:—खंडो माणकरांनीं नेमलेले गृहस्थ. जिवाजीराव विचारे हेहि त्यांच्यापैकीं असावेत. हे पुढें युद्धांत हजर होते.

विठोजी ठोकळे व आबाजी टाकळकर:—मोराजी शिंद्यानें नेमलेले हे दोघे पुढें युद्धाचे वेळीं हजर होते.

बापूजी श्रीपत व मोरसेट:—श्रीमंत पेशव्यांचे सरदार. यांचा मुलगा श्रीपत बापूजी हा अहमदाबादचा सुभा होता.

चिमणाजी भिवराव:—ह्यांचे बंधु बाजी भिवराव होत. ह्यानीं वसईचे मोहीमेंत बऱ्याच महत्वाची कामगिरी केली. हे प्रथमपासून ह्या मोहीमेंत होते. तारापूरचे हल्ल्यांत तोंडांत गोळी लागून बाजी भिवराव पडले. ह्यांचा पुत्र बापू यास पेशव्यांनीं आपल्याजवळ ठेविलें. हे पेशव्यांच्या नांवाजलेल्या सरदारांपैकीं होते. बाजी भिवरावांच्या मृत्यूबद्दल श्रीमंत बाजीरावांना फार वाईट वाटलें. पेशव्यांनीं त्यांच्या आईला सांत्वनपर पत्र लिहिलें आहे.

होनाजी बळकवडे, मोकाशी राजापूरकर, बाळाजी चंद्रराव:—हे सर्व आप्पांनीं पाठविलेले लहान मोठे सरदार होते.

बखाजी पाटील ताकपीर:—ह्यांनीं ह्या मोहीमेंत बरीच कामगिरी केली आहे. हे मांडवीस पेशव्यांचे एक अधिकारी होते.

रामाजी पायगडकर व सुभानजी केशरकर:—हे पेशव्यांचे सरदार होत.

रामाजी माहादेव (बिवलकर):—ह्यांनीं ह्या मोहीमेतल्या युद्धांत बरीच कामगिरी बजाविली होती. कृष्णाजी नाईक व रामाजी माहादेव हे मालाड येथें असत असें त्यांच्या पत्रावरून दिसतें. ह्यांचे वंशज कल्याणास राहतात. कल्याणास 'सुभेदारांचा

वाडा ' म्हणून एक प्रख्यात वाडा आहे. ठाण्याचे कौपिनेश्वराचें देऊळ ह्यांनींच बांधलें हे साष्टीचे सुभेदार होते.

जिवाजी ढमढेरे, आपाजी सितोळे, चिमणाजी बापूजी:—हेहि पेशव्यांचे सरदार होते. ढमढेरेचे वंशज पुणें येथें राहतात.

खानविलकर:—वाघोजि, राणोजी, अमृतराव, अप्पाजीराव, व गणोजीराव हे सर्व एकाच घरांण्यांतील होत. वाघोजीराव व अमृतराव हे दोघे वसईच्या मोहीमेंत मृत्यु पावले. हे खानविलकर दक्षिण कोंकणांतले होत. भिंवडी तालुक्यांतही एक खानिवली गांव आहे व तेथेही राव जातीचे लोक राहतात.

राजवा घुरुडकर:—हे गाजरे होत. हे पेशव्याच्या पदरचे गृहस्थ.

व्यंकटराव घोरपडे:—ह्यांनीं फिरंग्यांना गोवें प्रांतात फार हैराण केलें होतें. हे पेशव्यांचे मेहुणे. ह्यांचे वंशज इचलकरंजीस अहित.

मल्हारराव होळकर:—इंदूर संस्थानचे संस्थापक. बाजीराव पेशव्याचे प्रमुख सरदारांपैकीं ह्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत मराठी साम्राज्य वाढविण्याकरितां फार परिश्रम केले होते.

सटवाजी जाधवराव:—पिलाजी जाधवरावाचे हे भाऊबंद. हे पेशव्याचे पदरी होते. ह्यानीं दमणपर्यंत स्वाऱ्या केल्या.

तुकाजी ऊर्फ तुंबाजी अनंत:—पेशव्याचे पदरचे हे सरदार होते. ह्यानींही ह्या मोहींमेत बरीच कामगिरी बजाविली होती.

कंठाजी बांडे, विभूतराव सतक (सतकर), खंडो चिमणाजी, रायाजी शंकर विठोजी कदम, गणपतराव ब्राम्हण:—हे पेशव्यांचे सरदार.

शिंदे:—ह्या घराण्यांतील बरेच पुरुष ह्या लढाईत होते. हे सर्व पेशव्यांचे पदरचे होते. गुणाजी शिंदेसारखे एक दोन गृहस्थ ह्याच प्रान्तातील असावेत असा भास होतो. राणोजी सिंदे, रुद्राजी सिंदे, संभाजी शिंदे, कर्णाजी शिंदे, मोराजी बनकर उर्फ शिंदकर हे शिंदेच होत राणोजी देशमुख हे राणोजी शिंदे असावेत. यांचे मूळ स्थळ शिंदखेड. मोठें घराणें ग्वाल्हेरीस आहे.

बखरींतली इतर गृहस्थांची माहिती.

भगवंत गोसावी:—श्रीमोरेश्वर येथील श्री सिद्धि विनायकाचे पुजारी. चिंचवडकर देवांचा हा भाचा. गंगाजी नाईकांना झालेला दृष्टांत यावेळीं ह्यालाहि झाला होता.

जानक भारती:—श्रीमोरेश्वरास यावेळीं असलेला एक साधुपुरुष.

बखरींतील फिरंग्यांचे वसईचे किल्लेदार.

दोलुईस बुतेलजराल (लुई बोतेलो) ता. ८।५।१७३४ पासून सुरु.

कडदिन (आंटोनिया कार्डीम) ता. २३।५।१७३७.

पेद्रु दमेल (पीड्रो ड मेलो) मे. १७३८ ठाण्याचे हल्ल्यांत मृत्यु ८।१२।१७३८ (म. स्वा. च. पान ८१) पण ४।१२।१७३८ ला मृत्यु झाला असें म. रि. वि. पान. ३२१ त म्हटलें आहे.

(**सिल्व्हेरा मेनेझीस**–नेमणुक–४।१२।१७३८ वसईच्या हल्ल्यांत मृत्यु. **डिसोझा पेरीरा**–मे १७३९ ह्यानें चिमाजी आपास शरण जाऊन तह केला.)

सिद्धिसात—जंजीऱ्याचे नबाबांपैकीं. ह्यास चिमणाजी आप्पानें ता. १९ एप्रिल १७३७ रोजीं रेवस येथें ठार मारलें.



फिरंग्यांच्या जुलमाचें बखरींतील वर्णन

" ठाणे कोकण बिंबस्थान हें राज्य फिरंगी याणें घेतलें. घेऊन कुबुद्ध धरिलि. जमिदारांचि वतने बुडविली ॥ गावाचा गाव धरून बाटविला किरिस्ताव केले सासष्ट गाव व आगर वसईचा बहुतेक लोक धरून बाटविले बाप मेला म्हणजे घरांत प्रेत असतां त्याची पोरें जी असतिल ती नेऊन बाटवावें ऐसा उपद्रव महाराष्ट्रासि मांडिला मग लोक कष्टि जाहाले पळून कोण्हि कोण्हि दक्षिण प्रांति जाऊन राहिले क्रिया कर्में लोप जाहाला देव धर्म बुडाला प्राम्ताचीं तीर्थें क्षेत्रें लोपली देव देबालयें फोडतोड केलि आपलि देवळे फिरंगी याणे बांधलि फिरंगी धर्म चालवावयास लागले ॥ मुलकांत ब्राह्मण फिरता कामा नये ॥ कोण्हि ग्रहस्तानें काहि कार्य होम उद्यापने आरंभिलि म्हणजे ग्रहस्ताचे घर अवघे धरावे शेजारीपाजारी त्या घरांत सांपडले त्यांसहि धरून द्यावे बंदिकष्टि कराये ॥ बंदिखानियांत कुजवावे असा अनर्थ मांडिला त्या मुलखाचे ब्राह्मण वैद होऊन फिरावयाय लागले **माराष्ट्र धर्माचे कर्म** अवघेच राहिले मुलकांत कोणे एक गांवावर सेंदराचा धोंडा सुपारी एवढा सापडला म्हणजे तो गांव धरून नेउन बाटवावा हर कोण्हि दुस्मानगिरीनें च्यार शाहिदि उभे करावे ॥ दुसमान पाद्रिजवळ जाऊन येकाध्यानें बाळंट घ्यावे आणि तें शाइदि नेउन शाहिदि देवावि ॥ म्हणजे त्या ग्रहस्ताचे घर नेउन बाटवावे ॥ न्याय अन्याय पाहावयाचा दर्कार नाहिं ॥ या जातीचा उपद्रव **माहाराष्ट्रास मांडिला महाराष्ट्रास अभय** देता कोण्हि नाहिं ॥ त्यामध्यें पाठारे ज्ञातिचे मराठे लोक त्याची पाठ हात धुवुन घेतली त्या ज्ञातिचे लोक बहुत बाटविले वरकड शेणवी व प्रभु व वाणि व उदमी यास उपद्रव थोडा **पाठारे ज्ञातीस उपद्रव फार** केला तो **श्रीदेवास** न सोसे " ब. पा. १ ते ४

" हे राज्यात दुष्ट राजा आला आहे. आपले वडिलाचि घरें या राजानें बुडविलि आणि आपलि वतने बुडविलि " ब. पा. ७

" माझा मुलुख म्लेंछ फिरंगी म्हणोन आहे त्याजखालि आहे. तो दुष्ट राजा **देवधर्म माराष्ट्रचा** चालु देत नाहीं रयत बाटविली व आमचि घरें बाटविलि। आमचि वतने बुडविलिं आमचे वडिलांचे वडिलांचे सोइरे भाऊबंद बहूत बाटविले आमचे वडिलास जात वाचवावयाची मुस्किल जाली मग वतने आणि संसार कैसा ऐसा तो दुष्ट राजा **माराष्ट्र देवधर्म** आणि आमचि क्रिया कर्में सारिंच राहिलिं त्या मुलखांत आम्ही शुद्रवत होऊन जात मात्र राखोन राहिलो, " ब, पा, ११।१२

" जर त्या राजानें आमचि घरें बुडविलि आणि आमचि वतनें बुडविलि तो राजा आम्हास नसावा मराष्ट्र राजा असावा. " ब. पा. १२

" आमचा प्रांत आमचि मायभूमि तीजवर राजा आहे तो दुष्ट आम्हास फार कष्टि करितो आमचि वतने बुडविली मुलखाचा देवधर्म बुडविला आमचे लोक बाटविले ऐसा उपद्रव करित आहे. " ब. पा. २०

गंगाजी नाईक यांचें तत्त्वज्ञान व उपदेश.

" वतनदाराचे वंशि आपण जन्म घेतला आहे आपले पूर्वजि पराक्रम उत्तम संपादिला आपण त्याचे वंशि जन्म घेतला आहे तर आपण हें कर्म आचरू जर साधले तर चुपय पुरुषार्थ अर्थ आणि किर्त न साधे तर येकला मृत सत्यभूत तो सर्वांस आहे परंतु कीर्ती विरळा वाड्यास आली आपुण हे राज्यात दुष्ट राजा आला आहे. " ब, पा. ७

" नरदेहास यावे तर कांहिं किर्ति स्वार्थ राहे ही गोष्ट करावी नरदेहि येउन व्यर्थ मरु नये ऐसा पाच भावाचा विचार जाहला " ब. पा. ७.

" किं जर हें राज्य आपले राजास शाहू व्हावे.....महाराष्ट्र देवधर्म चालवावा हें आपण आपलें डोळां देखावें. या इच्छेस्तव आपण निघालों श्री मोरेश्वरा तुझे पाय पाहूं जातों ये जन्मी तू आपले पाय दाखऊन सुखाचा सोहळा दाखविशिल तर उत्तम, नाहिं तर जन्मातरिहि याद असोन तुझी सेवा घडून हे कार्य सिद्धीस पाववावें. " ब. पा. ८

" माझा मुलूख म्लेंछ फिरंगी म्हणून आहे त्याज खालि आहे ॥ तो दुष्ट राजा देवधर्म माराष्ट्रचा चालु देत नाहि रयत बाटविली व आमची घरें बाटविली !"
ब. पा. १२

" आपलि देवालये तिर्थें व क्षेत्रे मुक्त व्हावि मराष्ट्र राजा महाष्ट्रधर्म व्हावा हें कार्य आपले हांति व्हावे हे देवानें करावे. " ब पा. १२

" आमचि घरें बुडविली आणि आमचि वतनें बुडविलि तो राजा आम्हास नसावा मराष्ट्र राजा जाला म्हणजे अर्थ स्वार्थ, आणि परमार्थ होइल यास तुम्हि माझे मनांत भ्रांत घालु नको. " ब. पा. १२

" जे तु या जिवाचे हाल करून देव प्रसन्न केला आता आपण हईगई करावि तर आपुल्या ऐसे आळसी आणि भ्याड पृथिवीत नाहि याज करिता हा प्रयोग करावा. " ब पा. १२

" आमचा प्रांत आमचि मायभूमि तीजवर राजा आहे तो दुष्ट आम्हास फार कष्टि करितो आमचि वतने बुडविली मुलखाचा देवधर्म बुडविला आमचे लोक बाटविलें ऐसा उपद्रव करित आहे म्हणोन आम्हि जमीदार आपला मुलुख तुम्हास दिधला आमचि वतने आम्हास तुम्हि नविच दिधली हे खरें.....ह्या मुलखास राजा भोसला व्हावा तर जो राजा तोच प्रधान. " ब. पा. २०

" भरले भाणीयावरून उठावे ऐसे ते निंद्य कर्म आहे परंतु कर्णार देव समर्थ आहे. " ब. पा. २१

" जर मजला श्रीदेवानें अभय दिधलें आहे त्या भरवशावर देवाचे अभय घेतो. तेव्हां तुम्हांकडे मनुष्य पाठवितो तुम्हि मोरयाचे स्मरण करुन जें काम पडेल ते करा मनात कपट येऊ देऊ नको हा **सेवा धर्म** येकनिष्ट करा तुम्हास बाजिरायाचे हातचि वस्त्रें येतात तुम्हि बाजिरायाचे चाकर खरे आपण बहुत काळानें सेवा पूर्वजामागें अंगिकारिली तर ही सेवा येकनिष्टपणें करावि यामुळें बऱ्यावाईटाचे संकल्प देवापुढें ठेवावे बरें जाले तर आपण आपलि वतनें खाउ आणि पुण्य पुरुषार्थ वाढेल कीर्ति परमार्थ प्राप्त होईल वाईट जाहाले तर या महत्कार्याचा व आपलें **कुटुंबाचा संकल्प** करावा आपला संकल्प ऐसा आहे. तुम्हांस किंवा आम्हास दगा येखादे माणसास जाला म्हणजे आपण आपल्या **कुटुंबासुद्धां अग्निकाष्टें भक्षण करूं** " ब. पा. ३२

खंडेराव दाभाडे यांचें बुबाजी नाईकांस आश्वासन.

" तुम्ही तुमचा मुलूख आम्हास दिधला तर तुमचे सर्व साहित्य आम्ही करून तुमचिं वतने तुम्हास चालउ त्या खेरीज तुमचे मुलखाचा कारभार तुम्हीच कराल जे तुम्हि आपले मुलुखात कराल ते आम्ही मान्य करु आमचे नांवें निशाण मात्र चालवावें वरकड तुम्हि आपलि जमिदारि व आमचा अमल तुम्हीच चालवाल. " ब. प. १६

रामचंद्रपंतांनीं गंगाजी नाईकांना दिलेलीं आश्वासनें.

" रामचंद्रपंत बोलिले हा बाजिरायाचा शिका मजजवळ आहे मी बाजिरायाचा मुकत्यार आहे मी केले ते बाजीरायानि केलें आणि बोलिले तुमच्या लिहिल्याप्रमाणें तुम्हास दिधलें याशिवाय तुमचे कार्यसंमंधि लोक आमुचि इच्छा धरित आहेत त्याचि वतनें व शिळोत्रें वाड्या फाजिनें पुरातन असतिल ती व तुम्हि सांगाल तिं त्यास देउन व तुमचि तुमच्या मुलखात सत्ता साहेबि चालेल तुम्हि

आपल्या मुलखांत जे कराल ते आम्हास मान्य आहे दिवसास तिन खुन कराल ते तुम्हास माफ आहेत. ''

ब. पा. १९।२०

पांचा भावांचा विचार

'' कीं आपल्या मनसुभ्यास व लागास व भेदास मागास जो खर्च पडेल तो आपला आपण करु फौजेस जो खर्च पडेल तो रामचंद्रपंत करितिल आपण जमिदार आपले राज्य अकलेशयास (?) द्यावे म्हणजे आपले चाकरीचा मजुरा होईल ''

ब. पा. २३

गंगाजींचें कामगिरीबद्दल कांहीं ग्रंथकारांचीं मतें व बखरकारांचें म्हणणें.

एक मतः-

ह्या धर्मसंग्रमाचे गंगाजीच मुख्य उत्पादक व प्रवर्तक.

अ

'' युद्धाचीं कारणें. गंगाजी नाईक अणजूरकर हा या युद्धाचा उत्पादक आहे. त्यानें नाना तऱ्हेची खटपट व साह्य करून साष्टींतील पुढारी लोकांस मराठ्यांचे बाजूस वळवून आणिलें. सन १७२० त रामचंद्रपंत महादेव जोशी चासकर, बाजीराव पेशव्यांचा मेहुणा, यानें कल्याण प्रांत जिंकून तेथें पेशव्यांचें ठाणें बसविलें. गंगाजी व त्याचे साथीदार यांनीं माऱ्याच्या जागा व गुप्त वाटा वगैरे पेशव्यांचे लोकांस बांगल्या दाखवून दिल्या.

दुसरें मतः-

ह्या धर्मसंग्रमाचे अंताजी प्रथम सूचक.

अ

'' महाराष्ट्रांतील कांहीं लेखकांचा असा समज झालेला दिसतो कीं पोर्तुगीजांच्या धर्मच्छलापासून हिंदूस मुक्त करून वसई व साष्टी प्रांत हस्तगत करण्याचें कार्य बाजीराव बल्लाळ व चिमणाजी अप्पा ह्यांनीं स्वयंस्फूर्तीनें हातीं घेऊन सिद्धीस नेलें; परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं असें आमच्या संग्रहीं असलेल्या लेखांवरून सिद्ध होतें. हे लेख म्हणजे श्री. बाजीराव बल्लाळ, त्यांचे बंधु चिमणाजी अप्पा आणि नानासाहेब पेशवे

पुढें मालाडचा जमीनदार अंताजी रघुनाथ कावळे या खटपटींत सामील झाला त्याचा व बाजीरावाचा पत्रव्यवहार झालेला उपलब्ध आहे."

मराठी रियासत–मध्य विभाग,
पान ३२४
गो. स. सरदेसाईकृत १९२०

ब

साष्टीच्या बखरीवरून असें दिसून येतें कीं, श्रीछत्रपती संभाजी महाराजांच्या कारकीर्दीपासून हा धर्मच्छल चालु होता. त्या वेळींच पाठारे जातीचे हिंदु लोक पोर्तुगीज लोकांच्या उपद्रवामुळें त्रासून जाऊन कळव्यास येऊन राहिले. नंतर तेथून अणजूरास आले. त्यांचे पुढारी गंगाजी नाईक (निंबाजी नाईक) म्हणून एक गृहस्थ होते. त्यांनीं संभाजी महाराजांकडे संधान लाविलें परंतु संभाजीच्या कारकीर्दीत मोंगलांची सरशी होऊन सर्व मराठी राज्य विस्कळित झालें, त्यामुळें महाराष्ट्रधर्मरक्षणाचें कार्य सिद्धीस गेलें नाहीं.

पुढें गंगाजी नाईक ह्यांनीं कुलाब्यास सेखोजी (?) आंग्र्याकडे जाऊन पोर्तुगीज मुलूख सर करावा व स्वधर्माचें रक्षण करावें, म्हणून गुप्त रीतीनें प्रयत्न चालविला. परंतु, ती बातमी फिरंगी ह्यांस पोहोंचून त्यांनीं गंगाजी ह्यांचा अंताजी रघुनाथ कावळे व त्यांचे बंधु रामचंद्रपंत ह्यांच्या बरोबर झालेला पत्रव्यवहार होय. ह्या पत्रव्यवहारास आरंभ सन १७२९ पासून झाला असून तो सन १७४०।४२ पर्यंत सुरू होता. ह्या पत्रव्यवहाराच्या सूक्ष्म निरीक्षणापासून असें दिसून येतें कीं वसई व साष्टी प्रांतांतील धर्मगुरु, सरदेसाई अंताजीपंत कावळे व इतर हिंदुबांधव ह्यांस पोर्तुगीज धर्मोपदेशकांकडून होणारा धर्मच्छल असह्य होऊन त्यापासून आपली व आपल्या हिंदुबांधवांची मुक्तता व्हावी ह्यासाठीं अंताजी रघुनाथ ह्यांनीं ते प्रांत फिरंग्यापासून हस्तगत करण्याचें कार्य हातीं घ्यावें अशी श्रीशाहूमहाराज ह्यांजपाशीं याचना केली; परधर्मीयांच्या जुलमापासून त्यांची मुक्तता करण्याचें सत्कार्य आपण हातीं घ्यावें अशी श्रीशाहूमहाराज ह्यांजपाशीं याचना केली; आणि परधर्मीयांच्या जुलमापासून त्यांची मुक्तता करण्याचे सत्कार्य आपण हातीं घ्यावें अशी श्रीशाहुमहाराजांनीं बाजीराव बल्लाळ ह्यांस आज्ञा केली. ह्यानंतर बाजीराव बल्लाळ व अंताजी रघुनाथ ह्यांची समक्ष भेट होऊन आपण दर्शविलेलें सत्कार्य लौकरच हातीं घेण्याचें त्यांनीं अंताजीपंतास आश्वासन दिलें व ह्यापुढें पेशवे व अंताजीपंत कावळे ह्या दोघांमध्यें वसईवरील स्वारीच्या तयारीसंबंधानें परस्पर पत्रव्यवहार सुरू झाला."

उ. को. प्रा. इ. पान ८।९

नाईकांस कैद केलें, व त्याजपासून दंड घेऊन त्यास सोडून दिलें. ”

ब. स्वा. चरित्र पान ६३।६४

“ इ. स. १७२२-२३ ह्या वर्षी गंगाजी नाईक, बुबाजी नाईक, मुरारजी नाईक, शिवजी नाईक, नारायणजी नाईक हे **मुद्दाम साताऱ्यास** गेले व त्यांनीं लागमाग साधून देऊन मराठ्यांच्या सैन्यास तो प्रांत मिळवून देऊं असें कबूल केलें. शाहु महाराजांनीं व पेशव्यांनीं त्यांची विनंति ऐकून घेतली व त्यांचें संकट निवारण करण्याचेंही वचन दिलें. परंतु इतर अनेक राजकीय मनसब्यांमुळें त्याना ह्या मसलतींत लवकर लक्ष घालण्यास अवधी सांपडली नाहीं. तथापि गंगाजी नाईक प्रभृति मंडळींनीं **प्रतिवर्षी पेशव्यांस भेटून** फिरंग्यांचा मनसबा हातीं घेण्याबद्दल त्यांना एकसारखा तगादा चालविला होता. ” ब. स्वा. चरित्र पान ६५

“ गंगाजी नाईक प्रभृति पाठारे मंडळींनीं पेशव्यांच्याकडे संधान बांधिलें होतें. त्याप्रमाणें अंताजी रघुनाथ व रामचंद्र रघुनाथ कावळे देसाई व देशपांडे वसई वगैरे प्रांत फिरगाण, ह्यांनींही पेशव्यांकडे जाऊन हें स्वधर्म संरक्षणाचें महत्कार्य सिद्धीस नेण्याबद्दल त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न चालविला होता. बाजीराव बल्लाळ यांनीं २८ जानेआरी इ. स. १७३० “ आमच्या संग्रहीं असलेल्या प्रत्रांत पेशव्यांनीं अंताजींचे बंधु रामचंद्रपंत यांस स्वारीसंबंधीं सन १७२९ मध्यें लिहिलेलें पत्र पहिलें आहे. ”

उ. को. प्रा. इ. पान ९

“ कारण ह्यावरून असें निर्विवाद ठरतें कीं पेशव्यांस वसईप्रांत हस्तगत करण्याचे कामीं पहिलें **प्रोत्साहन व सूचना** हीं अंताजी रघुनाथ व त्यांचे बंधु रामचंद्र रघुनाथ यांचेकडून मिळालीं. ”

उ. को. प्रा. इ. पान १०

“ ह्या पत्रावरून असें दिसतें कीं फिरंग्यांपासून वसई प्रांत हस्तगत करण्याचें कार्य पेशव्यांनीं लौकर हातीं घ्यावें अशी अगत्याची विनंति **अंताजीपंत पेशव्यांस** वारंवार करीत होते. ”

उ. को. प्रा. इ. पान १४

“ अंताजीवर पेशव्यांचा अप्रतिम लोभ होता, त्यांस ते वारंवार भेटीस बोलावीत असत. त्यांची **सल्लामसलत घेत असत** व तुमचें उर्जित करूं असें त्यांस त्यानीं आश्वासन दिलें होतें. ” उ. को. प्रा. इ. पान १७

“ हिंदूंचा धर्मच्छल आणि अंताजी प्रभृति पुढाऱ्यांनीं **शाहूमहाराजांकडे नेलेली फिर्याद** हीं पोर्तुगीजांवरील स्वारींची प्रधान कारणें होत असें ह्या लेखांत मागें दर्शविलेंच आहे. ” उ. को. प्रा. इ. पान २३

रोजीं रामचंद्र रघुनाथ ह्यांना पत्र लिहिलें कीं 'आमचे ही चित्ती हाच हेतु आहे कीं कार्य करावे' ".

ब्रम्हेंद्र स्वामीचें चरित्र पान ६५।६६
दत्तात्रय बळवंत पारसनीस-
कृत १९००

क

" पोर्तुगीज लोकांच्या छळाचा बोभाटा छत्रपतींचें कानीं व्यवस्थितपणें छत्रपति **संभाजी महाराजांचे कार-कीर्दीत** गंगाजी नाईक (गंगाजींचे वडील निंबाजी नाईक) अणजूरकर यांनीं केला, त्याचा उपयोग पुढें झाला आहे. पुढें इ. स. १७२२ मध्यें **गंगाजी नाईक** व इतरक्षत्रिय मंड-ळीनीं पुन्हां **शाहू महाराज बाजी-राव पेशवे** व **चिमाजीआपा** याज-पाशीं फिर्याद नेली. त्याप्रमाणें मालाड-कर सरदेसाई बंधुद्वय, अंताजी व रामचंद्र रघुनाथ कावळे यानीं तशीच फिर्याद पेंशव्याकडे नेली. "

पे. धर्म. पान ९।१०

" वसईच्या धर्मसंग्रामाचे **मूळ उत्पादक गंगाजी नाईक** होत. गंगाजी नाईकांचा वंश फार पुरातन असून चौदा परगण्यांत नाईकांची सत्ता होती. पोर्तुगीजांचे सैतानी सत्तेचा त्या प्रान्ती फैलाव होऊं लाग-तांच **प्रथम** त्या सैतानाला **गंगाजी नाईकांनींच विरोध** केला. पण दुर्दैवानें त्यांचा इलाज चालेनासा होऊन त्यांना पराजय व छळ सहन

" वसईप्रांत पोर्तुगीजांपासून हस्त-गत करण्याच्या कामीं आरंभापासून तों शेवटपर्यंत अंताजीपंत कावळे त्यांचे स्वशाखीय बांधव आणि इतर क्षत्रिय अनुयायी ह्यांनीं जें सहाय केलें त्याची त्रोटक हकीगत आम्ही वर दिलीच आहे. "

उत्तर कोंकणाचा प्राचीन इतिहास
पान २४
रावबहादुर पुरुषोत्तम बाळकृष्ण
जोशी–१९२६

ब

" इ. स. १७३९ सालीं वसईप्रांत पोर्तुगीज सरकारकडून जिंकून घेण्याचे कामीं, अणजूरचे गंबा नाईक बुबा-नाईक वगैरे सोमवंशी क्षत्रिय ज्ञातीचे कांहीं वीरवृतीचे गृहस्थांनीं पेशव्यांस पराकाष्टेची मदत केली. या क्षत्रिय वीरांनीं कळकळीनें पेशव्यांस मदत केली नसती तर वसईप्रांत फिरंग्याक-डून हस्तगत करण्याचे कामीं काल-गति लागून मराठ्यांच्या सैन्याची फार खराबी झाली असती. "

हेमाद्रि पान १५१

" सबब अंताजी रघुनाथ कावळे यांसी धर्मरक्षणासाठीं **हिंदु लोकांचे पुढारीपण** पतकरणें भाग पडलें. पोर्तुगीजांची सत्ता झुगारून देऊन मराठ्यांची सत्ता स्थापन करण्याचा त्यानें जारीनें प्रयत्न सुरू केला. **प्रथम** याकामीं त्यानें मुंबईतील

करावा लागला. सर्व नाईक वंश देशोधडीला मिळाला. हा प्रलय निवारण्यासाठीं गंगाजी नाईकांनीं घोर तपश्चर्या केली. त्यांना श्रीसिद्धिविनायकाचा साक्षात्कार होऊन आशिर्वाद मिळाला. गंगाजी नाईक सर्वसंगपरित्याग करून तपस्वी बनले होते; पण गुरूच्या आज्ञेप्रमाणें त्यांना पुन्हा आपले देशाचा संसार शिरावर घ्यावा लागला. त्यांनीं आपल्या मायभूमीच्या दास्यविमोचनार्थ पुन्हा शस्त्रग्रहण केलें. त्यांना त्यांच्या बंधूंचा व अंताजीपंत कावळे, खंडोजी माणकर वगैरे इतर स्वाभिमानी वीरांचा पूर्ण पाठिंबा मिळाला. पेशव्यांना ह्या मंडळीनेंच वसईच्या मोहीमेचा उद्योग हातीं घ्यावयास लाविलें व त्यांना सर्वतोपरी साहाय्य केलें. ''

पे. धर्म. पान ३६।३७

'' अंताजी रघुनाथ हे वसई प्रांतातील सरदेसाई व सरदेशपांडे होत. इ. स. १७३० च्या पूर्वीपासून त्यांनीं व रामचंद्रपंतांनीं स्वधर्मरक्षणाचें कार्य सिद्धिस नेण्याबद्दल पेशव्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. अंताजीपंतांनीं आपलीं धर्मकृत्यें प्रसिद्धपणें केलीं म्हणून फिरंग्यांनीं अंताजीपंताची इमानत जप्त केली व त्यांना पकडून गोव्याच्या धर्मशासनमंडळासमोर नेण्याचा हुकूम केला. ''

पेशवाईंतील धर्मसंग्राम पान १३५

विठ्ठल वामन हडप.

इंग्रज सरकारकडे दाद मागितली

परंतु इंग्रज सरकार व पोर्तुगीज सरकार यांची दोस्ती असल्यामुळें अंताजी रघुनाथ कावळे यांची याकामीं निराशा झाली. नंतर अंताजी रघुनाथ कावळे यांनीं **सातारचे छत्रपति श्रीशाहुमहाराज यांचेकडे** दाद मागितली. श्रीशाहुमहाराजांनीं पेशव्यांस पत्र लिहून जरूर ती मदत अंताजी रघुनाथ यांस देण्याविषयीं त्यास आज्ञा केली. इ. स. १७२९ पासून इ. स. १७४१ चे दरम्यान श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे, चिमणाजी आपा आणि नानासाहेब पेशवे ह्यांचा (नानासाहेबांनीं या युद्धांत भाग घेतला नव्हता.) अंताजी रघुनाथ कावळे व त्यांचे बंधु रामचंद्रपंत ह्यांच्याबरोबर जो याबाबतींत पत्रव्यवहार झाला तो ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्वाचा आहे. त्यांतील कांहीं निवडक पत्रें ह्या पुस्तकाच्या परिशिष्टांत दिली आहेत. वसईप्रांतावर स्वारी करून तो पोर्तुगीज सरकारापासून हस्तगत करून घेण्याविषयीं अंताजी रघुनाथ कावळे व त्याचे जिवलग मित्र व क्षत्रिय यजमान गंबा नाईक वगैरे ह्यांनीं पेशव्यांच्या मागें सारखा नेट लावला होता. ''

हेमाद्रि पान १५२।१५३

'' वसई व साष्टी प्रांत मराठ्यांस मिळवून देण्याचे कामीं **अंताजी रघुनाथ कावळे** व त्याचे क्षत्रिय

ड.

" भोसळा राजा संभाजि दक्षणेचे राज्य करु लागला त्याजकडे (इ. स. १६८० ते १६८९) पैगम निंब नाईकाहि केला. प्रल्हाद जोशी ब्राम्हण पाठविला "

ब. पा. ६

" मग कान्होजी आंगरे याजकडे गंगाजी नाईक गेले. कुलाबे मुकामि आंगऱ्यास भेटले. तेथें विचार पाहतां त्याचे मनांत मुलुख काबिज कराघा ऐसे नाहीं. " (इ. स. १७१८।१७१९)

ब. पा. १३।१४

" त्याजवर बुबाजि नाईक श्रीपंढरीचे यात्रेस गेले, त्यास गुरु देहूकर नारोबा गोसावि त्याजवळ हकिकत सांगितली त्याही खंडेराव दाभाडे सेनापतिस देहूस बोलावून त्यास बुबाजि नाईक भेटविले हकीकत सांगितली सेनापति बहुत खुशाल जाहला मग बोलिले की तुम्हि तुमचा मुलूख आम्हास आला तर तुमचे सर्व साहित्य आम्ही करू." (इ. स. १७२०)

ब. पा. १५

" गंगाजी नाईक चिंचवडास जाऊन श्रीदेवाचे कागद घेऊन रामचंद्रपंतासि कल्याणास जाउन येकांति भेटले आपला वृतांत सांगितला रामचंद्रपंत ऐकून खुशाल जाहाला मग रामचंद्रपंताहि गंगाजी नाईक व बुबाजी नाईक याशि आपले क्रियापूर्वक वचन दिधलें. " (इ. स. १७२०)

ब पा. १८

यजमान गंबा नाईक बुबा नाईक वैगरे यानीं महत्वाची कामगिरी बजाविली, याबद्दलची कबुली श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे व चिमणाजी आप्पा यानीं अंताजी रघुनाथ यांस पाठविलेल्या पत्रांत दिली आहे. "

हेमाद्रि. पान १५३

" इष्ट कार्य साध्य झाल्यावर " तुमचे ऊर्जित करूं " असें पेश-ऱ्यांनीं अंताजी रघुनाथ कावळे व त्याचे मित्र गंबा नाईक यांस वेळोवेळीं आश्वासन दिलें होतें त्याप्रमाणें वसईची मोहिम फत्ते झाल्यावर गंबा नाईक यांस अण्जूर गांव इनाम दिला व तो त्यांचे वंशजाकडे अद्याप चालत आहे. " हेमाद्रि पान १५३

" अण्जूरचे गंबा नाईक, बुबानाईक वगैरे सोमवंशी क्षत्रिय लोकांच्या क्षात्रतेजानें वसई व साष्टी प्रांतांत हिंदुधर्माचें रक्षण झालें ही गोष्ट नाईक घराण्यास अत्यंत भूषणावह आहे. "

हेमाद्रि उर्फ हेमाडपंत यांचे चरित्र पान १५४

केशव आप्पा पाध्ये इ. स. १९३१

क

" वसईच्या स्वारींत सामील न झालेल्या एका नायकाला मालकाच्या मदतीस जातां आलें नाहीं म्हणून फार वाईट वाटलें, तेव्हां त्याच्या सांतवनपर चिमणाजी आपानीं पत्र लिहिलें. "

प. बा. पेशवे पान २४३

" हें महत्कार्य आहे. मग गंगाजी नाईक रामचंद्रपंतास बोलिला कीं आपले कुटुंब घेऊन तुम्हांजवळ येतों. मग रामचंद्रपंत बोलिले ही गोष्ट उत्तम आहे.....ते प्रसंगीं निघायास संध सांपडली. तीन तारवे भरून कल्याणचे बंदरि गंगाजी नाईक (अणजूराहून) गेले॥ "

(इ. स. १७२१।१७२२)

ब. पा. २१

" मग बाजीरायाहि पिलाजि जाधवराव मामजाद पाठविले त्याबराबर गंगाजी नाईकास कागद आला जर जाधवरायास सामील होउन फिरगाणाचे जे काम होईल ते करावे चवऱ्याशि देशपांडेयापैकीं मालाडकर अंताजि रघुनाथ कावळे आले होते ते गंगाजी नाईकाजवळ होते. मग गंगाजि नाईक व अंताजि रघुनाथ जाधवरायासि भेटले. " (इ. स. १७३०)

ब. पा. २७

ठाण्याच्या खाडीपलीकडील गांवकऱ्यांनीं फिरंग्याच्या जुलमास कंटाळून पेशव्यांकडे दाद मागितली. कारण पेशवे हे हिंदु धर्माचे संरक्षक समजले जात होते. पाठारे प्रभूंनीं (पाठारे प्रभू नव्हे, पाठारे क्षत्रिय) गांवकऱ्यांचें पुढारीपण निर्भयपणें पत्करलें होतें. मालाडचे इनामदार अंताजी रघुनाथ व रामचंद्र रघुनाथ सरदेसाई यांनीं पेशव्यांकडे संधान बांधलें. पेशव्यांचा उद्देश हिंदुपदपादशाही स्थापन करण्याचा असल्यामुळें, स्वराज्यालगत चाललेले हे अत्याचार त्यांना उघड्या डोळ्यांनीं स्वस्थ पाहत बसणें शक्यच नव्हतें. १७३१ पासूनच फिरंग्यांची व मराठ्यांची धुसफुस सुरू याली.

पहिले बाजीराव पेशवे पान २४७

प्रो. नारायण केशव बेहरे १९३०

वरील ग्रंथकारांचीं मतें पाहतां असें दिसतें कीं प्रथमचें मत बखरीच्या मताला पूर्णपणें जुळत आहे. दुसरें मत विरुद्ध पडतें. पारसनीस, सरदेसाई, ह्यांचे ग्रंथ पुष्कळ पूर्वी म्हणजे अनुक्रमें १९०० व १९२७ मध्यें छापलेले आहेत व त्यांच्या नंतर हडपांचा ग्रंथ छापलेला आहे. जोशी, पाध्ये व बेहरे यांचे ग्रंथ अनुक्रमें सन १९२६, १९३१, १९३० ह्या सालांत छापलेले आहेत अशा स्थितींत प्रथमच्या ग्रंथकर्त्यांच्या लिखाणाकडे ह्या ग्रंथकर्त्यांनीं दुर्लक्ष केलेलें असावें, म्हणून त्यांच्या लिखाणांत वस्तुस्थितीचा विपर्यास झालेला दिसतो. गंगाजी नाईकानीं ह्या राजकारणाला स. १७१८ पासून सुरवात केली होती व अंताजी रघुनाथ स. १७२९ मध्यें ह्या राजकारणांत पडले होते, ही महत्वाची बाब विसरून चालणार नाहीं. ह्या वरून ह्या धर्मसंग्रामाचे उत्पादक कोण हा निकाल लागतो.

वसईच्या किल्ल्याची दुर्भेद्यता.

" श्री. १६६१ वैशाख व. १

स्वामीचे अभयावरून वसईस मोर्चे माघ शु ॥ दशमीस लाविले. त्यादारभ्य मोर्चे चालविले व धमधमे चार पांच बांधले. सुरंग चालविले.....धमधमे यावर गरनाळा टाकिल्या. सुरंग विच्छिन्न केले. पनळ लावून पाणी सोडिलें. आगीचे ओंडे जळके टाकून त्यावर तेल, दारु, राळ टाकून चार चार रोज डोंबराही सारखा करीत. बरकंदाजी व तोफाजी फिरंगियाची निस्सीम म्हणावी तैशी. त्याचे प्रतापें इकडून तोफा लावून फिरंगियांच्या तोफा मना केल्या. सफेल पाडून लेश केली. वसई जागा बांका बुलंद सुरुंगाचा उपाय नाहीं...वैशाख शु॥ पंचमीस सिद्धता करून,.....सुरंग उडतांच सर्वांनीं येलगारास उठावें, बुरजावर चढावें, शिड्या टेकून चढावें ऐसा करार करून, वैशाख शु॥ ६ बुधवारीं दोन घटका दिवस प्रातःकाळचा येतांच सुरंगास बत्त्या दिल्या. डावे बाजूचे सुरंग कांहीं उडाले, कांहीं उडणें होते, तोंच लोकांनीं उतावळी करून कोटावर चालून घेतले; तों दुसरे सुरंग तेच बाजूचे उडाले, त्याणीं लोक दडपले व जाया व ठार आले. तसेच उजवे बाजूचे सुरंग उडाले. एक दोन उडताच बुरुजास वाट जाहली. ती देखून लोक वरते चढले, तों दुसरे सुरंग उडाले, त्यांणीं वरतें लोक चढले होते ते उडोन गेले. लोक कचरले. हिरमोड होऊन काम बंद पडिलें. फिरंगी याणीं संभाळून हुके व गरनाळा व रेजागिरीचा मार न भूतो न भविष्यति केला.....वैशाख शु॥ ७ गुरुवारीं उजवे बाजूचा सुरंग उडविला तेच समयीं लोक जाऊन बुरुज अर्धा उडाला त्याजवर चढले. फिरंगियानीं सफेलीच्या आंतून मेढा घालून पेटी भरून तोफा लावून तयार होतांच तेथें फिरंगी बळाऊन हुके गरनाळ्याच्या दारुच्या पोत्यास आग लावून मार केला, व रेजागिरीचा मार सीमे परता केला. लोकांबरी अग्नीचा पर्जन्य करून भाजून काढिले...आगीचा तमा न धरितां लोकांनीं हत्यार बरे वजेनें केलें. फिरंगियांनीं मरदुमी शिपाईगिरी करावी तैशी केली. त्याप्रमाणें इकडील लोकांनीं भारती युद्धाप्रमाणें युद्ध केलें. यामागे युद्धें बहुत जाली. परंतु ह्या लढाईस जोडाच नाहीं... काल वैशाख पोर्णिमेस फिरंगी झाडून गेला...लष्करचे व हशमाचे लोक सुरंगाने उडाले व जाया ठार अदमासें पांच हजार किंबहुना विशेष होतील. तैसेच फिरंगियाचे सात आठसे मालीस ठार व या निराळे जखमी जाले. भारतीयुद्धाप्रमाणें युद्ध जालें. वसई बांकीजागा, पश्चिमेकडून समुद्र, दक्षिणेकडे खाडी, पूर्वेकडे खाजण चिखल, तिहींकडून किमपि इलाज नाहीं. उत्तरेकडून उपाय. तिकडेहि रेती, घर नाहीं... " चिमाजी आप्पाचे ब्रम्हेंद्र स्वामीना पत्र खंड ३ ले २७ पृष्ट २१.

" वसई (म्हणजे तेथें) एक्या तोंडानें झुंजावें; कोट बिलंद गच्ची रुंद; मोर्चा अथवा सुरंग चालवीन म्हटल्यास पाणी लागते. फिरंगे या सारखे झुंजणार. असें असोन अप्रतिम तर्तूद करून उघडे सुरुंग चालविले. त्याणीं प्रत्योपकार यथाविधी केला...दक्षिणेची फौज म्हणजे मऊ लागले म्हणजे बेजरब घेणार' कठीण लागलें म्हणजे फिरोन पहाणें नाहीं. ऐशी पूर्वापार या राज्यांतील तऱ्हा. (असें) सरदारांत कर्म जाहलें नाहीं. पुढेंहि होणें नाहीं हा तो निश्चयच आहे... दक्षिणी फौजेस उपास करून व छातीचा कोट करून झुंजावें हे हिंमत पूर्वी कोणी केली ऐसे ऐकिलेंहि नव्हते....." चिमाजी आप्पास एका सरदाराचें पत्र

का. इ. पत्रें यादी पान ४३१

वरळी गोपचार व भोयें संस्थानचें

पाठारे क्षत्रिय इतिहास संशोधक मंडळ

सभासद–(डावीकडून) १ श्री. वसंतराव दामोदर रावते, २ श्री. गजानन गोविंद नाईक (सचालक), ३ श्री. भगवंतराव जनार्दन म्हात्रे, बी. ए., (अध्यक्ष), ४ श्री. मुकुंदराव जनार्दन गोरेगांवकर, ५ श्री शांताराम जनार्दन पाठारे (चिटणीस) व ६ श्री रामकृष्ण रामचंद्र देसाई (स्वीकृत करून घेतलेले).

प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनाच्या बाबतींत आत्मीय भावनेनें
हरएक प्रकारची मदत करून मला कायमचें ऋणी
करून ठेवणारे माझे परम मित्र

श्री. वसंतराव दामोदर म्हात्रे

वरळी गोपचार व भोयें संस्थानचे अत्यंत उत्साही चिटणीस,
यांचें हें छायाचित्र त्यांची परवानगी नसतांही
मी कृतज्ञताबुद्धीनें प्रसिद्ध केलें आहे.

—गजानन गोविंद नाईक

अणजूरकर नाइकांना पेशव्यांकडून आलेलीं पत्रें

आज्ञापत्रें, सनदा सरकारी ठराव वगैरे

(गजानन गोविंद नाईक यांचे दप्तरांतील नाईकांना मिळालेली सरपाटीलकीची अस्सल सनद.)

श्री

श्री
राजा शाहू नरपति
हर्षनिधान बाळाजी
बाजिराव मुख्य
प्रधान.

७ माअजाम जमीदार परगणे साष्टी व ता॥ आठगांव परगणे सायेवान प्रांत वसई यांसी बाळाजी बाजीराऊ प्रधान सुहूर सन इसने आबैन मया व अलफा बेइसी गंगाजी नाईक व बुगाजी नाईक व जनार्दनजी नाईक बिन मुराराजि नाईक व सिवजि नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महीमानराऊ कुळी सोळांखी ज्ञात पाठारे पुरातन वास्तव्य कसबे वानरे तर्फ मरोळ परगणे साष्टी वतनदार मोकादम मौजे अणजूर ता॥ आठगांव परगणे सायेवान प्रांत वसई हे प्रांत मजकूर-हून तीर्थरुप राजश्री बाजीराऊ व तीर्थरुप राजश्री चिमणाजीपंत आपा याचे दर्श-नास सातारीयाचे मुकामीं सन सलास अशरीन मिया अलफामध्यें येऊन आपली हकीकत विदित केली कीं आपण पुरातन प्रांत मजकुरचे वतनदार आहों त्यास वसईप्रांत फिरंगीयाकडे आहे त्याणें देवस्थानें यांचा व तीर्थांचा व माहाराष्ट्र धर्माचा लोप केला. कितेक हिंदुलोक भ्रष्टाऊन क्षार केले आपण पुरातन वतनदार देशनाडगौडपणाचें वतन होतें त्यास फिरंगीयाकडे तो प्रांत जाहालियापासून वतन चालों देत नाहीं याजमुळें आपण कुटुंबसहवर्तमान त्या प्रांतांतून येऊन कल्याण-प्रांते प्रस्तुत राहिलो त्या (वसई) प्रांताची हकीकत व आपलें वृत्त निवेदल्यावरून त्या प्रांती साहेबीं मसलहत करून प्रांत मजकूर सर करावा देवस्थापना व स्वधर्म-स्थापना होये ते गोष्टी करावी व आपलें वतन आपणास करून द्यावे त्याप्रांतीचे कोट किले जंजिरे वसई व कोट ठाणे या जागांचे लागमाग व खाडयाचे उतार व मार्ग वाटास आपण माहीत आहो व ठाणे व वसई कोटाचे लाग आपले स्वाधीन आहेत म्हणोन त्यावरून अणजूरकर मजकूर यास तीर्थरूपानीं आज्ञा केली की तुमचे हत्ये लाग्ये असतील ते हाती धरून वसईचा व ठाण्याचे उताराचा लाग

ठीक करणें त्याजवरून याणी हद्दये लाग्ये त्या प्रांतीचे हाती धरून कोट ठाणे साष्टी येथील लाग व तेच खाडीचा उतार व वसईचे आगराच्ये खाडीचे लाग केले ते वर्तमान हुजूर येऊन तीर्थरुपास साल दरसाल निवेदन केले त्यावरून संन सवा सलासीन मिया अलफामध्यें तीर्थरूप राजश्री आपानी मसलहत करून फौज समागमे देऊन राजश्री शंकराजी केशव व राजश्री चिमणाजी भीमराऊ फौज-समेत गंगाजी नाईक व सिवजी नाईक अणजूरकर बरावर देऊन वसईस पुढें रवाना केले व राजश्री खंडोजी माणकर व राजश्री रामचंद्र हरी यासी फौज समागमें देऊन बुवाजी नाईक व मुऱ्हारजी नाईक व नारा-यणजी नाईक तीघे बंधु बराबर देऊन साष्टीची खाडी पार करून फौज नेउन ठाणीयाचा कोट हस्तगत त्याच्या हवीलागानें जाहाला तीर्थरूप कैलासवासी राजश्री आपा खासा फौजसुद्धा पाठीवर जाऊन प्रांत मजकूरचे गड कोट किले हस्तगत करून प्रांत मजकूर सोडवून स्वराज्य केले याजमुळे स्वधर्मस्थापना होऊन देवधर्मादिक चालते जाहाले व अणजूरकर या पांचा बंधुनीं येकनिष्टपणें जीवाभ्य श्रमसाहास करून सेवाधर्म संपादिला व मुरारजी नाईक अण-जूरकर जंजीरे वसईच्ये कोटास हला जाहली ते समई युद्धप्रसंगांत स्वामी-कार्यीं खर्च जाहाले त्याजवरून मजकूर याजवर कृपाळु होऊन तीर्थरूप कैलास-वासी याणीं नुतन वतन करार करून द्यावे ऐसा करार केला. त्याजवरून हाली अणजूरकर गंगाजी नाईक व बुवाजी नाईक व सीवजी नाईक हे हुजूर पुण्याचे मुकामी येऊन आपली हकीकत ईस्तकबील तागायत निवेदन केली याज-वरून अणजूरकर मजकूर यासी नुतन वतन देशनाडगौडी उर्फ सरपाटीलकीचें वतन परगणे साष्टी देखील जकायेती व तर्फ आठगाव देह २६ सवीस परगणे सायेवान पैकी तर्फ मजकूर देखील जकायती जलमार्ग व उभामार्ग ब बंदरें परगणे मजकूर व तर्फ मजकूर वतन करार करून दिले असे देह बी तपसील.

परगणे साष्टी प्रान्त वसई देह

तर्फ मालाड देह ५६———तर्फ मरोल देह ५२

१०८

ता आठगाव परगणे सायेबानपैकी

किता देह १३——किता देह १३

२६

एकूण परगणे साष्टी देह येकसें आठ व तर्फ आठगांव परगणे सायेबान देह सवीस येकून देह येकसें चवतीस जिराईत व बागाईत व घरपटी व वण व मोहो तर्फ व ताडे व माड व भंडारथलभटीया व कुंभार देखील कोळी मछीमार व

स्थल प्रत
नं.

तरी उतार वगैरे जराईब व पटीबाब व जकायति व बंदरे जलमार्ग व उभामार्ग व मीठ बंदरें व मीठागर व थलभटीत व थलमाडे व गादीया वरैदें व वखारी सरकारी जमाबंदी होईल त्याजवर हक देशनारगौडी उर्फ सरपाटीलकी अणजूरकर मजकूर यांसी करार बी तपसील.

[विस्तारभयास्तव ह्या ठिकाणचीं चोवीस कलमें व गांवांचीं नांवें येथें उतरून घेतलीं नाहींत. ती क्षात्रवृत्त मासिकाच्या खास अंकामध्यें छापलीं आहेत.]

येकुण कलमे चोवीस सदरहूप्रमाणें सालमजकुरापासून करार करून दिली असेत तरी देशनाडगौडी उर्फ सरपाटीलकीचे वतन सदहूप्रमाणें उपभोग देखील हक लवाजीमे व इनाम गाव येक मौजे अणजूर व आगरवाडी वेसावे पैकी येक व मानपान टिला विडा सरपाटील मजकूर यास व याचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेनें वेतन अनभऊन सुखरुप राहतील या पत्राची प्रत लिहून घेऊन असल पत्र सरपाटील मजकूर यांस भोगवटीयास परतोन देणे जाणीजे छ २२ सवाल आज्ञाप्रमाण

लेखन सीमा

गंगाजी नाईकांनीं अत्याग्रहानें श्रीमंत बाजीराव पेशव्यांना वसईच्या धर्म संग्रामाची मोहीम हातीं घ्यावयास लाविली व त्याकरितां नाईकांनीं वारंवार पेशव्याचे दरबारीं हट्ट व धरणें धरले होतें हें बखरकाराचें म्हणणें वरील सनदेवरून सिद्ध होतें. दुसरें बखरकाराचें म्हणणें हें आहे कीं गंगाजी नाईकांच्या हवे लाग्यानींच ही मोहीम सिद्धीस नेण्याचें कार्य सुकर व सुगम केलें; हें ही त्यांचें म्हणणें सत्य-असल्याचें वरील सनदेंतील मजकूरावरून सिद्ध होते. तिसरी गोष्ट ही कीं ह्या संग्रामाचा मूळ हेतु माहाराष्ट्रधर्मस्थापना व स्वराज्यस्थापना करणेचाच होता; वतनें सोडविणें हा दुय्यम हेतू होता असें जें बखरकाराचें म्हणणें आहे तें ही ह्या सनदेवरून खेरं ठरलें आहे. पांचाही भावानीं बखरींत म्हटल्याप्रमाणें ह्या कार्यास्तव जीवाभ्य मेहनत अनेक वर्षें निरलसपणें केलीं व पेशव्यांची सेवा एकनिष्ठपणें केली, हें सत्यकथनही ह्या सनदेवरून तंतोतंत खेरं ठरतें. ही सनद अस्सल आहे व ती नानासाहेब पेशव्यांनीं दिलेली आहे. ही सनद म्हणजे बखरीचा काढलेला सारांशच आहे अर्थात् ह्यावरून ही बखर अक्षरशः खरी ठरते.

(बाळाजी बाजीराव यांचेकडून अणजूरकर नाईक वधूंस आलेलें आज्ञापत्र श्री.-गजानन गोविंद नाईकांचे दप्तरातून मिळालेलें.)

श्री

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजी पंडीत प्रधान तां। मोक...मौजे वेसावे ता। मालाड परगणे साष्टी प्रांत वसई सुहुर सन इसने आर्बैन मया व अलफ बेश्मी (इ. स. १७४१) गंगाजी नाईक व मुरारजी नाईक याचे पुत्र जनार्दन नाईक व सीवजी नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महीमानराऊ कुली सोळोखी ज्ञात पाठारे देशनारगौडी उर्फ सरपाटीलकी परगणे साष्टी व ता। आठगाव परगणे सायेवान प्रांत वसई प्रांताचे मसलतेस जीवाभ्य श्रमसाहास करून सेवाधर्म संपादिला याजकरितां अणजूरकर मजकूर याजवर कृपाळु होऊन नुतन वतन देशनारगौडी ऊर्फ सरपाटीलकी परगणे साष्टी व ता। आठगाव परगणे सायेवान प्रांत वसई येथील वतन करून दिल्हे असे यासीं वतनसंमधे ईनाम आगरवाडी मौजे मजकुरी सरकार बेरीज राजभाग रु॥ २५ पंचवीस ईनाम सरकारातून दिली असे तरी राजभाग रुपये पंचवीसामध्यें येक वाडी सरपाटील मजकुर याचे हवाला करणें तेथील उत्पन्न जे होईल ते सरपाटील मजकूर यांस व याचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने ईनाम चालवीत जाणे प्रतीवर्षी नुतन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राची प्रती लिहोन घेऊन अस्सलपत्र सरपाटील मजकूर

याजवळ भोगवटीयास परतोन देणें जाणीजे छ. २२ सवाल आज्ञा प्रमाण

पा. क्ष. ज्ञातीचें मासिक क्षात्रवृत्त वर्ष २ अं. १२ सप्टेंबर व आक्टोबर १९२२

बुबाजी नाईक यांच्या संबंधाचा सरकारी उल्लेख.

A. D. 1808. Regulation 1

इ. स. १८०८ सरकारी ठराव १.

VIII Second, In consistence with their own usage The Marhattas added to The Portuguise assessment under the denomination of Deshmookey a grain payment, rated first at two adowlies per para amounting to eight percent on the rice taken and to seven percent on the nekdy or ready money part of the rental; laying at the same time, another tax in favour of Bogajee Nayak, a Hindoo who having assisted them in the conquest was constituted Head Patel in which capacity he was authorised to exact two seers per para, or two percent on the rise and one half per cent on the neekdy settlement under the denomination of Sirpateily.

Their financial administration. Addition to the Tokah assessment and that of Sir-pateily.

भाषांतर

कलम ८ (दुसरा भाग) मराठ्यांचे नेहमीचे पद्धतीप्रमाणें त्यानीं पोर्तुगीज लोकांच्या वेळच्या कर वसुलींत देशमुखी ह्या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या सद-राखालीं नवीन कराची बरीच भर घातली. देशमुखी म्हणजे भाताच्या रुपानें दिला जाणारा हा कर प्रथम फऱ्याला दोन अधोली धान्य ह्याप्रमाणें होता. म्हणजे भाताच्या निपजेवर तो शेंकडा आठ टक्के व नगदी अथवा रोकड़ पैशाच्या

करान्वयें शेंकडा सात टक्के होता. त्याचवेळीं बुगाजी नाईकाचे नांवेंही एक कर वसूल करण्याची मुभा असे. बुगाजी नाईक ह्या एका दिंदुनीं त्यांना मुलुखगीरींत मदत केली होती म्हणून मुख्य पाटील म्हणजे सरपाटील त्यांना नेमण्यांत आले होते ह्या सरपाटीलकीच्या नात्यानें त्यांना प्रत्येक फड्यामागें दोन शेर धान्य कर घेण्याचा अधिकार होता. व नगदीवर शेंकडा अर्धा टक्का व तांदुळावर शेंकडा दोन टक्के कर घेण्याचा त्यांना अधिकार होता.

श्री.

(गजानन गोविंद नाईक यांचे दप्तरांत मिळालेलें असल पत्र)

गंगाजी नाईक——— (फाटलें आहे)

.....(फाटलें आहे.)

श्री.

७ अखंडीत लक्ष्मीं आलंकृत राजमान्ये श्रीो चीमणाजी बलाल आर्सीर्वाद सुमातीसा सलासीन मया अलफ (हें साल १७३९ असावे असें वाटतें.) खासा॰ श्वारी वसईस व्हावी अैसे होते परंतु प्रयोजन लागले येत नीमीत्य पुण्यास जाणे जाले तेथे राजश्री शंकराजी केशव आहेत त्याजपासी तुम्ही आहा माानिलेनी ज्यास जेथे ठेवीले त्या जागा राहून श्रमसाहास केलेत सकल वर्तमान माानिलेच्या पत्रावरून विदीत होऊन संतोष जाहला प्रहस्तुत हे पत्र सादर केले अंसे तरी माानिले सांगतील त्याप्रमाणे अंगेजणी करून जागा मजबूद होई ते करणें तुम्हीं ईतबारी कामाचे भरंवसीयाचे लोक आहा जागा मजबूद करून नक्ष करणे म्हणजे तुमचे नोकरीचा मजुरा होऊन उर्जीत केले जाईल तीकडील मनसुबा तुम्हा लोकावरी आहे त्याची शरम धरून माानिलेच्या हुकुमाप्रमाणे वर्तणुक करणे जाणिजे छ २८ सफर आज्ञाप्रमाण

श्री
राजा शाहू नरपति
हर्षनिधान बाळाजी
बाजिराव मुख्य
प्रधान

लेखन
सीमा

(अणजूरकर नाइकांस चिमणाजी बल्लाळ यांचें पत्र. ग. गो. नाईकांचे दप्तरामधून)

श्री

श्री चिमणाजी बल्लाळ सु॥ समान सलासीन मया अलफ वसईवर्ी हला जाहली ते प्रसंगीं तुम्हीं मेन वाढवून मेहनत केली म्हणोन विदित जाहालें तर तुम्हीं मर्द आहा जे लोक साहेब कामाविशी मने वाढवितील त्यांचे उर्जित होईल. जे ठार जाहले आहेत त्यांच्या मुलामाणसांचे चालविले जाईल जखमी जाले असतील त्यांची निगा करून बरे करणे ला (लो) काचे दिलासे करणे जाणीजे छ २८ जमादिलावल आज्ञा प्रमाण

लेखन सीमा

पाठारे क्षत्रीय ज्ञातीचें मासिक क्षात्रवृत्त मार्च-एप्रील १९२६

श्री

(श्री. गजानन गोविंद नाईक यांच्याकडून पारसनीसांचे लेख-संग्रहांतील पेशव्याचें नाईक बंधूस पत्र

पत्र ५ वें पान ५

पेशजी गंगाजी नाईक व बुबाजी नाईक व जनार्दन नाईक बिन मुरारजी नाईक व शिवजी नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महिमान राऊ कुळी साळींखी ज्ञात पाठारे पुरातन वास्तव्य कसबे वानरें तर्फ मरोळ परगणे साष्टी वतनदार मोकादम मौजे अणजूर तर्फ आठगांव परगणे सायवान प्रान्त वसई हे प्रान्त मजकुरीहून् तीर्थरूप रा. बाजीराव व तीर्थरुप रा. चिमणाजीपंत आपा यांचे दर्शनास सातारीयाचे मुक्कामीं सन सलास अशरीन मया व अलफामध्यें येऊन आपली हकीकत विदीत केली कीं आपण पुरातन प्रान्त मजकुराचे वतनदार आहों त्यास वसई प्रान्त फिरंगीयाकडे आहे. त्यानें देवस्थानें व तीर्थें व महाराष्ट्रधर्म याचा लोप केला. हिंदु लोक भ्रष्टाऊन क्षार केले. आपण पुरातन वतनदार, देश. नारगौडपणाचें वतन होतें. त्यास फिरंगी याकडे तो प्रान्त जहालीया-पासून वतन चालों देत नाहीं. त्यामुळें आपण कुटुंबासहवर्तमान त्या प्रान्तांतून येऊन कल्याणप्रान्तीं प्रस्तुत राहिलों. वसई प्रान्ताची हकीकत

व आपलें वृत्त निवेदन करून त्या प्रान्तीं साहेबीं मसलत करूत प्रान्त मजकूर सर करून देवस्थापना करून स्वधर्मस्थापना होय ते गोष्टी करावी व आपलें वतन आपणास करून घ्यावें. त्या प्रान्तीचें कोट किल्ले व जंजिरे वसई व कोट ठाणें या जागांचे लागे, माग व खाडीयांचे उतार व मार्ग वाटांस आपण माहीत आहों. व ठाणें वसई कोटाचे लाग आपले स्वाधीन आहेत म्हणून, त्यावरून अणजोरकर मजकूर यासी तीर्थरूप यानीं आज्ञा केली कीं तुमचे हातलागे असतील ते हातीं धरून वसईचा व ठाणेंयाचा उताराचा लाग ठीक करणे त्यावरून अणजूरकर मजकूर याणीं हातलागे त्या प्रान्तीचें हातीं घेऊन कोट ठाणें साष्टी येथील लाग हवे व खाडीयाचा उतारा व वसईचे आगारचे खाडीचे लाग केले, ते वर्तमान हुजूर येऊन साल दरसाल निवेदन केलें त्याजवरून सन सला सबासीन मया व अलफ मध्यें तिर्थरूप रा. आप्पांनीं मसलत करून फौजसमागमें देऊन रा. शंकराजी केशव व रा. चिमणाजी भिवराऊ फौजसमेत गंगाजी नाईक व शिवजी नाईक अणजूरकर बराबर देऊन वसईस पुढें रवाना केले, व रा. खंडोजी माणकर व रा. रामचंद्र हरी यास फौजसमागमें देऊन बुबाजी नाईक व मुरारजी नाईक व नारायणजी नाईक अणजूरकर हे तिघे बंधु बराबर देऊन साष्टीची खाडी पार करून फौज नेऊन ठाणेंयांचा कोट हस्तगत तुमचे हातीं लागोन जाला. ती. कैलासवासी रा. आपा यास फौजसुद्धां पाठीवर जाऊन प्रान्त मजकूर सोडवून स्वराज्य केलें; त्यामुळें धर्मस्थापना होऊन देवधर्मादिक चालते झाले. व अणजूरकर यांचा बंधु यांनीं एकनिष्ठपणें जीवाभ्य श्रमसाहस करून सेवाधर्म संपादिला. व मुरारजी नाईक अणजूरकर जंजीरे वसईचे कोटास हल्ला जाहली ते समयीं युद्धप्रस्तांत स्वामीकार्यीं खर्च झाले. अणजूरकर पांच बंधु यांजवरी कृपाळु होऊन ती. कैलासवासी यांनीं यासी नूतन वतन करार करून द्यावे ऐसा करार केला. त्याजवरून हल्लीं अणजूरकर मजकूर हुजूर येऊन आपली हकीगत निवेदन केली त्यावरून तुम्हास नूतन वतन देशनाडगौंडी उर्फ सरपाटीलकी वतन परगणे साष्टी देखील जकायती व तर्फ आठगांव देहे २६ सव्वीस परगणें सायवान पैकीं तर्फ मजकूर देखील जकायती जलमार्ग व उभामार्ग व बंदरे परगणें मजकूर व तर्फ मजकूर वतन सरपाटीलकी करार करून दिले असे

पा. क्ष. ज्ञा. चें मासिक क्षात्रवृत्तवर्ष ७ अं. १ ला

श्री

शके १६५९ भाद्रपद व॥ ३०

" राजश्री गंगाजी नाईक अणजोरकर व शिवजी न॥ अणजोरकर यांस:— अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य, स्ने॥ चिमणाजी बल्लाळ आशीर्वाद. सु॥ समान सलासीन मया अलफ. सांप्रत वसईवरी हल्ला जाहला ते समई कार्य न जाहलें म्हणून तुम्हीं मनांत दिलगीर न होणें. शाबास तुमची कीं तुम्हीं मन वाढवून मेहनत उत्तमप्रकारें केली ॥ ज्याणीं साहेब कामाच्या ठाईं मन वाढवून कामकाज केलेलें आहे, त्यांचें सर्व-प्रकारें ऊर्जित केलें जाईल व कोण्ही साहेब कामावर ठार झाला असेल; त्याचे मागें मुलामाणसांचें चालविलें जाईल. कार्य आजी न जाहलें, तरी पुढें तुमचे हातून घेतलें जाईल. तुम्ही आपलें समाधान असों देणें. जाणिजे छ २८ जमादिलावल. बहुत लिहिणें १ " बेहरेकृत पहिले बाजीराव पेशवे

पान २४३।२४४-

रा. खं. ६ ले. ११५

(गजानन गोविंद नाईक यांचे दप्तरांतून उपलब्ध झालेलें पत्र)

(गंगाजी नाईकांचे कर्जाबाबतचें पत्र.)

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री

रामचंद्रपंत स्वामीचे सेवेसी.

पो शंकराजी केशव सुंवर नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत जावे विशेष अणजूरकर यांचेकडे लोकाचे कर्ज बहुत येणें द्यावयासी ऐपत नाहीं यास्तव गुदस्तां साष्टीचे (मुकामीं तुम्हीं) आम्ही व राजश्री रामाजी महादेव व राजश्री विसाजीपंत याचे आमचे विचारे नउ साला हप्ते (हप्ते) लाऊन हप्तेबंदी प्रमाणें द्यावे याप्रमाणें करार जाहाला हली तुम्ही त्यास सक्त तगा (दा) केला आहे त्यास पेसजीच करारमदार जाहाला सर्वांचा निकाल होईल त्याप्रमाणे तुमचाही ऐवज हप्तेबंदी प्रमाणें.....खजालात द्यावा जाजती तगादा न क (रावा) जो ठराव केला तो सर्वांचे विचारे केला..... असता तुम्हींच तगादा करून अ × × × × पैका द्यावयासी ताकत नाही तेव्हा सलच जाईल ऐशास ही गोष्ट उत्तम की काये सर्व मामलेदार व अहस्त पुण्यासी आले पाठीमागे हा प्रकार होऊ लागला तर दुरलोकीक तुमचा होतो तरी काडीभर उपद्रव न द्यावा हप्तेबंदी प्रमाणें ऐवज द्यावा साऱ्याचा करारनामा त्या × × × देतील खरा त परतु येऊन न्यावे × × × × पत्रें द्यावी ही विनंती.

बखरींतल्या कांहीं प्रसंगांसंबंधानें पेशवे-दप्तर व इतर ठिकाणचीं पत्रें

" तेचवर्षि फिरंगी याणे विचार केला जर आपले मुलखात साष्टि व आगरात मराठे लोक आहेत ते यकदाच धरुन बाटवावे ऐसि वरदि दोलुईस बुतेल जरालानें विजुरेचि आणुन तमाम मुलखातिल रयतेचि घरें माणसे कागदि लिहिली देवळि जमा होणें म्हणून हुकुम केला त्याजवर मुलकात खळाळा पडला "

बखर पान २२-२३

"

श्री

पुरवणी राजश्रीपंत प्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. आजी कल्याणहून पत्रें आलीं. फिरंगी फिरंगाण प्रांतांत साष्टींत जितकें हिंदु माणुस आहे तितक्यिाची टीप, देखील पांचा वर्षांचें मुलापासून वृद्ध माणूस कुली टीप लेहून घेतली. येक माणूस कोठें फरकों देत नाहीं. जागा जागा चौक्या ठेविल्या आहेत. गलबतें लाहानथोर सेंदीडसें जमा करून जागां जागां ठेवलीं आहेत. हिंदु माणूस तेथून बाटवणार म्हणून लौकिक आहे. याकरितां त्याप्रान्तीं घोर आकांत जाहाला आहे. वर्तमान आपणांस कळावें याकरितां लिहिलें असें. बहुत काय लिहिणें लोभ करित गेलें पाहिजे. हे विनंती. "

पे. द. रु. १६ पत्र ११.

' गंगाजी नाईकानें बाजिरावास फिरंग्याचि हकि(क)त लिहिलीं. ' ह्या बखरींतल्या उल्लेखावरून हें पत्र गंगाजी नाईकांनीं पाठविलेलें किंवा लिहविलेलें दिसतें. ह्या पत्राचें साल इ. स. १७३४ आहे.

' गंगाजी नाईकानीं.....हकिकत सांगितली कीं फिरंगी याणे ठाण्याचे कोटावर लगट केला आहे यंदाचे वर्षानें कोट पुरा करील मग तुमचे मसलतीचा कारभार राहिला. '

बखर पान ३६

" ठाणियास गेलियावरी द्रव्य लाभहि होईलसा दिसतो. वरकड होणें ते प्राक्तनानुरुप व ईश्वर इछेने होईल. पुढें ठाणियाचा कोट जाहलियावरी कार्य साध्य होणार नाहीं. "

वासुदेव जोशींचें आप्पास पत्र पे. द. रु. १६ पत्र ८

" छ ८ रमजान श्री.

विनंती उपरी. स्वामीचे चित्तामध्ये हे गोष्टी आली आहे तर प्रस्तुतच करावी. पुढे कोट जालियावर बळकटी होईल म्हणून पूर्वी स्वामीस लिहिलेच आहे; तर अविलंबे कार्य करावें.....'

वासुदेव जोशींचें आप्पास पत्र पे. द. रु. १६ पत्र १३ दोन्ही पत्रें स. १७३७ तील आहेत असें बखरीवरून दिसतें.

पेशव्यांना शंकराजीपंत पत्राचीं उत्तरें वेळेवर पाठवीत नाहींत अशी तक्रार बुगाजी नाईक गंगाजी नाईकाकडे करितात, त्यास शंकराजीपंत लिहितात.

" सेवेसी विनंती. आजी राजश्री बुबाजी नाईक अणजोरकर यांनीं रा. गंगाजी नाईक अणजोरकर यास पत्र पाठविलें कीं, ' स्वामी बुबाजी नाईकास येक दोन वेला बोलिले कीं तुमच्या माणसासमागमे शंकराजीपंत यास पत्र पाठविले त्याचे उत्तर अद्याप आले नाहीं. ' त्यास तेच पत्र गंगाजी नाईक याणी आम्हांस दाखविले त्यास स्वामीनीं तों ' पत्राचे उत्तर रांहिले ' म्हणून लिहिलें नाही. बुबाजी नाईकाने लिहिले....." पे. द. रु. १६ पत्र १९

' अलिकडे वसईचे राजकारण रा॥ अंताजी रघुनाथ व गंगाजी अणजोरकर यांजकडे आले आहे त्याचे चौकसीस माणसें पाठऊन तेथील शोध मनास आणून चैत्र शुद्ध पौर्णिमे सिद्धी करावी ऐसा निश्चय केला आहे.' पे. द. रु. १६ पत्र ८ सन १७३७.

"(गंगाजीनीं) तीन महिने हजामत करविलि नाहि.....चिमाजी आपा त्यास बोलिले कीं आता फिरगाणचे मसलतिची योजना करावि मग सर्व (सरदार) मिळोन गंगाजि नाईकाचे विचारे चैत्रमासि मुईम करावी असा ठराव करून शंकराजिपंतास साहित्य करावयास सांगितले" ब, पान ३७

'त्यास राजश्री रायानीं अंताजी रघुनाथ व अणजोरकर यास याची (साष्टी-वरिल स्वारीची) पैरवी (व्यवस्था) सांगितली व आम्हास सांगितले कीं चौकशी करणें.....' पे. द. रु. १६ पत्र १७. सन १७३७

———

'(क)र्णाजी सिंदे याणी सिवजी अणजोरकर यासमागमें पनास माणूस देऊन फिरगाणात स्वारी करून फिरगाणाची दोन कुले उदमी धरून आणिले ऐसे सांगितले.' पे. द. रु. १६ पत्र २३

———

' त्यास स्वामीनीं आज्ञा केली कीं, कल्याणास जाऊन राजकारण ठीक करून रा॥ अंताजिपंत गंगाजी नाईक व भिकाजी नाईक या त्रिवर्गास पाठवावे. ...दहिवली येथें भिकाजी नाईक भेटले...नेरळावरी अंताजीपंत भेटले....गंगाजी नाईक कल्याणास होते. त्यांस रातोरात आणून बोली मनास आणून अंताजीपंत व भिकाजी नाईक यास स्वामीकडे पाठविले...गंगाजी नाईकांस कल्याणास नेले. यासहि मागाहून दो चौ दिवसा पाठवितो. " पे. द. रु. १६ पत्र ३४. स. १७३७

हे भिकाजी नाईक हरिभक्त पेशव्याचे सरदार असावेत शामजी नाईकाचा दुसरा मुलगा भिकाजी होता पण तो हा असतां तर अणजूरकर असें असतें.

———

" इकडे वसईकडे कामणचे डोंगरात वाघटाक्यावर... ...बाहादुरपुरा मागा टाकून कोटाखालीं आसपास रयतेनें गडग्याचा कोट करून तोंडि बरकंदाज ठेवून राहिले. "

वर दिलेला हा बखर पान ३९, ४० व ४१ मधील सर्व मजकुर खालीं दिलेल्या " पे. द. रु. १६ पत्र ४२ " तसेंच " पे. द. रु. ३४ पत्र २० व २१ " यामधील मजकुराबरहुकूम आहे.

"

श्री तारीस १–४–१७३७

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शंकराजी केशव सं॥ नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान त॥ ११ जिल्हेज प्रातःकाळपर्यंत वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीनीं आज्ञापत्र छ ८ जिल्हेजचे पत्र पाठविले ते पावले. तेथे लिहिले कीं तुम्ही कैसे गेलेत, कोण्हे समई पावलेत, कार्य किती जाहाले ते सविस्तर लिहिणे, म्हणून

लिहिले. त्यास किले माहुलीचे रानातून गुरुवारी रात्रौ निघालों ते पाहाटेस घोटवडियाचे आरण्यात आलो. ते दिवसी पाणी मार्गी मिळाले नाहीं याजकारितां दोघे चौघेजण पाणी पाणी करिता मृत्यु पावले. दुसरे दिवशीं शुक्रवारीं रात्रीस घोटवडीयाचे रानातून निघोन तुंगारचे रानांत येऊन पाहाटेचे राहिलो ते दिवशी पाणी मिळालें. तो दिवस क्रमून निवड करून दोन टोल्या केल्या, येक निवडीची व येक दूम यैसे केले. निवडीत आपण होतो. दूम लोकांत बाळाजी केशव खंडोबा होते. तेथून दोन घटका दिवस संध्याकाळचा असतां निघालो, ते प्रहर दाहा घटिका रात्रीस खाडीवर आलो तों तमाम चौकीया जागृत. दोनसें माणूस गोखरीयाचें बंदरावर आहे व तीस माणूस राजावलीचें उतारावर आहे व बाजे मेटावरी पंधरा वीस माणूस आहे. तमाम परस्परे जाबसाल होतात यैसे नजरेनें पाहोन मग गंगाजीचे(ला)गे समागमे आतील व बाहेरचे भेटले होते त्यास पुसिले की या उपरी उपाय काये ? ते बोलिले कीं राजावलीचे उतारावरील चौकीचे तीस माणूस आहेत, मारावे आणि पुढे जाऊन कार्य साधावे यैसे बोलिले. मग आपणहि विचार चित्तांत आणिला तो दुसरा विचार नाहीं. मग त्यास बोलिलों कीं संभर सवासें माणूस गलबतावरी उतरोन देणें. त्यास त्याणी गलबत सिध केले होते ते राजावलीचे उताराचे डावे हातावरी कोसाभऱ्यावरी उतरोन मोराजी सिंदे व बाजीराव बेकसे (बेलोसे) खासे खासे उतरिले तों तेथून राजावलीचे उतारावर चौकीवर येत तोच चंद्र मावळला. पाणी खाडीस आले. चंद्र मावळालियावरी दोन घटिकानीं चौकीवर मारामार झाली. चौकीचे लोक ठार केले. जेव्हां चौकीवर आमचे लोक आले तेव्हां वीस माणूस चौकीवर उभे होते. त्याणी पायेदल जाली तिची चाहूल घेतांच त्याणे आमचे लोकांस हटकिले. तों इतक्यात याणी मेळविले आणि तोडातोड केली. ते चाहूल दोन्ही बाजूचे चौकीदारानीं घेतली आणि बंदरावरी आवाज केला. तो तेचसमई अगोधरच खाडीचे किनारा गंगाजी ना॥ देखील काठी येऊन बसले होते तो पाणी भरले. चौकी मारिली, इलाज नाहीं यैसे जाले. स्वामी म्हणतील कीं आगोधरच कां पावलेस नाहीं ? तरी लागे बोलिले कीं चंद्र मावळतांच खाडीवर जावे. तरी आपण तातड केली तो पाणी भरले. मग काये करावे. यैसे संकट प्राप्त जाहालें त्यास आगोधर पोहोणार याची निवड केली होती. त्यास मग जे पोहोणार होते त्यास दर आसामीस सेर सोन्याचे कडे बकसीस देऊं केलें. आणि खाडींत उड्या घालविल्या. त्यास दीडसे माणूस पावता पाहोन घातलें. कितेकाच्या तरवारी बुडाल्या. पांघरुणें गेली. तो तपसील फारच आहे. जो बंदुखी होता त्यास दुसरियाची तर(वार) देऊन घातला. ते परस्परें हत्यारें गेली. मुबदले जालें. यैसे बहुतप्रकारें

श्रम करून अडीचसें माणूस पावत गेले. तो येक आगरुखाचे होडके सापडले. मग सटवाजी सालोंखे व रामजी तुगकर यास दोन कडी सैन्याची देऊ करून ते होडके-यासी दाहा माणसे लाऊन दुसरें दीडसे माणूस मेहनतीने घातले व गाताड्या (?) राजावलीचे गावांतून आणून ताफा बांधला. त्याजवरील संभर माणूस पावत उतरले व पेढें घालून त्याजवर माणसे दोनसे उतरलि. याप्रकारें लोक पलिकडे घातले. तेणेकरून हत्यारेहि किति एकांची गेली, चौकीदार मारामार करितां बोभाट जा (ला). मग हा इलाज केला आणि पलिकडे आपण खाडीत बसोन उतरले. खंडो चिमाणाजी पोहोनच गेले. त्याणी श्रम बराच केला, व बालाजी केशव व मोराजी शिंदे × × × जीराव बेकसे × × × विचारे रामाजी सुरवे व समस्त लोक उतेकर व मावळे व हेटकर यांणी सर्वांनीं बहुत मेहनत पोहोणारास जाली ते श्री जाणे. मग सकाली फौज पेढियावर उतरली, बंदर उखलून काढिला, माणिकपुरियावर आलो. कांहीं लोक उतरणेचे होते तो दोन घटिका दिवसांस तीर्थरूप राजश्री माहादाजीपंत दादा फौज रा॥ बाखाजी (बखाजी) पाटील ताकपीर यांचा घेऊन आले, पुढें आदकोस आपण सांगावयास आले की फौज आली, तो सर्वच पाठीवर राजश्री चिमणाजी भीवराव सा घटिका दिवसास जलदीनेंच आले ' तो आपण माणिकपुरीयावर आहो. तेथून माणिकपुरियाचे देवलात आला. तो रा॥. चिमणाजी भीवराव व रा॥ बारवाजी प॥ आले. भेटी जाल्या. मग तेथेंच मुक्काम केला, भोजन जाले आणि रा॥ माहादाजी केशव व रा॥ खंडो चिमणाजी व मोराजी सिंदे व बालाजीराव राजबाराव याजसमागमें लोक देऊन बाहादरपुरियास पाठविले. याणी जाऊन बाहादरपुरियाचें सेवटी माडी आहे. तेथे माहादाजीपंती मोर्चा दिल्हा तो त्याणे मार दिल्हा मग लोक जखमी जाले व पडिले त्याची यादी आलाहिदा प॥ आहे त्यावरून विदित होईल, जे रीतीनें मोर्चा समीप द्यावयाचा ते रीतीनें दिल्हा, मोर्चा द्यावयाची कोताई जाली नाही. बाहादरपुरा आगदीच पाठीशी घातला आहे. वरकड वर्तमान उभयताचे नावे पत्र लि॥ आहे तेथे लिहिले आहे त्यावरून विदित होईल, जर इतकी मेहनत व बुद्धि केली नसती तर स्वामीचे चरण पाहावे यैसें न घडते. मी वर्तमान लिहिले आहे यात कोण्ही अन्यथा म्हणावे यैसे नाहीं हेंच पत्र सेवेशी आहे. पुढें सर्व निवेदन करितील त्यास अंतराये पडिला तरी मीच अन्याई होईन. पुढेहि जो विचार करावयाचा तो करीतच आहो. राजश्री चिमणाजीपंत व आम्ही व राजश्री बरवाजी ताकपीर सर्व येक विचारेच आहो. येथें दुसरा अर्थ नाही. सेवेसी विदित होये हे विज्ञप्ति " पे. द. रु. १६ पत्र ४२

" श्री.

ता. २७-३-१७३७

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती शेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ ६ जिल्हेज मुकाम बहादूरपुरापावेतो स्वामीचे कृपाद्रिष्टी करून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते शनिवारी रात्रीस आवशीचे प्रहर रात्रीस राजावलीच्या उतारावरी आलो. त्यास टोपीकरास सुचे जाहाले. त्याणे तमाम चौक्या ठेविल्या. त्यास राजावलीच्या उतारावरी मेट ठेविले होते ते माराव्यासी चोरीनें दीडसे माणूस बा॥ मोराजी सिंदे व बाजीराऊ बेलोसे पाठविले. मेटावरी पंचविस माणूस होते ते कापून काढिले, तव भरती येऊन पाणी भरले. प्रातःकाली निघोन उतार जाल्यावर माणिकपुरियास येऊन मुकाम केला आहे. पुढें आज्ञेप्रमाणें वर्तणुक करून रयेतीस कुल कौल द्यावा म्हणजे सरकार किफायत आहे.शाहारात शिरतेसमई आम्ही लोकांस ताकीद केली, रयतेचे काडीस येकंदर हात न लावणें. प्रथम दिवसी कोणी किरकोळ वस्तवानी घेतली तें रयतीचे रयेते फिरोन देवितो. सेवेसी विदित जाले पाहिजे." पे. द. रु. ३४ पत्र २०

" श्री

२७-३-१७३७

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

°विनंती सेवक शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विनंती. तागायत छ ६ जिल्हेज पावेतों मुकाम बहादरपूर सुखरूप असो. विशेष–राजावलीचे उतारावरी आलो. लागे येऊन भेटले. त्यास टोपीकरास लस्कर येते हे आवाई होती, त्यामुळें तमाम खाडी किनाराचा बंदोबस्त केला. दोनसें माणूस बंदरावर, तीस माणूस राजावलीचे उतारावर होते; व बाजे उताराचाहि बंदोबस्त केलाच होता जागृत फार दिसोन आली; व लागियाचे विचारे जालें कीं चौकी मारून यावें; आणि मुख्य स्थलास जावे. त्यास शनिवारीं आवसीचे प्रहर रात्रीस, राजावलीचे उतारावर आलों. सवासें माणूस लागियाचे विचारें गलबतावरी घालून, तीस माणूस राजावलीचे उतारावर होतें ते मारून टाकिले. तेसमयी बोभाट जाहाला. समीप चौकिया होत्या. त्याणी यैकतांच खबरदारी केली. आंत उतरोन जावे तो खाडीस पाणी भरलें. मग इलाज नाहीं यैसें दिसून आले मग लोकांवर बलात्कार करून, दोनसें माणूस हत्यारेसमेत खाडींत घातलें. ते पार जाहाले, परंतु

लोकांची हत्यारे कितेक बुडाली व पांघुरणेहि बुडाली; परंतु आगरांत पाये घातला. इतकाच अर्थ जाहाला. थोरलें कार्य यामुळें न (च ?) जाहाले नाहीं. हेच गोष्टी श्रमेकरून साध्य जाहली. मेहनत केली ते परस्परे विदित होईल ते प्रमाण. पुढेंही **गंगाजी नाईक** याचे व लागियाचे विचारें जालें तरी मुख्य स्थलचा विचार मनास आणून वरकड हे जागे स्वामीनी पाहिल्यावर पुढें कितेक जागे सोडवावयाचे त्याची विचारणा करावी लागेल हे विज्ञाप्ति." पे. द. रु. ३४ पत्र २१

' तीर्थरुप राजश्री दादाचा (माहादजी) मुरदा मोर्च्यांत माहीमच्या असेल तरी शोध केला पाहिजे ?...आणि अग्नी दिला पाहिजे. ' पे. द. रु. ३४ प. १३४

ता. २४-१२-१७३७

" मुरारजी अणजूरकर याखेरीज लोक कोणी आले नाहींत. "

पे. द. रु. १६ पत्र १०४

" वसईकडील गंगाजी नाईक राजश्री शंकराजीपंत याणी पाठविले होते. ते व जासूद जोड्या गोमांतकांतून वाडीस आल्या. गंगाजी ना॥ वसईस गेले वसईहून आपल्याकडे येतील ते सविस्तर वर्तमान निवेदन करितील त्याजवरून विदित होईल. "

पे. द. रु. १६ पत्र १५१

' तेव्हां गंगाजी नाईक व शंकराजीपंत व मोरोजी शिंदे सर्व बैसोन विचार केला जर आपासाहेबास माहिमाकडे न जाऊ द्यावे ठाणियास आणावे हा विचार करून शंकराजीपंत आपास सामोरे गेले. ब. पा. ४६

" त्यासी खासा यानीं ठाणेंयासी यावें म्हणजे येथुन सारा बंदोबस्त करावा. परंतु वसईस जाऊन मागती पाहोन फिरोन येऊन नयें...संकराजीपंतास सांगोन बंदोबस्त...करावा. परंतु खासियांनीं न जावे हा विचार." पे. द. रु. १६ प. १०८

" इकडे शृंग (सुरंग) कोटाजवळ जात ते फिरगी वरून मोडतो.....हे आपलेच कार्य म्हणोन तुटोन कोटावर पडले. "

ब. पा. ४९ व ० ५०. मधील मजकूर खालील पे. द. रु. १६ पत्र १६२ बरहुकूम आहे.

(१७)

श्री

ता. ४।५।१७३८ नकल.

श्रियासह चिरंजीव राजश्री नाना यांसीं चिमणाजी बल्लाळ आसीर्वाद तु ×××× ता छ ६ सफर प्रातःकाळ दोन घटिका ×× रुवार जाणून स्वकीये कुशल लिहित जाणे ××× तुम्हीं पत्र छ २४ मोहरमचे पाठविले. छ ३ सफरी प्रविष्ट जाहालें. दरबारचे वरकड ×××× वर्तमान लिहिलें तें कळलें उतरे आलाहिदा पुरवण्यांत लिहिले असेत. त्यावरून कळले. आलीकडे वसईच्या मोर्च्याचे वर्तमान कळत नाहीं, तरी सविस्तर ल्याहावें म्हणून लिहिलें कळलें. ऐसियासी वसईस मोर्चे चालविले व धमधमे बांधले. सुरंग लाविले. तो अर्थ वरच्यावरी × तुम्हास लिहिलेच आहे. आलीकडील वर्तमान तरी (व)सईस सुरंग उत्तरेकडून लाविले राजश्री × णोजी सिंदे यांचे पांच सुरंग डावेबा(जूने) येके बुरजास लागले. रा॥ येशवंत राऊ पवार व रा॥ राणोजी भोसले यांचे सुरंग दोन सफेलीस लागले. परंतु लाहान उजवे बाजूस संताजी वाघ दि॥ मल्हारजी होलकर यांचे सुरंग दोन येक लाहान व येक थोर मल्हारबापलिकडे विभूतराऊ संतकर दि॥ हशम याचा सुरंग ××× बाजू वाटून दिल्हा. सुरंग उडताच येल-गार करून जागा फते करावा ऐसा करार केला सुरंगाचे वर्तमान फिरंगीयास (कळाली) यावरी फिरंगी यानीं साफिलीचेआं ××× मेढाबुरजा देखील घातला. पेटीच ××× तां वसईची इमारत दाहा दाहा हात बारा बारा हात रुंदी इमा-रत पुरकार उंच गची. दुसरे वसईस बुरुज नव आहेत ते बाजयां एक एक कोटच.* वसईस सुरंग चालावे ऐसा पदार्थ नाहीं. तथापि लोकांनीं मेहनत म्हणावी तैसी करून सुरंग पोहोचविले. बुधले भरून सिधता केली. छ ४ सफरी बु(ध) वारी दोन घटिका दिवस आलियावरी सुरं(गास) बत्त्या दिल्ह्या. राणवा-कडील चार सुरंग उडाले. एक उडावयाचा होताच तो लस्करच्या लोकांनीं व हशमाच्या लोकांनीं डावे बाजूनी राणबाकडेस उतावळी करून तबके सोडून हलेस उठले. हुतकियींत राणबाचा पांचवा सुरंग उडाला. निमे बुरुज उडोन गेला. सुरंगाचे धोंडे उडाले ×××××× चे व हशमाचे लोक दड ××× जाले येसवंत राऊ पवार ×××× यांचे सुरंग लहान हो ×× उडाले काम गारेगार जाले ×××××× बायांचे दोन सुरंग (सुमारें दोन ओळी फाटल्या) ऐसी केली. आपल्याही लोकी ××× सून हिमत व अंगे ××× युध्यें प्राप्त जाहलीं पर ×××××× सारिखे युध्ये मराठी फौजेस पडिले नाहीं. सिमा सिमा केली याचा विस्तार लिहितां विस्तार आहे. मागाहून सविस्तर लेहून पाठऊन. मुक्य

लोकांची हत्यारे कितेक बुडाली व पांघुरणेहि बुडाली; परंतु आगरांत पाये घातला. इतकाच अर्थ जाहाला. थोरलें कार्य यामुळें न (च ?) जाहाले नाहीं. हेच गोष्टी श्रमेकरून साध्य जाहली. मेहनत केली ते परस्परे विदित होईल ते प्रमाण. पुढेंही **गंगाजी नाईक** याचे व लागियाचे विचारें जालें तरी मुख्य स्थलचा विचार मनास आणून वरकड हे जागे स्वामीनी पाहिल्यावर पुढें कितेक जागे सोडवावयाचे त्याची विचारणा करावी लागेल हे विज्ञाप्ति.'' पे. द. रु. ३४ पत्र २१

' तीर्थरुप राजश्री दादाचा (माहादजी) मुरदा मोर्च्यांत माहीमच्या असेल तरी शोध केला पाहिजे ?...आणि अग्नी दिला पाहिजे. ' पे. द. रु. ३४ प. १३४

ता. २४-१२-१७३७

'' मुरारजी अणजूरकर याखेरीज लोक कोणी आले नाहींत. ''

पे. द. रु. १६ पत्र १०४

'' वसईकडील गंगाजी नाईक राजश्री शंकराजीपंत याणी पाठविले होते. ते व जासूद जोड्या गोमांतकांतून वाडीस आल्या. गंगाजी ना॥ वसईस गेले वसईहून आपल्याकडे येतील ते सविस्तर वर्तमान निवेदन करितील त्याजवरून विदित होईल. ''

पे. द. रु. १६ पत्र १५१

' तेव्हां गंगाजी नाईक व शंकराजीपंत व मोरोजी शिंदे सर्व बैसोन विचार केला जर आपासाहेबास माहिमाकडे न जाऊ द्यावे ठाणियास आणावे हा विचार करून शंकराजीपंत आपास सामोरे गेले. ब. पा. ४६

'' त्यासी खासा यानीं ठाणेंयासी यावें म्हणजे येथुन सारा बंदोबस्त करावा. परंतु वसईस जाऊन मागती पाहोन फिरोन येऊन नयें...संकराजीपंतास सांगोन बंदोबस्त...करावा. परंतु खासियांनीं न जावे हा विचार.'' पे. द. रु. १६ प. १०८

'' इकडे शृंग (सुरंग) कोटाजवळ जात ते फिरगी वरून मोडतो.....हे आपलेच कार्य म्हणोन तुटोन कोटावर पडले. ''

ब. पा. ४९ व ० ५०. मधील मजकूर खालील पे. द. रु. १६ पत्र १६२ बरहुकूम आहे.

श्री

ता. ४।५।१७३८ नकल.

श्रियासह चिरंजीव राजश्री नाना यांसीं चिमणाजी बल्लाळ आसीर्वाद तु ×××× ता छ ६ सफर प्रातःकाळ दोन घटिका ×× रुवार जाणून स्वकीये कुशल लिहित जाणे ××× तुम्हीं पत्र छ २४ मोहरमचे पाठविले. छ ३ सफरी प्रविष्ट जाहालें. दरबारचे वरकड ×××× वर्तमान लिहिलें तें कळलें उतरे आलाहिदा पुरवण्यांत लिहिले असेत. त्यावरून कळले. आलीकडे वसईच्या मोर्च्याचे वर्तमान कळत नाहीं, तरी सविस्तर ल्याहावें म्हणून लिहिलें कळलें. ऐसियासी वसईस मोर्चे चालविले व धमधमे बांधले. सुरंग लाविले. तो अर्थ वरच्यावरी × तुम्हास लिहिलेच आहे. आलीकडील वर्तमान तरी (व)सईस सुरंग उत्तरेकडून लाविले राजश्री × णोजी सिंदे यांचे पांच सुरंग डावेबा(जूने) येके बुरजास लागले. रा॥ येशवंत राऊ पवार व रा॥ राणोजी भोसले यांचे सुरंग दोन सफेलीस लागले. परंतु लाहान उजवे बाजूस संताजी वाघ दि॥ मल्हारजी होलकर यांचे सुरंग दोन येक लाहान व येक थोर मल्हारबापलिकडे विभूतराऊ संतकर दि॥ हशम याचा सुरंग ××× बाजू वाटून दिल्हा. सुरंग उडताच येल-गार करून जागा फते करावा ऐसा करार केला सुरंगाचे वर्तमान फिरंगीयास (कळाली) यावरी फिरंगी यानीं साफिलीचेआं ××× मेढाबुरजा देखील घातला. पेटीच ××× तां वसईची इमारत दाहा दाहा हात बारा बारा हात रुंदी इमा-रत पुरकार उंच गची. दुसरे वसईस बुरुज नव आहेत ते बाजयां एक एक कोटच.° वसईस सुरंग चालावे ऐसा पदार्थ नाहीं. तथापि लोकांनीं मेहनत म्हणावी तैसी करून सुरंग पोहोचविले. बुधले भरून सिध्दता केली. छ ४ सफरी बु(ध) वारी दोन घटिका दिवस आलियावरी सुरं(गास) बत्या दिल्हा. राणवा-कडील चार सुरंग उडाले. एक उडावयाचा होताच तो लस्करच्या लोकांनीं व हशमाच्या लोकांनीं डावे बाजूनी राणबाकडेस उतावळी करून तबके सोडून हलेस उठले. इतकियांत राणबाचा पांचवा सुरंग उडाला. निमे बुरुज उडोन गेला. सुरंगाचे धोंडे उडाले ××××××× चे व हशमाचे लोक दड ××× जाले येसवंत राऊ पवार ×××× यांचे सुरंग लहान हो ×× उडाले काम गारेगार जाले ××××××× बायांचे दोन सुरंग (सुमारें दोन ओळी फाटल्या) ऐसी केली. आपल्याही लोकी ××× सून हिमत व अंगे ××× युध्यें प्राप्त जाहलीं पर ×××××× सारिखे युध्ये मराठी फौजेस पडिले नाहीं. सिमा सिमा केली याचा विस्तार लिहितां विस्तार आहे. मागाहून सविस्तर लेहून पाठऊन. मुक्य

गेष्ट युध्य एक तोंडी दुसरे जागा उपाय नाहीं. हा जागा फत्ते होणें देवाची दया आहे व तीर्थरूप राजश्री रायाचे (पुण्ये) होईल. या उपरी जैसे जैसे काम होत जाईल × × × तुम्हास लिहित जाऊं छ ६ सफर. ''

पे. द. रु. १६ पत्र १६२

'' माहिमास मोरचे तिन...रामचंद्र हरिस गोळी लागली... ...सरदार कामास आले. ''

बखर पान ४५

'' माहीमचे मोर्चेयाचे वर्तमान व तीर्थस्वरूप माहादाजीपंत दादा व चिंतो शिवदेव व जनोबा व गणोबा व वाघोजीराव खानविलकर व राजबाराव बुरुडकर यांचें वर्तमान (मृत्युचें) लिहिलें ते कळलें...आपणास (रामचंद्र हरीस) गोळी लागली म्हणून राजश्री जोशी याणी लिहिलें..... मुरारजी नाईक अणजोर याजबा॥ पनास...ऐकून ती तीनसे पाठविले...''

पे. द. रु. १६ पत्र १०५

ता. २५-१२-१७३७

'' त्यास माहीमास तीन मोर्चे येक तीर्थरुप (माहादेव) दादाचा, येक राजश्री कर्णाजी सिंदे व येक खंडोबा यैसे ा तीन...तीर्थ दादाचे मोर्चेयावरी अडीच तीन हजार माणुस चालोन आले, त्याजवरी राजश्री रामचंद्रपंत याणी घोडी घालून माघारा फिरविलें, तो रामचंद्रपंत यास गोली बाहुवरी लागली... ..त्यास दादा, राजबाराव बुरुडकर, व चिंतो सिवदेव व जनार्दन हरि व वाघोजीराव व त्याचा भाऊ व गणेश हरी प्रभू कारकून + + + यैसे· पडिले शे दीडशे सारे माणूस पडिले असेल...''

ता. २६-१२-१७३७ पे. द. रु. १६ पत्र १०६

'' फिरंगी कौलास आला साता दिवसांचा वायदा मागोन तारवे भरोन फिरंगी गोव्यास गेला. ''

ब: पा. ५१.

'' विनंती. फिरंगी कौलास आला; छ. ६ सफरपासून सा दिवसाचा वाइदा मागितला; त्यावरून त्यास वाईदा दिल्हा असे. वाईद्यास फिरंगी मुंबईस पोहचाहुन द्यावा व कोट आपले स्वाधीन करून घ्यावा यैसा सिद्धांत जाला आहे. ''

पे. द. रु. १६ पत्र १६३.



' पेद्र दमेल जरालानें गोव्यास लिहून पाठविले. जेर ठाण्याची मसलत कडदीनानें मोडलि, त्याजवरून कडदिनास अन्यायान आणुन गोव्यास पाठविलें '

बखर पा. ४७.

' कडदिन मुंबईस गेला ' पे. द. रु. १६ पत्र १२२ एप्रील १७३८

" जरालानीं कोटात असावे. व पेद्रू दमेल यानी बाहेर स्वारी सिकारी करावी येसे करून आले. याची उमेद फारसी बाहेर यावयाची आहे....कडदीन गोवियास गेला." पे. द. रु. १६ पत्र १२५

वसईस बहादुरपुरा येथील मोर्च्यांत दुसऱ्या सरदाराबरोबर 'कर्णाजी सिंदे व गंगाजी ना॥ अणजूरकर सन्नासे लोकानिसी ठेविले. '

पे, द, रु. ३४ पत्र १४१

" आणि लागाचे कपत्तानासी भेटवावा...दोरी वरुन द्यावी."

बखर पान ३१

" आम्ही येथून गंगाजी नाईकाचा जावई गणोजी नाईक (?) व खलोजी जासूद व खंडोजी घुडे यास पाठविले त्यास हे तेथें गेले कपितानाची भेटी जाहाली.....सोइरे धाइऱ्याचे बोलावरून समर्थास वचन दिले त्या प्रमाणे आपण सिध्यच असों.....जो दिवस नेमला त्यास अंतर न करिता ते दिवसीं यावें.....मायेत असतील त्यास सांगणें ते सांगितले आहे, परंतु पैका पाहिजे."

पे. द. रु. ३४ पत्र ६

" विनंती. उपरी गंगाजी नाईक आणजोरकर यास—जाऊन आजी पंधरा सोला दिवस जाहाले. अद्याप कांहीं वर्तमान कळत नाहीं. जरी कार्य करणे असेल तरी अशा प्रसंगात कसें करावे.....प्रस्तुत जनराल ठाणीयाहून वसईस जाणार आहेत. अशामध्ये कार्य करावे....." पे. द. रु. ३४ पत्र ३८

गंगाजी नाईक कोठें गेले होते ! पुणें येथें जाऊन ठाण्याच्या हल्ल्याबद्दल सन १७३७ मधें त्यानीं पेशव्यांचेकडे हट्ट धरला होता असें बखरपान ३६ वर आहे. त्यावेळीं गंगाजी नाईक गेल्यानंतर वासुदेव जोशी यानीं पे. द. रु. १६ पत्र ८ व पत्र १३ प्रमाणेंच हें पत्र लिहिलें होतें असें दिसतें.

" इकडे गोव्याहून फिरंगी पेद्रु देमल या नावाचा जराळ होऊन कुमक घेऊन आला आरमार वसईस आलें. गंगाजी नाईकानें आतुन कोटातिल नाजुक खबर आणलि तव फिरंग्याचि मसलत ठाण्यावर हला करावयाचि आहे...गंगाजी नाईक ठाणेयास आले...खंडोजि मानकरासि बोलिचा विरोध पडला... "

बखर पान ४४

" यानंतर इकडील वर्तमान आम्हीं बातमीकरितां माणूस पाठविले होते तें छ २९ साबानी संध्याकाळीं येऊन पोहचले त्याणही वर्तमान सांगितले कीं जुना जराल ठाण्यास होता तो गोव्याहून अरमार फरगात मोठे...घेऊन आला असे. तो येऊन ठाण्यावर कपाळ फोडून मरावे की ठाणे उठऊन लावावे यैसा निस्चयेतार्थ केला आहे.....वाईच (घसईच ?) बातमी राजश्री बाबूजी (बुबाजी ?) नाईक अणजूरकर यांकडील यैसीच आली आहे..... "

खंडोजी माणकराचे रामचंद्रपंताना पत्र. पे. द. रु. ३४ पत्र १३१

ता. १२-१२-१७३७

" लोकास बिगार लाविले...मग त्या लोकानि आशिरवाद दिधली "

ब. पा. ३४-३५

" आजी कल्याणास आलों.....कबिलासुद्धां मातबर माणूस गोमांतकास गेले हा परमदुष्ट आहे, हिंदूचे दर्शन कार्यास नये स्वामी आज्ञा करतील तर मुख्य स्थलाचा कारभार आम्ही आमरावतीहून उरकून येविसीचा.....आर्थ सांगोन आपणाकड बुबाजी नाईक रवाना केले आहेत, हे विदित करितील.....वरकड इकडील वर्तमान सविस्तर मशारनिले मुखवचनें करून सांगता कलो येईल. "

पे. द. रु. ३४ पत्र २०२ सन १७३६

" फिरंग्यानें ठाण्याची मसलत ठेविली अरमारावर बैसोन कुमक माही-
मास गेलि "

बखर पान ४५

" स्वामीनी लिहिलें कीं फिरंगीयाचे बातमीचें वर्तमान राजश्री बाबूजी (बुबाजी ?) नाईक यांचे पत्रावरून कलेल. "

पे. द. रु ३४ प. ३६

" याकरितां किले मजकूर (कामण) वसवावयाचा विचार करून तेथें रविवारी र॥ सिवाजी नाईक अणजोरकर या समागमे संभर माणूस देऊन किले मजकुरास पाठविले. " पे. द. रु. ३४ पत्र १०२

" छ १४ सफर. श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

चरणरज कृष्णाजी नाईक आणजूरकर व रामाजी माहादेव वगैरे सरदार मौ ठाणे माहाड सा॥ नमस्कार अनुक्रमें दंडवत विनंती उपरी, येथील वर्तमान जाणून ता॥ छ १२ सफर पावेतो या प्रांतीचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज पाहाटसि च्यार घटका रात्रीस गलबते तीन घेऊन गनिमाची स्वारी येरगळचे तारियावर येऊन लागले. त्यास येथून आम्ही अगोधरच पालथी पाठविले होते. त्यास गनीम अलीकडे उतरला, हे वर्तमान आईकोन वरचेवर स्वारी झाडेयानसी निघोन गेले त्यास गनीम गोलीचे टप्यावर आला होता. त्यास आम्ही चालोन मुकाबला करावयासी गनीमावर जातांच गनीमाने माघार घेतली आणि पलोन खुसकीचे मार्गी मढास गेला. गलबतें बंदरांत धरून जाळली. तेथें गलबतें जलत तवर च्यार घटका बसलों होतों. गलबतें चांगली जललेयावर निघोन ठाणे मजकुरी स्वारी सुधां पावलों. युध्य हावे हा हेत सर्वांचा होता. परंतु मुकाबला होऊन आला नाहीं. मौजे येरगल गाव तमाम जाळून आलो. सेवेसी श्रुत होय. विशेष आम्ही चोकडपालथी ठेविले आहेत. चौकशीनें असो हें विज्ञापना. विसेष. पोस ठाकूर बरखंदाज सिपाई जदीद चाकरीस राहवयासी आला असे. कल्याणास यांची वस्ती आहे. शिपाई खबरदार असे. तैनात करार करावयाचा हुकूम करणार वडील समर्थ आहेत शिपाई चांगला आहे. तैनात रुो आठ ८ करावयास आज्ञा केली पाहिजे. तैनात करार जालेयावर चाकरी मुरारजी नाईक यांचे जमावात करील. सेवेसी विदित होय हे विज्ञापना येथें तूर्त पावणेतीनसे माणसांचा सरंजाम आहे; परंतु कर्णा नाहीं. ठाणे मजकूरी कर्णा आगत्य १ येक स्वारीस असावा. तर कर्णा येक पाठवावयाची आज्ञा करणारस्वामी समर्थ आहेत. कर्ण्यांविसी मार्ग लक्षीत असो हे विज्ञापना. " पे. द. रु. ३४ पत्र २३

"

श्री.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक मुरारजी न॥ अणजूरकर मो॥ देऊल मोताईचे कृ॥ स॥ दं॥ त॥ छ १० माहे जिल्हेज पावेतो स्वामीचे कृपाअवलोकनें करून सुखरूप असों विसेश सामान प॥ ते पावले बि॥

र॥ कानोजी माणकर यांबरोबर दाफ ' १ केलें २

व नारायण गडकरी यांबरोबर सामान वि॥

५ पहारा

४ कुऱ्हाडा

२ कुदंली

४ दाफ केले

१००७ गोहुया

१०१५

येणे प्रो॥ सामान पोचले. त्यापैकी र॥ होनाजी बल कौडे यासी दारू केले २ दोन व गोल्या ५०० पाचसे देऊन, वेसावेयाचा कोटास र॥ केले असे; व वेसावेयाचे पत्र आले नाहीं. परंतु कोट फत्य जाला यैसा दिसोन येतो. विसेश दारु गोलीची बेगमी केली पाहिजे; व तोफा पाठविल्या नाही; तर तोफाची मारग लक्षीत असो. उदईक रातकाळी मुरचे लाविती. सेवेसी लि॥ असे. तोफ सतवर पाठवावयाची आज्ञा केली प॥. वेसावेयाचे फत्यचे पत्र आले म्हणजे सेवेसी प॥. सेवेसी श्रुत होये. विसेश लोकास अडसेरी देणे म्हणऊन आज्ञापत्र सादर जालें; परंतु संनिधचे गांव वोस पडले आहेत. तेथून दाणा आणुन लोक खातात. तो सरकारची अडसेरी घेतात यैसा विचार नाहीं दाणा मिलेना तेव्हा सरकारचे कोठीचा गला आणुन अडसेरीस देऊन; व काहीं भरतीस लोक पाठवावयाची आज्ञा केली प॥. सेवेसी विज्ञापना--"

पे. द. रु. ३४ पत्र २०

श्री

" छ १५ जिल्हेज

श्रीमंत राजश्री आपास्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक कृष्णाजी नाईक अणजूरकर व रामाजी माहादेव मो॥ मालाड चर्णावरी मस्तक ठेऊन सिरसां॥ नमस्कार अनुक्रमे दंडवत विनंती विज्ञा-

पना. ता॥ छ १४ जिल्हेज पावेतो येथील वर्तमान येथास्तित असे विशेष. हुजूरून पेदरेल १ रतन पुरो याबरोबर पाठविला तो पावला. उद्यांपासून भटी रचावयाचे काम चालीस लाविलें. आज मजूरदार ५०० पाचसे जमा जाहले. काम निकडीने चालवीत असो विसेष. काबाडी भिवंडीपैकीं १९ येकूणीस हुजुरून पूर्वी पाठविले आहेत त्यास हजीर ई ॥ २७ जिलकाद पासून आज ता॥ लाकडे तोडावयाची ती तोडिली. याउपरी यांस येथें ठेवावयाचें काम नाहीं. लाकडे चौहो भटीची तोडिली आहेत, आणखी पाहिजेत तर सिपाई लोक तोडितील इतके असोन कावाडियासी नख्त दरमहा रो॥ ४ व दररोज तांदूळ ६६१॥ प्रमाणें द्यावे लागतात, येकून सरासरी दरमहा दरनंबरी रो॥ ७। सवासात पडतात. येकूणसदर असामीस दरमहा रो॥ १३७॥। द्यावे लागतात. इतके असोन याउपरी त्यांच्याने दुसरे काजकाम होत नाहीं." पे. द. रु. ३४. पत्र ३०.

"

श्री.

श्रीसकल तीर्थस्वरूप श्रीबुबाजी नाईक मो॥ ठाणे

वडिलांचे सेवेशी

अपत्यासमाने कृष्णाजी नाईक मो॥ मालाड चर्णावर मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विनंति उपरी. येथील क्षेम जाणुन आपले क्षेम लिहीत गेले पाहिजे. विशेष. धाराबीकडे बातमी आणावयासी माणूस रा॥ केले होते त्याणे येऊन सांगितले, कीं धारावीस फिरंगेयाचे माणूस पांचसे आहे. च्यारसे माणुस मुसलमान व मराठे व सेंभर सोलदाद आठसे घातले असेत. येकूण पाचसे गनीम असे. परंतु दोन बंदरामध्यें दोन मचवा तरत्या असेत, येतात जातात, यैसे वर्तमान इकडील सांगितलें आणि माहिमास माणूस पाठविले होते तेथें च्यार रोज होते ते आज येथे आले. त्याणे येऊन सांगितलें कीं आरमार तों आलें नाहीं. आणि जुना जेरार होता तो कोरलेचे किलेयावर बंदी घातला. त्याचा मामा विजुरल गोवेयांसी आहे, त्याणें बोली विरोंरदारजवळ घातली आहे कीं माझ्या भाचा सोडल्याविना आपण अरमार घेऊन जात नाहीं. त्यास येथें घेऊन येणे. मग ते आम्ही येसे मिलोन जाऊन. यैसी बोली गोवेयासी घातली असे; आणि तेथ अरमारही सिध जाले असे. तेथ त्यांची दोघांची समजावीस जाली असली, तर अरमार येका दोन्हां दिवशीं रिघणार असेत. बाहेर अरमार फिरते ते संभाजी अगरे याचे व हबशाचें हिंडते येसे सांगितले. तेथ गोष्ट सांगितली आणि त्याचा मुद्दा यैसा असे कीं अरमार आलेयावर येक वेल दाखला घ्यावा यैसा मुकदमा सांगितला. ते वडिलांस लिहिलें असे. बहुत काय लिहिणे क्रपा असो दीजे हे विनंती.

श्री.

पुरवणीपत्र चिरंजीव नारायेणजी नाईक चिरंजीव कृष्णाजी नाईक याचा कागद बातमीचा जात असे तो मनास आणणें. संभाजी आगरे याचा आरमार दर्यात फिरत असे. त्याची च्यार तारवे धरून नेली. गल्या भरली, दोन सिदीची व दोन फिरंग्याची सदरहु ४ गल्या भरली धरून नेली आणि सूलहुन फिरग्याची जाहाज गल्या भरुन येणार आहेत ती किल्ल्यात न पोहोच (त) तो सरजाम करून घेणें, व संभाजी आगरे याचे सख्यत्व (सख्यत्व) असत तर मोठासा मनसुबा होऊन येता. परंतु खावंद आपले कोठून आईकणार आणि माारनिले यास हातीं धरून आपले कार्य करून घ्यावे, त्यास तुम्हास तेथे बोलीचाली करितां गोस्ट दरसऊन घेणे कीं माारनिले याचे समाधान करून पुढे अरमार घेऊन ह्या प्रांती मदत करी तो विचार योजोन गोस्ट जाणवणे; व आक्षेकर इकडोन गेला आहे त्यास त्याणी आपले स्वयातीस कितीक प्रकारे सब्द लाविला असे. त्यास आम्ही पूर्वीच येत्नः केला होता परंतु हाती गवसत नाहीं. अंताजिपंत पलशा यानी पोटीसी घातला आहे आणि हाली हुजूर पाठविला असे. त्यास तुमच्यानें जितेके त्याचे पारिपत्य करवेल त्यास कधी चुको नका. श्रीमंत राजश्री आपा यास पत्रें लिहिले आहेत, वाचोन लाखटा करून त्यास देणें श्रीमंत राजश्री जोसी यासहि लिहिले असे. तेही मनास आणुन लाखोन (?) देणें आणि त्यासी बहुत युक्तीनें भाषण करणें व मुंबईसी तारवे येतात जातात त्याचा हक्क आम्हास येत नाहीं आणि दिवाणांतही घेत नाहीं, त्यास मधेच जातो हा कोण विचार ? न आम्हास न पुर्ता दिवाणात, हे बोली करणें व येकसे बत्तीस रुपयाचे उंची नग व सेले त्यास तुम्हास मागाच लिहिले आहे की त्यास गोस्ट जाणवावी. त्यास नसेल जाणवली तर जाणवणे. निमित्ते कीं कोण प्रसंग कसा येतो तो कलत नाहीं. याजकरता कानावर गोस्ट घालावी. बहुत लिहित नाहीं. हे आसीरवाद "

पे. द. रु. ३४ पत्र ८२

" छ १५ जिल्हेज

श्री.

श्रीमंत राजश्री आपासाहेबांचे सेवेसीं.

सेवक आज्ञाधारक कृष्णाजी नाईक अणजूरकर व रामाजी महादेव मो मालाड चरणावरी मस्तक ठेउन सिर सां नमस्कार अनुक्रमें दंडवत विज्ञापना. सा. छ १४ जिल्हेजपावेतो येथील वर्तमान येथास्थित असे विसेष मजूरदार



आटगाव तापैकीं पंचावन आले त्याबरोबर लोखंड वजन पके २॥ मण व पेंड वजन ३ तीन मण येणे प्रो पाठविली त्यास येथें वजनी वजन कचे भरले असे.

।३ लोखंड दागिने सुमार २५ येकून वजन कचे
।३ पेंड वजन कचे
|||१

येणें प्रमाणें सोलामण जिनस पावला. बारसणीचे वजन करून घेतले असे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना विसेष. पेदरेल लौकर पाठवावयासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. प्रस्तुत येक पेदरेल आला म्हणजे येथें दोन आहे व तो येक ऐसे तिघे मिळोन भटीचे काम चालवितील. माकण करविली आहे ती आगत्य पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय. रा॥ गोपालराव कानडा याचे जमावास रोजमुरा पावला नाहीं म्हणोन लोक गवगवा करितात. तर कृपालु होऊन यांचे लोकांस रोजमुरा द्यावयासी आज्ञा केली पाहिजे. विसेष काल ब्रहसपतवारीं २४८ खेपा जाल्या, दर खेपेस धोंडे पका -|||- प्रमाणें आणविला, त्यास दर खेपेस फद्या १। प्रो येकूण फदे सुमार ३१० दर रुपये यासी फदे ४० प्रो येकूण रुपये ७॥। पावणे आठ काल खर्च मजुरा जाले ते माहालचे ऐवजपैकीं दिल्हे आहेत. आनखी आज पाचसे माणूस यावे तो जमा होईल. हुजुरून तीस चाळीस रो देवावे हे विज्ञापना. ”

पे. द. रु. ३४ पत्र १०३ ता. २३-३-१७३८

“

श्री.

श्रीमंत राजश्री आपासाहेब साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक मदनाजी नाईक अणजूरकर हवालदार किले श्रीवर्धनगड सेवेसी दंडवत विज्ञापना ता॥ छ १० माहे रविलाखर पावेतो किले मजकूरचे व आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. किले मजकूरचे भरतीविसी पूर्वी सेवेसी येक दोन बिनंतीपत्रें पाठविलीं, परंतु किलेयाची भरती होऊन आली नाहीं. तर हल्लीं किले मजकुरी लोक भरतीस माणुस पनास ५० आहे. पाहारेयास च्यार पांच आसामी असावे, त्यास हल्ली पाहारेयास दोन दोन असामी आहेत. भरतीचे यैसे जें वर्तमान आहे सेवेसी कळावे म्हणोन लिहिले असे. भरती करावयाची आज्ञा करणार साहेब समर्थ आहेत किले मजकुरी तेल व तूप व भात तंबाखू किले-मजकूरी सामान येक सेर नाहीं. किलेयाचे सदरेस व दिवटीस तेल लागते ते महिनेयाचे महिनेयांत माचीहून आणून गुजराण करितो व भाताखेरीज किले

श्री.

पुरवणीपत्र चिरंजीव नारायेणजी नाईक चिरंजीव कृष्णाजी नाईक याचा कागद बातमीचा जात असे तो मनास आणणें. संभाजी आगरे याचा आरमार दर्यांत फिरत असे. त्याची च्यार तारवे धरून नेली. गल्या भरली, दोन सिदीची व दोन फिरंग्याची सदरहु ४ गल्या भरली धरून नेली आणि सूलहुन फिरग्याची जाहाज गल्या भरुन येणार आहेत ती किल्ल्यात न पोहोच (त) तो सरजाम करून घेणें, व संभाजी आगरे याचे सख्यत्व (सख्यत्व) असत तर मोठासा मनसुबा होऊन येता. परंतु खावंद आपले कोठून आईकणार आणि माारनिले यास हातीं धरून आपले कार्य करून घ्यावे, त्यास तुम्हास तेथे बोलीचाली करितां गोस्ट दरसऊन घेणे कीं माारनिले याचे समाधान करून पुढे अरमार घेऊन ह्या प्रांती मदत करी तो विचार योजोन गोस्ट जाणवणे; व आक्षेकर इकडोन गेला आहे त्यास त्याणी आपले स्वयातीस कितीक प्रकारे सब्द लाविला असे. त्यास आम्ही पूर्वीच येत्न केला होता परंतु हाती गवसत नाहीं. अंताजिपंत पलशा यानी पोटीसी घातला आहे आणि हाली हुजूर पाठविला असे. त्यास तुमच्यानें जितेके त्याचे पारिपत्य करवेल त्यास कधी चुको नका. श्रीमंत राजश्री आपा यास पत्रें लिहिले आहेत, वाचोन लाखटा करून त्यास देणें श्रीमंत राजश्री जोसी यासहि लिहिले असे. तेही मनास आणुन लाखोन (?) देणें आणि त्यासी बहुत युक्तीनें भाषण करणें व मुंबईसी तारवे येतान जातात त्याचा हक्क आम्हास येत नाहीं आणि दिवाणांतही घेत नाहीं, त्यास मधेच जातो हा कोण विचार ? न आम्हास न पुर्ता दिवाणात, हे बोली करणें व येकसे बत्तीस रुपयाचे उंची नग व सेले त्यास तुम्हास मागाच लिहिले आहे की त्यास गोस्ट जाणवावीं, त्यास नसेल जाणवली तर जाणवणे. निमित्ते कीं कोण प्रसंग कसा येतो तो कलत नाहीं. याजकरता कानावर गोस्ट घालावी. बहुत लिहित नाहीं. हे आसीरवाद ”

पे. द. रु. ३४ पत्र ८२

“ छ १५ जिल्हेज

श्री.

श्रीमंत राजश्री आपासाहेबांचे सेवेसीं.

सेवक आज्ञाधारक कृष्णाजी नाईक अणजूरकर व रामाजी महादेव मौ मालाड चरणावरी मस्तक ठेउन सिर सां नमस्कार अनुक्रमें दंडवत विज्ञापना. ता. छ १४ जिल्हेजपावेतो येथील वर्तमान येथास्थित असे विसेष मजूरदार

प्रत क्र. ४
स्पष्ट प्रत
सं. ..... नं. .....
ता. ....
डा. प्र.

आटगाव ताापैकीं पंचावन आले त्याबरोबर लोखंड वजन पके २॥ मण व पेंड वजन ३ तीन मण येणे प्रो पाठविली त्यास येथें वजनी वजन कचे भरले असे.

।३ लोखंड दागिने सुमार २५ येकून वजन कचे
।३ पेंड वजन कचे
।।।१

येणें प्रमाणें सोलामण जिनस पावला. बारसणीचे वजन करून घेतले असे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना विसेष. पेदरेल लौकर पाठवावयासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. प्रस्तुत येक पेदरेल आला म्हणजे येथें दोन आहे व तो येक ऐसे तिघे मिळोन भटीचे काम चालवितील. माकण करविली आहे ती आगत्य पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय. रा॥ गोपालराव कानडा याचे जमावास रोजमुरा पावला नाहीं म्हणोन लोक गवगवा करितात. तर कृपालु होऊन यांचे लोकांस रोजमुरा द्यावयासी आज्ञा केली पाहिजे. विसेष काल ब्रहसपतवारीं २४८ खेपा जाल्या, दर खेपेस धोंडे पका -।।।- प्रमाणें आणविला, त्यास दर खेपेस फद्या १। प्रो येकूण फदे सुमार ३१० दर रुपये यासी फदे ४० प्रो येकूण रुपये ७॥। पावणे आठ काल खर्च मजुरा जाले ते माहालचे ऐवजपैकीं दिल्हे आहेत. आनखी आज पाचसे माणूस यावे तो जमा होईल. हुजुरून तीस चाळीस रुो देवावे हे विज्ञापना. ”

पे. द. रु. ३४ पत्र १०३ ता. २३-३-१७३८

“ श्री.

श्रीमंत राजश्री आपासाहेब साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक मदनाजी नाईक अणजूरकर हवालदार किले श्रीवर्धनगड सेवेसी दंडवत विज्ञापना ता॥ छ १० माहे रविलाखर पावेतो किले मजकूरचे व आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. किले मजकूरचे भरतीविसी पूर्वी सेवेसी येक दोन बिनंतीपत्रें पाठविलीं, परंतु किलेयाची भरती होऊन आली नाहीं. तर हल्लीं किले मजकुरी लोक भरतीस माणुस पनास ५० आहे. पाहारेयास च्यार पांच आसामी असावे, त्यास हल्ली पाहारेयास दोन दोन असामी आहेत. भरतीचे ऐसे जें वर्तमान आहे सेवेसी कळावे म्हणोन लिहिले असे. भरती करावयाची आज्ञा करणार साहेब समर्थ आहेत किले मजकुरी तेल व तूप व भात तंबाखू किले मजकूरी सामान येक सेर नाहीं. किलेयाचे सदरेस व दिवटीस तेल लागते ते महिनेयाचे महिनेयांत माचीहून आणून गुजराण करितो व भाताखेरीज किले

मजकुरी दुसरा सामान कोठीस येक सेर जमा नाहीं. व परसोजी सरनोबत किले मजकूर यास दिवट्या देऊन सां॥ पाठविली त्यास तेलाची रु. १॥ (?) दिली नाहीं. तर साहेबी कृपाळु होऊन सरनोबत याचे दिवटीस तेल घ्यावयाची रु. १॥ (?) पाठवावयाची आज्ञा करणार साहेब समर्थ आहेत. सेवेसी विदित होय हे विज्ञापना. ''

पे. द. रु. ३४ पत्र १२२

ता. १२ मे सन १७३९ रोजीं करण्यांत आलेल्या

वसईच्या तहाचीं कलमें.

" (१) पोर्तुगीज फौज व बुणगे यांस हत्यारांसह बँन्ड वाजवीत व निशाण उभारून, सुरक्षितपणें किल्ल्याबाहेर मराठ्यांनीं जाऊं द्यावें.

(२) वसई येथें राहात असलेलीं खिस्ती, हिंदी किंवा मुसलमानीं कुटुंबें किंवा लोक, जे वसई सोडून जाण्यास इच्छितील, त्या सर्वांस आपआपली मालमत्ता घेऊन चिमणाजी आप्पानें सुरक्षित जाऊं द्यावे.

(३) वसईच्या बंदरांत जहाजें असतील त्यांसही आपापला दारूगोळा व तोफखाना घेऊन सुरक्षितपणें बंदरांतून जाऊं द्यावें.

(४) कलम दोन प्रमाणें लोकांस निघून जाण्यास गलबतांची वगैरे जरूर लागल्यास तीं गलबतें मराठ्यांनीं पुरवावीं, आणि हे लोक आपापल्या स्थळीं पोंहोंचेपावेतो, रस्त्यांत आंगरे वगैरे कडून त्यांस त्रास न होईल, अशी तजवीज चिमाजी आप्पानें ठेवावी.

(५) खिस्ती पाद्र्यांसही आपापलीं मालमत्ता घेऊन सुरक्षित जाऊं द्यावें.

(६) पोर्तुगीज लोकांचा दारूगोळा व दाणागोटा वसईस आहे तो सर्व बरोबर घेऊन जाण्याची त्यांस मोकळीक असावी. (हें कलम चिमाजी आप्पानीं कबूल केलें नाहीं. सर्व सामान त्यानीं विकत घेतलें.)

(७) जे खिस्ती लोक आपखुषीनें वसईच्या हद्दींत राहातील त्यांस आपलें धर्माचरण करण्यास मराठ्यांनीं हरकत करूं नये, किंवा त्यांच्या जिंदगीचा अपहार करूं नये. हें कलम मुसलमान व हिंदूसही लागू असावें.

(८) एकमेकांनीं पकडलेले कैदी ज्यांचे त्यास परत करावे.

(९) किल्ला खालीं करून निघून जातेवेळीं पोर्तुगीज्यास कोणताही त्रास होऊं नये, म्हणून चिमाजीनें आपली फौज दूर अंतरावर बहादुरपुरास न्यावी पोर्तुगीज लोक जहाजांत बसून तोफेच्या टप्याच्या बाहेर जाईपावेतों मराठी फौजेनें किल्ल्यांत प्रवेश करूं नये.

(१०) वसईतील कोणताही माल किंवा सामान योग्य किंमत दिल्याशिवाय मराठ्यांनीं घेऊं नये.

(११) वसई शहरांत तीन खिस्ती देवळें आहेत तीं तशींच राहुं द्यावीं: त्यांतील मूर्तीस व दागिन्यांस मराठ्यांनीं धक्का लावूं नये.

(१२) या तहावर सही झाल्यानंतर त्याप्रमाणें वर्तन राहण्यासाठीं चिमाजीनें आपला एक अंमलदार पोर्तुगीज जहाजावर ठेवून द्यावा, आणि पोर्तुगीजांचा एक अंमलदार मराठ्यांचे ताब्यांत राहावा.

ग्रंथ छापून झाल्यावर मिळालेली माहिती

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें ह्या संस्थेच्या चालकांनीं परवानगी दिल्यामुळें मंडळाच्या संग्रहालयांतील कांहीं ऐतिहासिक पुस्तकांत सांपडलेलीं पुढील पत्रें वगैरे महत्वाचीं वाटल्यावरून तीं त्यांच्या परवानगीनें ह्या पुस्तकास जोडलीं आहेत.

श्री.

प. नं. ३२ (अप्र. अणजूर सं.) मार्गव॥ ११ शके १६६३ ता. २८-१२-१७४१

छ मा॥ गंगाजी नाईक अणजूरकर यांसी बाळाजी बाजीराऊ प्रधान सूरसन इसने आरबेन मय्या व अलेफ. तुम्ही वसई प्रांताचे मसलतीस श्रम साहास बहुत केले यास्तव तुम्हास कृपाळु होऊन तुम्हास पालखी दिली असे. पालखी वागवूनं बसत जाणें. पालखीस वेतन तुम्हास वतन करून दिल्हे आहे. यांचें उत्पन्न होईल त्यापैकीं देत जाणें. जाणिजे. छ २४ सव्वाल आज्ञाप्रमाण मोर्तब लेखन सीमा. —ऐतिहासिक पत्रव्यवहार

छ २७ मोहरम १७-५-१७३७

खर्च रु ॥

४३ जखमी धारावीस जाले त्याचे खर्चास

६ मुरारजी न॥ अणजूरकर दि॥ खंडोजी माणकर १

८ दि॥ सिवजी न॥ अणजूरकर ४

६ दि॥ बाबूजीन॥ (बूत्राजी) न॥ अणजूरकर २

११ दि॥ गंगाजी न॥ अणजूरकर ३

१२ दि॥ सोमाजी कुंठे ४

४३

—पेशवदप्तर रुमाल ३० पा. ३४६

छ २० रजब् ३-११-१७३७

दफाते लक्ष्मण मायाजी कळवेकर दि॥ गंगाजी न॥ अणजूरकर यांसी खंडोजी माणकर याजकडून साष्टि प्रांते शंभर रुपयाची गांव नेमून देविला. रोजमुरा नेमणुक प्र॥ देत जाणे म्हणून सनद

—पे. द. रु. ३० पा. ३५०

प. नं. १०९ श्री शके १६५८ फाल्गुन शुद्ध १०

पु॥ रा॥ गंगाजी ना॥ अणजोरकर गोसावी यासीः—

सु॥ सबा सलासीन मया अलफ तुम्ही शिवजी परचितराव याजविशी लिहिले, कीं, हे कामकाजात आहेत. त्याचे हातून कित्येक कामें होतील, त्यासही बोलाविलें पाहिजे म्हणून लिहिलें. त्यास ते पूर्वापारच कामावरून आहेत त्याविशिं पूर्वी तुम्ही विदित केलेच आहे. त्याणी कामकाज करून आपलें सर्व प्रकारें ऊर्जित करून घ्यावे व कितेक त्याचा सरंजाम करणें तोही होईल. त्याचें समाधान तुम्ही करणें त्याचे मुखमाफिक सरंजाम होईल. सारांश त्यानीं मन घालून काम करावें. तुम्ही सांगाल त्याप्रमाणें त्याचा सरंजाम होईल. तुम्ही त्यास तेथेच ठेऊन घेणें ते तेथून आणावे तरी कल्याणकर तर्क करितील. यास्तव त्यास ठेवणें आणि तुम्ही येणें समई त्याचेच हातून काम घ्यावे लागेल जाणीजे छ ९ जिल्काद. लेखन सीमा. —राजवाडे खंड ६

पत्र नं. ११० श्री शके १६४८ जेष्ठ.

राजा शाहू नरपति हर्षनिधान
बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान

अभयपत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधि राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडीत प्रधान नानोजी देसाई, व जिवाजी ठाकूर व बाळकोजी राऊ, व गणेशजी कुळकर्णी व अंताजीराऊ ता॥ फिरंगाण सहूर सन सबा अशरीन मया व अलफ तुमचे विशिं रा॥ गंगाजी नाईक याणी तुमचे निष्ठेचा अर्थ कितेक निवेदन केला. त्याजवरून कळों आले. तुम्ही कार्याचे लोक, तुमचें सर्वप्रकारें चालवावे हे आवश्यक जाणोन तुम्हास अभयपत्र सादर केले असे तरी तुम्ही कोणेविशिं चित्तात वसवास न धरितां सुखरूप राहणें. तुमचे उर्जिताचा अर्थ रा॥ गंगाजी नाईक याणी निवेदन केला. त्यासी आज्ञा माारनिलेस केली आहे. त्यावरून कळेल. तुम्ही आपला खातर जमा असो देणें जाणिजे छ सवाल आज्ञाप्रमाण

लेखन
सीमा.
—राजवाडे खंड ६

प. नं. ११८ श्री शके १६५९ माघशु॥ १

राजश्री गंगाजी ना॥ अणजूरकर गा॥ यांसीः—स्ने॥ चिमणाजी बल्लाळ आशीर्वाद. सु॥ समान सलासीन मया अलफ. तुम्ही विनंतीपत्र पाठविले, त्यांत मुख्यार्थ हाच कीं:—

फिरंगीयांचे आरमार गोव्याहून आले आहे. ठाण्याची मजबुती तिळतुल्य नाहीं. र॥ खंडोजी माणकर अर्जुदा आहेत ते म × × सु × × × ही आपण र॥ रामाजी महादेव यांस घारावीस जाऊन वर्तमान सांगीतलें त्याणीं घारावीची वेहबुद्धी करून ठाण्यास आले येथीलही मजबुती करणें ते करितात. खंडोजी माणकरास कष्टी करावयाचे नव्हते म्हणोन लिहिले तें कळलें. रामाजी माहादेव याणीं घारावी व ठाणें येथील मजबुती केली उत्तम आहे. र॥ खंडोजी माणकर यास समाधानपत्र पाठविले असे तेही चुकणार नाहीं. १

आपलें वतन चालवावे सध्यां वतनाचे उत्पन्न होईल ते साहेब कामास लावूं म्हणोन लिहिले तें कळलें. ऐशास सर्व प्रकारचे तुमचे अगत्य. तुम्ही पदरचे आहां. इकडील आमचा गुंता वारला म्हणजे तिकडे येऊं. येविशिं आज्ञा कर्तव्य तें करुं ऊर्जित केलें जाईल.

आपले × ×
तुम्ही × × १

ठाणे वसई वगैरे प्रांते जमाव फार जाहला सरकारचा पैकाह मुबलक खर्च होतो. फिरंगीयाची ठिकाणें मजबूत आहेत. सुलतानढव्यानी × × नी येत नाहीं याकरितां जागाजागा फिरंग्यांचे कोठीचे उरावर गड्या बांधाव्या फिरंगी कांहीं पैकेकरी नव्हे गल्यादाण्याविण सहजच आयास येईल. आपल्यास शिबंदी कम पडे म्हणोन लिहिले तें कळले. ऐशास तुम्ही विचार लिहिला खराच आहे. राजश्री वासुदेव जोशी यांस लिहिले आहे या उपरी गड्या बांधावयाचा प्रारंभ केला जाईल. १

मुलकामध्यें जागा जागा सरकार कमाविसदार आहे. तेथें सेवकाचा एक एक माणूस असिल्यानीं दोही जागा दाखल आहे म्हणून लिहिले तें कळलें. ऐशास आम्ही तिकडे आलीयावर कर्तव्य तें केलें जाईल १

तुम्ही शंकराजी केशव × × सु चौकशी बरी करून खबरदार रहाणें. फिरंगी हावभरी जाहला आहे. एकवेळ थोबाडून ठासून राखणें जाणिजे. छ २५ रमजान आज्ञाप्रमाण.

लेखन सीमा

—राजवाडे खंड ६

(४)

गंगाजी नाईकांचें हस्ताक्षर



दानपत्राच्या वरील छायाचित्रांतील बालबोध अक्षर
गंगाजी नाईकांचें आहे.

वसईच्या किल्ल्याचे दोन दरवाजे

दर्या दरवाजा

खुष्की दरवाजा

—माधुरीचा बखर.

Photos by Vasantrao D. Mhatre.

बखरींतील गांवें, खाडया, किल्ले इत्यादि स्थलांची

सूची

अ.

१ अणजूर:—मोडकांच्या ठाणें जिल्ह्याचें वर्णनांत दिलेल्या माहितीवरून असें दिसून येतें कीं, हा गांव फार पुरातन कालीं वसलेला आहे. आठव्या शतकापासून ह्या गांवाचा उल्लेख इतिहासांत आढळतो.रामदेवराव ह्याच्या राजवटींतील एक अणजूरचा ताम्रपट उपलब्ध झालेला आहे. त्यांत देवगिरीच्या यादवराजांची वंशावळ दिलेली आहे. रामदेवरायाचें आयुरारोग्य व ऐश्वर्य यांची वृद्धि व्हावी म्हणून कोंकणच्या श्रीकृष्णदेवानें अणजूर गांव (खाजण वराडी पल्लिसुधा) निरनिराळ्या शाखेच्या व गोत्राच्या ४० ब्राह्मणास शके १२१२ विरोधी संवत्सर वैशाख शुक्ल १५ या दिवशीं दान दिला. (हे. च. पान १४६) ह्या गांवीं बाळ नाईक इ. स. १५८० ते १५९० च्या दरम्यान केव्हां तरी आपल्या बंधूसहवर्तमान राहण्यास वांद्याहून आले त्यावेळीं ह्या प्रांतांत फिरंग्यांचा अंमल नव्हता. इ. स. १७२१ त गंगाजी नाईकांनीं अणजूर सोडलें. इ. स. १७४० किंवा १७४१ त पुन्हां नाईकांचे कुटुंब अणजूरांत आलें. गंगाजी नाईकांचें वास्तव्य कल्याणासच होतें. त्या दिवसापासून आजपर्यंत नाईकांच्या घराण्यांतील पुष्कळ कुटुंबांची वस्ती अणजूरासच होती. परंतु हल्लीं फारथोडीं म्हणजे १०।१२ कुटुंबें अणजूरास आहेत. ह्यागांवीं पुरातन ठाकूर घराण्याचीं व तसेंच नाईकांबरोबर आलेल्या ठाकूर घराण्याचीं बरींच कुटुंबें पूर्वीं होतीं. हल्लीं एकच कुटुंब आहे. नाईकांच्या गोत्राजांपैकीं कोतवाल ह्यांचींहि कुटुंबें पूर्वीं अणजूरास होतीं. हल्लीं येथें कोणीही कोतवाल रहात नाहींत. नाईकांना तो गांव ४ पाड्यासुद्धां शराकती इनाम आहे. गंगाजी नाईकांना मिळालेला प्रसादाचा श्री सिद्धिविनायक अणजूरच्या माडींत आहे. गणेशचतुर्थीच्या वेळीं पांच दिवस कीर्तन उत्सव होत असतो, पूजेकरितां गांवच्या इनामांतून वर्षास पुजाऱ्यास १०० रु. पगारादाखल मिळतात. परशिक डोंगराच्या पूर्वेस खाडीच्या ह्या अंगास हा गांव आहे. गांव उंचवट्यावर असून हवापाणी उत्तम आहे. ह्या गांवांत फिरंग्यांचे वेळची एक फार पुरातन काळची नाईकांची माडी आहे. माडीच्या पश्चिमेस सुंदर घाट असलेलें एक पक्कें बांधलेलें तळें आहे. माडीच्या तटबंदीची भिंत पडलेली आहे. ह्या गांवास जाणेकरितां जि. आय. पी. रेल्वेच्या दिवा स्टेशनावर उतरून पुढें होडींतून जावें लागतें. हल्लीं बोर्डानें दिल्ली-आग्रा सडकेपर्यंत अणजूराहून सडक बांधलेली आहे. येथें श्रीरामनवमीस मोठी यात्रा भरते.

२ अरनाळा:—वसई तालुक्यांत वसईपासून १५।१६ मैलांबर आगाशीचे पश्चिमेस हा किल्ला वैतरणेचेकाठीं समुद्रांत, बेटांत आहे. हा जंजिरा किल्ला अद्यापि शाबूद आहे. किल्ला लहानच असून मध्यें शंकराचें देवालय आहे. समुद्रकिनारीं अर्नाळा म्हणून लहानसा गांव व बंदर आहे. किल्ल्यांत होडींतून जावें लागतें. किल्ल्यांत पाणी गोड आहे. हें उत्तम हवेचे ठिकाण आहे. २३-५-१७३७ रोजीं हा किल्ला बाजीराव पेशव्यांनीं बांधून पुरा केला. मार्च १७३८ मध्यें पुन्हां ह्याची दुरुस्ती केली होती. वसईहून मोटारनें अरनाळ्यास जातां येते. ह्या किल्ल्याचें नांव सिंधुदुर्ग असून त्यांत मुसलमानी इमारतीचे अवशिष्ठ राहिलेले आहेत. पूर्व दरवाज्यावर एक बालबोध लिपींत लिहिलेला कोरीव लेख आहे.

बाजीराव अमात्य मुख्य सुमती आज्ञापिले शंकरा ।
पाश्चात्यासि वधूनि सिंधु उदरीं बांधा त्वरें जंजिरा ॥
अर्नाळा जलदुर्ग चिंतुनि मनीं बाजी तुळाजी सुता ।
शिल्पज्ञे दृढ शौर्य जाणुनि तया दुर्गासि संस्थापिता ॥
अंक ९ बाण ५ रस ६ चंद्र १ शकाते ।
ज्येष्ठ पिंगळ सिन्तेंदुदिनातें ॥
रोहिणीध्रुव सुपुष्यहि जेव्हां ।
यशवंत बुरुजा करि तेव्हां ॥

पर्वणीचे दिवशीं समुद्रस्नानास लोक येथें येतात.

३ अमरनाथ:—(अंबरनाथ) हा गांव कल्याण तालुक्यांत आहे. जि. आय. पी. रेल्वेच्या पुण्याकडील फाट्यावर कल्याणपासून पहिलें स्टेशन अंबरनाथ आहे. येथें शंकराचें देऊळ आहे. व जवळच कोरीव लेणीं आहेत. येथें काड्यांच्या पेट्यांचा कारखाना आहे. येथें जवळच कांबें नांवाचे गांव आहे त्याठिकाणीं गंगाजी नाईकानीं आईच्या स्मरणार्थ बांधलेलें एक तळें आहे. त्याचें नांव देकाळें असें ठेविलें होतें.

४ असेरि:—अशेरी उर्फ अशीरगड हा किल्ला माहीम तालुक्याच्या पूर्व भागांत डोंगरावर सपाटीवर आहे. हा फार मजबूत किल्ला असून येथें पोर्तुगीज लोकांची बायकामुलें असत. १७३७ सालीं ह्याला पेशव्यानीं वेढा दिला होता. पण पुढें १ फेब्रुवारी १७३९ (७ २ जिल्काद) सालीं हा किल्ला पेशव्यांनीं जिंकून घेतला. हा किल्ला स. १५३३ चे नंतर पोर्तुगीज लोकांनीं बांधलेला आहे.

आ.

५ आगर (अगर):—वसई माहीम वगैरे किल्ल्याचे बाजूस असलेल्या पाणवट जागा म्हणजे आगर होत. ह्या आगरांत मोठमोठ्या वाड्या असतात व एक एकटीं घरें असतात.

६ आगाशी:—वसई तालुक्याच्या उत्तर भागांत हा गांव आहे. येथें सुकेळीं होतात. जैन धर्माचें पार्श्वनाथाचें देऊळ येथें आहे. सोमवारीं बाजार भरतो. विरार ते अरनाळा सडक आहे, त्या सडकेवर हा गांव आहे.

७ आचोळें:—वसई तालुक्याचे दक्षिण भागांत गोखिरव्याचें उत्तरेस हा गांव आहे.

८ आटगांव (आठगांव):—शहापूर तालुक्यांत हा गांव आहे. येथें तानसा नांवाचा मोठा तलाव मुंबई म्युनिसीपालिटीनें बांधलेला असून त्यांतील पाणी नळानें मुंबईस आणलें आहे. आठगांव हा पूर्वी पेशव्याचे वेळीं तर्फ-सुभा होता. आठगांव हें जि. आय. पी. रेल्वेचें स्टेशन आहे.

इ.

९ इटावें:—ठाणें स्टेशनच्या पूर्वेस खाडीचे पलीकडे जि. आय. पी. रेल्वेच्या दक्षिण बाजूस बेलापूर सडकेवर उत्तर साष्टी तालुक्यांत हा गांव समुद्रकाठीं आहे. येथें फक्त कोळी लोक रहातात. कळव्यापासून दक्षिणेस अंदाजें एक मैलावर हा गांव आहे.

उ.

१० उमेळें:—वसई तालुक्यांच्या दक्षिण भागांत हा गांव बि.बि.सी आय. रेल्वेच्या पूर्वेकडे आहे. ह्या गांवाजवळ खाडी आहे. हा गांव एक उत्तम बंदर आहे. येथें पूर्व अंगास मिठागरें आहेत. येथें मागावर लुगडीं हांतात.

औ

११ औरंगाबाद:—(औरंगाबाज) हें मोठें शहर निजामचें राज्यांत आहे. ह्या ठिकाणीं एक मजबूत किल्ला आहे. यादवांचे राज्यांत हें ठिकाण फार प्रसिद्ध होतें. औरंगजेब बादशहाचें छावणीनंतर ह्याला औरंगाबाद असें म्हणूं लागले. जवळ वेरुळचीं लेणीं आहेत. ह्याच्या नजीकच यादवांची राजधानी देवगिरी उर्फ दौलताबाद हें शहर व किल्ला आहे. मनमाड येथून दक्षिण हैद्राबाद येथें जाणाऱ्या जि. आय. पी. रेल्वेच्या फाट्यावर हे स्टेशन आहे.

क.

१२ कर्नाळा:—हा किल्ला पनवेल तालुक्याच्या दक्षिण भागांत पेण-पनवेल सडकेच्या पूर्व अंगास आपटे गांवाजवळ डोंगरावर आहे. पाताळ गंगेच्या पलीकडे कर्नाळा म्हणून डोंगर आहे त्याचें साल्ट जातीच्या खडकाचें शिखर खांबासारखें दिसतें. कर्नाळा येथें यादवांचा सुभा होता.

१३ कल्याण:—हें तालुक्याचें ठिकाण आहे. कल्याण हें जी. आय. पी. रेल्वेचें जंक्शन स्टेशन आहे. येथून एक फांटा नाशिकाकडे व दुसरा पुण्याकडे जातो. हें ठिकाण फार प्राचीन काळचें आहे. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याबरोबर व हिंदुस्थानच्या बाहेरही फार पूर्वकाळीं या बंदरांतून सर्व प्रकारचा व्यापार चालत होता. सहाव्या शतकांत कासमस नांवाचा ग्रीक व्यापारी हिंदुस्थानांत आला होता, हा गांव त्यावेळची राजधानी होती असें त्यानें म्हटलें आहे. इ. स. ६०० ते ११५१ पर्यंत चालुक्य राजे कल्याणास होते. पेशव्यांच्या सुभ्याचे हेंच ठिकाण होते. गंगाजी नाईक रामचंद्रपंतास प्रथमतः येथेंच भेटले. वसई सर होईपर्यंत स्वतः गंगाजी नाईक नेहमीं येथेंच राहत. पेशव्यांनीं अणजुरकरांना इनाम दिलेली जागा कल्याण शहाराचे मध्यभागीं आहे. ह्या धामधुमीच्या काळीं पा. क्ष. ज्ञातीची बरीच मोठी वस्ती कल्याणास होती. हल्लीं फक्त ८।१० कुटुंबेंच आहेत.

१४ कळवें:—ठाणें शहराच्या पूर्वेस खाडीच्या पलिकडे हा गांव आहे. ठाण्याहून पनवेलकडे जाणारी सडक ह्या गांवावरून जाते. हल्लीं खाडीवर पूल बांधलेला आहे. त्यास कळव्याचा पूल म्हणतात. हें गांवही फार पुरातन आहे. पूर्वीं ह्या ठिकाणीं पाठारे क्षत्रिय ज्ञातीची फार मोठी वस्ती होती. हल्लीं फक्त १।२ कुटुंबेंच आहेत. हा गांव उत्तरसाष्टी तालुक्यांत आहे. गंगाजी नाईकांना आमरणान्त मदत करणारे त्यांचे मामा मायाजी राऊत कळव्यास रहात होते. पेशव्यांच्या अमदानींत कळव्यास टांकसाळ होती.

१५ काकड दाहाड:—तुंगारचे रानांतून पुढें कामणचे रानाकडे जातांना तुंगारचे रानांत शेवटीं हा डोह आहे. येथून राजावली गोखिरवे व उमेळें ही तीन बंदरें त्याच्या पश्चिमेस आहेत.

१६ काढोळखिंड:—उमेळ्याचे बंदराकडे तुंगारचे रानांतून जातांना कामणचे रानांत ही खिंड आहे. उमेळ्याचे जवळ ही खिंड असावी.

१७ कांबें:—हें ठिकाण भिंवडी तालुक्यांत खारबावेवरून भिंवंडीस जाणाऱ्या खाडीच्या पलिकडे खाडीच्याकाठीं आहे. येथें तटबंदीची मुंडी होती. ह्या किल्ल्यांत फिरंग्यांची मोठी शिबंदी असे. इ. स. १७३० त हें ठिकाण पिलाजी जाधवरावांनीं व गंगाजी नाईकांनीं फिरंग्यापासून घेतले. हा गांव भिंवडीपासून २ मैल आहे.

१८ कामणदुर्ग:—वसई तालुक्यांत तुंगारचे डोंगराचे दक्षिणेस त्याला लागून कामणाचा डोंगर आहे. ह्याच्यांत २ टाकी आहेत व डोहही आहेत. ह्या डोंगराचे माथ्यावर कामणदुर्ग (२१६० फू. उंच) किल्ला आहे. ह्या ठिकाणीं मोठें रान आहे. कामणदुर्गाहून खाडी तीन कोस आहे. कामणदुर्ग किल्लयावर पाणी नाहीं. खालीं कोसावर पाणी आहे. कृष्णराव याचे कारकीर्दीत हा किल्ला वसविला होता, (पे. द. रु. ३४ पत्र १६०) बखरींतही

बखरींतील किल्ले



माहीम

वसई

ठाणें

—सार्ष्टीची बखर.

Photos by. Vasantrao D. Mhatre.

हा किल्ला व टकमक, तांदुळवाडी, जिवधण हे दुसरे किल्लेही त्याचवेळीं वसविल्याचा उल्लेख आहे. भिवंडी व सोनालतपा किल्ल्यावरून ३।४ कोस आहे.

१९ काळदुर्ग:---बि बि. सि. आय. रेल्वे लाईन व सूर्यानदी यांचेमध्यें सूर्यानदीच्या पश्चिमेकडे डोंगराची एक रांग आहे. त्या दक्षिणोत्तर रांगेत कालदुर्ग (१५५० फूट उंच) हें मुख्य शिखर आहे. त्यांत तीन डोंगरी किल्ले आहेत. त्यांतला मधला किल्ला काळदुर्ग हा पालघरचे पूर्व आंगास ४।५ मैलांवर आहे. वाड्याहून माहीमकडे जी सडक जाते त्या सडकेचे दक्षिणेस माहीम तालुक्यांत हा किल्ला डोंगरावर आहे. येथें एक टाकें आहे.

२० कुलाबा:— हा किल्ला श्री शिवाजी महाराजांनीं अलिबाग येथें समुद्रकिनारीं १६८० सालांत बांधला. ह्याच्या उत्तरेस खांदेरीउंदेरीचे पाणकिल्ले आहेत. पुष्कळ वर्षें ह्याच ठिकाणीं आंग्र्याची राजधानी होती. अलिबाग तालुक्यांत हा किल्ला आहे. जंजिऱ्याचे सिद्दी व आंगरे ह्यांच्या लढायांच्यावेळीं अनेकवेळां बाजीराव पेशवे व अप्पासाहेब येथें येऊन रहात. अशावेळीं अनेकदां गंगाजी नाईक कुलाब्यास जाऊन पेशव्यांना भेटले होते. कुलाबा जिल्ह्यांत उरण व अष्टागर मिळून सुमारें ९०० कुटुंबाची वस्ती आहे. कुलाबा जिल्ह्याचे भीष्मपितामह व एक थोर राष्ट्रीय पुढारी तपस्वी रामजी लक्ष्मण घरत हे पाठारे क्षत्रिय ज्ञातीचे असून त्यांचा महाराष्ट्रांत मोठा लौकिक आहे. शेतकीविषयींचें व तत्संबंधीं कायद्यांचें त्यांचें ज्ञान व अधिकार इतका मोठा आहे कीं त्यांचे शेतकीविषयक लेख सरकारी अधिकारीहि प्रमाणभूत मानतात. त्यांचे कांहीं लेख तर पार्लमेंटरी रेकार्डमध्यें ठेवण्यांत आले आहेत.

२१ केळवें:---माहीम तालुक्यांत माहीमच्या पूर्वेस १।२ मैलावर हा गांव आहे. येथें एक लहानसा किल्ला आहे. गांव लहान आहे. शीतळादेवीची यात्रा येथें भरते. हा मोडकळीस आलेला किल्ला ता. १० जानेवारी १७३९ त मराठ्यानीं घेतला. ह्यास केळवें-माहीम असें म्हणतात.

२२ कोल्ही:-चिंचोटीच्या लगतच वसई तालुक्यांत हें लहानसें गावढें आहे. ह्यास चिंचोटीचा पाडा म्हणतां येईल. कोल्ही-चिंचोटी असा ह्या दोन्ही गांवाचा एकदम उच्चार करण्यांत येत असतो.

२३ कोशिंबडे (कोशिंबरें):-शहापूर तालुक्यांत माहुली किल्ल्याच्या पश्चिमेस जवळच हा गांव आहे,

ख.

२४ खत्तलवाडा:-बी. बी. लाईनीच्या पश्चिमेस संजाणवरून नारगोळला जाणाऱ्या सडकेवर हा गांव उंबरगांव पेठ्यांत आहे. येथें पारशी लोकांची मोठी वस्ती आहे. स. १७३९ त मराठ्यांनीं हें ठिकाण घेतलें,

२५ खारी:—परसिकच्या डोंगराचे खालीं ठाणा-पनवेल रस्त्यावर कळव्यापासून पूर्वेस एक मैलावर हा गांव उत्तर साष्टी तालुक्यांत खाडीकिनारीं आहे. या गांवाचे पूर्वेस खाडीपलिकडे अणजूर गांव आहे.

२६ खिडकाळी (खडकाळी):—जि. आय. पी. रेल्वेच्या दिवा स्टेशनच्या दक्षिण अंगास २।३ मैलावर कल्याण तालुक्यांत हा गांव सडकेवर आहे. येथें शंकराचे देवालय आहे. महाशिवरात्रीस येथें यात्रा भरते.

ग

२७ गउळबावी:—तुंगारचे रानांत हें स्थान असावें. बावी नसून बावी असावें. बाव म्हणजे विहीर. गउळबाव म्हणजे गउळविहीर होय.

२८ गोखिरवें:—वसई तालुक्याच्या दक्षिण भागांत दादरचें खाडीवर उमेळ्याच्या व राजावलीच्या उत्तरेस हें बंदर आहे.

२९ गोवें:—कोल्हापूर संस्थानचें दक्षिणेस मुंबई इलाख्यांत हा प्रान्त आहे. पोर्तुगाल देशाच्या राजसत्तेखालीं हा प्रांत आहे. एथें एक गव्हर्नर असतो. दिव-दमण येथील अधिपति त्याच्या हुकमतींत असतात. पंधराव्या शतकांत येथें प्रथम पोर्तुगीजांनीं आपलें वास्तव्य कायम केलें व नंतर तेथें राज्य स्थापिलें. तेव्हांपासून आतांपर्यंत हा प्रांत पोर्तुगालच्या राजाचे ताब्यांत आहे. धर्मच्छल व धर्मदंड करणारें इंक्विझिशन कोर्ट प्रथम येथेंच १५६० मध्यें स्थापन झालें. ह्या कोर्टाची निरंकुश सत्ता ज्या वेळीं सर्व पोर्तुगीज-इंडीयात चालत असे.

घ

३० घोटवडें:—वसई व भिवंडी ह्यांच्या सरहद्दीवर भिवंडी पारोळ रस्त्यावर तिल्हेर गांव आहे. त्या गांवाचे पूर्वेस दीडदोन कोसांवर डोंगरावर हा किल्ला आहे.

३१ घोडबंदर:—उत्तरसाष्टी तालुक्यांत वसईच्या खाडीच्या दक्षिणअंगास हें ठिकाण आहे. हें बंदर आहे व ह्याठिकाणीं डोंगरावर एक किल्ला होता. ठाण्याहून भाईंदरकडे जाणारी सडक घोडबंदरवरूनच जाते.

३२ घोणसोळी (घणसोळी):—उत्तरसाष्टी तालुक्यांत ठाणें-बेलापूर सडकेवर कळव्यापासून ५।६ मैलांवर हा गांव आहे.

च

३३ चिंचवड:—पुणें जिल्ह्यांत हा गांव आहे. हें जी. आय. पी. रेल्वेचें स्टेशन आहे. स्टेशनापासून अंदाजें २ मैलांवर दक्षिण अंगास हा गांव नदीकिनारीं आहे. हें श्रीसिद्धिविनायकाचें स्थान आहे. श्रीमोरया गोसावी देव येथेंच रहात असत. श्रीमोरया



गोसावी इत्यादि देव घराण्यांतील सत्पुरुषांच्या समाधी येथें आहेत. देवस्थानास बरेंच उत्पन्न आहे. माघांत फार मोठा उत्सव येथें होतो. ह्याच ठिकाणीं गंगाजी नाईकांना श्रीचिंतामण देवांनीं अनुग्रह करून प्रसादाचा गणपति दिला. तो श्रीसिद्धीविनायकाचा प्रसाद हल्लीं अणजूर येथें आहे.

३४ **चिंचोटी**:—वसई तालुक्यांत राजावळीच्या पूर्व बाजूस हा गांव आहे. ह्याच्या जवळ कोल्ही गांव आहे. हे दोन्ही गांव एकदमच उच्चारले जातात.

३५ **चेऊल (चौल)**:—अलिबाग तालुक्याच्या दक्षिण भागांत असलेला हा गांव फार पुरातन म्हणजे इ. स.च्या सहाव्या सातव्या शतकांतला आहे. येथें पूर्वी अनेक हिंदु राजांनीं राज्यें केलीं आहेत. रोह्याच्या खाडीच्या काठीं त्यावेळीं हें मोठ्या भरभराटीचें बंदर होतें. पाश्चिमात्य राष्ट्राबरोबर ह्या बंदरांतून हिंदुस्थानचा मोठा व्यापार चाले. पूर्वी हा सुभा होता. हल्लींचा अलिबाग तालुका हाच तो चेऊलचा सुभा होय. नजीकच रेवदंड्याचें बंदर आहे. रेवदंड्यास आगबोटी लागतात. अलिबाग व चेऊल या दरम्यान खाडीवर पूल झाल्यामुळें अलिबागेहून थेट चेऊलास मोटारीनें जातां येतें. हा गांव वाड्यावाड्यांमधून वसलेला आहे. पोर्तुगीजांचें राज्य येथें बरेच दिवस होतें. पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या अष्टागर प्रांतीय महासभेचे अधिकारी श्री. आप्पाजी जगन्नाथ हे येथेंच राहतात. ह्या अधिकारी घराण्याकडे बरेच सनदी अधिकार असून आजतागायत त्यांच्याकडे नारळ विड्याचा मान चालू आहे. ह्या ठिकाणीं पूर्वी पा. क्ष. ज्ञातीची वस्ती बरीच होती. हल्लीं ती पुष्कळच कमी झाली आहे. येथें चंपावती देवीचें व इतर देवींचीं देऊळें आहेत. ह्यास पूर्वी चौलचंपावती म्हणत असत. येथें पोर्तुगीज लोकांनीं स. १५३३ चे नंतर एक किल्ला बांधला.

ज.

३६ **जंजिरा**:—हें हबशांचें संस्थान कुलाबा जिल्ह्याचे पश्चिम बाजूस त्या जिल्ह्यांत आहे. हे सिद्दी आपणास दिल्लीच्या बादशहाचे अंकित समजत. शिवाजी व संभाजी महाराजांनीं ह्या हबशांच्याबरोबर अनेक वेळां लढाया मारल्या आहेत. परंतु ह्यांचें काममचें उच्चाटन केव्हांच झालें नाहीं. बखरीच्या काळीं ह्यांचेबरोबर आंग्रे व पेशवे ह्यांचे नेहमीं युद्धप्रसंग चालूच होते. राजपूरीच्या खाडीच्या तोंडाशीं जंजिरा नांवाचा एक पाणकिल्ला आहे. ह्याच किल्ल्यांत राहून हबशी आपलें राज्य चालवित. ह्यांच्या आरमाराबरोबर टक्कर देण्याकरितां शिवाजी महाराजांनीं एक आरमार तयार केलें होतें. ह्या संस्थानचे राजपूरीच्या खाडीमुळें दोन तुकडे झाले आहेत.

३७ **जाधवरायाची वाडी**:—पिलाजी जाधवरावाची ही वाडी होय. पिलाजी जाधवराव हे वाघोलीचे राहणारे. (म. स्वा. च. ले. १८१) हा वाघोली गांव पुण्याचे

उत्तरेस १० मैल लांब आहे. बखरींत पिलाजी जाधवरायाची वाडी असा स्पष्ट उल्लेख असल्यानें वाघोली ही ती वाडी असें पत्करावें लागतें. जाधवाचा वाडा असे शब्द बखरींत असते तर पुणें ते जेजूरी ह्या सडकेवर असणारा सरळ रेषेंतला वरील गांव आपणास पत्करतां आला असता.

३८ जिवधणः—तुंगारचे उत्तरेस डोंगराचा एक समुदाय आहे. त्यांतील एक शिखर जीवधन हें होय. हें स्थान वसई तालुक्यांत आगाशीचे पूर्वेस ५ मैल लांब आहे. विरार स्टेशनावरून ह्या स्थानास जातात. विरारपासून १ मैलावर हें ठिकाण आहे. ह्या ठिकाणीं डोंगरावर देवीचें स्थान आहे. पूर्वी येथें एक लहानसा किल्ला होता. हा किल्ला मराठ्यांनीं वसविला.

३९ जुन्नरः—पुणें जिल्ह्यांत जुन्नर तालुक्यांत हें ठिकाण आहे. जवळ शिवनेरीचा किल्ला आहे. ह्या किल्ल्यांत शिवाजी महाराजांचा जन्म झाला. हल्लीं तळेगांव-दाभाडें-वरून किंवा पुण्याहून जुन्नरास जातां येतें. पूर्वी नाणेघाटानें जुन्नराचा व्यापार मुरबाड-बरोबर चालत होता. ह्याच रस्त्यानें कोंकण घाटमाथ्याची रहदारी चालू होती.

४० जेजुरीः—पुणें जिल्ह्यांत पुरंधर तालुक्यांत हें ठिकाण आहे. ह्या ठिकाणीं जाण्यास एस्. एम्. रेल्वेच्या जेजुरी स्टेशनावर उतरून बैलगाडीनें पुढें २।३ मैल जावें लागतें. डोंगरावर कडेपठारावर खंडेरायाचें जागृत स्थान आहे. सर्व खंडेरावभक्त ह्या ठिकाणीं प्रतिवर्षी दर्शनास येतात. ह्या देवस्थानाचें उत्पन्नहि बरेंच आहे. तें पंचांच्या ताब्यांत आहे.

ट.

४१ टकमकः—वसई तालुक्यांत पूर्व भागांत, तुंगार डोंगराचे पश्चिम भागांत हें उंच शिखर आहे. त्याची उंची २११६ फूट आहे. जिवधण व मांडवी ह्यांचे दरम्यान हें शिखर आहे. ह्यावर एक लहानसा किल्ला होता. हा किल्ला मराठ्यांनीं वसविला.

ठ.

४२ ठाणेंः—ह्या शहरास पूर्वी स्थानक म्हणत असत. हल्लीं हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. ठाण्याच्या किल्ल्याचा हल्लीं तुरुंग बनविला आहे. हा किल्ला इ. सन १७३० त पोर्तुगीजांनीं बांधण्यास घेतला; पण तें काम इ. स. १७३९ पर्यंत राहून राहून चालूच होतें. (ठा. जि. वर्णन पा. ७७) हें शहर फार पुरातन आहे. ह्या शहराचा व्यापार पाश्चिमात्य देशांबरोबर फार पूर्वीपासून चालत आला आहे. इ. स. ९५६ त अलमाघुदीन यानें (बाणा) ठाणें

ह्या शहराचा उल्लेख केला आहे. सन १२३८ त ओडोरिकस नामक इटालियन पाद्री ठाण्यास आला होता. १७८७ सनांत ठाण्याचे किल्ल्यांत ताम्रपट आढळला. त्याजवर ९३९ (इ. स. १०१८) असा शक आहे. ठाण्याचे दुसरे दोन ताम्रपट आहेत. त्यांत शके ११९४ (स. १२७३) आणि शके १२१२ (स. १२९१) हीं वर्षें असून यादवकुलांतील रामदेवरावांचा वंश त्यांत दिला आहे. बिंबानें १२९६ त साष्टी व ठाणें घेतल्याचा उल्लेख सांपडतो. (उ. को. ग. शु. य. ब्रा.) ह्या गांवाच्या पूर्वी नऊ पाखाड्या होत्या. चेंदणी भागांत व चरई भागांत पूर्वी सर्व वस्ती पाठारे क्षात्रिय लोकांचीच होती. हल्लीं दोन्ही भागांतलीं पुष्कळशीं घरें विकल्यामुळें वस्ती फार कमी झाली आहे. ठाणें येथें कलेक्टरचे ऑफिस सध्या आहे, तेथें नाईकांना पेशव्यानीं बक्षिस दिलेली माडी व ४ बिघे जमीन होती. येथें पूर्वी बाजार भरत असे व त्या जागेचें आतांपर्यंत माडें नाईकांची मंडळी घेत होती. पण हलगर्जीपणामुळें ती जमीन त्यांच्या हातची गेली. बुब्राजी नाईकाचें घर चेंदणींत होतें. बुब्राजी नाईक ठाण्यास वारले. तेव्हां त्यांची प्रथम स्त्री सती गेली तिची समाधी प्रसिद्ध कोपीनेश्वराचे देवळाचे आवारांत आहे.

ड.

४३ डाणु (डहाणु):—बखरींत डाकु आहे, पण मूळ नक्कलकारांचा ती चूक असावी. डाकु असा गांवच नाहीं. डहाणू तालुक्यांत बि. बि. सी. आय. रेल्वेच्या स्टेशनापासून पश्चिमेस ३।४ मैलावर समुद्रकिनारीं हा गांव असून हें तालुक्याचें ठिकाण आहे.

त.

४४ तारापूर:—हा गांव माहीम तालुक्याच्या उत्तर हद्दीवर समुद्रकिनारीं असून तेथें एक उत्तमसें बंदर आहे. येथें एक मजबूत किल्ला होता. स. १७३९ मध्यें येथें फार मोठी लढाई होऊन छ. २४ सवाली २४-१-१७३९ रोजीं हें ठिकाण मराठ्यांनीं जिंकिलें. बाजी भीवराव येथें पडले. बोयसर स्टेशनावरून तारापुरास सडक जाते. हा किल्ला मूळ पोर्तुगीजांनीं स. १५३३ च्या नंतर बांधला.

४५ तांदुळवाडी:—हें ठिकाण वसई तालुक्याच्या पूर्व भागांत डोंगराचे रांगेंत आहे. ह्या ठिकाणीं मराठ्यांनीं किल्ला वसविला. हें ठिकाण जिवधण व मांडवी यांचेमध्यें आहे. माहीम तालुक्यांतही एक गंदुळवाडी ऊर्फ तांदुळवाडी म्हणून ठिकाण आहे. रेल्वे लाईन व सूर्यानदी यांचे मध्यें पश्चिमेकडील बाजूस डोंगराची एक रांग आहे. त्या दक्षिणोत्तर रांगेंत दक्षिण टोंकाला तांदुळवाडी (१६०१ फु. उंच) म्हणून एक किल्ला आहे. अशीं तांदुळवाडी नांवाचीं दोन ठिकाणें आहेत.

४६ तुंगार:—हें ठिकाण वसई तालुक्यांत आहे. कामण डोंगराच्या उत्तरेकडील रांगेंत तुंगारचा डोंगर आहे. ह्यांत जीवधन टकमक इत्यादि शिखरें आहेत. येथें एक किल्ला आहे. तुंगारचे रानांत पाण्याचीं टांकी पुष्कळ आहेत तुंगार येथें एक शंकराचें मोठें देऊळ आहे. येथें महाशिवरात्रीस यात्रा भरते. ह्या डोंगरांत जागोजाग शंकराचीं स्थानें आहेत व तितकींच टाकीं आहे.

द.

४७ दवण (दमण):—हा प्रान्त ठाणें जिल्ह्याच्या उत्तर हद्दीस लागून आहे दमण हेंच मुख्य ठिकाण आहे. येथें पोर्तुगीजांचें राज्य आहे. येथें एक गव्हर्नर असतो. येथें १५३३ सालांत पोर्तुगीजांनीं एक भुइकोट किल्ला बांधला आहे.

४८ दादर:—वसई तालुक्यांत उमेळे ते गोखिरवें ह्या खाडीवर सोपाऱ्याचे जवळ हें ठिकाण आहे. हें तटबंदीचें ठिकाण आहे. सोपाऱ्याचे पैकींच हा दादराचा बुरुज होता. हा अगदीं खाडीकिनाऱ्यावर आहे. ह्या खाडीला दादराची खाडी म्हणतात. ह्या ठिकाणीं खाडीला ओहोटीच्यावेळीं उतार असतो. 'दादरचा अर्थ तरी वोहोटिचे समयीं वीथभर पाणी असत नाहीं व चिखलही नाहीं" (पे. द. रु. ३४ पत्र ५०) नारायणजी सुतारांनीं ज्या दादराच्या खाडीपलीकडे वसईस फौज नेण्याचें गंगाजी नाईकांना कबूल केलें होतें ती हीच 'दादराची' खाडी. मुंबई बेटांतहि दादर म्हणून जें ठिकाण आहे त्या ठिकाणीं पूर्वी खाडी होती. पण त्या दादराचा व त्या खाडीचा येथें कांहींच संबंध नाहीं. मुंबईतील दादर येथें हल्लीं पाठारे क्षत्रिय ज्ञातीची फार मोठी–४५० कुटुंबांची–वस्ती असून ती वाढतच आहे.

४९ दिघें:—उत्तर साष्टी तालुक्यांत कळवे–बेलापूर रस्त्यावर कळव्याचे दक्षिणेस २।३ मैलावर हा गांव आहे.

५० दिल्लि (दिल्ली):—हल्लींच्या हिंदुस्थानच्या राजधानीचें हें ठिकाण असून व्हाईसराय येथेंच राहतात. हें स्थान फारच पुरातन आहे. धर्मराजाची इंद्रप्रस्थ राजधानी ह्याच ठिकाणीं होती. पृथ्वीराज व इतर हिंदु राजांच्याहि राजधानीची हीच जागा होती. मुसलमान व मोंगल लोकांनीं ह्याच ठिकाणीं आपली राजधानी केलेली होती मराठ्यांनींही हें ठिकाण काबीज करण्याकरितां फार मोठे प्रयत्न केले होते.

५१ दुरगाडी:—कल्याणच्या गढीस दुरगाडी म्हणतात. हें ठिकाण कल्याणचे पुलाला लागूनच उत्तरेकडे आहे. गावांचे संरक्षण करण्यास अशा लहान गढ्या ऊर्फ तटबंदीचीं ठिकाणें पूर्वी जेथें तेथें बांधलेलीं असत. तटाचे संरक्षणार्थ बांधलेला हा

लहानसा किल्लाच होय. वसईच्या मोहीमेंतला पहिला हल्ला फिरंग्यांनीं येथेंच केला. येथूनच पुढें मोहीमेस सुरवात झाली.

५२ देहू:—ही संत श्रीतुकाराम महाराजांची पुण्यभूमी पुण्यापासून २४ मैल, आळंदीपासून १० मैल, व चिंचवडपासून ६ मैल अशी चिंचवडचे उत्तरेस आहे. देहू व आळंदी हीं इंद्रायणीच्या कांठीं असून तेथें पुण्याहून मोटारीनें जाता येतें. जि. आय. पी. रेल्वेच्या शेलारवाडी स्टेशनावरूनही येथें जातां येतें. फाल्गुन वद्य २ ला श्रीतुकाराम महाराजांच्या पुण्यतिथीसमयीं येथें मोठी यात्रा भरते. इ. स १७०५ त हा गांव नारोबा गोसावी यांना शाहू महाराजांकडून इनाम मिळालेला आहे. येथें भंडारा व चंद्रभान नांवाचे दोन डोंगर आहेत. त्या ठिकाणीं श्रीतुकाराममहाराज भजन करीत असत.

ध.

५३ धारावी:—बोरीवलीच्या पश्चिमेस वसईच्या खाडीच्या तोंडाशीं समोर एक चिंचोळें बेट आहे त्यांत खाडीच्या तोंडाजवळ धारावी हें ठिकाण आहे. येथें एक फार मजबूत किल्ला होता. ह्या बेटांतील किल्ल्यावरून वसईचें संरक्षण उत्तमप्रकारें करितां येत असे. म्हणून ह्या बेटास त्याकाळीं वसईचा नाका असें म्हणत असत. (पे. द. रु. १६ पत्र २७) धारावी घेतल्याशिवाय वसई मिळत नाहीं असें त्यावेळचे सरदार नेहमीं म्हणत. ह्या बेटांत लांबलांब दगडाच्या खाणी आहेत. डोंगराच्या पायथ्याशीं एक गायमूख आहे. ह्यांतून गोड पाणी वहातें. प्रस्तुतच्या मोहीमेंत ह्या गायमुखास फार महत्व आलें होतें. बखरींतही ह्याचा उल्लेख आला आहे. ह्या बेटांतून वसईच्या किल्ल्यावर व खाडींत पल्लेदार तोफांचा मारा चांगलाच होई. स. १७३७ त ह्या बेटांवर पेशव्यानीं पहिला हल्ला केला होता. " धारावीमुळें एक काय हलहल लागली ते ईश्वरास ठाऊक " असे चिमणाजी आपांचे ता. ४।४।१७३८ तले (पे. द. रु. ३४ प.१११) उद्गार आहेत. ता. ६।३। १७३९ मध्यें दोनतीन महिन्याचे वेढ्यानंतर पेशव्यांनीं धारावी जिंकली. हल्लीं भाईंदर स्टेशनवर उतरून ह्या बेटास जातां येते.

न.

५४ नारगोळ:—उंबरगांव पेठ्यांत समुद्रतीरीं हा गांव रेल्वे स्टेशनपासून ३।४ मैल लांब आहे. ह्या ठिकाणी पारशी लोक मोठ्या प्रमाणांत रहातात. नारगोळला सडक जाते. स. १७३९ त मराठ्यानीं हें ठिकाण घेतलें.

प.

५५ पश्चिम समुद्रतिरीं:—अपरांतकांतील अर्थात् उत्तर कोंकणांतील वसई-साष्टी ह्या प्रांतांतल्या ह्या भागास गंगाजी नाईकांनीं ' पश्चिम समुद्रातिरीं ' असें म्हटलें आहे.

५६ पंढरिः—पंढरपूर हें सोलापूर जिल्ह्यांतील पंढरपूर तालुक्यांत आहे. हल्लीं जी. आय. पी. रेल्वेच्या कुर्डुवाडी स्टेशनावरून पंढरपुरास रेल्वेचा एक फांटा जातो, तो चंद्रभागेवरून थेट पंढरपुरास जातो. श्रीपंढरीनाथाचें–श्रीविठोबाचें–हें फार पुरातन स्थान आहे. येथें आषाढी कार्तिकी शुद्ध एकादश्यांस फार मोठ्या यात्रा भरतात तसेंच माघांत व चैत्रांत शुद्ध एकादश्यास लहान यात्रा भरतात. पंढरपुरास सरकारी उत्पन्न आहे. देवस्थान कमेटी आहे. भागवतधर्मीय वारकरीपंथाचे लोकांचें हें मुख्य स्थान आहे. गांवाला लागूनच चंद्रभागा वाहत जाते. पंढरपूर येथील विठ्ठलमंदिरांत ८४ शींचा शिलालेख आहे. तो शके ११९५ ते ११९८ तला आहे. (हे. च.)

५७ परबळ (प्रबळ):—कर्जत तालुका व पनवेल तालुका ह्यांच्या सरहद्दीवर डोंगरावर माथेरानच्या पश्चिम बाजूला हा प्रबळ नांवाचा किल्ला आहे.

५८ परसिकः—परसिक हा डोंगराचा एक भाग आहे. हा डोंगर पनवेल व उत्तर साष्टी ह्या दोन तालुक्यांच्या सरहद्दीवर खारीपासून तो पनवेल पर्यंत दक्षिणोत्तर पसरला आहे. ह्याचे उत्तर टोकास परशिक आहे. त्या ठिकाणीं फिरंग्यांची गढी उर्फ लहान किल्ला होता. आज ती गढी पडक्या स्थितींत आहे. परसिकच्या डोंगरासमोर खाडीच्या पलीकडे अणजूर हा गांव आहे. स. १७२७ त नारायण जोशीनीं परसिक घेतलें.

५९ पला (पालें किंवा पाली):—हा गांव बावामलंगाचे सडकेजवळ पुष्कळ अलिकडे, कल्याण तालुक्यांत बाळा व भाल या गांवाच्या मध्यभागीं आहे.

६० पापडी:—हा लहानसा गांव वसईचाच एक भाग आहे. वसईपासून अर्ध्या मैलावर हा गांव आहे. येथें दर शुक्रवारीं मोठा बाजार भरतो. रेल्वे स्टेशनावरून वसईस जाणारी सडक ह्याच गांवावरून जाते. ज्याला वसईचे आगर म्हणतात ते ह्या गांवाजवळूनच सुरू होतात.

६१ पाहाड:—बखरींत माहाड आहे, पण हा माहाड नसून पाहाड गांव होय. वेसांव्याचे पुढें माहाड गांव मुळींच नाहीं. गोरेगांवाजवळ पाहाड गांव आहे. तेथें एक फिरंग्यांची गढी होती. अद्यापिही त्या गढीचे अवशेष तेथें आहेत. वेसाव्याचे पुढें मढ बेट आहे. पण तो निराळाच गांव असून त्याचा उल्लेख बखरींत इतरत्र आलेला आहे. नकल करणारानें बखरींत चुकीनें पाहाडाचें माहाड केलेलें असावें. मालाड परगण्यांतील हा पाहाड गांव बिंब राजाचे काळीं ब्राह्मणाला इनाम दिलेला होता. [उ. को. ग. ब्रा.]

फ.

६२ फिरंगाणः—फिरंग्यांचे अंमलाखालीं त्यावेळीं जेवढा मुलूख होता, तो सर्व मुलुख 'फिरंगाण' ह्या नांवानें संबोधला जात असे. 'फिरंगणाखालीं' म्हणजे फिरंगी लोकांचे अंमलाखालीं. 'फिरंगाण मोडलें' म्हणजे फिरंगी राज्य नाहींसें झालें.

बखरींतील किल्ले

धारावी

मढ



अर्नाळा

—साष्टीची बखर.

Photos by: Vasant ao D. Mhatre.

ब.

६३ बदलापूरः—हें ठिकाण कल्याण तालुक्यांत आहे. कल्याणपासून पुण्याकडील जी. आय. पी. रेल्वेचे फांट्यावरील हें दुसरें स्टेशन आहे. स्टेशनापासून गांव २ मैल लांब आहे. ह्या ठिकाणीं 'उल्हास' नदी आडवून बदलापूर बॅरेज म्हणून एक मोठें धरण हल्लीं बांधलेलें आहे. कल्याणहून बदलापुरास सडक जाते. हा गांव बराच मोठा आहे. आप्पासाहेबांची येथें छावणी होती.

६४ बऱ्हाणपूरः—अशेरी किल्ल्याचे उत्तरेस माहीम तालुक्यांत बुरनपूर उर्फ बऱ्हाणपूर गांव आहे. वसईच्या लढाईच्या वेळीं तेथें पेशव्यांचे सरदार मुक्काम करीत असत. (पे. द. रु १६ पत्र ७५ व पत्र ७६) पण ज्या बऱ्हाणपुराचा उल्लेख बखरींत आहे तें बऱ्हाणपुर मध्यप्रान्तात जी. आय. पी. रेल्वेवर भुसावळ व खांडवा यांचेमध्यें आहे. पे. द. रु. १६ पत्र १२१ मध्यें ज्या बऱ्हाणपुराचा उल्लेख आहे तेंच हें बऱ्हाणपूर होय.

६५ बहादुरपुराः—हा वसई गांवाचा पश्चिमेकडील भाग होय. ह्याला लागूनच समुद्राचा किनारा आहे. वसईच्या किल्ल्याचे पश्चिमबाजूच्या लगतचा हा भाग आहे. बहादुर सुलतानानें १४ व्या शतकांत वसई घेतली होती त्यावेळीं बहादुरपुरा हें नांव ह्या भागास देण्यांत आलें आहे. (उ. ग. शु. ब्रा.) येथें ख्रिश्चन कोळी राहतात.

६६ बागटाकीः—तुंगारचे डोंगरांत हें टाकें म्हणजे पाण्याचा हौद आहे. त्यावेळीं डोंगरांतल्या निरनिराळ्या ठिकाणीं बांधलेलीं अशीं पुष्कळ टाकीं होतीं असें दिसतें. बखरींत बागटाकें व वाघटाकें अशा दोनच टाक्यांचा उल्लेख आहे. वाघटाकें कामणचे डोंगरांत आहे. हीं टाकीं किल्ल्यावरही असत. पेशव्यांनीं हीं टाकीं त्यावेळीं दुरुस्त केलीं होतीं. (पे. द. रु. १६ पत्र ४८)

६७ बालाखिडीः—पनवेल तालुक्यांत पाल्याच्या पलीकडे बाळागांव आहे. तेव्हां हा शब्द बाळाखेडी असावा असें दिसतें. 'बाळाखेडी' म्हणजे बाळा नांवाच्या खेड्यांत असा अर्थ होतो. कळव्याहून येथें सरळ खिडकाळीच्या मार्गानें येतां येतें. पुढें कौशाचे अलीकडे पनवेल सडकेवर व खिंडीचे पलीकडे शीळ गांव आहे. पण त्या मार्गाचा उपयोग इ. स. १७३१ च्या वेळीं केलेला दिसतो. त्यावेळीं दिघे गांवावर सैन्य ह्याच खिंडींतून गेलें होतें. प्रस्तुतची जागा बाळा उर्फ बाळे हीच ती आहे.

६८ बाळखूमः—हा गांव उत्तर साष्टी तालुक्यांत वसईची खाडी व ठाण्याची खाडी ज्या ठिकाणीं एकमेकांस मिळतात त्या ठिकाणीं किनाऱ्याजवळ आहे. तानसा नळ ह्या गावांजवळून नेले आहेत. गांवापासून जवळच कशेळीचा पूल आहे. ह्या गांवाचे

दक्षिणेस ठाण्याचा किल्ला नजीकच आहे. ह्या बाळखूम गांवांत पूर्वी पाठारे क्षत्रिय ज्ञातीची वस्ती होती.

६९ बारडा पारडी:—सुरत जिल्ह्यांत पारनेरा तालुक्यांत हें ठिकाण आहे. येथें पक्का भुईकोट किल्ला होता. बी. बी. रेल्वेच्या पूर्वेस हा गांव आहे. येथें पूर्वी लष्करी ठाणें होतें जवळच पार नदी उत्तर अंगास वाहते समुद्रकिनारीं उमरखाडी गांव आहे. त्याठिकाणचे देसाई फार शूर म्हणून नांवाजलेले होते. त्यांतले कांहीं लोक पेशव्यांचें पदरीं होते. त्यांना त्यावेळीं पेशव्यांनीं इनामें दिलेलीं आहेत.

७० बावामलंग (बोवामलंग):—कल्याणचे दक्षिणेस बोर्डाचे सडकेनें गेलें असतां १० व्या मैलाजवळ हा डोंगर व किल्ला आहे. किल्ला डोंगराच्या माथ्यावर आहे त्यास 'बालेकिल्ला' म्हणतात. येथें हजरत बावामलंग व त्यांची पत्नी अशा दोघांच्या कबरी आहेत. माघ शुद्ध पौर्णिमेस ह्या गडावर मोठा उरूस उर्फ यात्रा भरते. हिंदु व मुसलमान सारखेच ह्या कबरीस भजतात. ७०० वर्षांपूर्वी नळ नावाच्या हिंदु राजानें हाजी अब्दुर्रहमान नांवाच्या अरबस्थानांतील अवलियास 'हजरत बाबामलंग' असें नांव दिल व त्यावेळेपासून तेंच नांव ह्या ठिकाणास चालू आहे. केतकर नांवाच्या ब्राह्मणाकडे ह्या कबरीची व्यवस्था पेशव्यांच्या पासून चालत आली आहे. उरुसाचेवेळीं साधु, फकीर वगैरे यात्रेकरूंना खिचडीचा सिधा येथें मिळतो. बाबामलंगाच्या खालच्या वाडीस ब्राह्मणवाडी म्हणतात. ह्या वाडीचा उल्लेख बखरींत आला आहे.

७१ बिंबस्थान:—बिंबाचें स्थान उर्फ ठिकाण तें बिंबस्थान. उत्तर कोंकण प्रान्तावर बिंबानें स्वारी करून हा प्रान्त जिंकल्यानंतर बिंबाचे नांवावरून ह्या प्रान्तास हे नांव प्राप्त झालें. इतिहासाचार्य राजवाडे यांचे म्हणणें असें आहे कीं, बिंब राजे दहाव्या शतकांत आले. रावबहादूर जोशी वगैरेंचें म्हणणें असें आहे कीं बिंबराजा तेराव्या शतकांत आला. ह्यापैकीं खरें कोणतें तें अद्यापि निश्चित व्हावयाचें आहे. पण एवढें मात्र खरें आहे कीं, त्यानें **महिकावती** उर्फ मुंबई–माहीम ही आपली राजधानी केली. तेव्हांपासून ह्या भागांस–उत्तर कोंकण प्रान्तास–बिंबस्थान हें नांव पडलें. विशेषतः उत्तर साष्टि तालुका, वसई तालुका, माहीम तालुक्याचा कांहीं भाग, कल्याण तालुक्याचा कांहीं भाग भिवंडी तालुक्याचा कांहीं भाग, मुंबई उपनगर, व पनवेल तालुक्याचा कांहीं भाग-एवढ्या मोठ्या प्रान्तास हें नांव दहाव्या किंवा तेराव्या शतकांत पडलें होतें. कोकण प्रान्तास फार पूर्वी अपरांत (उत्तर कोंकण) व वनवासी (दक्षिण कोंकण) अशीं नांवें होतीं. भिवंडीला पूर्वी ' बिंबस्थान ' म्हणत असत असें ' ठाणें जिल्ह्याचें वर्णन ' ह्या पुस्तकांत ज. बा. मोडक ह्यानीं म्हटलेलें आहे. (ठा. जि. व. पान ४७) बिंबानें केळवें–माहीम ही आपली राजधानी करून त्यास बिंबस्थान नांव दिलें असेंहि म्हणतात.

[उ. कों. प्रा. गं. शु. य. ब्रा. पा. १६]

७२ बेलापूरः—उत्तर साष्टी तालुक्यांत दक्षिण टोंकास खाडीच्या कांठीं हें ठिकाण आहे. येथें एक किल्ला होता. ता. २८–४–१७३८ रोजीं हें ठिकाण नारायण जोशी मुरूडकरांनीं घेतलें. ह्या किल्ल्यांत पेशव्यांची शिबंदी असे. व तेथें नारायण जोशी किल्लेदार असत. ह्याला बेलापूर उर्फ शहाबाद म्हणतात.

७३ बोळीजः—दांतीवऱ्याचे खाडीचा जो फांटा आंत येऊन दादराचे खाडीस मिळतो त्या फांट्याचे तोंडाशीं बोळींज वसई तालुक्यांतील एक बंदर आहे. हा गांव लहान आहे. बोळींज व गोखिरवे येथें आतां खाडीवर पूल बांधले आहेत.

भ

७४ भालः—कल्याण तालुक्यांत बोवामलंग सडकेजवळ हा गांव आहे. ह्याचेपुढें पालें गांव व त्याचेपुढें बाळा गांव आहे.

७५ भींवडोंगरी (भुईडोंगरी):—कल्याण तालुक्यांत ही डोंगरी आहे. ठाकुरली स्टेशन सोडल्यानंतर गाडी कल्याणचे स्टेशनांत पुलाखालून जाते त्या पुलाचे दक्षिण अंगास पुलला लागूनच ही डोंगरी आहे.

७६ भूपाळगडः—मध्य हिंदुस्थानांत–माळव्यांत–हें एक संस्थान आहे. भोपाळला बेगमचें राज्य आहे. जी. आय. पी. रेल्वेच्या इटारसी स्टेशनाकडून भूपाळला एक फांटा जातो. येथें फार मोठा किल्ला आहे व गांवही फार मोठें आहे. हें संस्थान नर्मदा नदीचें उत्तरेस आहे.

म

७७ मढः—साष्टी तालुक्यांत खाडीचे पश्चिमेस एक लहानसें बेट आहे. ह्या बेटांत दक्षिणेस मढ व उत्तरेस येरंगल हे दोन गांव आहेत. खारटणाच्या वर चढलें म्हणजे टेंकाडावर एक देऊळ आहे त्यांत हरबाई व हरडाई अशा दोन देवी आहेत. उत्तर अंगाची हरबाई व दक्षिण अंगाची हरडाई. हरबाई ही नाईकांची देवी आहे. टेकाडाचे वर पूर्व अंगास डोंगरावर चढले असतां मढचा किल्ला दिसतो. देवीच्या देउळाचे खालीं पश्चिमेस ' मढ ' गांव आहे. अंधेरीहून वेसाव्यास मोटारनें जाता येतें व पुढें तरींतून पार गेले असतां हें बेट लागतें.

७८ मनोर (मनोहर):—हा गांव माहीम तालुक्यांत आहे. ह्या ठिकाणीं मजबूत किल्ला होता. हा गांव वैतरणा नदीच्याकांठीं प्रसिद्ध असें बंदर आहे. ह्या ठिकाणाहून लांकडाचा फार मोठा व्यापार चालतो. भिंवडी वाडा ते पालघर अशा मार्गानें जाणारी सडक मनोरवरून जाते. स. १७३१ त येथें फार मोठी लढाई झाली. ता. २०-५-१७३७ रोजीं मनोर मराठ्यांनीं घेतलें.

७९ मरोळः—साष्टी तालुक्यांत वांद्याचेपुढें पारल्याचे पूर्वेस हा गांव आहे. हें स्थान बिंबराजांचे वेळेपासून प्रसिद्ध आहे. बखरीचेकाळीं हें स्थान फार बंदोबस्ताचें होतें. ह्या ठिकाणीं फिरंग्यांची तटबंदी होती. त्या माडीत पाद्री रहात असत. स. १७२२त ही माडी फोडण्याकरितां गंगाजी नाईक साष्टींत आले होते. फार पूर्वी मरोळ हा परगणा होता.

८० माझिवडेंः—ठाणें शहराचें उत्तर आंगास हा लहानसा गांव २।३ मैलांवर आहे.

८१ मांडविः—वसई तालुक्यांत आंबाडी–वसई सडकेवर पारोळच्या पुढें वसईच्या ईशान्येस वसईपासून सुमारे १५ मैलांवर हा किल्ला होता. जवळून तानसा नदी वाहते. त्यामुळें हें बंदर झालें आहे. मुंबईबेटांत मांडवी आहे ती निराळी.

८२ माणीकपुराः—वसईरोड स्टेशनावरून सडकेनें वसईकडे येत असतांना हा पहिल्यानें गांव लागतो. स. १७३७त येथें मराठ्यांनीं आपली फौजेची छावणी केली होती.

८३ मालाडः—बी. बी. सी. आय. रेल्वेवर मालाड हा गांव साष्टी तालुक्यांत आहे. हा गांव फार पुरातन असून तो देसायांना वतन म्हणून (बिंबकाळीं) दिलेला होता; तेव्हां मालाड परगणा होता. ह्या गांवाची वृत्ति अंताजी रघुनाथ कावळे यांच्या पूर्वजांना त्याच वेळीं मिळालेली होती. पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या मुख्य सभेचे–महासभेचे–अधिकारी (देसाई) येथेंच राहात असतात. एकेकाळीं ह्या ठिकाणीं पाठारे क्षत्रिय ज्ञातीची फार मोठी वस्ती होती. हल्लीं ती बरीच कमी झाली आहे. येथें पाटील व देसाई अशीं दोन प्रमुख घराणीं आहेत. बखरकालीं ह्या ठिकाणीं कृष्णाजी नाईक अणजूरकर हे पेशव्याचे वतीनें राहत व त्यांचे देखरेखीखालीं येथें दारुसामानाचा कारखाना काढण्यांत आला होता. (पे. द. रु. ३४ पत्र १०३) व चुन्याची भट्टीही घातली होती. (पे. द. रु. ३४ पत्र ३०) बिंबानें मालाड आपली राजधानी केली होती (उ. को. शु ग. ब्रा. पा. १६) 'मालाडचा सिंह' ह्या नांवानें संबोधले जाणारे व स्वातंत्र्याच्या लढ्यांत (सत्याग्रहांत) अपरिमित स्वार्थत्याग करून उडी घेणारे वीर भगवंतराव जनार्दन म्हात्रे बी. ए., हे पाठारे क्षत्रिय ज्ञातीचे असून येथेंच राहतात.

८४ माहीमः—(केळवें) माहीम तालुक्यांत पालघर पासून ५ मैलांवर हा गांव आहे. पालघराहून येथें सडक जाते. येथें एक लहानसा किल्ला आहे. हें ठिकाण समुद्राकिनारीं असून येथें फिरंग्याचे ६० शिपाई व १५ जेजाला असत. हें ठिकाण मराठ्यांनीं इ. स. १७३९ चे जानेवारींत जिंकून घेतलें. माहीमच्या दोन बाजूस खाडी आहे. 'समुद्र किनाऱ्याची जागा दीड कोसावर आहे.' (पे. द. रु. १६ पत्र ७७) हा किल्ला मूळ १५३२ त फिरंग्यानीं बांधला. मुंबई बेटांत वांद्यासमोरही एक माहीम आहे तें निराळें.

८५ माहोली (माहुली):—शहापूर स्टेशनचे वायव्येस माहुली नांवाचा डोंगर (२००० फूट उंच) आहे. त्या डोंगरावर माहुली नांवाचा किल्ला आहे. माहुली हें त्याकाळीं पेशव्यांचें एक मुख्य ठिकाण होतें. ह्याठिकाणीं पेशव्यांचें सैन्य आणण्यास शिवजी नाईक प्रभृति मंडळी गेली होती.

८६ माळवा:—नर्मदा नदीचे उत्तरेकडील प्रान्तास माळवा म्हणतात. ह्यांत इंदोर, रतलाम, बुंदेलखंड वगैरे संस्थानें आहेत. पेशव्यांच्या काळीं ह्या भागास फार महत्व प्राप्त झालें होतें. पहिल्या बाजीरावानें ह्या प्रान्तावर स्वाऱ्या करून हा आपल्या ताब्यांत आणला होता.

८७ मुडदें (मुर्धे):—साष्टी तालुक्यांत खाडीच्या एका लहान फाट्यावर आंत हा गांव आहे. ह्यास नेहमीं राई-मुरधें म्हणतात. भाईंदरकडून उतनकडे जाणारी सडक ह्या गांवावरून जाते. जवळच राई गांव आहे.

८८ मुंबई बेट:—हल्लीं एकच शहर असें दिसणाऱ्या मुंबई शहराचीं पूर्वीं निरनिराळीं सहा स्वतंत्र बेटें होतीं. इ. स. १६६४ त पोर्तुगालच्या राजानें इंग्लंडच्या चार्लसराजास मुलीकरितां हें बेट आंदण दिलें होतें. हल्लीं मुंबईची वस्ती शींव व वांद्यापर्यंत आली असून तें एकच शहर बनलें आहे. हें बेट जी. आय. पी. व बी. बी. रेल्वेच्या फांट्यांनीं साष्टी बेटास जोडलें गेलें आहे.

८९ मोरेश्वर:—हें श्रीसिद्धिविनायकाचें महास्थान पुण्यापासून १५।१६ कोसांवर सुपें तालुक्यांत आहे. ह्यास पांडेश्वर–मोरगांव म्हणतात, तें एक यात्रेचें ठिकाण आहे.

य

९० येकथडी:—ठाण्याची खाडी व वसईची खाडी ह्या दोन खाड्यांच्या पलीकडील भिवंडी व कल्याण तालुक्यांतील मुलखास उद्देशून येकथडी असें येथें म्हटलेले असावें असें वाटतें. येक=एक, थडी=किनारा. एका बाजूच्या किनाऱ्यावरील मुलुख तो येकथडीचा मुलुख.

र

९१ राजमाची:—कर्जत स्टेशनजवळ ढाक किल्ला आहे. सह्याद्रीची मुख्य रांग व हा किल्ला ह्यांत खळगा आहे. ढाक व खंडाळें ह्यांतल्या खिंडीस कातळदरा म्हणतात. ह्या दऱ्याजवळ कोंडाण्याचीं लेणीं असून 'कोंकण दरवाजा' घाटहि आहे. ह्या मोठ्या खिंडीच्या पलीकडे दुहेरी तटाचा राजमाची नांवाचा डोंगरी किल्ला बोरघाटाजवळ आहे. त्याचे दक्षिणेस नागफणी उर्फ 'डयूकचें नाक' नांवाचा डोंगर आहे. पेशव्यांचे सैन्य आणण्यास कृष्णाजी नाईक प्रभृती मंडळी ह्याच ठिकाणीं पुढें गेलीं होती.

९२ राजावळि:—वसई तालुक्यांत खाडीच्या किनाऱ्यावर पूर्व अंगास हा गांव आहे. गोखिरवें व उमेळें ह्यांच्यामध्यें हा गांव आहे. ह्या ठिकाणीं ओहोटीच्यावेळीं उतार होतो, म्हणून त्या ठिकाणास राजावळीचा तारा असें म्हणतात.

९३ रामनगर:—धरमपूर संस्थानांतील एक प्रांत. पूर्वीं हा प्रांत जव्हारच्या राजाचे अमलाखालीं होता. रामनगर हें गांवही आहे.

९४ रेवस:—अलिबाग तालुक्यांत नागोठण्याचे खाडीचे तोंडाशीं हें बंदर आहे. येथून मोटारनें अलिबागला जातां येतें. ह्या ठिकाणीं जाणाऱ्या येणाऱ्या आगबोटी थांबतात. रेवस व रेवदंडा ह्या दोन बंदरांतून मुख्यत: अलिबाग तालुक्यांचा व्यापार बाहेर चालतो.

ल

९५ लोनाड:—भिंवडी तालुक्यांत हें गांव आहे. बाळाजी बाजीरावानीं हें गांव चासच्या कृष्णराव जोशी यांस इनाम दिलेले असून हल्लीं ते त्यांच्याच वंशजाकडे आहे. हल्लीं हे इनामदार कल्याणास राहातात. बाजीराव बल्लाळच्या शालकाचे ते वंशज आहेत. गंगाजी नाईक अणजूराहून निर्वासित झाल्यावर ह्याच ठिकाणीं त्यांनीं आपलें कुटुंब ठेविलें होतें. त्या ठिकाणी हल्लीं पाठारे क्षत्रिय ज्ञातीचीं मुळींच वस्ती नाहीं. लोनाड येथें एक सन १२०३ तला शिलालेख बाबगांव दान दिल्याबद्दलचा सांपडला आहे त्यावरून हें गांव फार पुरातन आहे हें सिद्ध होतें (हे. च. पा. २३०)

व

९६ वज्रयोगिणि (वज्राबाई):—भिंवडीपासून उत्तरेला वाडा सडक जाते त्या सडकेच्या १२ व्या मैलावर वसई–आंबाडी सडक सुरू होते. त्या सडकेवर ५ व्या मैलावर हें ठिकाण आहे. खालीं पायथ्याशीं गांव आहे व उंच टेकडीवर वज्राबाईचें देऊळ आहे. चिमाजिआपांनीं वसईच्या मोहीमेच्या वेळीं देवीस नवस केला होता त्याप्रमाणें त्यांनीं हें उत्तम पायऱ्या असलेलें तटबंदीचें देऊळ बांधलेलें आहे. जवळच अकलोली व गणेशपुरी उर्फ भिवाली येथें पक्कीं बांधलेलीं गरम पाण्याचीं कुंडें आहेत. इतरहि बऱ्याच ठिकाणीं तानसा नदीच्या पात्रांत सर्वत्र हीं उन्हाळीं आहेत, हें देवस्थान गीरीपंथाच्या गोसाव्याकडे आहे. देवीला ४ गांवें इनाम आहेत. यात्रेच्या वेळचें भाड्याचें फार मोठें उत्पन्न आहे. पूर्वीं अणजूर येथील इनामदारांकडूनही कांहीं नक्त नेमणूक होती. येथें धर्मशाळा आहेत. चैत्र वद्य अमावास्येस येथें मोठी यात्रा भरते. टेकडीच्या माथ्यावर गोदडीबोवांची समाधि आहे.

९७ वसई:—वसई हें साष्टी व मुंबई ह्यांच्या सारखें एक बेट होतें. पण सोपारें, गोखिरवे इत्यादि ठिकाणीं पूल झाल्यामुळें ते आतां बेट राहिलें नाहीं. त्यांतले वसई हें मुख्य

स्थान होय. बिंबानें स. १२९५ त वसई घेतली [उ. को. शु. य. ब्रा. पा .१६] शके ९९१ (स. १०६९) तला एक ताम्रपट आहे, त्यावरून वसईच्या पुरातनत्वाबद्दल खात्री पटते. हा गांव तालुक्याचें ठिकाण आहे. खाडीच्या तोंडाशीं हा वसईचा पाण-किल्ला आहे ह्याचा घेर जवळजवळ २ मैलांचा होईल. हा किल्ला फार मोठा आहे. त्याच्या आंत एक लहानसा दुसरा किल्ला आहे. किल्ल्यांत फिरंग्याच्या देवळांचे व इमारतींचे अव-शेष अद्यापि पुष्कळ आहेत. पागाच्या जागा आहेत. उंच बुरुज आहेत. व तटबंदी बऱ्याच ठिकाणीं कायम आहे. टेहळणीचा बुरुजही अद्याप साफ पडलेला नाहीं. किल्ल्यांत एक शंकराचें, एक देवीचें व एक मारुतीचें अशीं तीन देवळें आहेत. जागोंजाग विहिरी व तळीं आहेत. एक जुना लांब खिळे असलेला दरवाजा पूर्वेस बंदराकडे आहे. हल्लीं त्या ठिकाणीं वसईचें कस्टम हाऊस आहे. त्या दरवाज्यास समुद्र-दरवाजा (Sea gate) म्हणतात व पश्चिमेस तसाच दरवाजा आहे त्यास भू-दरवाजा (Land gate) म्हणतात. गंगाजी नाईकांना नेहमीं मदत करणारी गुजाबाई सुतारीण सुतार आळींत राहत होती. ह्याठिकाणीं पाठारे क्षत्रिय ज्ञातीचीं वस्ती पूर्वकाळीं फार मोठी होती. ज्याठिकाणीं पाठारे क्षत्रिय ज्ञातीची वस्ती हल्लीं थोडीबहुत आहे त्याठिकाणास सुतार आळी असें म्हणतात. रायकर, साहानी, दांडेकर, पाठारे इत्यादि घराणीं वसईकर होत. वसईस मोठमोठे पडाव बांधले जातात. अखिल पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या अभ्युदयार्थ सुमारें दीड लक्ष रुपयांचा वनमाळी-शिक्षण-फंड नांवाचा निधी स्थापून व क्षात्रैक्य समाजास आपलें तन मन धनही अर्पून अमर होणारे प. वा. **जनार्दन राघोबा वनमाळी** हे पाठारे क्षत्रिय ज्ञातीचे गृहस्थ मूळचे वसईकरच होत.

९८ **वसत**:—हें गांव कल्याण तालुक्यांत अंबरनाथजवळ पूर्वेस आहे. ह्यास वसत-शेलवली असें म्हणतात,

९९ **वांदरें** (वांद्रें):—ह्यास बखरकालीं वांनरें असें ही म्हणत. हें पूर्वीचें बेट होय. खाडीच्या तोंडाशींच हा गांव वसलेला आहे. रेल्वेनें व सडकेनें हल्लीं हें ठिकाण मुंबईस जोडलें आहे. बी. बी. सी. आय. रेल्वेचे हें एक जंक्शन स्टेशन आहे. जि. आय पी. रेल्वेचा एक फांटा येथें येऊन मिळतो. लढाईच्याकाळीं ह्याला फार मोठें महत्व होतें. वांद्रे हा कसबा होता. 'साऱ्या साष्टीचें नाक हेंच असें साऱ्या साष्टीची जुंज येथें आहे' असें ह्या वांद्र्याचें महत्व होतें. (पे. द. रु. ३४ पत्र २८) गंगाजी नाईकांचे पूर्वज वांद्र्याहून अणजूरास आले. वांद्र्याची एक पाखाडी नाईकांना इनाम होती. त्यावेळीं पाठारे क्षत्रिय ज्ञातीची फार मोठीं वस्ती येथें होती. त्यावेळीं बरेचसें लोक फिरंग्यांनीं बाटविले व बाकीचे परागंदा झाले. आतां पाठारे क्षत्रिय ज्ञातीची १।२ च कुटुंबें येथें आहेत. हें ठिकाण १७३७ त पेशव्यांनीं घेतलें.

१०० वाघटाकी:—कामणचे डोंगरांत हे टाकें उर्फ पाण्याचा हौद बांधलेला आहे.

१०१ वेसावें:—वांद्र्याच्या उत्तरेस पांच मैलांवर हें गांव साष्टी बेटांत खाडीच्या किनाऱ्यावर आहे. बि. बि. लाईनच्या अंधेरी स्टेशनवरून वेसाव्यास सडक जाते. ह्याठिकाणीं कोळी लोकांची फार मोठी वस्ती आहे. महर्षी दादाभाई नौरोज़ींचें हें रहाण्याचें ठिकाण होतें. पूर्वी येथें तटबंदीचा किल्ला होता. वेसावेचे कोळी लोक दर्यावर्दीपणांत फार वाकब आहेत. वांदरें वेसावें, धारावी ह्या बंदरांना त्यावेळीं फार मोठें महत्त्व होतें. हें ठिकाण ७ जिल्काद रोजीं खंडोजी माणकरांनीं घेतलें (स. १७३७). वेसाव्याजवळ जुहू येथें पाठारे क्षत्रिय ज्ञातीचे श्री. कृष्णराव रघुनाथ राणे ('बिन्नाख्यानं' कर्त्यांचे चिरंजीव) यांचें एक पुराण-वस्तुसंग्रहालय (म्युझियम) आहे.

श

१०२ श्रीरंगपट्टण:—म्हैसूर संस्थानांत हें ठिकाण आहे. हा सर्व प्रांत त्यावेळीं कर्नाटकांत मोडत होता. निजामउल्मुल्काचे ताब्यांतून हा प्रांत सोडविण्याकरितां बाजीरावांनीं स्वाऱ्या केल्या होत्या. टिपू सुलतानाचे वेळीं श्रीरंगपट्टण म्हैसूरची राजधानी होती. मुंबई इलाख्याचे दक्षिणेस हें संस्थान आहे.

स

१०३ सहरोली (सरवली);—भिवंडी तालुक्यांत कल्याण सडकेचे उत्तरेस ४।५ मैलांवर हा गांव आहे. बदलापुराजवळही सावरोळी गांव आहे. पण तो गांव बखरींतला गांव नव्हे.

१०४ सातारा:—हें जिल्ह्याचें ठिकाण आहे. एस्. एम्. रेल्वेच्या सातारा स्टेशनापासून १२ मैलावर हा गांव आहे. ही श्रीशाहूमहाराजांची राजधानी होती. येथें छत्रपतींचा वाडा आहे. साताऱ्याचेजवळ श्रीसमर्थांची परळी उर्फ सज्जनगड आहे. समर्थांची तेथें गडावर समाधी आहे. साताराराडवरून येतांना पूर्व अंगास जरांडेश्वराचें—श्री मारुतिरायाचें—जाज्वल्य स्थान जरांड्या डोंगरावर आहे.

१०५ सायवान (साईवान;)—हा पूर्वी परगणा होता. आंबाडी वसई सडकेवर वज्रेश्वरीच्या पुढें ४।५ मैलावर तानसा नदीचे 'ईशान्येस' हा गांव आहे. हे तटबंदींचें ठिकाण होतें. मराठ्यांच्यावेळीं हा एक सुभा होता.

१०६ सासष्टगांव:—हें हल्लीचें साष्टिबेट होय. ह्याला पूर्वी षट्षष्टि म्हणत असत. षट्-षष्टि—सासष्टि असें हें नांव ह्या बेटास मिळालें आहे. सासष्ट—सहासष्ट गांवें म्हणून साष्टी होय. ह्या बेटांतलें श्रीस्थानक उर्फ ठाणें हें फार प्राचीन ठिकाण आहे. ह्या ठाणें बंदरांतून इजिप्त, इराण इत्यादि पाश्चिमात्य देशाबरोबर ह्या बेटांतला व्यापार फार प्राचीनकाळीं चालत असे,

बखरींतील किल्ले

तारापूर

शिरगांव

— मार्ष्यांचा बखर.

Photos by. Vasantrao D. Mhatre.

ह्या बेटाचे उत्तरेस वसईची खाडी व दक्षिणेस ठाण्याची खाडी असून त्या ठाण्याचे पुढें बाळखूमजवळ एकमेकास मिळून कल्याणाकडे जातात. सासष्ट उर्फ साष्टी बेटांत फिरंग्यानीं भयंकर धर्मच्छल व जुलूम केला. त्याप्रमाणें व त्याचवेळीं गोवें प्रांतांतल्याही सासष्ट उर्फ साष्टी बेटांत त्यानीं भयंकर जुलूम व धर्मच्छल केला. हा एक योगायोगच होय. पण गोव्यांतल्या त्या साष्टींत मात्र कोणी गंगाजी नाईक निघाला नाहीं व फिरंग्यांचें त्या साष्टी-तील राज्यही नष्ट झालें नाहीं हा मात्र विपरीत योग होय.

१०७ **साळसुबें** (सोळसुंभें):—उंबरगांवपेक्षांत खत्तलवाड्याच्या उत्तरेस हा गांव आहे.

१०८ **सिरगांव**:—माहीम तालुक्यांत हा गांव आहे. ह्याठिकाणीं मजबूद किल्ला होता. ठाण्याचे किल्ल्यापेक्षांहि सवाईनें उंच असे चार बुरुज माडी एक व देऊळ एक असलेला हा किल्ला आहे. (पे. द. रु. १६ प. ८१) ह्या गावापासून १॥ मैलावर समुद्र आहे. दक्षिणेस माहीम ३ मैलावर व उत्तरेस तारापूर ८ मैलावर आहे. ह्या किल्ल्याच्या तीन बाजूस आगर व एक बाजूस पश्चिमेकडे समुद्र आहे (पे. द. रु. १६ पत्र. ८१) माहीम तालुक्यांत अशेरी व तारापूर ह्यांच्या मध्यावर दुसरें एक निराळेंच शिरगांव आहे तें हें नव्हे.

१०९ **हिंगणगांव** (हिंगणबर्डी):—हा गांव पुणें जिल्ह्यांत तर्फ पाटस सुपें उर्फ भीमथडी तालुक्यांत आहे. येथें दमाजी थोरात नांवाच्या धनगर पुंडानें गढी उर्फ किल्ला बांधला होता. तो बाळाजी विश्वनाथानीं मोडून धुळीस मिळविला.

कठीण शब्दांचे अर्थ.

आरा—सैन्याचे रक्षणार्थ उभारलेला लांकडाचा तात्पुरता कोट.

आलाड—अलीकडे.

आशिरवाद—शाप.

उडीनें—तातडीनें, घाईनें.

उपरात, उपरांत—नंतर.

कचमोहरे—कचखाऊ, माघार घेणारे.

कटक—सैन्य, फौज.

कबिला—कुटुंब, बायका माणसें.

कानु—कायदा, नियम.

कामास आले—लढाईंत पडले.

किर्त—कीर्ति.

कुबुद्ध—दुर्बुद्धि, दुर्वासना.

कृत्रिम—कपट.

कैफसरा—कैफ आणणारी वस्तु, अफू.

कौउल, कौल—१ अभय, अभयपत्र, आश्वासनपत्र. २ ओलीस, परवाना, सुरक्षितपणें जाण्यास अभयपत्र. ३ आज्ञापत्र, हुकुम, लेख.

कौल मागणें—तहाच्या वाटाघाटीकरितां अवसर मागणें.

खजिना—एकंदर लढाईचें सर्व साहित्य.

खटलें—कुटुंब.

खटे—खट्टु, नाराज.

खळाळा—हाहाःकार. भयंकर भीति.

खुडकिली—नाहींशी झाली.

खुशाल—खुशी, आनंदित.

खोप—१ कोपरा, जागा. २ बाजूचें लहान घर

गडगा—दगडाचा ढीग.

गडदा—(गडता) सोल्जरांचे हत्यार, एक प्रकारची बंदुक. **गाडद**—(Guards) बंदुकी घेतलेले शिपाई.

गरनाळा—एक प्रकारची लहान तोफ.

गलाठा—गोंगाट, खराबी, डबघई, गाळण, नुकसानी.

गलिम—शत्रु.

गुजारतिनें—मध्यस्तीनें, मार्फतीनें

चढे घोड्यानसि (शि)—घोड्यावर चढलेल्या स्थितींत, त्याच पावलीं, घोड्यावरून न उतरता, एकदाहीं दम घेतल्याशिवाय, एका धावेंसरसे.

जंग्या—तोफा मारण्याकरितां तटाला ठेवलेलीं मोकळीं भोकें, Loophole.

जिनबंदि—स्वारीकरितां घोड्यावर जिन बांधणें.

जुमस—भीति, जरब.

जेरबंद—घोड्याला बांधलेले बंद

झुंझ, जुंझ—युद्ध.

झाप—झावळी, झावळ्यांचें झोपडें.

ढिग—संभार, जमाव, समुदाय.

तटे—बांबूच्या कामट्याचे तट्टे, खपेटे.

तराफा—नदींतून माणसें उतरण्याकरितां मोठाली लांकडें बांधून केलेली जुळी.

तव—तेव्हां.

तवकल—१ महत्कार्य, आश्चर्यकारक काम. २ भरंवसा.

तळ—मुकाम, मुकामाची जागा.

तमाम—सर्व.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ क्र.
सं.
ता.

तारा—दोन जुट्टं उर्फ बेटें जोडणारा व ओहोटीच्या वेळीं कोरडा पडणारा जमीनीचा पट्टा.

तिकट—तेढ.

थागा, थांगा—मुक्कामाची जाँगा.

थोपोन—थांबवून.

दबा—१ लपून बसण्याची जागा, २ लपून बसणें.

दमामा, दमदमा—१ लढाईकरितां बांधलेली तात्पुरती लाकडाची माच उर्फ बुरुज. २ मातीचे किंवा रेतींच्या पोत्यांचे मोठमोठाले धक्के किंवा बुरुज.

दर्कार—पर्वा, जरूरी.

दर्या, दऱ्यात—समुद्र, समुद्रांत.

दस्त करणें—ताब्यांत घेणें, कैदी करणें, जिवंत धरणें.

दाहाड—डोह.

दिलासा, दिलासाय—मनसाफी, खातरजमा, आश्वासन, दिलसफाई.

दुइ—दुजेंपण, भांडण, द्वैत, दुजाभाव.

दुसाळी—दुपाखी, दुमाळी.

देशनाडगौडी—देशांतील उत्पन्नावरचें वतन. नाडगौडी—हें शेंकडा ३½ रुपया प्रमाणें, नाड-देश, गौड-पाटील.

धाडा—[?]

धारकरि—तरवारीनें युद्ध करणारे लोक.

नवि—नवीन.

नविकानु—नवीन कायदा.

नाडा—दोरी, लंगोटाची दोरी.

निपदरि—निष्कांचन, निराधार, उघडा, विवस्त्र.

निर्धार—निश्चय.

निशा—खात्री.

निसूर—स्वस्थपणें, निर्धास्तपणें.

परवारि—वाटाड्या, हेर.

पलाड—पलीकडे.

प्रस्तान—प्रयाण

पाइकी—शिपाईगिरी.

पाइचे—पायदळ.

पाणबुरुज—किल्ल्याचा पाण्यांत बांधलेला बुरुज.

पायउतारा—पायीं.

पाहार—प्रहर.

पु करणें, पुढें करणें—होणारी गोष्ट, जें पुढें व्हावयाचें तें.

पैगम, पैगाम—प्रयत्न.

फाजिनें—वतनें, खोती वतनें.

फिरंगाण—फिरंगीराज्य.

बतेले—मोठा पडाव, बुतेला.

बरेल—Barrel पिंप.

बरे वजेने—उत्तम रीतीनें, चांगल्या मार्गानें. वजे—मार्ग, रीति.

बरकंदाज—निशाणवाले, तिरंदाज, चापाच्या बंदुकी बाळगणारे लोक.

ब्रह्मस्व—कर्ज.

बाजे—निरनिराळे, इतर, बाजारबुणगे.

बाहल—इनाम, बक्षिस.

बाहि—बाहु, हात.

बाळंट—कुमांड, थोतांड.

बिगार—वेठ.

बिनि—नाक, आघाडी, सैन्याची पुढची बाजू.

बोंब—आरडाओरड.

भरड---१ भुरळ, दिशाभूल. २ जोराची दौड.

भरले भाणियावरुन---वाढलेल्या भरलेल्या जेवणावरून.

भरले—आयतें, भरलेलें.

भाणें---जेवणाचें वाढलेलें पात्र.

भाकक्रिया—आणाशपथा, शपथविधि, वचन देणें.

भाक---वचन; **क्रिया**—शपथ, करार, आणभाकं.

भार---जमाव.

भाल---मोकळी उंचवट्याची माळरानाची जागा.

भुजा—हात.

मनसुबा [भा]---बेत, विचार.

मर्दानकि---बाहादुरी, मर्दुमकी.

माडी---कोटरें, लहान गढी, मजबूत घर.

मांगे---त्यानंतर, मागाहून.

माग—तपास, टेहेळणी, टेहेळणीदार, गुप्तवाट.

मागिलेकडे---मागील बाजूकडे.

मुईम---मोहीम.

मुकबला—१ भेट, २ सामना, लढाई.

मुडा—पंचवीस मण भाताचा एक मुडा.

मृत---मरण, मृत्यु.

मेजाचि---खुणेची, मापाचि.

मेट---चौकी.

मेढा---१ तात्पुरत्या आश्रयाकरितां, झाडांची, लाकडांची, डाभांची बनविलेली, मजबूत जागा, २ वासें, लांकडें यांची भिंत-कोट.

मोहरे—१ पुढें, आंगावर. २ प्यादा. मोहरेकर्णे-पुढें करणें.

या—अथवा, आणि, ह्याशिवाय.

येकथडि---[थडी-बाजू, किनारा.] एका बाजूचा मुलुख.

रव---१ सैन्य, फौजेची आघाडीची तुकडी, २ रांग.

राउत—शिपाई, घोडेस्वार.

राखले---रोखले, अडकाविले.

रुका—रुपाया.

रेनोळ---रिकूट, लढवय्ये, युरोपियन शिपाई.

रोखे—रोखाने

लगट—घाई.

लंघनि—उपवासि.

लादण्या—बुरुजाचे संरक्षणार्थ जवळच केलेले मातीचे, चिखलाचे ढीग.

लाग—सुरक्षित जागा, ठिकाण. **लागे**-टेहळणीदार.

लागमाग—१ गुप्त व सुरक्षित जागांचा पत्ता, शत्रूंच्या स्थानाची माहिती. २ तशी माहिती देणारे ते लागेमागे. ३ गलबतें लागण्याच्या समुद्रांतील जागा व मार्ग.

लेस—जर्मानदोस्त. [?] ओस [?]

वसता (बसता)—ठेंगणा.

वळित केलें—उध्वस्त केलें. [?]

वाडा, वाडी—१ जागा, वस्तीची जागा, लहान गांव पाडा, २ घर.

वाडे---[वाड-तुकडा] लाकडाचे तुकडे.

विजिस [बिनीस]---आघाडीस.

विजूर, विजुर—Viceroy. मुख्य अंमलदार. गव्हरनर.

विरोध—विरुद्धपण, तफावत.

वोळीत—आळींत.

शाइदि, साहिदी—१ साक्षीदार. २ साक्ष.

शाहि—फौज.

शाला [साला.]—मेहुणा, बायकोचा भाऊ.

शिळोत्रे—वतनें.

श्टुंग—सुरुंग.

षैद—बेकार.

सत्यभृत—खरोखर, ठरलेलें.

संध—संधि, अवसर.

सफेल—किल्ल्याच्या तटाची गच्ची.

समत—संमति, होकार.

समधियास—सगळ्यांना, (समद्यांना).

सर्यत—बहादुरी, शिताफी, शर्थ.

सराईस—सुगीच्या दिवसास, पीक काढितो त्यावेळीं.

सलतनत—चतुरंग दळ, फौजफांटा.

सापेक्ष—हुबेहुब, खरोखर.

साहित्य—१ सैन्याची व इतर मदत, मदतीचीं माणसें, सामान. २ जुळवाजुळव, जमविणें.

सुखियावर—सुखिया म्हणजे ओहोटीच्या वेळीं पाणी नसलेली खाडींतली जागा उर्फ भाट; त्या ठिकाणीं.

सुभे—सुभेदार, सरदार.

सेवाधर्म—सेवा करण्याचा धर्म–युद्धकर्म.

सोलदाद—Soldier (Soldad) फिरंग्यांचे सैनिक.

हटनिग्रह—दुराग्रह, त्रागा.

हमि भरुं—खात्री देऊं.

हयास—हैरणीस, मट्टयास.

हवे—वाटाडे, पाळतीदार, भेदे, माहितगार, मार्गदर्शक.

हातघाय—हातलढाई; तरवारीची लढाई.

हातरे—हत्यारें.

हाल—सर्व. हाशमनिश–शिबंदि, शरीरसंरक्षक वगैरे शिपाई लोकांची हजेरी व हिशेब ठेवणारा.

हिरिच्या—१ स्वाऱ्या, उचली, २ झपाट्याचे हल्ले.

हुके—१ दारुचे गोळे, २ बंदुका.

होन, होवोन—हून, कडून.

महालय
B38

आणखी कांहीं माहिती

गांवें वगैरेंचीं

पुरी किंवा पुरीया:—(ब. पा. ४१) म्हणजे माणिकपुरा.

चरई (चरी):—अलिबाग तालुक्यांत कनकेश्वर पर्वताच्या दक्षिणेस हा गांव आहे व उत्तरेस रेवस गांव आहे.

बाभई (बोरीवली):—मालाडचे पुढें उत्तर साष्टी तालुक्यांत वि. बि. अँड सी. आय रेल्वेवर हा गांव आहे.

आरनाळा:—किल्ल्यावरील टीपेंत दिलेल्या दुसऱ्या श्लोकासंबंधानें तपस्वी रामजी लक्ष्मण घरत यांचेकडून आलेलें स्पष्टीकरण:—"अंक ९ बाण ५ रध ६ चंद्र १ शकातें १ या ओळीच्या खालीं श्लोकाच्या तीन ओळी आहेत. तेव्हां वरील ओळ श्लोकाचा प्रथम चरण 'अंकबाण रसचंद्र शकातें' असा आहे. पूर्वीच्या ग्रंथांत शक अंकांत न देतां शब्दांत देत. ह्या शब्दावरून अंक जुळवावयाचे असतात. अंक=९, बाण=५, रध=६, चंद्र= १ याप्रमाणें अंक धरून ते उजवीकडून डावीकडे मांडावयाचे असतात. म्हणजे प्रथम. १, त्याकर ६, त्यानंतर ५, व शेवटीं ९ म्हणजे हा शक १६५९ येतो. (अंकानां वामतो गतिः ।) बखरींतील टीपेंत १७ शें पुढील सन १७३७ असा आहे. तो सन बरोबर जुळतो."

शब्दांचे व वाक्यांचे अर्थ

अनाज—अन्न.

कटोरा—लोटा.

रवेरा—(रवेस) सैन्यास, सैन्याचे रांगेस.

रुका—रुपया.

वगर—शिवाय इतरत्र.

हातीं—हस्ते, करवीं, हातून.

काकड दाहाडचे पाणी चालता घेऊन—(ब. पा. ४०) सैन्य चालत असतांना काकड डोहांतून पाणी घेऊन.

जुमस खात नाहीं—(ब. पा. ४६) धास्ती धरीत नाहीं, धास्तीनें माघार घेत नाहीं.

तेथें ह्यांई काईं—(ब. पा. २८) (ह्यांई--स्थायी) तेथें ईलाज काय ?

रेनोळाच्या गड्या----(ब. पा. ४५) हल्यास तयार झालेल्या घोडेस्वार सैनिकांच्या रांगा.

वसईच्या धर्मयुद्धांतील स्थलांचा

नकाशा

इ. स. १७१८ ते १७४०



जमाडींचा मोर्च्यास जाण्याचा मार्ग.
बंदाहून साष्टींत सैन्य आल्याचा मार्ग.
माहुलीहून वसईस सैन्य आल्याचा मार्ग
राजाभाऊहून ठाणे शहरावर सैन्य आल्याचा मार्ग
किल्ले
गांव
मोठे गांव
रस्ता
खाडी
नदी
डोंगर
रेल्वे लाईन
तलाव

मैलांचे प्रमाण

इ-साहाय्य -श्रीकृष्ण पाटील
अंधेरी, २२ मे २०१५